IRBK-0100242

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय चरित्र

दा क्र २४२

IRBK-0100242

दा.क्र. २४२

[redacted] २४२

चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

8 NOV 1979

ग्रं.८२

*( In Memoriam. )*

# THE LATE Drs. KANE.

## ( FATHER AND SONS )

BEING

SHORT SKETCHES OF THE INSPIRING LIVES OF THE THREE WORTHIES.

---

**Written respectively by (1) the late Dr. S. W. Kane (2) Mr. D. G. Padhye and Mr. K. K. Lele and (3) Mr. V. G. Nene.**

AND

Printed and published as desired by and on behalf of the late Mr. G. N. Kane, pleader, Amraoti (Berar) and his wife Mrs. P. Kane

BY

ANANT ATMARAM MORAMKAR.

"Shree Laxmi-Narayan Press," 402, Thakurdwar,
BOMBAY No. 2

---

**August 1918.**

---

**Price 12 Annas.**

( सादर स्मरणार्थ )

# कै. वा. डाक्टर काणे
## ( पिता व पुत्रद्वय )

यांचीं

# बोधप्रद अल्प चरित्रें.

अनुक्रमें (१) कै. डा. स. वा. काणे, (२) प्रि. दा. ग. पाध्ये,
व रा. रा. का. कृ. लेले, आणि (३) रा. रा.
वि. ग. नेने यांनीं लिहिलीं;

तीं

**प. वा. गो. ना. काणे, वकील उमरावती (वऱ्हाड )**
व त्यांच्या पत्नी मिसेस **पी. काणे**
यांच्या इच्छानुसार
व
त्यांच्या वतीनें

IRBK-0100242

IRBK-0100242

अनंत आत्माराम मोरमकर यांनीं,
४०२, ठाकुरद्वार–मुंबई, येथें छापून प्रसिद्ध केलें.

आगष्ट १९१८.

किंमत १२ आणे.

हें पुस्तक कृष्णराव सखाराम पाटकर यांनी श्रीलक्ष्मीनारायण
छापखाना ४०२ ठाकुरद्वार, मुंबई येथें छापले
व
अनंत आत्माराम मोरमकर यांनीं ४०२ ठाकुरद्वार,
मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... | १--७ |
| डा. वामन गोपाळ काणे यांचें चरित्र ... ... | १-१०९ |
| डा. सदाशिव वामन काणे यांचें चरित्र आणि चारित्र्य ( प्रि. दा. ग. पाध्ये यांच्या इंग्रजी लेखाचा रा. रा. का. कृ. लेलेकृत मराठी अनुवाद ) ... ... ... | १११-१९२ |
| डॉ. काशीनाथ वामन काणे यांचें रा. रा. विष्णु गणेश नेने कृत पद्यात्मक चरित्र. ... | १--६० |
| डॉ. सदाशिव वामन काणे यांचे स्मरणार्थ मुंबईंत भरलेल्या जाहीर हिंदुसभेंत प्रि. दा.ग. पाध्ये यांनीं वाचलेला इंग्रजी लेख व सभेची हकीगत. ... ... ... | १--३२ |



गोविंदराव काणे.



गौतमराव केशव.

# प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेला एक तऱ्हेचें शोकपर्यवसायी कथेचें स्वरूप आलेलें आहे. त्यांत समाविष्ट झालेलीं तीन सत्पुरुषांचीं चरित्रें संकलित करून छापून प्रसिद्ध करण्याचा ज्यांनीं उपक्रम केला ते माझे मित्र व उमरावतीचे प्रसिद्ध वकील, रा. रा. गोविंद नारायण काणे, ह्यांस योजिलेलें कार्य समाप्त होण्याचे पूर्वींच परमेश्वराचें बोलावणें आलें. प. वा. गोविंदराव हे चरित्रनायकांचे अगदीं निकटचे आप्त होते व त्यांनीं प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करावयाचें काम हें एक आपलें पवित्र कर्तव्य व प्रेमाचें ऋणविमोचन होय अशा भावनेनें तें हातांत घेतलें होतें. आपल्या हयातींत हें काम तडीस जाणार नाहीं कीं काय असा संदेह त्यांस वाटत असून तो एकदां त्यांनीं पत्रांतही मजला प्रदर्शित करून दाखविला होता. ईश्वराचे इच्छेनें तो संदेह सार्थ ठरला. त्याच्या इच्छेपुढें सर्वांनीं शिर नमविलेंच पाहिजे. तथापि दुःखांत समाधानाची गोष्ट ही कीं आपल्या प्रियकर पतींनीं सद्भावानें आरंभिलेलें हें कार्य शेवटास नेण्याचा दृढ निश्चय गोविंदरावजींच्या पत्नी मिसेस पी. काणे यांनीं, आर्यस्त्रियांच्या अनादि काळापासून सिद्ध

झालेल्या धर्मास अनुरूप असा केला. त्या निश्चयाचें फळ प्रस्तुत पुस्तक होय. ज्यांनीं त्याचा उपक्रम केला त्या गोविंद-रावजींच्या जीवनचरित्राची अल्प हकीकत पुढें दिली आहे.

माझ्या समजुतीनें प्रस्तुत पुस्तकानें आधुनिक मराठी वाङ्मयांत फार महत्वाची भर पडेल. पुस्तक जितकें मनोवेधक तितकेंच आबालवृद्धांसही बोधप्रद होईल. तीन्ही चरित्रनायक 'महात्मे' ही अभिधा शोभण्यासारखे होते. पैकीं कनिष्ट चिरंजीव डॉ. काशिनाथ हे पूर्ण गुणप्रकाश होण्याचे पूर्वीच अल्पवयांत मृत्यु पावले यामुळें फार जणांस पूर्ण परिचित व ज्ञात नव्हते. पण पिता डॉ. वामन गोपाळ व त्यांचे ज्येष्ठ पुत्र, डॉ. सदाशिव वामन ऊर्फ बाळाभाऊ ऊर्फ आबासाहेब काणे, यांचीं नांवें अद्यापि मुंबईंत कितीकांच्या ध्यानीं, मनीं आणि तोंडीं आहेत; आणि त्यांची,–विशेषतः पुत्राची–आठवण झाल्याबरोबर हृदय भडभडून येणारे मित्र, आप्त व कृतज्ञ "आर्त" पुष्कळ आहेत. उभयतांचे अंगीं तसेच विशिष्ट व लोकोत्तर गुण होते. पेशवाई बुडाली त्याबरोबर मराठ्यांची कर्तृत्वशक्ति आणि तेजोमय गुण पूर्णपणें लुप्त झाले नाहींत हें डॉ. वामन गोपाळ यांचें चरित्र उत्तम रीतीनें सिद्ध करितें. इंग्रजी विद्येचा व संस्कृतीचा आमच्या हिंदुत्वाशीं आणि पूर्वपरंपरेशीं मधुर संमेळ बसवून ज्या विद्वान् महाराष्ट्रीयांनीं उदात्त आयुःक्रमाचें उदाहरण घालून दिलें त्यांत कै. वा. डॉ. सदाशिव वामन काणे यांचें नांव प्रमुखतेनें घातलें पाहिजे. वरील विधानांत अतिशयोक्तीचा भाग नाहीं हें पुस्तकांतील चरित्रांचें पर्यालोचनच सिद्ध करून दाखवील.

प्रस्तुत पुस्तक संकलित झालें तें कोणत्या रीतीनें हें प. वा. रा. गोविंदराव काणे यांनीं मरणापूर्वी त्याची प्रस्तावना लिहून मजपाशीं ठेवली होती तींतील खालील उताऱ्यावरून कळून येईलः—

" माझे सख्खे चुलते कै. डॉ. वामन गोपाळ काणे यांचें अल्पसें चरित्र त्यांचे वडील चिरंजीव सुप्रसिद्ध कै. डॉ. सदाशिव वामन काणे यांनीं पेन्सिलीनें लिहून ठेवलें होतें. तें छापवून प्रसिद्ध करण्याचें त्यांच्या मनांतून होतें. परंतु अनेक कार्य-बाहुल्यामुळें त्यांच्या हयातींत तें प्रसिद्ध झालें नाहीं. ते कागद-पत्र माझ्याकडे आल्यावर, त्याच्या एकदोन शुद्ध प्रती करून त्या पुष्कळ मित्रांस दाखविल्या. सर्वांचा अभिप्राय पडला कीं चरित्र छापण्यासारखें आहे. छापण्याचा जेव्हां विचार मनांत आला तेव्हां असें वाटलें कीं कै. डॉ. सदाशिव वामन काणे यांचें अल्पसें चरित्र त्यांचे परम मित्र रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांनीं इंग्रजींत लिहिलेलें आहे तेंही या चरित्राबरोबर छापावें. तसेंच रा. रा. विष्णु गणेश नेने यांनीं कै. डॉ. काशीनाथ वामन काणे यांचें शोकरसप्रधान पद्यात्मक काव्य लिहिलें तेंही या पुस्तकाबरोबर छापावें. पुढें असा विचार मनांत आला कीं पहिलें चरित्र मराठींत, दुसरें इंग्रजींत आणि तिसरें पुनः मराठींत ही त्रिसंगतवार व्यवस्था होते, ह्मणून बाळाभाऊंचे प्रेमळ व विद्वान् मित्र रा. रा. काशीनाथ कृष्ण लेले धारकर यांस मी विनंती केल्यावरून त्यांनीं रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांच्या इंग्रजी चरित्राचें फारच उत्तम तऱ्हेनें मराठींत

रूपांतर केलें. तें अतिउत्तम वठलें आहे. ह्या मराठी रूपांतरास प्रस्तुत पुस्तकांत दुय्यम स्थळ देऊन तें छापलें आहे.हीं चरित्रें छापवून पुस्तक तयार करण्याचें काम मी माझे मित्र रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांजकडे सोंपविलें. त्यांचा व रा. रा. का. कृ. लेले व रा. रा. विष्णु गणेश नेने यांचा मी फार आभारी आहें. शिवाय माझे मित्र रा. रा. गोविंद वासुदेव कानिटकर, रा. रा. कृ. त्रिं. डोंगरे, रा. रा. गौतमराव केशव यांचे चि. रा.रा. भगवंतराव यांनींही साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.तसेंच लक्ष्मीनारायण प्रेसचे मॅनेजर रा. रा. अनंत आत्माराम मोरमकर यांनीं हें पुस्तक छापण्याचें व प्रसिद्ध करण्याचें काम मोठ्या आस्थेनें केलें याबद्दल मी त्यांचाही आभारी आहें."

कै. गोविंदरावजींनीं लिहिलेल्या ह्या प्रस्तावनेला अधिक मजकुराची जोड करणें अवश्य आहे; ती त्यांच्या स्वतःच्या जीवनवृत्ताची स्वल्प हकीकत ही होय. ती देण्याचे कामीं त्यांचे व माझे परम स्नेही रा. रा. हरि सीताराम दीक्षित, येथील प्रसिद्ध सॉलिसिटर, यांनीं मजला पूर्ण साह्य केलें. विशेष माहिती उपलब्ध झाली नाहीं ह्मणून आह्मी दोघेही दिलगीर आहों. असो. प्रस्तुत पुस्तकांतील मुख्य चरित्रनायक डॉ. वामन गोपाळ काणे यांचे वडील बंधु नारायणशास्त्री, त्यांचे गोविंदराव हे चिरंजीव होत. यांनीं आपले लहानपणचे दिवस गरिबींत व दुःखाकष्टांतच घालविले. मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाल्यानंतर गोविंदराव यांस नोकरी धरून मुंबईपुण्याहून लांब जावें लागलें. परंतु गोविंदरावजीनीं खटपट करून मुंबईस नाय-

गांवमधील एका शाळेंत कांहीं तासांची शिक्षकाची जागा मिळवून तें काम करून वुइल्सन कॉलेजांत एफ्. ए. चा अभ्यास करण्याचा उपक्रम केला. परंतु संसार सांभाळून व आयुष्यांतील आपले इतर व्यवसाय चालू ठेवून युनिव्हर्सिटीची आराधना करण्याचें काम त्यांचेंकडून शेवटास नेणें झालें नाहीं. गोविंदरावजींचें लक्ष पहिल्यासून धर्म आणि अध्यात्म या विषयांकडे असे. मुंबईस परत येऊन कॉलेजांत शिकावयास लागले तेव्हां ते प्रार्थनासमाजाचे मोठे उत्साही सभासद होते. परंतु साध्या हिंदुधर्मानें किंवा समाजाच्या विशिष्ट मतांनीं त्यांचे मनाचें समाधान झालें नाहीं व आपणांस निश्चित रीतीनें नीतीचा व मोक्षाचा मार्ग दाखवील असा कोणी तरी महात्मा सद्गुरू अवश्य पाहिजे अशी त्यांच्या मनाची भावना झाली. सद्गुरूविषयीं कांहीं काळ त्यांस केवळ तळमळ लागली होती. ती मोठ्या चमत्कारिक रीतीनें शांत झाली. येशू ख्रिस्ताचें जीवनचरित्र वाचून, समाधान पावून, हाच आपणांस योग्य गुरु आहे असें वाटून, गोविंदराव हे १८८० सालीं ख्रिश्चियन झाले. रेव्हरेंड हेन्‍री स्क्वायर्स ह्मणून एक सच्छील मिशनरी गृहस्थ होते, त्यांशीं जडलेला स्नेह गोविंदरावजींच्या ह्या धर्मांतरास मुख्यांशें कारण झाला असावा असें दिसतें. हा स्नेह शेवटपर्यंत जागृत राहिला. गोविंदराव व रा. ह. सी. दीक्षित विलायतेस गेले होते तेव्हां रेव्हरेंड स्क्वायरकडे पाहुणे ह्मणून त्यांनीं कांहीं दिवस काढले. दीक्षित सांगतात कीं रे. स्क्वायर व गोविंदराव काणे यांमध्यें केवळ पितृपुत्रतुल्य वत्सलता

पाहून आपणांस मोठें कौतुक वाटलें. गोविंदराव ख्रिश्चियन झाले खरे, परंतु त्यांनीं त्यामुळें आपल्या राहणींत किंवा आचारांत व रीतिभातींत व अन्य विचारांत रतिमात्र फरक केला नाहीं, इतर धर्मांचा द्वेष केला नाहीं, व आपली स्वतःची धर्मश्रद्धाही अंध किंवा असहिष्णु होऊं दिली नाहीं. त्यांची वृद्ध मातुश्री व अंध पत्नी हीं हिंदुच राहिलीं; तरी त्यांसह एकेच जागीं गोविंदरावजी जेवीत खात व राहत. उभयतां माता व पत्नी थोडक्याच कालांत कैलासवासी झाल्यानंतर गोविंदरावजी यांनीं ख्रिस्तधर्मीय दुसरी गृहिणी केली. त्यांपासून त्यांस दोन पुत्र झाले. पैकीं वडील पुत्र भास्करराव हे उमरावतीस बॅरिस्टर आहेत. गोविंदरावजी यांनीं कॉलेजांतील अभ्यास सोडून देऊन कायद्याचें अध्ययन केलें व १८८८ सालीं त्यांची वकिलीची परीक्षा पास झाली. तेव्हां त्यांनीं मुंबई सोडून वऱ्हाडांत उमरावती येथें आपला धंदा सुरू केला. त्यांत त्यांस चांगलें यश आलें. उमरावतींतील प्रमुख वकिलांत त्यांची गणना असून लोकोपयोगी कृत्यांत त्यांचा नेहमी पुढाकार असे. पण विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं गोविंदरावजी हे प्रथमपासून विद्याव्यासंगी व सरस्वतीचे उपासक होते, व आमरण ते तसे राहिले. मुंबईस कॉलेजांत शिकावयास येण्याचे पूर्वींच त्यांनीं एक ग्रंथ लिहिला होता, तो “ बेकनचें जीवनचरित्र ” हा होय. ख्रिस्ती झाल्यावर त्यांनीं गौतमबुद्ध आणि महमद पैगंबर यांचीं चरित्रें लिहिलीं. ह्यावरूनच त्यांच्या मनाची समदृष्टि व उदारता हीं व्यक्त होतात. गोविंदराव यांचा स्वभाव मोठा मनमिळाऊ असून

त्यांचें मित्रत्व मोठ्या उच्च दर्जाचें असे. ते स्वतंत्रताप्रिय होते. लोकांस उपयोगी व्हावें हें त्यांचें शील सदैव जागृत असे. गोविंदरावजी यांचें देहावसान थोडें आकस्मिक असें २ एप्रिल १९१८ रोजीं झालें. त्या वेळीं प्रस्तुत पुस्तक फक्त अर्धेंच तयार झालें होतें. तें आज संपूर्ण स्वरूपानें जगांत बाहेर आलें आहे हें पाहून त्यांच्या आत्म्यास खचित अत्यंत आनंद वाटत असेल. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास निरंतरचें सौख्य देवो.

मुंबई ता. २० जून १९१८ **दा. ग. पाध्ये.**



डॉ. वामन गोपाळ काणे.

# डॉ. वामन गोपाळ काणे यांचें चरित्र.

जे कां रंजले गांजले ॥ त्यांसी म्हणे जो आपुले ॥ १ ॥
साधु तोचि ओळखावा ॥ देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥
ज्यासी आपंगिता नाहीं ॥ त्यासी धरी जो हृदयीं ॥ ३ ॥
दया करीजे पुत्रासी ॥ तेचि दास आणि दासी ॥ ४ ॥
तुका म्हणे सांगु किती ॥ तोचि भगवंताची मूर्ती ॥ ५ ॥

## भाग पहिला.

### पूर्वजांचा वृत्तांत.

रत्नागिरी जिल्ह्यांत रीळ या नांवाचें एक गांव आहे. तेथें बापूशास्त्री हे काण्यांच्या घराण्याचे मूळ पुरुष पेशवाईच्या अमदानींत रहात असत. भाग्योदय व्हावा या हेतूनें त्यांनीं आपला मूळचा गांव सोडून पुण्यास राजधानीमध्यें आपलें वास्तव्य केलें. त्यांचे चिरंजीव चिंतामणशास्त्री काणे हे मोठे लोकोत्तर विद्वान् झाले. त्यांचा लौकिक मोठा होता व त्यांस पेशव्यांकडून पालखीचा मान मिळाला होता. म्हणतात कीं त्यांचे हातून एकदां एका कर्मठ व शीघ्रकोपी ब्राह्मणाचा नकळत अपमान झाल्यावरून त्या ब्राह्मणानें शास्त्रीबुवांस शाप दिला. झालेल्या अपराधाबद्दल क्षमा करण्याविषयीं चिंतामणशास्त्री यांनीं ब्राह्मणाची पुष्कळ विनवणी केली, परंतु कांहीं केल्या

त्याचा राग कमी होईना व शास्त्रीबुवांस उःशाप मिळेना. अखेरीस तो ब्राह्मण आपले गांवीं निघून गेला. कर्मधर्मसंयोगानें पुढें कांहीं दिवसांनीं शास्त्रीबुवांस भ्रम झाला. हा भ्रम थोड्या बहुत अंशानें पुढें प्रत्येक पिढींत कोणाला तरी पछाडीत चालला. चिंतामणशास्त्र्यांचे चिरंजीव गोपाळशास्त्री यांस त्यांच्या उतार वयांत भ्रम झाला; तसेंच त्यांचे वडील चिरंजीव सदाशिवशास्त्री म्हणजे चरित्रनायकांचे वडील बंधु यांसही भ्रम होता; व सदाशिवशास्त्र्यांचे चिरंजीव हरिभाऊ यांसही भ्रमाची थोडीशी झांक होतीच. या शापाचा परिणाम वर लिहिल्याप्रमाणें शास्त्रीबुवांचे पुढील पिढ्यांस भोगावा लागला व अद्यापही तो भोगावा लागत आहे असा त्यांचे वंशजांचा समज आहे.

---

## भाग दुसरा.

### जन्म व बालपण.

चिंतामणशास्त्री यांची विद्वत्ता जाणून त्यांचा पेशव्यांनीं बहुमान केला तें वर सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें त्यांना राहण्याकरितां शनिवार पेठेंत जागाही सरकारांतून मिळाली. तेथें चिंतामणशास्त्र्यांचे पुत्र गोपाळशास्त्री हे आपल्या वडिलांचा लौकिक चांगल्या तऱ्हेनें चालवून रहात असतां त्यांस तीन मुलगे व दोन मुली अशीं पांच अपत्यें झालीं. मुलांत वडील सदाशिवशास्त्री, मधले नारायणशास्त्री व सर्वांत लहान वामनतात्या म्हणजे आपले चरित्रनायक होत. यांचा जन्म इ. स. १८१९ ह्या वर्षीं झाला. वामनतात्यांच्या

बहिणींचीं नांवें गंगा व यमुना अशीं होतीं. वामनतात्यांची मुंज श्रीक्षेत्र काशी येथें झाली. पुढें लवकरच त्यांचे वडील वारले. वामनतात्या लहानपणीं फार उनाड व स्वच्छंदी असत. खबुतरें बाळगण्याचा व उडविण्याचा त्यांस फार नाद असे. शेजारापाजाऱ्यांचीं मुलें जमवून त्यांच्या संगतीनें त्यांनीं खबुतरें उडवीत बसावें. ससांची एक जोडीही त्यांनीं घरीं बाळगिली होती. कथाकीर्तनें ऐकण्याची व स्वतः करण्याची त्यांस फार आवड असे. त्यांचा खेळांतला एक मारुति होता, त्याचा उत्सव ते आपल्या मित्रमंडळीसह मोठ्या थाटानें करीत व मारुतीची लहानशी पालखीही काढीत. त्यांच्या त्या उनाड व खेळाडू स्वभावामुळें घरच्या माणसांचें त्यांस वारंवार बोलून घ्यावें लागे; व मारही मिळे. वामनतात्यावर त्यांचे वडील बंधु सदाशिवशास्त्री यांचा विशेष लोभ असे. कोणी कांहीं बोललेंसवरलें म्हणजे वामनतात्यांचा त्यांनीं कैवार घ्यावा व त्यांस आपले जवळ घ्यावें. एवढेंच नव्हे तर वामनतात्या त्यांचे इतके लाडके होते कीं त्यांचे सारे हट्ट ते पुरवीत. वामनतात्या सर्व भावांत लहान व उनाड असल्यामुळें त्यांच्या आईलाही त्यांची फार काळजी वाटत असे. त्या माऊलीनें पतीचे पश्चात् सर्व मुलांचा उत्तम रीतीनें सांभाळ करून संसाराचा गाडा मोठ्या धैर्यानें चालविला. सदाशिवशास्त्री यांजवर रेसिडेंट एलफिन्स्टन साहेब यांचा फार लोभ असे. यांनीं त्यांस पर्वतीवर रोज एक वेळ पक्वान्नांचें जेवण व दरमहा पांच रुपये अशी नेमणूक करून दिली होती. मधले बंधु नानाशास्त्री हे कांहीं थोडे बहुत भिक्षुकी करीत. या दोघां बंधूंचीं लग्नें झालीं. त्यांच्या बायका, सदाशिवशास्त्र्यांचा एक मुलगा व एक मुलगी, वामनतात्यांची

वडील विधवा बहीण यमुनाताई:—अशा या आठदहा माणसांचा प्रपंच चालविण्याची मोठी पंचाईत पडूं लागली. अशा स्थितींत जवळच्या दागिन्यांची मोडतोड करून दोघां वडील मुलांच्या अल्पस्वल्प मिळकतीच्या मदतीनें वामनतात्यांच्या आईनें जसातसा संसार चालविला. अशा स्थितींत वामनतात्यांच्या लग्नाचा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां त्या माऊलीला किती काळजी उत्पन्न झाली असेल? उद्योगाच्या नांवानें शून्यच. उलट उनाड व खेळाडू वामनतात्याला मुलगी कोण देईल? हा विचार तर नेहमीं तिच्यापुढें उभा राही. पण वामनतात्यास या विचाराचें कांहींच वाटत नसे. अखेरीस कांहीं आप्तांच्या मध्यस्थीनें वामनतात्यांच्या लग्नाचा योग जुळून आला. पुण्यांतच काळ्या हौदाजवळ काळे यांचे घरांत गोखल्यांच्या आश्रितांपैकीं पटवर्धन आडनांवाचे एक कुलीन गृहस्थ रहात असत. त्यांचे वंशज अझून पुण्यांत आहेत. या पटवर्धन घराण्यांतील मुलगी वामनतात्यास वधू मिळाली.

---

## भाग तिसरा.

### प्रपंचाची काळजी व उद्योगास प्रारंभ.

वामनतात्यांचें शिक्षण बुधवार वाड्यांत सरकारी शाळेंत थोडें बहुत झालें होतें. त्या वेळीं इस्डेल साहेब शाळाखात्याचे मुख्य अधिकारी होते. या साहेबाचें शाळेंतल्या मुलांशीं मोठ्या प्रेमाचें व लडिवाळपणाचें वर्तन असल्याबद्दल वामनतात्या सांगत असत. त्या

वेळचे वामनतात्यांचे सहाध्यायी म्हणजे सदाशिवराव गंवडे, रावो नारायण गुणे ( हे पुढें धारचे दिवाण झाले ) वगैरे मंडळी होती. वामनतात्यांचा जो काय थोडा बहुत विद्याभ्यास झाला तो वरील सरकारी शाळेंतच. प्रत्यक्ष लग्न झाल्यावर त्यांना प्रपंचाची एक प्रकारची जबाबदारी वाटूं लागली; व घरच्या गरिबीमुळें उद्योग-धंद्यासाठीं म्हणून वामनतात्यांस शाळा सोडावी लागली. किंबहुना वरील अडचणीमुळें त्यांना शाळा सोडण्याला सबब मिळाली असें ह्मटलें तरी चालेल. कारण आतांपर्यंत वामनतात्यांचा विद्येकडे ओढा म्हणून नव्हताच; धंद्याविषयीं विचार करितां, थोड्याशा भांडवलांत विशेष दगदग न पडतां करतां येण्यासारखा सराफीशिवाय दुसरा धंदा त्यांना आढळेना; ह्मणून तो धंदा करण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. व त्याप्रमाणें सर्व व्यवस्था करून आपा बळवंत मेहेंदळे यांच्या वाडयापुढें सराफीचें दुकान मांडून ते तेथें बसूं लागले. वामन-तात्यांचे स्वभावास ह्या वेळेस कसोटी लागण्याचा एक अकल्पित प्रसंग घडून आला; तो असा. वामनतात्यांच्या एका शेजाऱ्याच्या मुलानें एक चांदीचा लहानसा जिन्नस त्यांना थोडयाशा किंमतींत विकला; किंवा त्यांजजवळ गहाण ठेविला म्हटलें तरी चालेल. पुढें असें उघडकीस आलें कीं तो चांदीचा जिन्नस गहाण ठेवणाऱ्या मुलानें कोठें चोरी करून चोरीचा तो माल त्यानें ह्या साध्या भोळ्या नवशिक्या सराफाजवळ आणून गहाण ठेविला होता. तो माल चोरीचा असेल अशी सराफतात्यास शंका आली नाहीं. कारण आपल्या शेजाऱ्याचा मुलगा अशा तऱ्हेनें आपणास घोटाळ्यांत घालील अशी त्यांची कल्पनाच नव्हती. पुढें चवकशी होऊन तो

सर्व खटला फरासखान्यांत सुनावणीकरितां आला. त्यांत तो माल चोरीचा आहे असें सिद्ध होऊन तो चोर व ज्यांनीं त्याचा माल घेतला होता ते सर्व गुन्हेगार ठरले; व कोणाला दंड, कोणाला शिक्षा आणि कोणाला दोहींचीही बक्षिशी मिळाली. वामनतात्यांवर चोरीचा माल विकत घेतल्याचा आरोप येऊन त्यांस फरासखान्यांत नेऊन उभें करण्यांत आलें. या प्रसंगानें घरच्या सर्व माणसांची मेधा उडून गेली. आधींच गरीबी, खाण्यापिण्याचे हाल, त्यांत हा मुलगा उनाडकी सोडून कोठें इकडे तिकडे खटपट करून पोटाचा उद्योग करूं लागतो न लागतो तोंच त्याच्यावर व सर्व कुटुंबावर हें संकट ओढवलें. घरांतल्या माणसांना कांहीं सुचेनासें झालें. शेजारीपाजारीही फार कष्टी झाले. आतां पुढें काय करावें या विचारांत सर्व मंडळी पडली. त्या बिचाऱ्या आईच्या तोंडचें पाणी पळालें. कोणी संतापून वामनतात्यांला शिव्या देऊं लागले, कोणी कान उपटूं लागले, कोणी कांहीं दुसरेंच करूं लागले. अशा गडबडींत एक शक्कल निघाली ती अशी; वामनतात्या या वेळेस वयानें १८ वर्षांचे होते, तरी त्या मानानें थोडे ठेंगणें दिसत असत. तेव्हां कांहीं मंडळी त्यांस असें शिकवूं लागली कीं, तुला फौजदारानें तुझें वय किती असें विचारलें असतां, साहेब, माझें वय सोळा वर्षांचें आहे, असें सांग, म्हणजे झालें, मग तूं सुटशील. असें त्यांस एकसारखें पढवणें चाललें होतें. घरच्या माणसांसही ही युक्ति बरी वाटली. पण वामनतात्यांला ती रुचली नाहीं. ते म्हणत कीं खोटें कसें बोलावें ? मी १८ वर्षांचा असून १६ वर्षांचा आहें असें कसें सांगूं ? मंडळीनें खोटें सांगण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला, एवढेंच नव्हे तर चोहोंकडून तात्यास अशी दटावणी सुरू

झाली कीं तूं १६ वर्षांचा असेंच सांग. नाहीं तर विनाकारण कैदेची शिक्षा भोगावी लागेल. आम्ही कोणीही येऊन तुला सोडविणार नाहीं. अशा वेळेस वामनतात्यांचें त्या सर्वांच्या शिकवणीस, धमकीस, दटावणीस एकच उत्तर; व तें हेंच कीं, मी खोटें कसें बोलूं? १८ वर्षांचा मी असतांना १६ वर्षांचा मी आहें म्हणून कसें सांगूं? हें खोटें नाहीं कां होणार? हा त्यांचा हट्टवादीपणा पाहून कांहीं मंडळींनीं, द्वाड पोर आहे, भोगील शिक्षा, त्याचें नशीबच तसें असेल तर आपण तरी त्याला काय करणार? असें म्हणून त्यांचा नाद सोडून दिला. घरच्या माणसांनीं मात्र खटल्याची सुनावणी सुरू झाली म्हणजे आपण पुढें होऊन मुलगा लहान आहे, १६ वर्षे पुरीं झालीं नाहींत असें फौजदारासमोर सांगण्याचा निश्चय केला; व त्याप्रमाणें हा खटला चालला असतां त्यांनीं पुढें होऊन सांगितलेंही. परंतु सर्व फुकट गेलें. कारण वामनतात्यांनीं मी १८ वर्षांचा आहें असेंच आपल्या जबानींत सांगितलें. त्यामुळें वामनतात्यांस दंड देण्याचा हुकूम झाला. नाहीं तर कैद. अशी शिक्षा फरमावण्यांत आली. शिक्षा झाल्याचें समजल्यावर घरीं एकच कल्होळ उडून गेला. कोणी म्हणूं लागले, जाऊं द्या, भोगूं द्या कैद; दोनशें रुपये कोठले आणा? कोणी म्हणे, उनाड पोर, तुरुंगांत गेल्यावांचून वठणीवर नाहीं यावयाचा. जाऊं द्या, येईल माघार दोन महिन्यांनीं, काय होतें आहे त्याला? अशा प्रकारें कोणी कांहीं, कोणी कांहीं म्हणूं लागले. परंतु वामनतात्यांचे वडील बंधु व त्यांची मातुश्री हीं दोघें दुःखानें विव्हळ झालीं. दोनप्रहरची वेळ झालेली, घरांत सर्व माणसें उपाशी व वामनतात्या फरासखान्यांत एकटा भुकेनें

तळमळत बसलेला, सदाशिवशास्त्र्यांनीं वामन घरीं आल्यावांचून तोंडांत पाणी घेणार नाहीं, असे उद्गार काढून आईच्या दागिन्यांपैकीं राहिलेली पुतळ्यांची माळ घेऊन ती एका शेजाऱ्याजवळ २०० रुपयांवर गहाण ठेविली, व ती रक्कम फरासखान्यांत भरून वामनतात्याला सोडवून आणलें.

---

## भाग चवथा.

### स्वावलंबन.

वर वर्णन केलेल्या सर्व प्रकाराचा वामनतात्यांच्या मनावर व वर्तनावर मोठा विलक्षण परिणाम घडला. ह्यापुढें त्यांचा उनाडपणा व स्वछंदीपणा निघून गेला; व स्वपराक्रमाचें बिजारोपण त्यांचे ठायीं झालें. अन्नानें चारितार्थ चालविण्यास पाहिजे तितकी विद्या अंगीं नाहीं. पुन्हां शाळेंत जाऊन शिकावें म्हटलें तर गरिबीमुळें तें शक्य नव्हतें.असें होतें तरी ना—उमेद न होतां स्वपराक्रमाचे जोरावर लौकिक संपादन करण्याचा त्यांनीं निश्चय केला. पुण्याहून त्यांचा एक स्नेही मुंबईस जाण्यास निघाला. त्याच्याबरोबर मुंबईस जाण्याची वामनतात्यांनींही तयारी केली. एके दिवशीं पहांटेस कोणास न कळवितां ते दोघेजण मुकाट्यानें पुण्याचे बाहेर पडले, व मुंबईच्या रस्त्याला लागले. त्या वेळेस आगगाडी नव्हती, म्हणून ते दोघे पायींच मजल गांठून पनवेलच्या मार्गानें मुंबईस येऊन दाखल झाले; मुंबईस कोणाची ओळख देखील नव्हती, सबब ते विठ्ठलवाडींत एका

देवळांत उतरले. पुढें इकडे तिकडे चौकशी करितां वामनतात्यांस असें समजलें कीं पलटणींचे इस्पितळावर कोणी नारायण या नांवाचे ब्राह्मण जातीचे गृहस्थ डाक्टर आहेत, यांस भेटलें असतां ते कदाचित् आपल्या हाताखालीं शिकण्यास म्हणून आपल्याला ठेवतील. त्याप्रमाणें त्यांस जाऊन भेटतां त्यांनीं वामनतात्यांस विचारपूस करून दुसरे दिवसापासून कामावर येण्यास सांगितलें.

इकडे घरीं कोणास न कळवितां एकाएकीं वामनतात्या घरांतून निघून गेल्यामुळें घरांतील मंडळी मोठ्या काळजींत पडली. रागानें कोठें तरी पळून गेला असावा असा घरांतील सर्व मंडळीचा तर्क झाला. जिकडे तिकडे शोध केला परंतु कांहीं पत्ता लागेना. थोडे दिवसांनंतर वामनतात्यांचें स्वदस्तुरचें पत्र मुंबईहून आलें. त्यामुळें सर्व माणसांची काळजी दूर झाली. इकडे वामनतात्यांनीं डाक्टर नारायणरावजींच्या हाताखालीं उमेदवारी सुरू केली. उदरनिर्वाहासाठीं साहेब लोकांच्या एक दोन मराठीच्या शिकवण्या मिळविल्या, त्यावर चरितार्थ चाले. पुढें कांहीं दिवसांनीं जमशेटजी जीजीभाई इस्पितळांत त्यांना लहानशी चाकरी मिळाली व ग्रँट मेडिकल कॉलेज त्याच सुमारास चालू झाल्यामुळें वामनतात्यांस आपल्या नोकरीचें काम सांभाळून कॉलेजांतील वर्गाबरोबर शिकण्याची परवानगी मिळाली. हा वर्ग डॉ. भाऊ दाजी, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. अनंत चंद्रोबा वगैरे मंडळी मिळून झालेला होता. क्लासांत प्रवेश होण्यासाठीं म्हणून वामनतात्यांस पुष्कळ खटपट करावी लागली. त्यांचे पुरस्कर्ते, इस्पितळांतील डोळ्यांचे डॉक्टर स्टोवेल साहेब यांनींही

त्यांजबद्दल चांगली शिफारस केली. परंतु त्या वेळचे कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मूरहेड ह्यांनीं ती गोष्ट मंजूर केली नाहीं. तरी क्लासाबरोबर शिकण्याची परवानगी मिळाली. असो; कसेंही का होईना विद्या शिकण्याची संधी तर वामनतात्यांस साधली. शिकणें चाललें असतांना वामनतात्यास प्रेतच्छेद वगैरे करण्याचे प्रसंग वारंवार येत. त्यामुळें ज्या खाणावळींत हे जेवावयास जात असत त्या खाणावळींत त्यांस अपांक्त केलेल्या माणसांप्रमाणें वेगळे बसवीत. पंक्तींत बसूं देत नसत. विद्येच्या अभिरुचीपुढें या अपमानाचें वामनतात्यांस कांहींच वाटलें नाहीं. असो. इस्पितळाची चाकरी सांभाळून याप्रमाणें क्लासाबरोबर शिकणें कांहीं दिवस चाललें. डाक्टर स्टोवेल म्हणून डोळ्यांचे जे डाक्टर वर सांगितले त्यांचा वामनरावजींवर फारच लोभ बसला. त्यांच्या हाताखालींच त्यांची बदली झाली होती. यामुळें डोळ्यांचे रोगी पाहण्यास त्यांना चांगली संधी मिळे; व डाक्टर स्टोवेल यांनींहि तें काम वामनरावजींस मनापासून शिकवावें व त्याजकडून शस्त्रक्रियाही करवून घ्यावी. याप्रमाणें वामनरावजींस नेत्ररोगाची चांगली माहिती होऊन पुढें ते प्रसिद्ध नेत्रवैद्य बनले. डॉक्टर स्टोवेल यांची त्यांजवर इतकी कृपा असे कीं त्यांनीं वामनरावजींचा पगार थोडा असल्यामुळें यांचा निर्वाह होण्याची अडचण पडत असेल असें समजून महिन्याच्या कांठीं त्यांनीं आपल्या पदरचे कांहीं पैसे वामनरावजींना द्यावे.

अशा तऱ्हेनें इस्पितळांत काम करण्यांत व एकीकडे शिकण्यांत कांहीं काळ गेल्यावर वामनरावजींची कराचीस बदली झाली; त्यामुळें

त्यांस तिकडे जावें लागलें. मुंबईस असतांना वामनरावजींचा आयुष्यक्रम मोठा उद्योगाचा व मेहनतीचा असे. पहांटे चार वाजतां उठून स्नान वगैरे नित्यविधि आटोपल्यावर घरगुती शिकवण्याचा उद्योग कांहीं दिवस होता त्यापैकीं एखादी शिकवणी सकाळीं शिकवून पुढें इस्पितळांत कामावर जात असत; नंतर जेऊन कॉलेजांत जावयाचें, तेथून सुटल्यावर पुढें संध्याकाळची एखादी शिकवणी शिकवून मग घरीं जाऊन जेवावयाचें; अशा कार्यबाहुल्यामुळें वामनरावजींस दुपारीं कधीं कधीं नुसत्या फुटाण्यावर सुद्धां रहावें लागे.

अशा रीतीनें वामनरावजींनीं मुंबईस असतांना उदरनिर्वाह व विद्योपार्जन हीं दोन्हीं साधलीं. कराचीस बदली झाली म्हणून वर लिहिलें. त्या वेळची कराची हल्लींच्याहून फार निराळी होती. तेथें दक्षिणी मंडळी फार थोडी होती, किंबहुना नव्हतीच म्हटलें तरी चालेल. म्हणून बरोबर खटलें घेऊन जाणें म्हणजे मोठीच अडचण होती. कोणाची ओळखदेख नाहीं. अशा स्थितींत परमुलखांत जाण्याचा प्रसंग आला, परंतु उपाय नाहीं. सरकारी नोकरी ठरली. हुकूम झाला, म्हणजे गेलेंच पाहिजे. जातांना वामनरावांचे परमस्नेही डॉक्टर आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनीं आपले बंधु राघोबा पांडुरंग यांचे नांवचें एक पत्र वामनरावजींस दिलें. राघोबा पांडुरंग हे कांहीं दिवसांपूर्वीं सरकारी नोकरीच्या संबंधानेंच कराचीस गेले होते. त्यांची डॉक्टर आत्मारामजींच्या पत्रावरून ओळख झाल्यामुळें वामनरावजींस त्यांची फार मदत झाली. सिंध हैद्राबादेस जावयाचें म्हणजे कांहीं जमिनीवरून व कांहीं जहाजानें जावयाचें असे.

या प्रवासांत वामनरावजींचे व त्यांच्या कुटुंबाचे फार हाल झाले. असो. कराचीहून सिंध हैद्राबाद, तेथून सक्कर वगैरे ठिकाणीं बदल्या होऊन पुढें अफगाणीस्थानची लढाई सुरू झाली. तीवर पलटणींबरोबर जाण्याचा वामनरावजींस हुकूम झाला. त्यामुळें बायकामाणसांची पुण्यास रवानगी करून वामनरावजींस लढाईवर जावें लागलें. तिकडे गेल्यावर लढाई तहकूब झाल्यामुळें वामनरावजी कराचीस परत आले.

पुढें कांहीं दिवसांनीं रजा घेऊन घरच्या मंडळीस भेटण्यासाठीं म्हणून ते पुण्यास निघून आले. उनाड, खेळाडू वामन पुण्याहून पळून गेल्यापासून आज इतके वर्षांनीं पुष्कळ हाल अपेष्टा सोसून जिवापाड मेहनत करून, विद्या व अब्रू मिळवून पुन्हां पुण्यास आला, त्यामुळें घरचे मंडळीस तसेंच शेजाऱ्यापाजाऱ्यांस व लहानपणचे इष्टमित्रांस पराकाष्ठेचें कौतुक व आनंद झाला. वामनतात्या डॉक्टर होऊन आला असें जिकडेतिकडे सर्व मंडळी बोलूं लागली. जो तो वामनतात्यांस आपल्या घरीं बोलावूं लागला. कोणी आजाऱ्यास दाखविण्याकरितां, तर कोणी भेटण्याकरितां, आणि कोणी मेजवानीकरितां वामनतात्यांस आपल्या घरीं बोलावूं लागले. अशा तऱ्हेनें पुण्यास वामनरावजींची बरीच मान्यता झाली. पुढें वामनरावजींचे वृद्ध मातुश्रीचा त्यांस असा आग्रह पडला कीं आजपर्यंत तूं पुष्कळ हाल काढलेस, संकटें भोगलींस, देशांतरें केलीस. आतां यापुढें असे हाल नकोत. दुसरी मिळाल्यास सोईची चाकरी करावी, नाहीं तर खाजगी धंदा चालवून निर्वाह करावा. पण असा वनवास व देशांतर आतां नको. मातुश्रीचा व इतर मंडळीचाही असाच आग्रह पडल्यामुळें वामनरावजींनीं सरकारी नोकरी सोडली.

नोकरी करण्याची ज्यास एकदां सवय लागली त्याची नोकरी कांहीं कारणानें गेल्यास त्याला मेल्याप्रमाणेंच होतें. असें असतां हातची सरकारी नोकरी सोडणें यांत वामनरावजींची मातृभक्ति व आत्मविश्वास व्यक्त होतो. ती वेळ डॉक्टराच्या खाजगी धंद्याला अनुकूल अशी नव्हती. कारण एक तर इंग्रजी वैद्यकाबद्दल लोकमत अजून बरेंच साशंक होतें व गोरगरिबांस तर फुकटच औषधें मिळत; कोणाही डॉक्टराला आपल्या गुणांचे चीज करून दाखवितां येणें कठिण होतें. तरीही वामनतात्या डगमगले नाहींत. उदरनिर्वाहाचा मार्ग ह्मटला म्हणजे खाजगी डॉक्टरी; हाच होता तो त्या वेळेस हल्लीं सारखे घरगुती डॉक्टर नसत तरी त्यांनीं अंगिकारला पण अशा प्रकारच्या उद्योगानें यश येईल कीं नाहीं अशी वामनरावजींस मोठी शंका वाटली. प्रयत्न करून पाहावा अशा हेतूनें ते मुंबईस आले. मुंबईस येण्याचें कारण अशा उद्योगांत यश येण्यास पुण्या-पेक्षां मुंबई ज्यास्त सोइस्कर होती, असें त्यांस वाटलें व मुंबईस येऊन रामवाडीचे नाक्यावर त्यांनीं एक लहानसा घरगुती दवाखाना काढला. दक्षिणी किंबहुना हिंदुजातींत अशा प्रकारचा उद्योग वामनरावजींनींच प्रथम आरंभिला असें म्हटलें तरी चालेल.

कांहीं दिवस ह्या उद्योगांत गेल्यावर त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांस विचारलें कीं, इंदुरास डॉक्टर पाहिजे आहे, तुम्ही जातां कां? यावर वामनरावजींनीं असें मनांत आणलें कीं, संस्थानांतील नोकरी आहे, मिळाल्यास प्राप्ती व लौकिकही लभ्य होईल, म्हणून त्यांनीं होय असें सांगितलें, व डॉक्टर पिट, त्या वेळचे जमशेटजी इस्पित-

ळांतले मुख्य डॉक्टर त्यांच्या शिफारशीवरून ती जागा वामनराव-जींस मिळाली. मुंबईंतील दवाखाना मोडून वामनरावजी इंदुरास निघून गेले.

मध्यहिंदुस्थानांतील संस्थानिकांकडून वर्षासनें करवून घेऊन त्या पैशानें इंदुरास एक मोठें इस्पितळ उभारून ठिकठिकाणीं त्याच्या शाखा स्थापन झाल्या. गोरगरिबांस औषधपाणी फुकट मिळूं लागलें; व शस्त्रक्रियेनें लोकांच्या दुर्धर व्याधींचा परिहार होऊं लागला. या एकंदर सोयींचें श्रेय इंग्रज सरकारचे खटपटीसच दिलें पाहिजे. मध्य-हिंदुस्थानांत हें एक नवीनच खातें बंडाच्यापूर्वीं दहाबारा वर्षें उत्पन्न झालें व त्याचे मुख्य अधिकाऱ्याचे जागीं डॉ. इंपी यांची योजना झाली. ह्या साहेबांनीं मुंबईस लिहून पाठविल्यावरून प्रथम डॉक्टर अनंत चंद्रोबा यांस तिकडे पाठविलें व डॉक्टर अनंत यांची इंदूरचे मोठे इस्पितळावर योजना झाली. पुढें उज्जनीस एक नवीन शाखा काढून तेथें एक डॉक्टर नेमावयाचा असें ठरलें. डॉ. इंपीनीं पुन्हां मुंबईस लिहून पाठविल्यावरून वामनरावजींचा तिकडे जाण्याचा योग आला. वामनराव इंदुरास गेल्यावर, त्यांस लगेच उज्जनीस जाऊन नवा दवाखाना उघडण्याविषयीं हुकूम झाला. त्याप्रमाणें उज्जनीस जाऊन तेथें " उज्जन धर्मार्थ दवाखाना " वामनरावजींनीं उघडला; व आपल्या कामास आरंभ केला. त्याची तारीख १ जुलै सन १८५० इ.

वर सांगितलेंच आहे कीं मध्यहिंदुस्थानांतील राजेराजवाडे यांजकडून त्यांच्या प्रजाजनांना इंग्रजी औषधोपचाराचा फायदा मिळावा या हेतूनें वार्षिक खर्च घेऊन त्यावर इंदूर व इतर ठिकाणीं दवाखाने उघडले. ही कल्पना इंग्रज अमलदारांची असून तीस

उदार संस्थानिकांची अनुकूलता व द्रव्याचें भरपूर साहाय्य मिळाल्या-मुळें ही लोकोपयोगी संस्था अस्तित्वांत आली; व तीपासून माळ-व्यांतील लोकांस फार मोठा लाभ झाला, हें आजपर्यंतच्या इतिहासावरून व्यक्त होत आहे. कोणतीही नवी गोष्ट सुरू करावयाची व तिचा लोकांत प्रसार करावयाचा ह्मणजे मोठें कष्टाचें, जोखमीचें व नाजुक काम असतें; पूर्वापर चालत आलेल्या लोकांच्या रीतीभातीस व समजुतीस नवें वळण लावावयाचें, ह्मणजे मोठें बिकट काम आहे. तें सिद्धीस नेण्यास पुष्कळ गोष्टींच्या अनुकूल-तेची जरूरी असते. बुद्धि, उत्साह, अश्रांत मेहनत, सुस्वभाव-परोपकारेच्छा, इत्यादि गुण अंगीं असल्यावांचून अशा कामांत मनुष्यास यश येत नाहीं. वामनरावजींच्या अंगीं हे सर्व गुण वास करीत होते; म्हणूनच इंग्रजी औषधें घेण्याचा प्रचार माळव्या-सारख्या शिक्षणांत मागासलेल्या प्रांतांत पडण्यास विशेष विलंब लागला नाहीं. इंग्रजी औषधासंबंधानें प्रथम नानाप्रकारच्या कुकल्पना व कुतर्क लोकांच्या मनांत वागत असल्यामुळें त्याविषयीं लोकांचा बराच विरोध होता. इंग्रजी औषधांत दारू असते, हीं औषधें फार उष्ण व जलाल असतात, अशा कांहीं तरी समजुती त्या वेळीं रूढ होत्या. त्या जाव्या कशा आणि या नव्या लोकोपयोगी संस्थेचा त्यांना फायदा व्हावा कसा ? परंतु वामनरावजींचा या संस्थेशीं संबंध घडल्यापासून हे सर्व कुतर्क, गैरसमज व विरोध नाहींसे होऊन लोकांची इंग्रजी औषधावर हळू हळू श्रद्धा बसूं लागली. कारण त्यापासून होणारे फायदे त्यांच्या अनुभवास येऊं लागले. गोरगरिबांपासून तों थेट राजेरजवाड्यांपर्यंत इंग्रजी औषधें घेण्याचा प्रघात पडला. उज्जनी-

सारखें क्षेत्र, तेथील लोक फार धर्मभोळे, परंतु त्या ठिकाणीं सुद्धां वामनरावजींच्या सुस्वभावामुळें, परोपकारामुळें व निर्लोभीपणामुळें इंग्रजी औषधोपचार लौकरच लोकप्रिय झाला. वामनरावजी उज्जनीस प्रथम आले. तेव्हां श्रीमंत बायजाबाई शिंदे तेथें राहात असत; व बाबासाहेब आपटे तेव्हां तेथील सरसुभे होते. वामनरावजींवर बाईसाहेबांची पूर्ण कृपा बसली. तसा बाबासाहेबांचाही फार स्नेह जडला. सर्व दर्जाचे लोकांस वामनरावजी फार प्रिय झाले. सर्व उज्जनी क्षेत्रभर वामनरावजींची कीर्ति झाली. अशा प्रकारें वामनरावजींनीं ह्या ठिकाणीं दोन वर्षें म्हणजे ता. ३१ आक्टोबर १८५२ पर्यंत काम करून इंग्रजी औषधोपचाराविषयीं लोकांत श्रद्धा उत्पन्न केली व त्यांस इंग्रजी शस्त्रक्रियेचा प्रभाव दाखविला. पुढें त्यांची इंदुरास बदली झाली, तेव्हां इंदूरचे इस्पितळावर डॉ. अनंत चंद्रोबा असत. ते चाकरी सोडून मुंबईस आल्यामुळें त्यांचे जागीं वामनरावजींची योजना झाली; व पुढें सतत १९ वर्षेंपर्यंत याच ठिकाणीं त्यांनीं लोकसेवा केली.

---

## भाग पांचवा.

### मध्यमावस्था.

#### इंदूरची नोकरी.

वामनरावजी इंदुरास बदलून आले त्या वेळीं श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांस राज्याधिकार नुकताच मिळाला होता. सर राबर्ट हॅमिल्टन हे रेसिडेंट होते व डॉ. इंपी साहेब हे

डॉक्टरी खात्यावर मुख्य होते. वामनरावजी इंदूरचे इस्पितळावर आल्यापासून त्या इस्पितळाची कीर्ति व लोकप्रियता दिवसेंदिवस वाढूं लागली. इंग्रजी औषधोपचाराविषयीं लोकांची अश्रद्धा व विरोध होता तो जाऊन त्याबद्दल लोकांची आदरबुद्धि उत्पन्न झाली. दवाखान्यांत रोग्यांची खूप गर्दी होऊं लागली व इंदूरभरच नव्हे तर सर्व माळवाभर वामनरावजींची कीर्ति पसरली. वामनरावजींची कीर्ति ऐकून रोगनिवारणार्थ दूरदूरहून रोगी येऊं लागले; व दवाखान्याचा खर्च वाढून इस्पितळाची जागा अपुरी वाटूं लागली. मध्यहिंदुस्थानांतील लोकांचे इंग्रजी औषधाविषयींचे दुराग्रह नाहींसे करण्यांत व सर्व लोकांत त्याचा प्रसार करण्यांत डॉ. वामनरावजींचे प्रयत्न कसे कारणीभूत झाले हें नामदार मि. एल्. एल्. पी. टक्कर, सी. आय्. ई. मध्यहिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरलचे इंदूर येथील एजंट यांनीं किंग एडवर्ड हास्पिटल मेडिकल स्कूलच्या विद्यार्थ्यांपुढें ता. १६ जून १९१३ रोजीं दिलेल्या व्याख्यानांत इंदूरच्या धर्मार्थ दवाखान्यासंबंधें जो उल्लेख केला आहे त्यावरून दिसून येईल. तो उल्लेख असा:—*

Dr. Impey.........appointed one of those ( Native doctors ) by name Waman Gopal Kane to the charge of the charitable Hospital at Indore. This Native doctor in addition to possessing considerable professional attainments, had a happy knack of wining confidence from all with whom he came in contact. The

* हा मजकूर अलीकडे उपलब्ध झाला आहे म्हणून प्रकाशकानें या चरित्रांत तो नमूद केला आहे.

prejudice held by the natives of Central India against taking European medicines or to submitting to surgical operations was then almost insuperable. They believed that all European fluid contained spirituous liquors and that the solid medicines contained bone dust and other ingredients calculated to spoil their castes and it is due to Waman Gopal's assiduous and unremitting exertions coupled with his power of inspiring confidence that these prejudices were finally combated. He did not satisfy himself with seeing patients at the Hospital but went about the streets of the city seeking out patients where-ever he could find them; and he soon succeeded in earning a reputation for himself and gradually brought the people to believe in his system of treatment.

( भावार्थः—डाक्टर इंपे ह्यांनीं इंदूरच्या धर्मार्थ रुग्णालयावर डॉ. वामन गोपाळ काणे ह्यांची नेमणूक केली. ह्या देशी डॉक्टरांना आपल्या धंद्याचें बरेंच ज्ञान असून शिवाय ज्यांच्याशीं म्हणून त्यांचा संबंध येत असे त्या सर्वांचा विश्वास संपादन करण्याची नामी हतोटी त्यांना साधली होती. युरोपियन औषधें घेणें किंवा शस्त्रक्रिया करून घेणें ह्याला मध्यहिंदुस्थानांतील लोक अनुकूल नसून त्यांचा तो दुराग्रह नाहींसा करणें जवळ जवळ अशक्य होतें. युरोपांतील सर्व प्रवाही औषधांत मादक दारू असते व अप्रवाही औषधांत हाडांचें पीठ आणि इतर निषिद्ध पदार्थ असतात त्यामुळें आमची जात बाटली जाते, असा त्यांचा समज असे. परंतु हे दुराग्रह शेवटीं नाहींसे होण्याला वामन गोपाळ यांचे अविश्रांत प्रयत्न व लोकांचा आपल्यावर विश्वास

बसवून घेण्याची हतोटी हींच कारणीभूत झालीं. फक्त रुग्णालयांत येणाऱ्या रोग्यांना पाहून त्यांचें समाधान होत नसे. ते शहरांतील रस्त्यांत फिरून जेथें जेथें त्यांना रोगी आढळत तेथें तेथें जाऊन त्यांना पहात असत. अशा रीतीनें त्यांनीं लौकरच कीर्ति संपादन केली व हळु हळु आपल्या उपचारपद्धतीवर लोकांचा विश्वास बसविला.)

वामनरावजी हे पेशवाई जाऊन इंग्रजी अंमल स्थापन झाल्यावर जन्मले होते, म्हणजे अव्वल इंग्रजी पिढींतले ते होते. तेव्हां त्या पिढींतील लोकांप्रमाणेंच त्यांचेही विचार असत. म्हणजे लहानपणापासून सर्व जुन्या चालीरीतींचें वळण, परंतु इंग्रजी विद्येच्या संस्कारामुळें नव्या म्हणजे पाश्चात्य विचारांचाही थोडाबहुत परिणाम त्यांचे मनावर झालेला होता. थोडें बहुत स्त्रीशिक्षण असावें, पुनर्विवाह कांहीं मर्यादेनें असावा, परदेशगमनास अडथळा नसावा, जातिभेदाचें बंधन अगदीं जखडून टाकण्यासारखें नसावें इत्यादि नव्या विचारांची वामनरावजींवर छाया पडली होती. प्रायः ते विचार त्यांना संमत होते व त्याप्रमाणें त्यांचें वर्तनही असे. ह्याचा पुढें सविस्तर उल्लेख होणार आहे; सध्यां येथें इतकेंच सांगणें आहे कीं ह्या त्यांच्या विचाराप्रमाणें इंदूरासही त्यांनीं कांहीं कृति करून दाखविली. संस्थानांत असल्या नवीन विचारांचा प्रसार करणें वामनरावजींसारख्या निर्लोभी मनुष्यासच शक्य झालें. त्यांनीं इंदूरास एक दवाखाना सुरू करून एक मुलींची शाळा स्थापन केली. ह्या दोन संस्था उभारण्यांत वामनरावजींस बरीच झीज सोसावी लागली. त्यांच्या कर्तबगारीविषयीं त्या वेळचे रेसिडेंट सर रॉबर्ट हॅमिल्टन साहेब यांनीं दिलेल्या दाखल्यांत वामनरावजींची सदहू मुलींची शाळास्थापन केल्याबद्दल प्रशंसा केली आहे. तो दाखला पुढें दिला आहे.

" I have much pleasure in giving a certificate to Wamanrao, the Native Doctor, who has from the commencement had charge of the city Dispensary and other medical duties at Indore. He is intelligent, clever and most attentive and has always conducted himself so as to obtain approbation and confidence of all who have been brought in contact with him. He bears an excellant character and merits attention and consideration. To him I am indebted for establishing a girls' school, which upto the disturbances was much attended and very successful: I hope he may be encouraged to renew his exertions in this direction for he has tact and judgment to make it popular."

(Sd.) Robert Hamilton.

29th March 1859.

( **भावार्थः**—डॉ. वामनरावांना हा दाखला देण्यांत मला फार आनंद वाटतो. इंदुर येथील सिटी डिस्पेन्सरीचें व दुसऱ्या दवाखान्याचीं कामें आरंभापासून त्यांच्याकडेस आहेत. ते हुशार, शहाणे आणि अत्यंत दक्ष असून ज्यांच्याशीं त्यांचा संबंध आलेला आहे त्या सर्वांचा विश्वास आणि प्रीति संपादन करण्यासारखें त्यांनीं आपलें वर्तन सदोदित ठेविलें आहे. ह्यांचें शील उत्तम असून ते बुद्धिवान्, लायक आणि विचारी आहेत. त्यांनीं मुलींची शाळा स्थापन केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. बंडाचे सालापर्यंत त्या शाळेंत पुष्कळ मुली येत असत व ती एक चांगली संस्था झाली होती. ती शाळा लोकांना आवडती करण्याइतका विचारीपणा व करामत त्यांच्या ठायीं

आहे आणि म्हणून ह्या दिशेनें त्यांना आपले प्रयत्न पुन्हां चालू करण्याविषयीं उत्तेजन मिळेल अशी मला आशा आहे. )

आपलें काम योग्य रीतीनें सांभाळून अन्य मार्गानें समाजकार्य करण्याची उत्सुकता दाखविल्यास त्या वेळीं वरिष्ठ इंग्रजी अमलदारांकडून कसें प्रोत्साहन मिळे ह्याचें हें एक चांगलें उदाहरण आहे.

असो. वामनरावजींचें बिऱ्हाड छावणींत इस्पितळाचे हद्दींतच डाक्टरांकरितां बांधलेल्या बंगल्यांत असे. इंदूर शहर व छावणीमध्यें सुमारें पाऊण कोसाचें अंतर आहे असें असून वामनरावजींस रात्री बेरात्रीं किती जरी खेपा पडल्या तरी रोग्यास जाऊन पाहण्याचा मुळींच कंटाळा नसे. पाहिजे त्यानें यावें, वामनरावजींस समक्ष जाऊन भेटावें, आपल्या घरच्या दुखणेकरी माणसाची हकिकत सांगावी व आपल्या घराचा पत्ता सांगून ठेवून निघून जावें. अशा तऱ्हेनें दुखणेकऱ्यांचे घरीं जाण्याची नोंद आपले जवळ ठेवून घेऊन इस्पितळाचें काम आटोपलें म्हणजे जेवून लगेच त्यांस पाहण्यासाठीं बाहेर पडावयाचें. सर्व दुखणेकरी पाहणें झाल्यावर पुन्हां इस्पितळांत येऊन तेथील काम पहावयाचें; अशा रीतीनें आळस न करितां पडेल तितकें काम करावयाचें. हें दिवसाचें झालें. अशा रीतीनें सर्व दिवसभर काम केलेल्या मनुष्यास रात्रीं तरी विसावा पाहिजे कीं नाहीं ? पण डाक्टरीसारख्या धंद्यांत वामनरावजींसारख्या आत्मयाजी पुरुषास तो कोठून मिळणार ? अशा परोपकारी पुरुषास दुसऱ्यांचे हिताप्रीत्यर्थ आपलें शरीर झिजविण्यांतच विसावा वाटतो. धन्य हे पुरुष. कितीही रात्रीं कोणीही वामनरावजींस दुखणेकऱ्यास

पाहण्याकरितां बोलावूं आल्यास ते ताबडतोब उठून त्याजबरोबर पाहिजे तिकडे मोठ्या आनंदानें जात. असा त्यांचा नित्यक्रम असे.

अशा रीतीनें इस्पितळाचें काम व समाजसेवा कांहीं वर्षें वामनरावजींच्या हातून चालली असतां त्यांत एक मोठें विघ्न झालें. तें विघ्न म्हणजे इतिहासप्रसिद्ध १८५७ सालचें बंड होय. ह्या बंडांत छावणींतील इतर इमारतींप्रमाणें इस्पितळाचीही राखरांगोळी झाली. इस्पितळ व वामनरावजींचें लगतचें घर हीं बंडवाल्यांनीं जाळून पोळून फस्त केलीं. वामनरावजींचा व त्यांचे वरिष्ठ साहेबांचा जीव धोक्यांत पडला, पण सुदैवानें दोघेही बचावले.

---

## भाग सहावा.

### सन १८५७ सालांतील बंडाचा प्रसंग व चरित्रनायकाचें धैर्य.

एके दिवशीं सुमारें ८ वाजतां वरिष्ठ डॉक्टरसाहेब इस्पितळांत येऊन वामनरावजी व ते दोघे मिळून नेहमींप्रमाणें रोग्यांचे बिछान्याजवळ जाऊन त्यांस तपासून पहात असतां एकामागून एक असे तोफेचे आवाज ऐकूं येऊं लागले. साहेब व इतर मंडळी घाबरून इकडे तिकडे पाहूं लागली. चोहींकडून धांवाधांवी, पळापळी, मारहाण, आरडाओरड वगैरे प्रकार नजरेस आले. त्यावरून आज पुष्कळ दिवस ज्या गोष्टीची बोलवा होती तीच आज घडून येत आहे अशी तत्क्षणींच सर्वांची खातरी झाल्याबरोबर ज्यानें त्यानें ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे पळ काढला. डॉक्टरसाहेब अगदीं भेदरून गेले. पुढें काय करावें तें त्यांस सुचेनासें झालें. बडेसाहेबांचे

( एजंट टु धि गव्हर्नर जनरल इन सेंट्रल इंडिया) कोठीवर किंवा आपल्या बंगल्यावर जाण्याची सोय राहिली नाहीं. छावणीभर जिकडे तिकडे शिपाई लोक वावरूं लागले व तोफांचा भडिमार जवळ जवळ ऐकूं येऊं लागला. अशा स्थितींत आपण बंगल्याकडे गेल्यास खचीत प्राणास मुकणार असें वाटल्यावरून साहेबांनीं परस्पर मागचे वाटेनें हळूंच निघून जाण्याची युक्ति काढली; व त्याप्रमाणें त्या वाटेनें ते चालते झाले. वामनरावजींस आपल्या वरिष्ठाची अशी गर्भगळित झालेली स्थिति पाहून फार वाईट वाटलें; व त्यांस धीर येण्यासाठीं ह्मणून आपण आपल्या प्राणाची व आपल्या बायकामुलांची काळजी न करितां ते त्यांजबरोबर गेले. वामनरावजींच्या हाताखालीं गोविंदराव नांवाचे एक देवीडाक्टर होते त्यांना मात्र त्यांनीं जातांना घाई घाईनें व घाबऱ्या घाबऱ्या असें सांगितलें कीं घरीं जाऊन मुलांमाणसांस चांगल्या सुरक्षित जागीं लवकर घेऊन जा. मी साहेबास पोंहचवून येतों. साहेबाबरोबर बरेच लांब गेल्यावर त्यांस देवगुराड्याच्या रस्त्यास लावून आतां त्यांच्या जिवाला कांहीं धोका नाहीं अशी खात्री झाल्यावर साहेबांच्या परत जाण्याविषयींच्या आग्रहावरून वामनरावजी इस्पितळाकडे परतले. अशा रीतीनें आपल्या वरिष्ठाचा जीव धोक्यांतून पार पडेपर्यंत वामनरावजी त्यांजबरोबर होते हें एक स्वामीसेवेचें उत्तम उदाहरण होय. वामनरावजी परत येतांना वाटेंत त्यांच्यावर दोन अरब शिपायांनीं बंदुका रोखल्या. त्याबरोबर वामनरावजींनीं न डगमगतां आकाशाकडे बोट दाखवून "अल्ला बडा है" असें म्हटल्याबरोबर अरबांनीं रोखलेल्या बंदुका खालीं केल्या. अशा रीतीनें केवळ ईश्वरीकृपेनें

वामनरावजी मृत्यूच्या हातून सुटले. मनुष्याच्या अंतःकरणांत प्रामुख्येंकरून जे विचार सांठवलेले असतात ते अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सहज बाहेर पडत असतात. साधारण मनुष्याला निदान आपल्या बायकामुलांचें कसें होईल हा विचार तरी मूर्तिमंत पुढें उभा दिसूं लागला असता. परंतु वामनरावजींची तशी कांहींच स्थिति न होतां त्यांच्या हृदयांत सांठविलेल्या ईश्वरनिष्ठेची छायाच त्यांचे उक्तींत व कृतींत दिसली. ईश्वरनिष्ठेवांचून दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें ते या वेळीं यमाचे जबड्यांतून वांचणें शक्य नव्हतें, त्यांच्या हृदयरूपी मंदिरांत ईश्वराची सप्रेम स्थापना झालेली होती. त्यानेंच त्या अरबांस बंदुका खालीं करण्याची प्रेरणा केली. आपले भक्ताचें तेज लोकांचे निदर्शनास आणण्याकरितां ईश्वरास अशा तऱ्हेची योजना करावी लागते. वामनरावजींच्या हातून आणखी सेवा घ्यावयाची होती म्हणूनच कीं काय ईश्वरानें यमदूतांचे हातून त्यांना सोडविलें. असा ईश्वराचा वशिला ज्याला आहे तोच खरा ज्ञानी व धन्य समजला पाहिजे.

वामनरावजींची ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठा होती, व ते स्वामीसेवक होते, तसेंच त्यांच्या अंगीं धैर्यही वाखाणण्याजोगें होतें. वामनरावजी हे इंग्रजांच्याच बाजूचे आहेत असें त्या वेळीं सर्व लोक समजत असत. त्यामुळें बंडवाले वामनरावजींचा शोध करीत छावणीच्या इस्पितळांत आले. त्यांचा उद्देश वामनरावजींना मारावयाचा अगर छळावयाचा होता असें वाटतें. आपला शोध चालला आहे ही गोष्ट वामनरावजींस कळतांच ते पुढें सरसावले व म्हणाले "हा मी वामनराव डॉक्टर आहें; तुम्हास काय पाहिजे आहे?" वामनरावांचे हे धैर्याचे बोल ऐकून बंडवाले विरमले व मागें फिरले.

यमदूतांच्या हातून सुटून वामनरावजी आपल्या घराकडे येऊं लागले तों वाटेंत त्यांना कोणीं सांगितलें कीं इस्पितळ व घरदार या सर्वांचा आगीनें भडका उडाला आहे; व मुलेंमाणसें शेजारच्या शिंद्यांच्या वकीलाच्या हात्यांत जाऊन लपून बसलीं आहेत म्हणून ते तिकडे गेले. आतां पुढें राहण्याची सोय काय या काळजींत सर्व मंडळी पडली. घरदार चीजवस्त सर्व बंडवाल्यांनीं जाळून टाकली. फक्त अंगावरचीं वस्त्रें तेवढीं शिल्लक राहिलेलीं. अशा स्थितींत कोठें व कोणाकडे जावें हें कोणास सुचेना. शेवटीं तेथेंच एक रात्र व एक दिवस काढून दुसरे दिवशीं जिकडे तिकडे स्वस्थता झाल्यावर सर्व माणसें घेऊन सकाळचे प्रहरीं जुन्या इंदुरांत सदूमामा जोशी, मराठी शिरस्तेदार, म्हणून एक गृहस्थ रहात होते त्यांजकडे आपल्या मंडळीसह वामनरावजी गेले. या थोर गृहस्थानें मोठ्या सदय अंतः-करणानें आपलें एक घर रिकामें करून तें वामनरावांचे कुंटुंबास राहण्यास दिलें; व भांडीं-कुंडीं वस्त्र प्रावर्ण इत्यादि सर्व सोय केली. हे त्यांचे उपकार वामनराव नेहमीं स्मरत असत. बंडवाल्यांनीं बराच इस्पितळाचा भाग जाळून व मोडून तोडून टाकला होता. तेव्हां रोग्यांचे राहण्याची पुढें निराळी व्यवस्था करण्यांत आली. महाराज तुकोजीरावांनीं त्यांचे पदरीं असलेला फौजेवरील एक अधिकारी सादतखां बंडवाल्यांस फितूर झाला त्याचेच हवेलींत दवाखाना घाल-ण्यास सांगितलें. त्यामुळें थोडक्याच काळांत दवाखाना पूर्ववत् चालू झाला. जळालेलें इस्पितळ पुन्हा नवें बांधून तयार होईपर्यंत दवा-खाना कांहीं दिवस सादतखानचे हवेलींत व कांहीं दिवस इंदूरचे मुशाफरखान्यांत होता.

बंडांत ज्यांच्या मालमत्तेचें नुकसान झालें होतें अशा इंग्रज सरकारच्या नोकरांचें तें नुकसान भरून देण्याचा ठराव झाला. त्या ठरावाअन्वयें झालेल्या नुकसानीबद्दल खात्री करून घेऊन त्याची शक्य तितकी भरपाई करून देण्यासाठीं एक इंग्रजी अमलदार शहरोंशहरीं दौरा करीत निघाला. फिरतां फिरतां त्या अमलदाराची स्वारी इंदूर मुक्कामीं आली; व लोकांस बोलावून ज्यांचें नुकसान झालें होतें अशा सरकारी नोकरांस शपथ घेण्यास लावून त्यांचे नुकसानीबद्दल कांहीं ठरीव रक्कम त्यांस तो अमलदार देत असे. एक दिवस वामनरावजींना तेथें जाऊन इतका इतका आपला ऐवज गेला आहे असा पुरावा देऊन शपथ वाहून प्रतिज्ञा करण्याकरितां निमंत्रण आलें. वामनरावजी तेथें गेले, व इतका इतका आपला ऐवज लुटींत गेला असें त्यांनीं अमलदाराजवळ सांगितलें. परंतु रीतीप्रमाणें शपथ घेऊन आपली प्रतिज्ञा खरी करा असें साहेबानें त्यांस सांगितल्यावर वामनरावजींनीं शपथ घेण्याचें नाकारलें. ह्या त्यांच्या कृतीनें त्या साहेबांस व त्यांच्या दप्तरांतील कारकुनास मोठें आश्चर्य वाटलें. शपथ न घेण्याचें कारण साहेबांनीं त्यांना विचारलें असतां वामनरावाजींनीं त्यांस असें उत्तर दिलें कीं मी शपथ कधींच वाहात नसतों. मी नेहमीच खरें बोलतों. तेव्हां मला शपथ घेण्याचें कारण नाहीं. मी म्हणतों हें आपणास खरें वाटत नसल्यास माझा नाइलाज आहे. माझ्या म्हणण्यावर आपला भरंवसा बसत असेल तर मला पैसे द्या, नसल्यास देऊं नका, हा मी चाललों. असें म्हणून वामनरावजी लागलेच तेथून निघून गेले. साहेबास मोठा अचंबा वाटला, ज्या साहेबाच्या येथें हा अमलदार उतरला होता तो साहेब म्हणजे वामनरावजींचा

वरिष्ठ अधिकारींच होय. हें त्या अमलदारास माहित नव्हतें. वामनरावजींचा नामनिर्देश करून त्यांच्या निस्पृहतेबद्दल त्यांच्याशीं तो अमलदार बोलूं लागला व सदर्हु गृहस्थाची आपणास कांहीं माहिती आहे काय असें अमदारानें त्यांस विचारतांच वामनरावजींच्या वरिष्ठ साहेबांनीं त्या अमलदारास सांगितलें कीं तो गृहस्थ माझाच दुय्यम आहे, त्याला बोलावून आणा व तो म्हणतो आहे तेवढी रकम त्याला बिनदिक्कत द्या. मी त्याबद्दल हमी घेतों. तो फार प्रतिष्ठित मनुष्य आहे. अमलदारानें लागलेंच वामनरावजींस बोलावून घेऊन त्यांचा मोठा आदर सत्कार करून त्यांनीं सांगितली होती तेवढी रकम त्यांस दिली. रकम देते वेळीं अमलदारानें असे उद्गार काढले कीं मी आज इतका मुलुख फिरलों व इतकीं माणसें पाहिलीं परंतु असा विलक्षण निश्चयी व सत्यनिष्ठ मनुष्य माझ्या पाहण्यांत आला नाहीं. वरील हकिकतीवरून वामनरावजी निश्चयी, सत्यप्रिय व धैर्यवान् होते हें चांगलें दिसून येतें.

---

## भाग सातवा.

### संसाराची फिरून मांडणी.

अशा रीतीनें झालेल्या नुकसानीची अंशतः भरपाई होऊन व जुन्या इंदुरास राहण्याची सोय होऊन वामनरावजींचे संसाराची पुनः जशी तशी मांडणी झाली; व त्यांनीं आपला परोपकाराचा क्रम पूर्ववत् सुरू केला. सकाळीं उठून स्नानसंध्या आटोपून छावणींत इस्पितळांत जावयाचें, तेथें १०–१२ वाजेपर्यंत काम करून जेवा-

वयास घरीं जावयाचें. येणेंप्रमाणें दिवसाचें काम आटोपल्यावर रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास घरीं यावयाचें. दुपारीं झोंप वगैरे घेण्याची त्यांची संवय नसे. रात्रीं रोग्यास पाहण्याकरितां बाहेर जाण्यामुळें जागरण झालें तरी देखील नित्यक्रमांत कांहीं अंतर पडूं द्यावयाचें नाहीं अशी त्यांची रीत होती. हें व्रत त्यांस वर्षानुवर्ष अबाधित चालवितां आलें याचें कारण हें कीं लहानपणापासून कष्ट करण्याची संवय, शरीरसंपत्ती चांगली, खाण्यापिण्यांत नेमस्तपणा व निर्व्यसनता इत्यादि गुण त्यांच्या अंगीं वसत होते. त्यामुळेंच स्वतःस दुखण्याबाण्याचा प्रसंग कधीं न येतां आपलें रोजचें काम त्यांना राहाटगाडग्यासारखें एकसारखें चालवितां येई. आपल्या नित्याच्या उद्योगाखेरीज त्यांना मधून मधून कित्येक महत्त्वाच्या गोष्टींत मन घालण्याचा प्रसंग येई. असें करण्यास त्यांचा मुरवती स्वभाव व आपल्या मित्रांवर व सर्व साधारणपणें आर्त जनांवर आपल्याकडून होईल तितका हस्तें परहस्तें उपकार करण्याची त्यांची उत्कट इच्छा हीं कारणीभूत झालीं. व ह्यामुळें कित्येक प्रसंगीं त्यांना आपल्या पदरास चांगला खारही लावून घ्यावा लागत असे.

---

## भाग आठवा.

### मित्रासाठीं झीज व परोपकारबुद्धि.

वामनरावजी परोपकारी होते व मित्रांकरितां ते प्रसंगीं झीजही सोसणारे होते. व ह्या त्यांच्या गुणांमुळेंच त्यांच्यासारख्या निर्व्यसनी व सदाचारी गृहस्थास सुद्धां कर्जबाजारी व्हावें लागलें. एका

मोठ्या स्नेह्याकरितां वामनरावजींना मध्यहिंदुस्थानांतील एक संस्थान सोडविण्याच्या कामांत पडावें लागलें. त्या वेळच्या लाट साहेबांच्या कौन्सिलांतील एक मोठा वजनदार गृहस्थ विलायतेस परत जाण्यासाठीं निघाला असतां वाटेंत इंदूर मुक्कामीं उतरला होता; व तो वामनरावजींचे वरिष्ठ गोरे डॉक्टर ह्यांचा पाहुणा होता. ह्या साहेबांच्या शिफारशीनें व खटपटीनें सदरहू संस्थान सुटण्याच्या कामीं थोडीबहुत मदत होईल असें वामनरावजींच्या स्नेह्यास वाटल्यावरून त्यांनीं त्या साहेबाची भेट वामनरावजींच्या द्वारें घेण्याचें मनांत आणलें. वामनरावजींनीं आपल्या वरिष्ठ साहेबांचे बंगल्यावर आपल्या स्नेह्यांची व त्या साहेबांची भेट करून दिली. ह्या प्रसंगीं त्या विलायतेस जाणाऱ्या इंग्रज गृहस्थाचें सुमारें अडीच तीन हजार रुपयांचें फोटोग्राफीचें सामान विकावयाचें होतें. तें घेण्यास कोणी गिऱ्हाईक मिळेल काय असें त्या साहेबांनीं वामनरावजींस विचारलें. शोध करून आम्हीं आपणास ताबडतोब कळवितों असें वामनरावजींच्या मित्रांनीं उत्तर दिलें. पुढें असा विचार ठरला कीं वामनरावजींनीं तें सर्व सामान आपले स्वाधीन करून घ्यावें व पुढें तें संस्थानानें विकत घेऊन पैसा द्यावा. आपल्या मित्राच्या भरंवशावर वामनरावजींनीं तें सर्व सामान विकत घेतलें. पुढें कांहीं दिवसांनीं तें संस्थान सुटून तेथील राजास अधिकार मिळाला परंतु तें सर्व सामान वामनरावजींच्या गळ्यांतच पडलें. व त्याबद्दलचा सर्व पैसा त्यांना कर्ज काढून भरावा लागला. अशा रीतीनें स्नेह्याच्या मुरवतीमुळें वामनरावजींस कर्ज करून घ्यावें लागलें.

---

# भाग नववा.

## इंदुरास राजमान्यता व लोकमान्यता.

वामनरावजी इंदुरास असतांना गोरगरिबापासून तों थेट राजापर्यंत सर्वांस सारखेच प्रिय झाले होते. कारण निर्लोभीपणा, परोपकारबुद्धि, प्रेमळ भाषण, पोटीं सर्वांविषयीं दया व निस्पृहता असे अमोलिक गुण त्यांचे अंगीं वसत होते. ईश्वरनिष्ठा तर त्यांचे सर्व गुणावर पताकेप्रमाणें शोभत होती, व त्या पताकेच्या दहशतीनेंच तर यमाचे दूत देखील एकदां विरघळून गेले, तो वृत्तांत मागें आलाच आहे. असा पुरुष राजापासून रंकापर्यंत प्रिय झाला तर त्यांत नवल तें काय? सरकार वाड्यांत कोणास दुखणें आलें म्हणजे वामनरावजींस बोलावणें येई. श्रीमंत तुकोजीराव महाराजांचा व त्यांच्या राणी साहेबांचा वामनरावजींवर पूर्ण लोभ व भरंवसा असे. वामनरावजी हे आपल्या कुटुंबापैकींच आहेत असा सरकारवाड्यांत त्यांजविषयीं लोभ जडला होता. महाराजांचे सरदार मानकरी वगैरे बड्या लोकांतही वामनरावजींस वारंवार जावें यावें लागे; त्या सर्वांचाही वामनरावजींवर पूर्ण लोभ व भरंवसा असे; तरी गरीबगुरिबांची त्यांच्याकडून यत्किंचित्‌ही हयगय न होतां उलट त्यांचेकडे वामनरावजींचें विशेष लक्ष असे. छावणीचे साहेबलोकांतही वामनरावजींविषयीं मोठी आदरबुद्धि व भरंवसा असे. कित्येक साहेबलोक व त्यांच्या मडमा वामनरावजींकडून मोठ्या श्रद्धेनें औषध घेत. कित्येक प्रसंगीं खुद्द तेथील रेसिडेंट साहेबांच्या मडमेकडून आपल्या स्नेही वर्गांतील इंग्रज मडमांस औषधोपचाराकरितां वामनरावजींची शिफारस करण्यांत येई. परंतु

अशा मोठ्या ठिकाणीं व इंग्रज लोकांच्या बाबतींत वामनरावजी मोठ्या सावधपणानें वागत. कोणी फारच भीड घातली म्हणजे ते जाऊन त्या बायांस पहात, परंतु लगेच ते आपल्या वरिष्ठसाहेबांस आणून दाखविण्याविषयीं आग्रह करीत. इतकें केल्यावर कोणी नच ऐकल्यास मग आपण औषधोपचार करीत. बहुतेक सर्व रेसिडेंट साहेबांचा व इतर इंग्रज अमलदारांचा वामनरावजींवर मोठा लोभ व त्यांच्याविषयीं मोठी आदरबुद्धि असे. वामनरावजी हे मोठे सत्यवादी, स्पष्टवक्ते निष्कपटी व निस्पृह आहेत असा या सर्वांचा ग्रह झालेला होता. त्यामुळें साऱ्या इंग्रजलोकांत त्यांचें मोठें वजन असे. वामनरावजींचा स्वभाव अत्यंत निर्लोभी असे. त्यावेळचे माळव्यांतीऊ दवाखान्यांचे सुपरिंटेंडेंट डॉक्टर बोमंटसाहेब ह्यांनीं मध्यहिंदुस्थानातील गव्हर्नर जनरलचे एजंट कर्नल मीडसाहेब ह्यांना डॉक्टर वामनरावजीं संबंधानें लिहिलेलें पत्र आम्हास सांपडलें असून त्याचा उतारा आम्ही खालीं देत आहों त्यावरून डॉक्टर वामनरावजींच्या निर्लोभीपणाची साक्ष पटते.

To,

Colonel Meade C. S. I. Agent Gov. General-
C. India.

Sir,

I send you enclosed an appeal from Waman Rao Head Native doctor of the Malva Dispensaries asking for your assistance in obtaining some provision for his old age.

My experience of Waman Rao is that all, whom I have ever heard speak of him, say that he is one of the kindest, best and most charitable of men, always

ready to give his assistance to any one, rich or poor, and neither seeking nor accepting any reward for his services. In this latter respect he has been, I consider, very foolish; for the fees he might easily have obtained would have amounted to a sum more than enough for all his wants. When I have spoken to him and advised him to take fees, if only to provide for his old days, he replied "the people among whom I have laboured so long will never see me come to wants."

Under these circumstances I think he may appeal to the Native Rulers of Malva among whom and whose subjects he has laboured so long to subscribe a sum which for a man of his simple habits will be sufficient to place him beyond the reach of wants.

I have the honour to be

Sir.

Your most obedient servant.

( Sd. ) T. Beaumont, M. D.

Superintendent, Malva Dispensaries.

Indore, 21st September 1867.

( भावार्थ–माळवा–दवाखान्याचे मुख्य हिंदी डाक्टर वामनराव ह्यांच्याकडून आलेलें विनंतिपत्र मी आपणाकडे ह्या सोबत पाठवितों व त्यांच्या म्हातारपणाकरितां कांहीं व्यवस्था करण्यासाठीं तुम्ही मदत करावी अशी त्यांची विनंती आहे. वामनरावाविषयीं माझा अनुभव असा आहे कीं ज्यांना ज्यांना त्यांच्याविषयीं बोलतांना मी ऐकलें आहे

ते सर्व सांगतात कीं हे गृहस्थ अत्यंत मायाळू, सद्गुणसंपन्न व अत्यंत दयाशील आहेत. आपल्या मेहनतीबद्दल कोणत्याही बक्षिसाची अपेक्षा न करितां किंवा कोणताही मोबदला न घेतां गरीबाला किंवा श्रीमंताला मदत करण्याला त्यांची नेहमीं तयारी असते. मला वाटतें कांहींही न घेण्यांत त्यांनीं बराच वेडेपणा केला आहे. कारण जी फी त्यांना सहज मिळाली असती तिची रक्कम आजला इतकी झाली असती कीं तीमुळें त्यांच्यासारख्या साध्या वृत्तीच्या मनुष्याच्या सर्व गरजा भरून आल्या असत्या. वृद्धापकाळांत कांहीं तरतूद पाहिजे, एवढ्याकरितां तरी फी घेण्याविषयीं मी त्यांना बोललों तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं " ज्या लोकांमध्यें मीं आजपर्यंत काम केलें ते लोक मला अडचणींत पडूं देणार नाहींत. "

म्हणून मला असें वाटतें कीं त्यांनीं माळव्यांतील संस्थानिकांकडे अर्ज करावा. ज्या संस्थानिकांचें व त्यांच्या प्रजेचें आजपर्यंत त्यांनीं काम केलें आहे, त्या संस्थानिकांकडून जी वर्गणी जमा होईल ती त्यांच्यासारख्या साध्या राहणीच्या मनुष्यांना पुरेशी होईल.

आपला आज्ञाधारक सेवक,

टी. बुमोंट एम्. डी.

माळव्यांतील दवाखान्यांचे सुपरिंटेंडेंट.

मुकाम
इंदूर
२१ सप्टेंबर १८६७.

# भाग दहावा.

## धंद्यांतील नैपुण्य.

वामनरावजींचे वरिष्ठ डॉक्टरांचाही त्यांच्या हस्तकौशल्याबद्दल व योग्यतेबद्दल फार चांगला ग्रह असे. इस्पितळांतील बहुतेक शस्त्रक्रियेचें व औषधोपचाराचें काम पुष्कळ वर्षेंपर्यंत वामनरावजींकडूनच होत असे. मुतखडे व मोतीबिंदु काढणें व तशाच दुसऱ्या अनेक प्रकारच्या शस्त्रक्रियेंत वामनरावजी फार निष्णात होते; व त्यांचे बहुतेक वरिष्ठ डॉक्टर या कामांत त्यांचेच सल्ल्यानें वागत तसेंच प्रसूतिक्रियेमध्येंही वामनरावजींचा हात खंडा असे. माळव्यांतील डॉक्टरी खात्याचे मुख्य अधिकारी आर्थर न्यून्हॅम् एम्. डी. यांनीं त्या खात्याचा १८५४ सालचा जो रिपोर्ट केला आहे त्यांत त्यांनीं वामनरावजींबद्दल जो उल्लेख केला आहे त्यावरून वामनरावजींच्या कौशल्याची उत्तम माहिती होईल. तो उतारापुढें दिला आहे.

" There have been several cases of cataract to operate on. The operation has been successful in many of them. I find Waman Gopalrao a very good occulist; he is the best native operator I have met with."

[ अर्थ—मोतीबिंदूवर शस्त्रक्रिया करून घेण्यासाठीं पुष्कळ रोगी आले. मोतीबिंदूवरील पुष्कळ शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या. वामन गोपाळराव मला फार चांगले नेत्रवैद्य दिसतात, व मला जे देशी वैद्य आढळून आले त्यांमध्यें हे उत्तम शस्त्रक्रिया जाणणारे आहेत. ) वामनरावजींच्या इंदूरचे इस्पितळांतील नोकरीबद्दल डॉ. टी. बोमंट एम्.

डी. एफ्. आर्. सी. एस्. सुपरिंटेंडेंट, माळवा चारिटेबल डिस्पेन्सरीज यांनीं जो दाखला त्यांस दिला त्यावरूनही वामनरावजींच्या नैपुण्याबद्दल कळून येईल; तोही पुढें दिला आहे.

" Mr. Wamanrao has served as Native Doctor in the Malva Charitable dispensary for the last 22 years and it gives me great pleasure to testify to the very valuable services he had done especially in the Indore Hospital of which he has often been in sole charge for considerable period. His care and kindness to the sick and poor is beyond praise.

Indore<br>1st August 1871 (Sd.) T. Beaumont.<br>M. D. F. R. C. S.

( राजश्री वामनराव ह्यांनीं देशी डाक्टर म्हणून माळव्यांतील दवाखान्यावर गेलीं बावीस वर्षें नोकरी केली. इंदूर येथील रुग्णालयाची देखरेख बहुतेक त्यांच्याचकडे पुष्कळ दिवस होती. विशेषतः ह्या रुग्णालयासंबंधें त्यांनीं जी बहुमोल कामगिरी बजाविली तिचा उल्लेख करण्यास मला आनंद वाटतो. आजाऱ्याविषयींच्या त्यांच्या काळजीबद्दल व गरिबाविषयींच्या दयेबद्दल त्यांची स्तुति करावी तेवढी थोडीच. )

वामनरावजींच्या यशाची कीर्ति ऐकून लांब लांबचे लोक इंदूरचे इस्पितळांत उपचाराकरितां येत. मधून मधून रोगी पाहण्यासाठीं वामनरावजींस बाहेरगांवींही जावें लागे. रावराजे दिनकरराव यांचे कुटुंबाचे डोळे बरे करण्यासाठीं वामनरावजींस दोन तीन वेळां आग्रा मुकामीं जावें लागलें होतें; व एके प्रसंगीं तेथें असतां जयाजीराव महाराज शिंदे ह्यांचा मुक्काम तेथेंच होता. महाराजांची प्रकृति नादुरुस्त होती

म्हणून त्यांना पाहण्यासाठीं वामनरावजींस रोज १०।१५ दिवस जावें लागलें होतें. मुंबईंत असतां डाक्टर भाऊ दाजी आजारी असतां रात्रीं एका श्रीमंत रोग्याकडे वामनरावजींस जाण्याचा प्रसंग आला. वामनरावजींनीं त्याच वेळेस त्या रोग्याला उपचार करून त्याचा वायुगोळा वर चढवून दिला व त्याला बरा केला. एवंच डाक्टरीच्या कामांत यांचा यशोदुंदुभी सर्व माळवाभर व मुंबईस आल्यावर मुंबई शहरांत एकसारखा गर्जत होता.

खालील मजकुर रा. रा. काशीनाथ कृष्ण लेले मुक्काम धार ह्यानीं कळविला आहे. त्यावरून त्या वेळीं वामनरावजींची शस्त्रक्रियेच्या विद्येंत किती निपुणता होती हें दिसून येतें.

" माधवराव जाखडे कंपौंडर हल्लीं पेनशनर असून धार येथें श्री. रा. रा. लक्ष्मण गोविंद अळकूटकर यांचे राममंदिरांत असतात. त्यांचे तोंडची हकिकत:—

वामनरावजी डाक्टर यांचा मोतीया बिंदु काढून डोळे नीट करण्यांत व मुतखडे काढण्यांत व प्रसूति करविण्यांत हात खंडा असे. डोळ्याचें काम ते दोन्ही हातानें सारखें करीत. यांचे वरिष्ट साहेब डाक्टर बोमंट यांस नेत्रवैद्यकीचें काम चांगलें येत नव्हतें. म्हणून विलायतेस जाऊन ते तें काम शिकून परत आले. तथापि त्यांस वाटत असे कीं डाक्टर वामनरावजी काणे इंदूरचे इस्पितळांत आहेत तोंपर्यंत आपलें वजन पडावयाचें नाहीं व आपला लौकिकही व्हावयाचा नाहीं."

अक्कलकोटचे प्रसिद्ध स्वामी वामनरावजींची योग्यता जाणून होते. स्वामीकडे एकदां एक गरीब डोळ्याचा रोगी आपले डोळे बरे व्हावेत

ह्या हेतूनें गेला. स्वामींनीं त्याला सांगितलें, तूं वामनरावजींकडे जा. तेथें तुझे डोळे बरे होतील. स्वामीच्या आज्ञेप्रमाणें तो गृहस्थ वामनरावजींकडे आला व वामनरावजींनीं रोग्यास आपल्या घरीं ठेवून त्याची सर्व प्रकारची सुश्रूषा करून त्याचे डोळे बरे केले.

वामनरावजी घरीं स्वतः औषधेंही बनवीत असत. क्लोरोडिन बनवून तें आपल्या रोग्यांना देत असत. सध्यां बाजारांत मिळत असलेल्या कोणत्याही विलायती क्लोरोडिन इतकेंच त्यांचें क्लोरोडिन चांगलें होतें. अर्थात् त्याचा गुणही लोकांस चांगला येत असे. डॉक्टर वामन गोपाळ यांचा सार्सापरिला तर प्रसिद्धच आहे. वामनराव जीवंत असतांना सारसापरिल्याची वर्तमानपत्रांतून जाहिरात होत नव्हती. ते हें औषध आपल्या रोग्यांस देत असत. वामनरावजी वारल्यावर बरेच दिवस वामनरावजींचे शिष्य सार्सापरिला सर्व लोकांस विकीत असत. डॉ. बाळा भाऊंची परीक्षा उतरल्यावर सार्सापरीला दवाखान्यांतील इतर औषधांप्रमाणें रोग्यांसच विकला जाई. पुढें काशीनाथपंतांची डॉक्टरीची परीक्षा झाल्यावर एक दोन वर्षांनीं या औषधाचा कारखाना गौतमरावांकडेस सोंपविला गेला; रा. रा. गौतमरावजींनीं या सार्सापरिल्याच्या जाहिराती देऊन विक्री मांडली; व या वेळेपासून याचा सर्व कारभार रा. गौतमराव करीत. त्याची मिळकत रा. गौतमरावजींकडेसच जाई. वामनरावजींस किंवा त्यांच्या उभयतां पुत्रांस या औषधाची जाहिरात देणें योग्य वाटत नसे. याशिवाय मालवा म्यांगो चटणी ह्मणून एक प्रकारची चटणीही वामनरावजी तयार करीत असत; व ती चटणीही हजारो देशी परदेशी लोकांना आवडती झाली होती.

# भाग अकरावा.

## इस्पितळांतील वर्तनक्रम.

इस्पितळांतील आपले हाताखालचे लोकांशीं वामनरावजींचें वर्तन मोठ्या ममतेचें, सरळपणाचें व विश्वासाचें असे. त्यामुळें इस्पितळांतील सर्व नोकराचाकरांचेंही वामनरावजींवर फार प्रेम जडलें असून त्यांच्या बद्दल सर्वांचे मनांत फार पूज्यबुद्धि वसत असे. सणाचे दिवशीं कित्येक प्रसंगीं पुष्कळांना दुपारची सुटी देऊन ते आपण स्वतः दुपारीं इस्पितळांत काम करीत बसत. इस्पितळ हें वामनरावजींस घराहून प्रिय वाटे. कित्येक प्रसंगीं इस्पितळांतील सर्पण संपलें किंवा दुसऱ्या कांहीं वस्तूची एकाएकीं तूट आली तर वामनरावजी ती वस्तु आपले घरून पाठवून देत; व प्रसंगीं गरीब रोग्यांस खाण्यापिण्याची, वस्त्र–प्रावरणाची व भांड्यातोड्यांचीही आपल्या खर्चानें तरतूद करून देत. वामनरावजींचा पगार आरंभीं तीस रुपये होता. तो पुढें इंदुरास आल्यावर शंभर रुपयांपर्यंत वाढला. ह्यापुढें त्यांनीं आपली बढती करून घेतली नाहीं. याचें कारण असें कीं इस्पितळाच्या खर्चाचा सर्व आढावा यांचेच हातून जात असल्यामुळें आपल्या बढतीला रोग्यांच्या शिध्यांत किंवा इस्पितळाचे इतर सामुग्रींत काटकसर केल्यावांचून सवड होणार नाहीं हें त्यांना पक्कें माहित होतें. अशा तऱ्हेनें इस्पितळाचे खर्चांत काटकसर करून आपल्या पगाराची बढती करून घेणें त्यांस मुळींच प्रशस्त वाटत नसे. वरिष्ठ डॉक्टरांनीं त्यांचे बढतीबद्दल शिफारस करावयाचें मनांत आणलें

तरी इस्पितळाचे खर्चांत काटकसर करून मला प्रमोशन मिळावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं, असें साफ ते त्यांस बजावीत. येणें-प्रमाणें इस्पितळाची आयात ठराविक असल्यामुळें वामनरावजींचा पगार अखेरपर्यंत शंभरावरच राहिला. सर्वांभूतीं परमेश्वर समजून त्याकरितां स्वार्थत्याग करणें म्हणजे कायावाचामनेंकरून झिजणें म्हणतात तें यालाच.

---

## भाग बारावा.

### प्रापंचिक स्थिति.

वामनरावजींचा स्वभाव मोठा उदार व परोपकारी होता. याचा परिणाम त्यांचे गृहस्थितीवरही झाल्याशिवाय राहिला नाहीं. घरांत बहुतेक पाहुणे व गरीबगुरीब आश्रित मंडळी ही असावयाचीच. त्यांचे कुटुंबाचा स्वभावही त्यांच्याप्रमाणें उदार व परोपकारी असल्या-मुळें घरांत खर्च आहाराबाहेर होई. शिवाय मधून मधून घरांत कार्यें निघत त्यामुळें मिळकतीपेक्षां खर्च जास्त होऊं लागला. मागें सांगि-तलेंच आहे कीं एका मित्राच्या भिडेकरितां त्यांना कर्ज काढण्याचा प्रसंग पूर्वीच आला होता. त्या कर्जांत वरील कारणामुळें हळूं हळूं आणखी भर पडत चालली. त्यांतल्या त्यांत त्यांनीं छावणींत एक घर बांधलें. त्या घरालाही बराच पैसा लागला, व कर्जाचा बोजा बराच वाढला. तेव्हां आतां हें कर्ज फिटावें कसें अशी विवंचना वामनरावजींस लागली. मग नुसती काळजी करीत बसणें बरें नाहीं,

कांहीं तरी उद्योग केला पाहिजे असा वामनरावजींनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. पगारांत बढतींची सोय नाहीं. असलेल्या पगारांत जेमतेम नेहमीचा खर्च भागे. कर्जाची फेड करण्याकडे त्यांतलें कांहीं लावतां येईना, त्यामुळेंच दुसऱ्या उद्योगाचा विचार वामनरावजींस करावा लागला.

---

## भाग तेरावा.

### दुसरे उद्योग.

इंदूर मुक्कामीं Mr. Fenwick मि. फेनविक या नांवाचे एक साहेब असत ते वामनरावजींचे स्नेही होते. मि. फेनविक व वामनरावजी ह्या दोघांनीं चहाचा व्यापार भागीनें आरंभिला. तेव्हां तिकडे चहा दुर्मिळ असे. सबब चहाच्या पेट्या मागवून व्यापाऱ्यांना त्या ठोक विकावयाच्या असा क्रम त्यांनीं सुरू केला पण या उद्योगांत त्यांस यश आलें नाहीं. सबब तो उद्योग त्यांस लवकरच सोडावा लागला. फोटोग्राफीचें यंत्र व इतर सामान यांचे गळ्यांत पडल्याचें वर सांगितलेंच आहे. त्याचा तरी उपयोग करून पाहावा व साधल्यास त्यावर पैसा मिळवावा असें मनांत आणून त्यांनीं त्या कलेचें ज्ञान फारच उत्तम रीतीनें करून घेतलें. तें इतकें कीं त्या वेळेस वामनरावजींच्या बरोबरीचा तसबीर काढणारा दुसरा कोणीही फोटोग्राफर मध्यहिंदुस्थानांत नव्हता. मोठमोठे साहेब लोक व राजेरजवाडे हे यांच्याकडून आपल्या तसबिरी काढून घेत; पण ह्या उद्योगापासून द्रव्यप्राप्ति होणें बाजूलाच राहून

वामनरावजींचें उलटें कर्ज मात्र वाढलें. कोणा जवळ पैसा मागावयाचा नाहीं हें त्यांचें ब्रीद असल्यामुळें व मेहनत करणाऱ्यास त्याबद्दल कांहीं दिलें पाहिजे ही बुद्धि त्या वेळीं तिकडील लोकांत नसल्यामुळें या धंद्यांत फायद्याचे बाबतींत वामनरावजींची दिशाभूल झाली यांत कांहीं नवल नाहीं. वामनरावजींचा तो स्वतंत्र धंदा असता तर त्यांजवर कदाचित् असा प्रसंग न येता. पण त्यांना सरकारी नोकरी असल्यामुळें प्रपंच भागविण्याकरितां वेगळा धंदा करावा लागेल अशी त्या वेळच्या लोकांना कल्पना होणेंही शक्य नव्हतें. त्यांनीं आपला भिडस्त स्वभाव सोडून यदाकदाचित् फोटोच्या कामाबद्दल आपल्या बड्या गिऱ्हाइकांजवळ किंवा मेहेरबानांजवळ मेहनतीची किंवा खर्चाची गोष्ट काढली असती तर त्यांचें तसें करणें उलटें हास्यास्पद झालें असतें. असो. अशा तऱ्हेनें फोटोग्राफीच्या धंद्यांतही फायद्याची आशा खुंटली व भिडेकरितां कोणास नाहीं म्हणण्याची पंचाईत. तेव्हां ‘ भीक नको पण कुत्रा आवर ’ या म्हणीप्रमाणें या फोटोग्राफीच्या धंद्यांतून कसें सुटावें याच्या विचारांत वामनरावजी पडले. शेवटीं अगदीं कंटाळून तें फोटोग्राफीचें सामान मूळ किंमतींतही तोटा खाऊन ग्वालेरीस श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे यांस विकलें. वामनरावजींनीं पैशाच्या आशेनें व स्नेह्यास मदत करावी म्हणूनही आणखी एक उद्योग केला; तो असा. उज्जनीचे डाक्टरखान्यावर वामनरावजींचे एक स्नेही असत. त्यांच्यावर कांहीं आरोप येऊन ते बडतर्फ झाले. ते इंदुरास येऊन त्यांनीं आपली सर्व परिस्थिति वामनरावजींजवळ सांगितली. त्यांची वामनरावजींस दया येऊन ‘मी तुम्हास कोठें तरी उद्योग लावून देतों, घाबरूं नका,’ असें त्यांनीं त्यांस अभिवचन दिलें. त्या वेळीं तिकडच्या

प्रांतांत इंग्रजी औषधें मिळण्याचें दुकान कोठेंच नव्हतें. तेव्हां असें एखादें दुकान काढलें तर कदाचित् फायद्याचें होईल व आपल्या स्नेह्यालाही उद्योगाचा उद्योग होऊन त्याच्या कुटुंबाचें पोषण होईल. असें मनांत आणून त्यांनीं सदाशिव गणेश आणि कंपनी असें आपल्या मुलाच्या व आपल्या स्नेह्याच्या मुलाच्या नांवानें छावणींत ता० १-७-१८६४ इ० रोजीं इंग्रजी औषधांचें एक लहानसें दुकान काढलें. व त्यावर आपल्या स्नेह्याची योजना केली. एक दोन वर्षें हें दुकान बरें चालून इंदुरांत व आसपासचे प्रदेशांतही ह्या दुकानची विक्री बरीच झाली. ह्यामुळें थोडीशी उमेद वाटून ह्या दुकानाची एक शाखा इंदूर शहरांत उघडली. परंतु ज्या मित्रावर भरंवसा टाकून वामनरावजींनीं ह्या धंद्यांत आपला हात गुंतवून घेतला होत, त्या गृहस्थाची मति बदलून ह्यापुढें तो वामनरावजींशीं सरळपणानें न वागतां आंत एक बाहेर एक असें करूं लागला. वामनरावजींच्या लक्षांत त्याचा डाव आला पण त्याला त्याचा मागमूस लागूं न देतां त्यांनीं तडजोड करून सर्व व्यवहार तोडला व दुकान त्याचे स्वाधीन करून आपण मोकळे झाले. पण परिणाम हाच कीं वामनरावजींस याही प्रकरणांत फायदा न होतां कर्जाचें ओझें मात्र ज्यास्त झालें. स्नेह्यानें आपलें सर्व खटलें व दुकान महूचे छावणींत नेलें. हेतू हा कीं व्यापारांत होणारा फायदा वामनरावजींस दिसूं नये. व्यापारांत खरोखर नुकसान नव्हतेंच. पण आपल्या मेहनतीनें होणारा सर्व फायदा आपणासच मिळावा अशा लोभी बुद्धीनें सदहू गृहस्थ अंध झाल्यामुळें वामनरावजींनीं आरंभीं केलेल्या उपकारास त्याचे अंतःकरणांत ठावही राहिला नाहीं व म्हणून नुकसानाचें खोटें प्रदर्शन त्यानें केलें.

आपल्यावर अनुपकारच नव्हे तर प्रत्यक्ष अपकार करणाऱ्यावरही वामनरावजींनीं कधीं शस्त्र धरलें नाहीं. त्याच्यावर देखील आपल्या हातून होईल तों उपकारच करावयाचा हें त्यांचें ब्रीद. या युगांत असलीं मनुष्यें खरोखर फार विरळा होत. स्नेह्याचें दुकान महूंत गेल्यावर अर्थातच तें भरभराटलें, तें पाहून वामनरावजींस आनंदच झाला.

---

## भाग चवदावा.

### स्वतःचें घर.

ते वेळीं वामनरावजी छावणींत धार सरकारचे कोठींत ( बंगल्यांत ) राहात असत. ह्या ठिकाणीं राहात असतां एकदां कांहीं कारणावरून बंगल्याच्या रखवालदाराशीं त्यांची बोलाचाल झाली होती. त्यावरून दुसऱ्याच्या घरांत, मग तो मोठा वाडा कां असेना, राहण्यापेक्षां स्वतःच्या सत्तेची लहानशी झोपडी जरी राहण्यास मिळाली तरी बरें, असें त्यांचे मनांत येऊन ते घर बांधण्याचे उद्योगास लागले. हा आपला मनोदय त्यांनीं तेथील दुय्यम रेसिडेंटास कळविल्याबरोबर त्यानीं वामनरावजींस धारवाल्याचे कोठीसमोरच पुष्कळशी जागा घर बांधण्याकरितां बक्षिस दिली. जागा मिळाल्याबरोबर वामनरावजींनीं घर बांधण्यास आरंभ केला. व थोड्याच दिवसांत घर तयार झालें. वामनरावजींचा स्वभाव भोळा व निष्कपटी असल्यामुळें घराचे कामावर स्वतः देखरेख ठेवण्याचे खटपटींत ते पडले नाहींत. सर्व कारागिरांच्या विश्वासावर हवाला. त्याचा परिणाम असा झाला कीं घराला

लागावा त्यापेक्षां ज्यास्त पैसा लागूनही घर चांगलेंसें झालें नाहीं. असो. कसेंही झालें तरी स्वतःचें घर राहण्यास झालें यांतच सुख मानून वामनरावजी धारवाल्यांच्या कोठींतून आपल्या घरांत तें तयार झाल्याबरोबर राहण्यास गेले. घराबद्दल वामनरावजींस सुख वाटलें तसें त्यांच्या कुटुंबांतील मंडळींसही वाटलें. घर स्वतःच्या सत्तेचें झालें तेव्हां त्यांत फुलझाडें फळझाडें भाज्या वगैरे लावणें, त्यांस स्वतः पाणी वगैरे घालणें यापासून वामनरावजींस एक प्रकारची करमणूकच झाली. लावलेल्या बगिच्यांतील फुलें, फळें व भाज्या हीं ताजीं ताजीं मिळूं लागलीं यामुळें घरांतील मंडळींसही आनंद झाला.

---

## भाग पंधरावा.

### बडोद्याची सफर.

स्वतःच्या मालकीचें घर राहण्यास झालें याबद्दल तर सुख झालेंच पण वामनरावजींची सांपत्तिक स्थिति मात्र या वेळेस अधिक काळजी उत्पन्न करण्यासारखी झाली. घरामुळें कर्जांत भर पडली व पगाराशिवाय इतर कोणत्याही प्रकारानें पैसा मिळण्याची आशा राहिली नाहीं. गृहस्थितीबद्दल वामनरावजींस मोठी चिंता उत्पन्न झाली. अशा स्थितींत बडोद्यास त्यांचे गुरु डाक्टर नारायणराव गोडबोले हे मोठ्या हुद्दयाचे डाक्टर होते; त्यांनीं त्यांस बोलविलें. वामनरावजी मुंबईस प्रथम गेल्यावर डाक्टरीचें काम शिकूं लागले तें यांच्याच जवळ. असो. यांच्या बोलावण्यावरून वामनरावजी रजा घेऊन बडोद्यास गेले. त्या वेळेस मल्हार-

रावमहाराज कैदेंत होते, ह्यामुळें तेथें दोन फळ्या होत्या. एक मल्हारराव महाराजांची फळी, दुसरी खंडेरावमहाराजांची फळी. डॉ. नारायणराव हे मल्हारराव महाराजांचे फळींतले समजले जात असत. सबब ते खंडेराव महाराजांचे इतराजींत होते. वामनरावजी बडोद्यास गेल्यावर सहजींच डॉ. नारायणरावजींच्या घरीं उतरले. नारायणरावजींनीं वामनरावजींची खंडेराव महाराजांशीं भेट करून देण्याचा बेत केला, व वामनरावजींनीं दोन दिवस स्वतंत्र बिऱ्हाड करून नंतर भेटीस जावें म्हणजे चांगली भेट व मोठा लाभ होईल असें नारायणरावजींनीं त्यांस सुचविलें. आपण कोठें उतरलां आहां असें महाराज सहज विचारतील व तुह्मी आमचे येथें उतरलां आहां असें महाराजांस कळल्याबरोबर त्यांची मर्जी जाईल व आपण इतके दूर आल्याचें सार्थक होणार नाहीं; सबब आपण एक तर निराळें बिऱ्हाड करावें किंवा आमचें नांव काढूं नये, कोठें तरी दुसरीकडे उतरलों आहों म्हणून सांगावें, असें नारायणरावजींनीं त्यांस सांगितलें. परंतु वामनरावजींस दोहोंपैकीं एकही गोष्ट करणें रुचलें नाहीं. ते म्हणाले, आपण माझे मूळ आश्रयदाते गुरु, आपल्या कृपेमुळेंच मी या योग्यतेला चढलों; येथें आलों तरी आपल्या बोलावण्यावरूनच. येथें आल्यावर आपल्याकडेच उतरावयाचें, त्याप्रमाणें उतरलोंही. असें असतां केवळ महाराजांचे मर्जीसाठीं दुसरीकडे उतरलों आहें असें सांगतां यावें म्हणून मी आतां दुसरें बिऱ्हाड करावें किंवा आपली मळींच ओळख देऊं नये असें करणें माझे स्वप्नींही येणार नाहीं; मग माझे हातून प्रत्यक्ष कसें होणार? महाराज एवढ्याच कारणामुळें माझेशीं मोकळपणानें बोलले नाहींत, किंवा माझा सत्कार त्यांनीं चांगलासा

केला नाहीं तरी चिंता नाहीं. मला या दोहोंचीही फारशी पर्वा नाहीं. जें योग्य व उचित तेंच मी करीन. हें वामनरावजींचें म्हणणें ऐकल्यावर नारायणरावजी स्वस्थ बसले. दुसरे दिवशीं महाराजाच्या भेटीचा प्रत्यक्ष योग आला. प्रारंभीं महाराजांच्या संभाषणांत पूर्ण गोडी होती होळकरशाहींतील आपण मोठे प्रवीण डाक्टर आहां असें आम्हीं ऐकलें आहे वगैरे भाषण होत असतां आपण कोठें उतरलां आहांत असा महाराजांनीं ओघानेंच प्रश्न केला. त्यास वामनरावजींनीं अर्थात्च उत्तर दिलें कीं माझे आश्रयदाते व गुरु नारायणराव डॉक्टर यांच्या येथें मी उतरलों आहें. हें मोठ्या गौरवानें दिलेलें उत्तर महाराजांच्या कानीं पडतांच त्यांचे वृत्तींत फरक पडलासा दिसला, व भाषण आटोपतें घेऊन त्यांनीं वामनरावजींस निरोप दिला. भाकित केल्याप्रमाणेंच घडून आलें हें ऐकून डॉ. नारायणरावजींस फार वाईट वाटलें. परंतु वामनरावजींस झालेल्या प्रकाराबद्दल कांहींही वाटलें नाहीं. या प्रसंगीं डॉक्टर नारायणरावजींचा संबंध जाहीर करण्याची वामनरावजींस कांहीं आवश्यकता नव्हती. उलट या प्रसंगाला उपयोगी पडण्यासारखें त्यांच्या जवळ त्या वेळचे गव्हर्नर जनरलचे मध्यहिदुस्थानांतील एजंट एच. बी. डेली साहेब यांच्यासारख्याचें शिफारसपत्रही होतें. त्याचा उतारा पुढें दिला आहे.

"Waman Gopal, Native Superintendent of the Malva Dispensaries, is about to visit Bombay and Baroda. He is an excellent kindly man respected by all his Malva friends and I have great pleasure in recommending him to the notice of gentlemen he may visit during his trip."

(Sd.) H. B. Daly C. B.

Offg–Agent to th Govr. General for Central India.

( अर्थ:—माळव्यांतील दवाखान्याचे हिंदी सुपरिंटेंडेंट वामन गोपाळ मुंबई व बडोदा येथें जात आहेत. ते अत्यंत दयाळू असून माळव्यांतील त्यांचे सर्व मित्र त्यांना मान देतात. त्यांच्या प्रवासांत ते ज्या गृहस्थांस भेटतील त्यांच्याजवळ ह्यांची शिफारस करण्यास मला फार आनंद वाटतो.)

सही, एच बी. डेली, सी. बी. आफिशियेटिंग एजंट टु धि गव्हर्नर जनरल फॉर सेंट्रल इंडिया.

---

# भाग सोळावा.

## बडोद्याहून परत.

वामनरावजींस बडोद्यास बोलाविण्याचा त्यांचे गुरु डॉ. नारायणरावांचा हाच हेतु कीं, बडोद्याची रियासत मोठी व वामनरावजी-ही चांगले गुणसंपन्न झाले होते तरी त्यांस त्यांच्या योग्यतेनुरूप एखादी बढतीची जागा तेथें मिळावी, व हें अगदीं शक्य होतें. परंतु विपरीत झालें. त्यांत त्यांची सत्यप्रियता व करारीपणा हे गुण मात्र कसोटीस लागून ते पुरे कसास उतरले. महान् पुरुषांचें हेंच लक्षण होय. त्यांना आधिव्याधींनीं कितीही पीडा केली तरी ते मोठमोठ्या दुर्धर प्रसंगींही आपल्या सत्वाच विषयीं मेरू पर्वताप्रमाणें अचल राहतात. ते प्रापंचिक उन्नतीची क्षिति करीत नाहींत. असो. बडोद्याचे सफरीचें कारण संपल्यामुळें तेथून ते परत निघाले. मार्गापासून जवळच डाकूरजींचे स्थान असल्यामुळें तेथील दर्शनाचा लाभ तरी घ्यावा असें वामनरावजींनीं मनांत आणलें. त्या वेळेस आगगाडी नसल्यामुळें प्रवास बैलाचे गाडीनें करावा लागे. दिवस पावसाळ्याचे

होते. वाटेंत फार हाल होऊं लागले. एक दिवस रात्रीं निजले असतां वामनरावजींस एक स्वप्न पडलें. ठाकुरजीच्या देवानें दर्शन देऊन म्हटलें कीं 'मीच आलों, तूं आतां इतक्या लांब कशाला येतोस ? जा माघारा. मग सकाळीं उठून वामनरावजी बोलले कीं ठाकुरनाथ-जींनीं कृपावंत होऊन मला स्वप्नांत दर्शन दिलें. आतां तिकडे जाव-याचें कारण नाहीं. असें म्हणून त्यांनीं तिकडचा रस्ता सोडून इंदू-रचा मार्ग धरला. मजल दर मजल करीत इंदुरापासून एक दिवसाचे मुकामावर येऊन पोहोंचले. दुसऱ्या दिवशीं रजा संपावयाची. या दिवशीं कामावर. हजर झालें पाहिजे. म्हणून अर्ध रात्रीनंतर गाडी केली. रान मोठें, सोबतीला दुसरी गाडी नाहीं, म्हणून गाडीवाला कांकूं करूं लागला. त्याला जसा तसा धीर देऊन बाहेर काढला. परंतु रस्ता चढणीचा असल्यामुळें बैल फार हळूं हळूं चालत. अशा चालीनें आपण वेळेवर पोहोंचणार नाहीं असें वाटल्यावरून वामन-रावजींनीं आपल्या बरोबर आपल्या कपड्यांचें गाठोडें घेऊन गाडी-वर आपल्याबरोबरचा मनुष्य ठेविला, व आपण सडे पायींच निघाले. बरोबरचे मनुष्यानें, रात्र काळोखी आहे, पावसाचे दिवस आहेत, रस्ता जंगलांतून आहे, जनावरांची व चोराचीही वाटेंत भीति आहे, तरी आपण एकटे जाऊं नये म्हणून पुष्कळ विनवणी केली, परंतु वामनरावजी तें कांहीं एक न ऐकतां जे सडक निघाले ते सकाळ-पर्यंत सात आठ कोस जमीन चालून आठ वाजतां अचानक येऊन इस्पितळांत उभे राहिले व आपलें काम पाहूं लागले. हें त्यांचें कृत्य पाहून सर्वांस अति आश्चर्य वाटलें. साहेबांससुद्धां त्यांचे धारिष्ठाचें व नियमितपणाचें मोठें कौतुक वाटलें. ज्याचें मन दुसऱ्याचें वाईट कधींही चिंतीत नाहीं त्याला भय कशाचें ?

# भाग सतरावा.

## धारचे महाराजांस उपचार.

ह्याच सुमारास धारचे महाराज श्रीमंत आनंदराव पोवार यांस मोठें दुखणें झालें. पदरचे वैद्य हकीम वगैरे यांचा इलाज चालला असतां महाराजांची प्रकृति दिवसेंदिवस फारच बिघडत चालली, सर्वांस मोठी काळजी पडली. वैद्य हकीमांनीं हात टेकले. शेवटीं वामनरावजींस बोलावणें आलें. वामनरावजी महाराजांस पाहण्याकरितां गेले; पाहतात तों प्रकृति फार बिघडलेली. तरी औषधोपचार सुरू केला. अहोरात्र जवळ बसून, उलटून पालटून औषधें देऊन राणीसाहेबांस व जवळचे मंडळीस धैर्य दिलें. महाराजांची प्रकृति हळू हळू ताळ्यावर आणिली. मोठेंच यश मिळविलें. महाराज बरे झाले, म्हणजे तुम्ही मागाल तें देऊं असें राणीसाहेबांनीं म्हणावें, सरकारची तबियत सुधारली कीं आम्ही आपले वर्षाचे पगार आपणास देऊं असें कारभाऱ्यांनीं व इतर बड्या कामगार मंडळींनीं म्हणावें; त्यावर वामनरावजींनीं श्रद्धापूर्वक व भरंवसापूर्ण असें उत्तर द्यावें कीं 'ईश्वर महाराजांस सर्व संकटांतून वांचवील, घाबरूं नका, महाराज लवकर बरे होतील.' महाराज अगदीं चांगले बरे झाले, तेव्हां त्यांनीं वामनरावजींस एक पोषाख व दरमहा २५ रुपये तहाहयात पेन्शन करून दिलें. वामनरावजींच्या उपचारानें तर धारचे महाराज मोठ्या जिवावरच्या दुखण्यांतून उठले त्यामुळें वामनरावजींची लोक जिकडे तिकडे मोठी प्रशंसा करूं लागले; व बड्या साहेबांनींही त्यांची मोठी तारीफ केली.

# भाग अठरावा.

## कर्जांतून मुक्तता.

हरिपतळांतून मिळत असलेल्या पगारांतून कर्जाची फेड होणें शक्य नव्हतें व तें फेडण्यासाठीं वामनरावजींनीं जे जे धंदे हातीं घेतले त्यांत त्यांना फायदा न होतां उलट नुकसानच होत गेलें. ती हकिकत मागें आलीच आहे. आजपर्यंतच्या झालेल्या कर्जाचें व्याज भरण्यांतच वामनरावजींच्या पगाराचा बराच भाग जाऊं लागला. त्यामुळें ते फार जेरीस आले; तरी अंतःकरणांत वसत असलेली ईश्वरावरील पूर्णश्रद्धा, सत्वशीलता, अचल धैर्य व उद्योगपरायणता, इत्यादि त्यांच्या अंगचे गुणामुळें आपलें कर्ज फिटेल व आपण या संकटांतून मोकळे होऊं अशी त्यांस उमेद वाटत असे, व त्यामुळें त्यांच्या नित्यक्रमांत चलबिचल न होतां तो यथास्थित चालत असे. त्यावेळेस वामनरावजींस एके दिवशीं रात्रों स्वप्न पडलें. स्वप्नांत एक जहाज दृष्टीस पडलें आणि त्यांतून असा शब्द निघाला कीं " अरे भित्र्या माणसा! दुसरें एक जहाज बुडत होतें म्हणून मी तिकडे गेलों होतों. आतां मी तुझ्याकडे आलों आहें, तूं कांहीं काळजी करूं नको. "

त्या वेळचे बडे साहेब सर हेनरी डेली व वामनरावजींचे वरिष्ठ डाक्टर यांस वामनरावजींची गृहस्थिती पूर्ण माहित होती. वामनरावजी हे मोठे सत्यवादी, स्पष्टवक्ते प्रामाणिक व परोपकारी गृहस्थ आहेत हें त्यांस पुष्कळ दिवसांच्या सहवासानें माहित झालें होतें

म्हणून वामनरावजींची लवकरच कर्जबाजारीपणाच्या दुःखांतून मुक्तता व्हावी असें त्यांस मनापासून वाटत असे. त्यास अनुकूल अशी संधीही लवकरच आली, ती अशी:-

श्रीमंत बुळे साहेब ( श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांचे जामात ) यांस छावणींत घर बांधण्याची इच्छा झाली. त्यांनीं आपली इच्छा मेहेरबान डॅली साहेबांस कळविली. त्यानंतर डॅली साहेबांनीं वामनरावजींस म्हटलें कीं आपलें घर व जागा विकत असाल तर गिऱ्हाईक चांगलें आहे. किंमत चांगली येऊन तुमची कर्जांतून मुक्तता होईल. ह्यावरून वामनरावजींनीं घर व जागा विकण्याचा निश्चय केला. कारण त्या योगें तरी एकदां कर्ज फिटो असें त्यास वाटलें. साहेबांनीं लगेच बुळे साहेबास कळविलें कीं तुम्ही वामनरावजींची जागा विकत घेत असल्यास तिला लागूनच आणखीही जागा मिळूं शकेल. ह्यावर बुळे साहेबांनीं वामनरावजींचें घर व जागा घेण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें लवकरच खरेदीचा सवदाही झाला. अशा रीतीनें घर विकलें जाऊन पुष्कळ वर्षांपासून वाढत चाललेल्या कर्जांतून वामनरावजींची एकदां मुक्तता झाली; व वामनरावजी एका मोठ्या काळजींतून दूर झाले; व वर सांगितलेलें स्वप्नही कर्मधर्मसंयोगानें खरें झालें असें त्यांना वाटलें.

---

## भाग एकोणिसावा.

### सरकारांतून शस्त्रांची पेटी बक्षिस मिळते.

वामनरावजींच्या शस्त्रक्रियेंतील निपुणतेबद्दल चांगलाच लौकिक झाला होता; व त्यांचे वरिष्ठ डॉक्टरांचें व रेसिडेंटाचेंही त्यांचे गुणाविषयीं चांगलें मत असे. इस्पितळाच्या वार्षिक रिपोर्टांत वामनराव-

जींच्या योग्यतेबद्दल नेहमीं उल्लेख असे; व कलकत्त्याच्या लाट साहेबांकडून त्या रिपोर्टावर जे अभिप्राय प्रसिद्ध होत त्यांतही वामनरावजींच्या योग्यतेबद्दल मान्यता दर्शविलेली असे. सन १८६६ सालीं आग्रा मुक्कामीं लॉर्ड लारेन्स यांच्या कारकीर्दीत एक मोठा दरबार भरला होता. त्या वेळचे रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांचे शिफारशीवरून त्या दरबाराला येण्याचें वामनरावजींस निमंत्रण येऊन लॉर्ड लॉरेन्स यांच्या हस्तें त्यांस तेथें एक मोठी शस्त्रांची पेटी सरकारांतून बक्षिस मिळाली. आपल्या गुणाची सरकारांत चहा झाली व त्याबद्दल आपणास ही पेटी बक्षिस मिळाली म्हणून वामनरावजींस अर्थात् भूषण वाटे. यापूर्वीही हिंदुस्थान सरकाराकडून वामनरावजींच्या नोकरीबद्दल मान्यता दर्शविण्यांत आली होती, हें 'सेक्रेटरी टु धि गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' च्या एका पत्राच्या पुढें दिलेल्या उताऱ्यावरून कळेल.

Extract from a letter from the Secretary to the Government of India, to the Agent to the Governor General for Central India No. 1114 dated.28th May 1862.

"The zealous superintendence of Dr. Brodrick and the conduct of the chief Native Dr. Wamanrao Gopal are noticed by his Excellency in Council with much satisfaction."

( अर्थः–डाक्टर ब्राडरिक ह्यांनीं उत्साहानें केलेली देखरेख आणि मुख्य देशी डाक्टर वामनराव गोपाळ ह्यांची वर्तणुक हीं गव्हर्नर जनरल साहेबांच्या नजरेस फार समाधानकारक रीतीनें आलीं आहेत.)

तसेंच शिक्षणाचे बाबतींत वामनरावजींनीं जी लोकसेवा केली तिजबद्दलही सरकारांतून खास बक्षिसाच्या द्वारें मान्यता दर्शविण्यांत आली तें पुढील यादीवरून कळेल.

"Tuesday 20th November 1866.

The following native gentlemen on being presented to the Viceroy were honoured with special rewards for their services in the cause of public education.

| | |
|---|---|
| Baboo Kemsing Bedi.<br>Miran Bax khan<br>Lala Ramchandra. | From the Panjab. |
| Lala Mugut Singh<br>Baboo Sheoprasad<br>Sayd Ahmad Bahadur | From N. W. P. |
| Waman Gopal | From Malwa. |

( अर्थः—मंगळवार ता० २० नोव्हेंबर १८६६. खालील एतद्देशीय गृहस्थांना व्हाईसरॉय साहेबांकडे नेल्यावर ( तेथें ) लोकशिक्षणासंबंधीं त्यांनीं जी सेवा केली त्याबद्दल त्यांना विशेष बक्षिसें देऊन त्यांचा सन्मान करण्यांत आला.

| | |
|---|---|
| बाबु केमसिंग बेद्री<br>मिरन बक्षखान<br>लाला रामचंद्र | पंजाबचे |
| लाला मुगुट सिंग<br>बाबु शिवप्रसाद<br>सैयद अहमद बहादुर | नार्थ वेस्टर्न प्रांताचे |
| वामन गोपाळ— | माळव्याचे |

# भाग विसावा.

## इंदूरच्या नोकरीची समाप्ति.

येणेंप्रमाणें केवळ इंदुरांतच नव्हे तर सर्व माळवाप्रांतभर वामनरावजींनीं डाक्टरी विद्येबद्दल व आपल्या अंगच्या अलौकिक गुणांबद्दल कीर्ति संपादन करून प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकाराकडूनही मान्यता मिळविली. राजमान्य व लोकमान्यही झाले. अशी उभय मान्यता संपादन करणारे पुरुष फारच विरळा. असो. वामनरावजींनीं येथपर्यंत २१ वर्षेंपर्यंत इंदूर इस्पितळाचें काम केलें होतें. व तसेंच त्यांनीं तें पुढेंही चालवावें असें डॅली साहेबांच्या मनांत होतें. त्यांनीं आपलें घर विकलें म्हणून त्यांना राहण्याकरितां इस्पितळाच्या हद्दींत एक घरही बांधून दिलें. परंतु या समयीं असा एक प्रसंग घडून आला कीं त्यामुळें वामनरावजींचा इंदूर सोडून मुंबईस जाऊन राहण्याचा निश्चय झाला. तो प्रसंग असाः—

इंदुरास रामचंद्र भाऊ रेशिमवाले म्हणून मोठे चतुर व हुशार कारभारी होळकर महाराजांचे मंत्री असत. त्यांना ज्वर येऊन वायू झाला. त्यांस पाहण्यास वामनरावजी व त्यांचे वरिष्ठ डॉक्टर बोमंटसाहेब या दोघांसही जावें लागे व दोघांचाही उपचार चालू होता. दिवसेदिवस वायू जोरावत चालला. म्हणून वामनरावजींचें असें म्हणणें होतें कीं भाऊसाहेबांचे मानेवर पलिस्तर लावावें. परंतु तसें करण्यास डॉक्टर बोमंट ह्यांची संमती नव्हती. सबब तो उपचार करण्यांत आला नाहीं व लवकरच पुढें या दुखण्यानें भाऊसाहेबांचा अंत झाला. मोठा कारिंदा

मनुष्य गेला. रियासतीचें मोठें नुकसान झालें, अशी शहरभर हाकाटी माजून गेली. या प्रकरणांत डॉ. बोमंट व डॉ. वामनरावजी या दोघांत बराच गैरसमज झाला. त्यामुळें वामनरावजींनीं चाकरी सोडून मुंबईस जाण्याचा निश्चय केला, व ते त्या उद्योगासही लागले. आजपर्यंत इस्पितळासंबंधीं आंतली बाहेरली सर्व व्यवस्था वामनरावजींकडे असे व आजपर्यंत यांचेवर जे वरिष्ठ डॉक्टर आले ते वामनरावजींवर सर्व प्रकारचा भरंवसा ठेवीत असल्यामुळें वामनरावजींस एक प्रकारचें स्वातंत्र्य वाटत असे; व त्यांचें स्वतःचें वर्तन मोठें शुद्ध व चोख असल्यामुळें त्यांजबद्दल त्यांच्या वरिष्ठांची मोठी आदरबुद्धि असे. शेवटल्या अमलदाराच्या कारकीर्दींत मात्र हा प्रकार बदलत चालला. व्यवस्थेचें सर्व धोरण बदललें, असें वामनरावजींच्या मनास भासूं लागलें. तेव्हां स्वतंत्र धंदा करून आपल्या दोन्ही चिरंजीवांचे शिक्षणाचीही व्यवस्था ठेवतां येईल अशा ठिकाणीं जाऊन राहण्याचा ते विचार करूं लागले. असें ठिकाण म्हणजे मुंबईवांचून दुसरें कोणतें नाहीं असें सहजच त्यांना वाटलें. मुंबईविषयीं वामनरावजींचे मनांत कांहीं विलक्षण प्रकारचें प्रेम असे. चाकरीवर असतांना सुद्धां चार सहा वर्षांनीं रजा घेऊन महिना पंधरा दिवस मुंबईपुण्यास येऊन राहावयाचें असा त्यांचा क्रम असे. पहिल्यानें त्यांची पोटाची सोय मुंबईस झाली, व त्याबरोबरच डॉक्टरीचें शिक्षण मिळालें व थोडे दिवस त्यांनीं स्वतंत्र धंदाही तेथें केला असल्यामुळें मुंबईविषयीं त्यांचे मनांत प्रेम असणें साहजिकच होतें. मुंबईहून कोणी इंदुरास आले म्हणजे वामनरावजींनीं मोठ्या प्रेमानें त्यांचें आगत स्वागत करावें, तेथील

प्रमुख लोकांशीं त्यांच्या भेटी करून द्याव्या, व शहर आणि तेथील संस्था वगैरे त्यांस दाखवाव्या. डॉ. भाऊ दाजी, रा. ब. राम बाळकृष्ण, रावबहादुर दादोबा पांडुरंग वगैरे मोठ मोठी मंडळी इंदुरास गेली तेव्हां त्यांचें स्वागतांत वामनरावजींचाच पुढाकार होता. रा. ब. दादोबा पांडरंग तर त्यांचे घरींच पाहुणे होऊन बरेच दिवस होते. मुंबईस जाऊन राहण्याच्या विचारास रा. ब. दादोबा पांडुरंग यांनींही पुष्टी दिली, व तेथें येण्याबद्दल आग्रहही केला. रा ब. दादोबा मुंबईस गेल्यावर देखील त्यांनीं वामनरावजींस पत्रद्वारा हेंच लिहिलें कीं "मुंबई येथें कनिष्ठ व मध्यम स्थितींतील लोकांस अद्यापि असावा तसा डाक्टर नाहीं. योग्य मनुष्याची येथें फार गरज आहे. तुम्ही येथें याल तर लोकांची गरज भागून तुमचेंही कार्य होईल. तुम्ही बिनधोक या." रा. ब. दादोबांचे उत्तेजनामुळें वामनरावजींचा मुंबईस जाण्याचा निश्चय पक्का होऊन त्यांनीं तो आपले वरिष्ठ डाक्टर, एजंट डॅली साहेब व तुकोजीराव महाराज या तिघांसही कळविला. इतके दिवस आपण इस्पितळाची नोकरी इमानें इतबारें केली; त्याबद्दल आपणास कांहीं पेन्शन मिळावें म्हणून वामनरावजींनीं आपल्या वरिष्ठाकडे एक अर्ज दिला. त्यास त्यांजकडून उत्तर मिळालें कीं राजे रजवाड्यांत तुमची तुम्हींच खटपट केली तर तुम्हास खात्रीनें पेन्शन मिळेल. त्यावरून वामनरावजींनीं तुकोजीराव महाराजांस विनंती केल्यावरून महाराजांनीं मेहेरबान होऊन वामनरावजींस तहाहयात दरमहा ३० रुपये पेन्शन करून दिलें. व धारच्या राजे साहेबांकडून पूर्वीं झालेलें पेन्शन दरमहा २५ रुपये मिळून एकंदर पेन्शन ५५ रुपये झालें. इतर राजे रजवाड्यांकडे वामनरावजींनीं रदबदली

केली नाहीं. कारण ५५ रुपये म्हणजे निम्मे पगारापेक्षां ज्यास्तच होतात. त्यांत संतोष मानून वामनरावजींनीं नोकरी सोडली.

वामनरावजी इंदूरची चाकरी सोडून दवाखाना काढून आपली उपजीविका करणार ही गोष्ट इंदूर येथील लोकांस समजली. त्यांच्या पैकीं एक मोठा गृहस्थ त्यांना जराशा कुत्सितपणानें म्हणाला, डाक्टर साहेब, मुंबई शहरीं पुष्कळ नामांकित डाक्टर आहेत; तुमचा तेथें निर्वाह होणें कठीण. इंदूरची नोकरी सोडून जाणें तुम्हास जड जाईल. त्यावर वामनरावजी ह्मणाले, मोठमोठ्या शहरीं नाना प्रकारचे लोक श्रीमंत गरीब, गुणवान् व गुणशून्य असे असतात. पण ईश्वर त्या सर्वांचें त्यांच्या त्यांच्या परी चालवितो तसें माझेंही तो चालवील. मला किमपि उणें पडणार नाहीं. हें उत्तर ऐकून त्या गृहस्थाचें तोंड अर्थात् बंद झालें.

---

## भाग एकवीसावा.

### मुंबईचा वेध.

नोकरी सोडली व पेन्शन मिळालें. आतां मुंबईस जाऊन स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घ्यावयास सांपडेल या विचारानें वामनरावजींस खरोखर आनंद झाला. पण त्या स्वातंत्र्या बद्दल अर्धी किंमतही गेली. तेव्हां स्वतंत्र धंदा चालूं लागून पैसे मिळेपर्यंत पेन्शनीच्या ५५ रुपयांवरच प्रपंच भागविला पाहिजे हा विचार आतां त्यांच्या पुढें उभा राहूं लागला. कुटुंबांतील मुलांमाणसांना या भावी स्थितीची कल्पना व्हावी म्हणून तिचें नुसतें शब्दांनीं वर्णन करून ते राहिले

नाहींत, तर प्रसंगवशात् तशी स्थिति प्राप्त झाली तर तिचा थोडा-बहुत अनुभव आधींच असावा म्हणून मधून मधून त्यांनीं कधीं नुसता तिखट मिठाचा सांजा तर कधीं नुसती सोजी असा स्वयंपाक करवून सर्व मुलांबाळांसह आपण तसलें जेवण जेवावें; व त्यांस बजावावें कीं, पहा रे बाबांनो! ईश्वरानें नीट चालविलें तर ठीक; नाहीं तर अशा प्रकारचे अन्नावर निर्वाह करावा लागेल. अशा तऱ्हेनें मुंबईस गेल्यावर येणाऱ्या भावी परिस्थितींत राहण्याची संवय कुटुंबांतील मुलांमाणसांस लावून, राजीनामा मंजूर झाल्यावर, वामनरावजींनीं इंदूरचे लोकांचा निरोप घेतला. इंदूर सोडतांना वामनरावजींस व तेथील लोकांसही फार वाईट वाटलें. इंदूर सोडल्यावर तेथील एका गृहस्थानें वामनरावजींच्या वियोगाबद्दल इंदुप्रकाश वर्तमानपत्राकडे एक पत्र पाठविलें होतें. त्यावरून त्यांच्या विषयींचें लोकमत कळण्यासारखें आहे म्हणून तें पुढें दिलें आहे.

## मालव देशास नुकसान.

वि. वि. आमचे येथील प्रख्यात व लोकप्रिय डॉक्टर वामनराव गोपाळ काणे हे आपल्या खुशीनें राजीनामा देऊन तारीख २७ माहे आगष्ट मजकूर रोजीं स्वदेशीं ( मुंबईस ) गेले. त्या योगानें आमचे प्रदेशास मोठें नुकसान झालें.

ह्या गृहस्थानें ह्या देशांत २१ वर्षें चाकरी केली. त्यांचे येण्याचे पूर्वीं या देशांत इंग्रजी औषध घेण्याचा परिपाठ मुळींच नव्हता. तो ह्यांनीं मोठे परिश्रम घेऊन व लोकांचे घरोघरीं जाऊन त्यांची मनवळणी करून प्रघात पाडला. तो इतका कीं वैद्य व

हकीम यांजवर लोकांचा फार थोडा भरंवसा राहिला आहे. हे गृहस्थ मोठे सत्यवादी, दयाळु, निर्लोभी, निष्कपटी शांत व धैर्यवान् असे होते. शस्त्रक्रिया ह्मणजे मुतखडा काढणें, हातपाय कापणें, गर्भाशयाचें काम, औषध क्रिया वगैरे कामांत फार हुशा असून नेत्ररोगाचे कामांत तर फार अती उत्तम प्रतीचे आहेत. त्यांचे कुशलतेची प्रख्याति केवळ या प्रदेशांत आहे असें नाहीं तर दुसरे प्रदेशांतही आहे. दूर देशाहून बेमार लोक त्यांचेकडे येत असत. गरीब लोकांकडे ह्यांची मोठी नजर होती व सर्वांवर समदृष्टि राहावी म्हणून त्यानीं असा नियम केला होता कीं राजेखेरीज करून कोणाजवळून कांहीं वेऊं नये, व जरी त्यांना राजे लोकांकडून म्हणण्यासारखी प्राप्ति झाली नाहीं तरी ईश्वरसत्तेनें त्यांचा नियम पुरा झाला. त्यांचे जाण्यानें सर्व लोक दिलगीर झाले, व कित्येक गरीब लोक तर इस्पि-तळांत गेले म्हणजे रडूंच लागतात म्हणून ऐकतों. यांचे योगानें केवळ औषधांचाच फायदा होता असें नाहीं. परंतु पुष्कळ लोकांचा अनेक तऱ्हेनें फायदा होता, व सुधारणुकीचे कामांत तर ह्यांचा सर्वांपुढें पाय असे. म्हणजे मुलींची शाळा त्यांनीं घातली होती ती लुटीपर्यंत चांगली चालली होती, व धारेसही मुलींची शाळा घातली होती, व या ठिकाणीं जी लायब्ररी ( पुस्तकालय ) आहे ती याच गृहस्थानें पुढारी होऊन कांहीं पदरचीं बुकें देऊन उभी केली. ती हल्लीं चांगले स्थितींत आहे.

ह्या गृहस्थाचे शस्त्रक्रियेचे कुशलतेविषयीं ख्याति ऐकून सर जॉन लॉरेन्स गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया यांनी आग्रा येथें मोठे दरबारांत बोलावून एक शस्त्रांची मोठी पेटी बक्षिस दिली. ही गोष्ट त्या ठिकाणचे वर्तमानपत्रद्वारें पूर्वीं प्रसिद्ध झालीच आहे.

महाराज, आह्मी त्यांचें अधिक वर्णन करावें असें नाहीं तर हल्लीं ते आपले तेथेंच आले आहेत तर आपणास अनुभव येईल.

इंदूर तारीख ५
सप्तंबर सन १८७१ } एक इंदूरकर

## भाग बाविसावा.

### उत्तरावस्था.

इंदुराहून मुंबईस आगमन. मागील भागांत सांगितल्याप्रमाणें वामनरावजींनीं आपल्या आयुष्याचा मध्यम काल इंदूरचे नोकरींत घालवून सर्वतोपरी यश संपादन केलें व आपल्या आयुष्याचा उत्तर काल मुलांच्या शिक्षणावर देखरेख करण्यांत व साधेल तितकी लोकसेवा करण्यांत घालविण्यासाठीं ते इंदूर सोडून मुंबईस आले. तेथें प्रथम त्यांनीं केशवजी नाईकाचे चाळींत बिऱ्हाडाकरितां जागा घेतली व दवाखान्यासाठीं पालवाचे रस्त्यावर बोरभाट गल्लीचे समोर विनायक पांडुरंग यांचे चाळींत रस्त्यावरची तळमजल्यावरील जागा घेतली व तेथें दवाखान्यास सुरवात केली. मुंबईसारख्या ठिकाणीं नव्या मनुष्यानें आपल्या उतार वयांत येऊन स्वतंत्र धंदा आरंभणें म्हणजे एका प्रकारचें साहसच होय. परंतु वामनरावजींनीं तें केवळ स्वातंत्र्यासाठीं व मुलांचे शिक्षणासाठीं ईश्वरावर भरंवसा ठेवून केलें याबद्दल त्याचे स्नेही त्यांची तारीफ करीत. धंद्याचे सुरुवातीला लोकांचे माहितीकरितां वामनरावजींनीं इंदुप्रकाशांत एक लेख छापविला तो पुढें दिला आहे.

# NOTICE TO THE PUBLIC.

I, the undersigned Waman Gopal Kane, was formerly employed as an Eye Doctor, a medical practitioner and performer of surgical operations on the establishment of his Highness Maharaja Tukojirao Holkar and am now a pensioner. I am a Brahmin by caste and am inhabitant of Poona. I served in 1839 in the Bombay Native General Hospital of the 24th Regiment under Dr. Leman, in the Garrison Hospital, under Dr. Stowell, thé ophthalmist; in the Sir Jamsetji Hospital, being appointed there at its commencement by the Calcutta Medical Board, and under Drs. Morehead, Peet and Giraud in the 10th Regiment No. I, in all, my service being more than 10 years. I was afterwards at the recommendation of Dr, Peet employed at Indore where I served for 21 years. During this period of 31 years service I had extensive practice and thousands of persons of rich, middle and poor circumstances have been cured by me. For instance I cured Maharaja Anandrao Pawar of Dhar and get an annuity as a pension from him as I have from H.H. the Holkar. Having now resolved to spend the remaining portion of my life in being serviceable to the public and at the same time supporting my family according to the present state of circumstances I have opened a Dispensary in House No. 130 in Girgaon. At this place patients will be attended to and medicines will

be prescibed and givən or surgical operation performed at a moderate rate daily in the morning from 7 to 9 and in the evening from 5 to 7. To the people of out stations prepared medicines will be sent with a label of instruction stuck on them in Marathi, Guzarathi and English. Further information may be had on personal interview.

(Sd.) Waman Gopal Kane.
5th September 1871.

( अर्थ–मी खालीं सही करणार वामन गोपाळ काणे ह्यानें महाराज तुकोजीराव होळकर ह्यांच्या संस्थानामध्यें नेत्रवैद्य, शस्त्रक्रिया करणारा व डाक्टर म्हणून नोकरी केली, व मला आतां पेन्शन मिळतें. मी ब्राह्मण असून पुण्याचा रहाणारा आहें. सन १८३९ मध्यें डॉ. लेमन ह्यांच्या हाताखालीं, २४ व्या पलटणीच्या मुंबईच्या नेटीव जनरल हास्पिटलमध्यें, डोळ्यांचे डॉक्टर स्टोवेल साहेब ह्यांच्या हाताखालीं, ग्यारिसन हास्पिटलमध्यें व सरजमशेटजी हास्पिटलमध्येंही मीं नोकरी केली. सर जमशेटजी हास्पिटलमध्यें तें कलकत्ता मेडिकल बोर्डानें सुरू केल्यापासून माझी नेमणूक झाली होती. त्याचप्रमाणें डॉ० मोरहेड, पीट आणि जिरड ह्यांच्या हाताखालीं व १० वी रेजिमेंट नं. १ मध्येंही मी नोकरी केली. सर्व ठिकाणची मिळून माझी नोकरी १० वर्षांपेक्षां अधिक दिवसांची झाली. नंतर डॉ० पीट साहेबांच्या शिफारशीवरून माझी इंदूर येथें नेमणूक झाली, व त्या ठिकाणीं मी २१ वर्षे नोकरी केली. ह्या ३१ वर्षांच्या नोकरीमध्यें माझा धंद्याचा उद्योग पुष्कळ वाढला, व हजारो श्रीमंत, मध्यम व गरीब

स्थितींतील लोक माझे हातून बरे झाले. उदाहरणार्थ मीं धारचे महाराज आनंराव पवार ह्यांना बरें केलें; व महाराज होळकर ह्यांच्यापासून जसें मला पेंशन मिळतें तसें त्यांच्यापासूनही मला पेनशन मिळतें. आतां मी आपलें राहिलेलें आयुष्य लोकसेवेंत घालविण्याचें व हल्लींच्या स्थितीला अवश्य अशा रीतीनें माझ्या कुटुंबाचें पोषण करण्याचेंही मनांत आणून गिरगांवांतील घर नं. १३० मध्यें एक दवाखाना उघडला आहे. ह्या ठिकाणीं सकाळीं ७ ते ९ व संध्याकाळीं ५ ते ७ पर्यंत रोज माफक दरानें रोग्यांची शुश्रूषा करण्यांत येईल, व औषधांची योजना करून तीं देण्यांत येतील; अथवा शस्त्रक्रिया करण्यांत येईल. बाहेर गांवच्या लोकांकरितां आयतीं औषधें पाठविण्यांत येतील व त्यांबरोबर मराठी, गुजराथी व इंग्रजी ह्या भाषांमध्यें सूचीपत्रकें त्यांना चिकटून पाठविलीं जातील. अधिक माहिती भेटी अंती मिळूं शकेल.

५ सप्तंबर १८७१ वामन गोपाळ काणे.

---

## भाग तेविसावा.

### धंद्याचे आरंभीं मुंबईची परिस्थिति.

वामनरावजींनीं आतां मुंबईस धंद्याला सुरुवात केली. त्या वेळीं तेथें मोठमोठे नामांकित व जुने डाक्टर आपला धंदा करीत होते. डॉ. भाऊ दाजी, डॉ. नारायण दाजी, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. पांडुरंग गोपाळ, डॉ. गोपाळ शिवराम, डॉ सखाराम अर्जुन,

डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे, डॉ. लिसबो वगैरे यांनीं मुंबईची बहुतेक श्रीमान गिऱ्हाइकी अडवून टाकिली होती. तेव्हां ज्यास पदवीधर डाक्टरी शिक्का नाहीं अशा अगदीं परक्या व साध्या स्वाभावाच्या मनुष्याचें तेथें कसें चालावें हें त्या वेळेस पुष्कळांना गूढ वाटे; परंतु वामनरावजींचे अंगीं जे कित्येक अलौकिक व नैसर्गिक गुण होते त्यांमुळें वामनरावजींच्या धंद्याचा अशा बिकट परिस्थितींतही हळुहळु जम बसूं लागला. वामनरावजींच्या सात्विक गुणांची छाप लोकांवर पडली व त्यांच्या अंगची भूतदया पाहून गोरगरिबांचा ओघ त्यांजकडेच वळला. औषधांचे दर माफक, औषध घेण्यासंबधानें रोग्यांची चांगली समजूत पाडणें, त्यांशीं ममतेनें वागणें व पाहिजे त्या वेळेस त्यांचे उपयोगीं पडणें इत्यादि गोष्टींनीं वामनरावजी मुंबईसही लोकप्रिय झाले.

---

## भाग चोविसावा.

### धंद्याची भरभराट.

हिरा जरी कोंदणांत बसविलेला नसला तरी त्याचें तेज कांहीं लपत नाहीं. वामनरावजी बिनशिक्याचे डाक्टर व दिसण्यांतही साधे भोळे तरी त्यांच्या अंगच्या योग्यतेचा व गुणांचा प्रकाश लोकांवर पडण्यास फार काळ लागला नाहीं. धंदा बरा चालतो असें पाहून वामनरावजींनीं पहिल्या दवाखान्याच्या शेजारच्याच बबी विनोबाचे मोठ्या घराचा खालचा मजला भाड्यानें घेऊन तेथें दवाखाना व बिऱ्हाड हीं दोन्हीही नेलीं. त्यामुळें मोठी सोय झाली. पुढें लवकरच

एक घोडा व गाडी ठेवली. ईश्वरकृपेनें वामनरावजींचें बस्तान ठीक बसलें, व मोठे गोड व ममताळु डाक्टर असा त्यांचा लौकिकही झाला. रा. ब. दादोबा पांडुरंग ह्यानीं भाकीत केल्याप्रमाणें वामनरावजी गोर-गरिबांचे डाक्टर बनले. इंदुरास असतांना वामनरावजींचा जो रीत-रिवाज व पेहराव असे तोच त्यांनीं मुंबईसही ठेविला.

डोक्यावर स्वच्छ पांढरें पागोटें, आंगांत जुन्या चालीचा लांब बाह्यांचा स्वच्छ पांढरा अंगरखा व आंत मुंबईचीच जुन्या चालीची पांढरी बंडी व पांढरेंच स्वच्छ आंगावरचें धोतर व पायांत ब्राम्हणी पुणेरी जोडा. हा त्यांचा नेहमींचा पोषाख. नित्यक्रमही पूर्वींप्रमाणेंच रोज पहाटेस ४॥-५ वाजतां आपण स्वतः उठून घरांतील सर्व माणसांस उठवावयाचें. स्नान संध्या आटोपून ६–६॥ वाजतां दवा-खान्यांत येऊन बसावयाचें. फुरसत झाली म्हणजे ८ वाजण्याचे सुमारास घरांत जाऊन चहा घ्यावयाचा व पुन्हा काम करूं लागा-वयाचें. दवाखान्यांतील काम आटोपल्यावर दुखणेकऱ्यांचे घरीं जाऊन त्यांस पाहणें झाल्यावर ११–१२ वाजतां जेवावयाचें. वेळ मिळा-ल्यास जेवण झाल्यावर थोडी वामकुक्षी घेऊन रिकामपणा असल्यास रोग्यांची व त्यांस दिलेल्या औषधांची नोंद स्वतः करीत बसावयाचें तसेंच एखादी शस्त्रक्रिया करावयाची असल्यास त्याजबद्दल ग्रंथावलो-कन करीत बसावें, अगर औषधोपचारा संबंधानें विचार पडल्यास तो विषयही ग्रंथांतरीं पहावा; किंवा रोग्याकडून बोलावणें आल्यास तिकडे जावें. येणेंप्रमाणें ५।६ वाजेपर्यंत सायंकाळचें काम आटोपल्यावर बहुतकरून रा. ब. दादोबा पांडुरंग, मोरोबा विनोबा मांडवीकर व न्हियाटसेक साहेब यांपैकीं कोणीतरी फिरावयास जाण्या-

करितां येत त्यांजबरोबर हवा खाण्याकरितां जावयाचें. फिरून माघारीं आल्यावर राहिलें साहिलें काम पाहून ८।९ वाजतां फराळ करावयाचा, व नंतर रजिस्टरांतील नोंद पुरी करून कोणतीं औषधें तयार आहेत कोणतीं नाहींत हें पाहून दुसरे दिवशीं कोणतीं तयार करावयाचीं व कोणतीं बाजारांतून आणावयाचीं या सर्व गोष्टींचा विचार करून १०।११ वाजतां निजावयास जावयाचें. रात्रीं कोणीही उठविण्यास आलें तरी उठून बाहेर येऊन त्यास औषध वगैरे द्यावयाचें व घरीं पाहावयास जाण्याचें काम पडलें तरी जावयाचें. रात्रीं बेरात्रीं येऊन त्यांना उठविण्याची मुळींच मनाई नसे. वास्तविक आतां त्यांना पूर्वींप्रमाणें जरी शक्ती नव्हती तरी आपला देह जितका दुसऱ्याच्या कामीं पडेल तितका झिजवावयाचा, त्यांत स्वत:च्या आरामाचा विचार पाहावयाचा नाहीं, असा त्यांचा स्वभाव असल्यामुळें अजूनही ते पूर्वींप्रमाणेंच मेहनत करीत असत. नोकरीच्या शेवटीं शेवटीं त्यांना जें पारतंत्र्य भासूं लागलें होतें त्याचा आतां लेशही नसल्यामुळें काम जरी जास्त करावें लागलें तरी त्यांच्या मनास उल्हासच वाटे. वामनरावजींचा धंदा बहुतेक गोरगरिबांतच असल्यामुळें काम ज्यास्त पडून व्हावा तितका फायदा होत नसे, हें खरें पण त्यांचा स्वभाव अल्पसंतोषी असल्यामुळें ज्यास्त फायद्याची हाव त्यांनीं कधींच धरली नाहीं. हल्लींच्या स्थितींत त्यांस फार सुख झालें व ते वारंवार त्याजबद्दल उद्गारही काढीत. वामनरावजींचें मुंबईस चांगलें चालूं लागलें हें पाहून मुंबईचे व दूर दूरचे इष्टमित्रांसही आनंद झाला.

वामनरावजी इंदूरची नोकरी सोडून आले होते, तरी महाराजांचा त्यांच्यावर इतका भरंवसा होता कीं राणीसाहेबांची एकदां प्रकृति

बिघडली तेव्हां त्यांनीं वामनरावजींस मुद्दाम मुंबईहून बोलावून नेलें होतें. त्यानंतर होळकर सरकारची स्वारी मुंबईस आली होती. तेव्हांही प्रसंग पडल्यास महाराजांस किंवा त्यांचे स्वारींतील मंडळीस वामनरावजींचाच उपचार असे. महाराजांनीं वामनरावजींच्या शब्दाचा शेवटपर्यंत कधींही अव्हेर केला नाहीं. ह्या वेळच्या स्वारींत वामन-रावजींच्या द्वारें पुष्कळांस महाराजांची भेट झाली. मला महाराजांची भेट करून द्या अशी वामनरावजींस कोणीही विनंति केली तरी त्यास नेऊन महाराजांची त्यांनीं भेट करून द्यावी. अशा प्रकारें एकदां एक यति वामनरावजींबरोबर महाराजांचे भेटीस गेला. तो वामनराव-जींकडे बराच येत जात असे. तो फार निर्लोभी होता. महाराजांची भेट झाल्यावर आम्ही आपली काय सेवा करावी असा महाराजांनीं यतीस प्रश्न केला. तेव्हां त्यानें म्हटलें “ हमकूं एक सांटा देना और कुछ नही चाहिये.” हें त्याचें विलक्षण उत्तर ऐकल्यावर सर्वांस आश्चर्य वाटलें. हें काय ? आणखी कांहीं मागा, असें महाराज व जवळचे लोक म्हणत असतांही त्यानें म्हटलें कीं, “बस्स सांटाही होना, दुसरा और कुच्छ नही चाहिये.” महाराजांनीं कांहीं ऊंस आणवून यतीपुढें ठेवविले. त्यांपैकीं एक लहानसा तुकडा घेऊन तो यति चालता झाला. ह्या मुक्कामाचे वेळींच महाराजांस प्रार्थनामंदिर पहा-ण्यास येण्याविषयीं निमंत्रण देण्याकरितां त्या समाजांतील प्रमुख मंडळी वामनरावजीं मार्फतच महाराजांकडे गेली होती. महाराजांनीं निमंत्रणाचा स्वीकार करून समाजवाल्यांचे विनंतीप्रमाणें मंदिरास भेट दिली. त्या वेळचे अमेरिकन मिशनचे पाद्री रेव्हरेंड विष्णु भास्कर करमरकर ह्यांचीही वामनरावजींनीं महाराजांशीं भेट करून दिली. त्या प्रसंगीं रेव्हरेंड करमरकर ह्यांनीं महाराजांस एक खिस्ती शास्त्राची प्रत नजर केली व तिचा महाराजांनीं स्वीकारही केला.

ह्यावेळीं वामनरावजींची मुंबईतही मान प्रतिष्ठा होऊन धंदा चांगला वाढला. खर्चवेच भागून शिल्लकही राहूं लागली. पण हल्लीं वामनरावजींनीं जो धंदा चालविला होता तो द्रव्यसंचयाच्या हेतूनें नव्हे तर आपला प्रपंच भागवून गोरगरीबांची जेवढी सोय होईल तेवढी करावयाची हाच त्यांचा हेतु होता. इतर डाक्टरांपेक्षां वामनरावजींनीं औषधाचे दर आधींच कमी ठेविले होते. ते आतां आणखीही कमी केले व निराश्रितांस जास्त मदत करूं लागले. ते ह्मणत, "मी चाकरी सोडून जो येथें आलों तो फक्त माझा निर्वाह व मुलांचा विद्याभ्यास नीट रीतीनें व्हावा व आयुष्याचे शेवटले दिवस सुखानें म्हणजे स्वातंत्र्यांत घालवावे म्हणूनच. ईश्वरकृपेनें माझा उत्तम प्रकारें निर्वाह होतो आहे तेवढें पुरें आहे. मला संग्रह करावयाचा नाहीं." असो. असे स्वार्थत्यागी पुरुष समाजांत असणें हें त्या समाजाचें मोठें भाग्यच होय.

वामनरावजींस धंद्यांत जसा जसा जास्त लाभ होत जाई तसा तसा ते त्याचा उपयोग गरीब निराश्रित लोकांस अधिक अधिक करून देत. भंगी, महार, मांग, यांना बहुतेक फुकटच औषधें देत असत. वाळकेश्वरचे ब्राह्मणांसही जंताच्या पुड्या व इतर औषधें फुकट द्यावयाचीं. महारमांगास शिवावें लागलें तर खुशाल शिवत. मग स्नान मात्र करीत. लहान मुलांबद्दल औषधोपचारासंबंधानें ते फारच काळजी घेत. त्यांना दवाखान्यांत औषध स्वतः पाजीत. त्यांचे इतर उपचार शक्य तितके दवाखान्यांतच करीत. उदाहरणार्थ आंकडी आली असतां त्यांस ऊन पाण्यांत बसवावयाचें. येणेंप्रमाणें वामनरावजींच्या दवाखान्यांतील उपचारपद्धति लोकांस

फारच प्रिय झाली होती. दवाखान्यांत जावयाचें असलें म्हणजे कांहीं कांहीं मोठीं माणसेंही भितात. पण वामनरावजींच्या दवाखान्यांत जाण्याला मुलेंही भीत नसत. इतक्या प्रेमानें ते उपचार करीत असत. त्यांच्या दवाखान्यांत जाणें म्हणजे बायकामुलांस, गोरगरिबांस, लहान मोठ्यांस आपल्या एखाद्या जिवलग स्नेह्याकडे जातों असें वाटे. वामनरावजींची ज्यांना पूर्ण माहिती नसे त्यांना सकृद्दर्शनीं असें वाटे कीं, हें त्यांचें प्रेम वरकरणी व दिखाऊ आहे. पण दीर्घ परिचयानें हा त्यांचा भ्रम दूर होई; व ममताळुपणा हा वामनरावजींचा स्वाभाविक गुण आहे अशी त्यांची खात्री होई.

कित्येक डॉक्टर लोक मत्सरानें आपल्या रोग्यांजवळ म्हणत कीं, वामनराव हे काय बिचारे हास्पिटल असिस्टंट आहेत. त्यांची योग्यता ती किती ? पदवीधर डॉक्टराकडे जावयाचें सोडून लोक त्यांच्याकडे जातात. एकदा असा प्रकार घडला कीं, एका गृहस्थाचे घरीं वामनरावजींचा उपचार चालू असतां शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या आग्रहावरून त्या घरचे माणसांचा असा विचार झाला कीं दुसऱ्या एका मोठ्या डॉक्टरास आणून रोग्यास दाखवावें. यजमानानीं तो विचार वामनरावजींस कळविला.वामनरावजींनीं लागलेंच त्या गोष्टीस अनुमोदन दिलें व ते ह्मणाले कीं सदहु डाक्टरांस अवश्य बोलवावें व त्यांचाही विचार घ्यावा; ते माझ्यापेक्षां ज्यास्त शिकलेले आहेत; शिवाय घरच्या माणसांसही त्यापासून समाधान होईल. डाक्टर मजकुरास आपलें प्रिस्क्रिप्शनही दाखविण्यास त्यांनीं सुचविलें. वामनरावजींवर यजमानाचा पूर्ण भरंवसा होता कारण ते त्यांना चांगले ओळखीत होते. पण घरच्या माणसांची समजूत करण्याकरितां वामनरावजींच्या अनुमोदनानें त्यांनीं

दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या डाक्टरास आणलें. डाक्टरसाहेब आल्यावर त्यांनीं वामनरावजींची प्रत्यक्ष निंदा केली नाहीं. तरी साधारण असा शेरा मारला कीं तुम्हीं या रोग्यास भलत्यासलत्याचे हातीं देऊन अगदीं खराबी केली; व आतां फार ज्यास्त झालें तेव्हां आम्हास बोलाविलें. वेळींच योग्य मनुष्यास बोलावून औषधोपचार करणें सुशिक्षित माणसास समजूं नये तर कोणास समजावें ? ह्या उद्गारांचा अर्थातच मालकाचे मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. घरांतील मनुष्यांची मात्र समजूत झाली. चांगल्या डॉक्टरची फी भरली, औषधही घेतलें पण जेव्हां गुण वाटला नाहीं तेव्हां पुन: वामनरावजींच्या हातानेंच तो रोगी बरा झाला. फी घेण्याच्या बाबतींत त्यांच्या निश्चयाची गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे ती अशी:—एखाद्या मोठ्या शस्त्रक्रियेच्या बाबतींत अगर दुर्धर रोगाच्या बाबतींत वामनरावजींचा रोगी, मी तुम्हास काय फी द्यावी असें विचारूं लागला तर वामनरावजी म्हणत, तुम्हाला वाटेल तें तुम्ही द्या; ह्यावर रोगी कांहीं तरी फी सांगा असा आग्रह करूं लागल्यास वामनरावजी त्यास बजावीत कीं मीं एकदा अमुक एक फी सांगितल्यावर तिच्यापेक्षां कमी घेणार नाहीं व त्याप्रमाणें रोग्यांच्या आग्रहानें त्यांनीं अमुक एक फी द्या असें त्यांना एकदा सांगितल्यावर त्यापेक्षां ते कांहीं एक कमी घेत नसत. ह्यामुळें निंदापवादही वामनरावजींस कधीं कधीं ऐकावे लागत. कित्येक डाक्टर म्हणत रोग्यांनीं कांहींही फी दिली तरी हे घेतात व त्यामुळें धंद्याची किंमत कमी होते. वामनरावजी म्हणत कीं मी गोरगरीबांचा डॉक्टर, माझी गिऱ्हाइकी अशाच लोकांत आहे; गाईचें आंचूळ हळु हळु व बेतानें दाबलें तर त्याच्यांतून दूध निघतें पण तेंच जर जोरानें

दाबलें तर रक्त निघतें; ज्याच्या त्याच्या स्थितीप्रमाणें कोणी स्वसंतोषानें जें देईल तें मी घेतों, व त्यांतच मला समाधान वाटतें. ह्यांत मी कांहीं गैर करितों असें मला वाटत नाहीं. अशा रीतीनें वामनरावजींनीं आपला धंदा चालविला.

---

## भाग पंचविसावा.

### सामाजिक सुधारणा.

सार्वजनिक कामापैकीं सामाजिक सुधारणेचें वामनरावजींस विशेष अगत्य होतें. पुनर्विवाहपक्ष त्यांना संमत होता. विष्णुशास्त्री पंडित पुनर्विवाहाचे पुरस्कर्ते हे त्यांचे फार जुने स्नेही होते! वामनरावजींचे परममित्र विनायक बापूजी भांडारकर यांचे कन्येचे पुनर्विवाहांत वामनरावजी आपल्या सर्व कुटुंबासह हजर होते. तसेंच खुद्द विष्णुशास्त्री पंडित यांचे पुनर्विवाहांतही ते गेले होते इंदुरांत असतांना देखील त्यांनीं एक पुनर्विवाह घडवून आणला होता. त्या वेळीं पुनर्विवाहित सुधारक तिरस्करणीय व बहिष्कृत असत. वामन तात्यांना त्यांच्याबद्दल फार सहानुभूति वाटे व सणावाराच्या दिवशीं ते त्यांना आपल्या घरीं कधीं कधीं आदरानें जेवावयास बोलावीत व इतर मदतही करीत असत. प्रार्थना समाजाचीं मतें त्यांस सर्वांशीं ग्राह्य नव्हतीं तरी ठळक ठळक प्रसंगीं ते मंदिरांत जात. मंदिरास त्यांनीं वर्गणीही दिली होती. स्त्रीशिक्षणाचे ते पुरस्कर्ते होते याबद्दल इंदूरच्या हकिकतींत लिहिलेंच आहे. मुंबईस मुलींच्या

शिक्षणाची सोय होतीच. तेथें ते आपल्या मुलींस शाळेंत पाठवीत असत. मुंबईंत सुईणीचा एक वर्ग होता, त्यांत शिकण्यासाठीं म्हणून विष्णुशास्त्री पंडितांच्या वतीनें एक तरुण विधवा स्त्री आली होती तिची दुसरी कोठें राहण्याची सोय नव्हती म्हणून वामनरावजींनीं तिला आपले बिऱ्हाडीं राहण्यास जागा दिली होती. पुढें ही बाई परीक्षा पास होऊन तिला बडोद्यास सुइणीची जागा मिळाली व तेथें तिनें चांगला लौकिक मिळविला.

वामनरावजी जरी सोंवळें ओंवळें पाळणारे होते तथापि कर्तव्याच्या आड ते सोवळ्याओवळ्यास कधींही येऊं देत नसत. हें भंग्याकडे जाऊन ते औषधोपचार करीत होते यावरून दिसून येतें. सिंधप्रांतांत सरकारी नोकरीवर असतां उंटावरून प्रवास करण्याचे अनेक प्रसंग वामनरावजींस पडत असत. त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याचा आग्रह पुष्कळ लोकांनीं केला पण वामनरावजींनीं तें कांहीं ऐकलें नाहीं. ते म्हणत उंटावरून प्रवास करण्यांत धर्मरीत्या मी पाप केलें नाहीं, व म्हणून मी प्रायश्चित्तही घेणार नाहीं.

हुंडा घेण्याच्या चालीसंबंधानें वामनरावजींचा मोठा कटाक्ष असे. त्यांना चार अपत्यें होतीं व दोन पुतणे होतें. मोठ्या मुलाचें लग्न केलें त्या वेळीं त्यांनीं हुंडा घेतला नाहीं व मोठ्या मुलीचें लग्न केलें त्या वेळीं त्यांनीं हुंडा दिलाही नाहीं. योग्य करणी करावयाची ती केली. एका पुतण्याचें लग्न केलें त्या वेळींही त्यांनीं हुंडा घेतला नाहीं. धाकट्या मुलीच्या लग्नाचे वेळीं मोठी पंचाईत येऊन पडली. हीं तिन्ही लग्नें माळवाप्रांतांत झालीं. तेथें वामनरावजींचें वजन मोठें असे व लोकांना त्यांच्या स्वभावाची माहिती असे. वामनरावजी इंदूर

सोडून ज्या वेळीं मुंबईस आले त्या वेळीं मुलगी अगदीं लहान होती. पुढें ५।६ वर्षांनीं ती लग्नाची झाली. इकडे हुंडयाची चाल जबरदस्त पडली होती. वामनरावजींचा पक्का निश्चय झाला होता कीं, हुंडा द्यावयाचा नाहीं, करणी भरपूर करावयाची. ह्या विचारांत गुंतले असतां त्यांस ताप येऊन मोठें दुखणें आलें व त्यांतच त्यांचा अंत झाला. पण त्यांचा निश्चय ढळला नाहीं व धैर्यही त्यांनीं सोडलें नाहीं.

रेव्हरेंड नेहमया नीलकंठ शास्त्री गोरे वामनरावजींचे मोठे स्नेही असत. प्रसंगीं वामनरावजी त्यांना आपल्या येथें जेवावयास बोलावीत व आपल्या घरीं टेबलावर दूधभात जेऊं घालीत.

---

## भाग सव्वीसावा.

### दयाशीलता.

दयाशीलता तर वामनरावजींचा प्रधान गुण. वामनरावजींना जे दयेला पात्र दिसत त्यांच्यावर दया करावयाची संधी ते कधींही दवडीत नसत. मग त्या कामीं त्यांना त्रास झाला किंवा त्यांचें कांहीं नुकसान झालें तरी त्याची त्यांना पर्वा नसे. भिकारी त्यांच्या वरून विन्मुख कधींच जात नसे. सुखवस्तु लोकांच्या घरीं भिकाऱ्यांची दाद लागलीच तर ती मोठ्या मुष्किलीनें व फार उशीरा लागते. तात्यांच्या घरीं असा प्रकार सहसा होत नसे, व झालाच तर तो त्यांना कधींही खपत नसे. इंदूर मुक्कामीं तात्यांच्या घरीं एकदा कांहीं भिकारी भिक्षा मागावयास आले. त्यांनीं भीक मागितली पण घरांतील माणसांचें लक्ष तिकडे गेलें नाहीं. घरांतील मोठे मुलगे

आईच्या बाळंत खोलींत सांजा खात बसले होते. त्यांचें भिकाऱ्यांकडे लक्ष गेलें नाहीं. दुपारची वेळ झाली इतक्यांत वामनरावजी घरीं आले, त्यांना भिकारी दारीं उभे असलेले दिसले. 'भिकारी बाहेर तिष्ठत उभे आहेत व तुम्ही त्यांच्या हाकांकडे लक्षही देत नाहीं,' असें ते रागानें बोलले व रागाच्या भरांत त्यांनीं मुलांना मारलेंही. भिकाऱ्यांना नासकें कुजकें अन्न ते कधींही देऊं देत नसत. इतकेंच नव्हे तर मुंबईंत असतां आपल्या रोजच्या जेवणांत जे तांदुळ ते उपयोगांत आणीत तेच तांदुळ ते भिकाऱ्यासही द्यावयास लावीत. इंदूर मुक्कामीं असतां भिक्षेकरी लोकांस गव्हाचें पीठ घालीत. नुसते गहूं घालीत नसत. त्या वेळीं इंदूराहून छावणींत अफूच्या पेट्यांची नेआण मजुरांच्याकडून बरीच होत असे. मधल्या दोन मैलांत मजुरांना पेट्या ठेवून थोडी विश्रांति घेण्यास कांहींच सोय नसल्यामुळें त्यांचे फार हाल होत. ही गोष्ट वामनरावजींच्या लक्षांत आल्यावर त्यांनीं तेथील लोकांकडून इंदूर शहर व छावणी ह्यांच्यामध्यें ठिकठिकाणीं लांकडी बैठकी बसविल्या व गरीब लोकांचे हाल कमी केले.

गरीब रोग्यांकडे जाऊन—मग ते कोणत्याही जातीचे असोत—त्यांना औषधोपचार आणि तोही फुकट करणारे त्या वेळीं ते एकटेच डाक्टर होते असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्यासंबंधीं एकदा ते म्हणाले, येशू ख्रिस्ताच्या अंगीं चमत्कार करण्याची शक्ति देवानें दिली होती. त्या शक्तीच्या योगानें त्यानें अनेक लोकांस अनेक आधिव्याधींपासून मुक्त केलें. मला थोडासा गुण देवानें दिला आहे त्याचा मी उपयोग करून घेऊन रोग्यास व्याधींतून यथाशक्ति तरी मुक्त केलेंच पाहिजे.

कधीं कधीं उच्चहिंदूंच्या अनाथ प्रेतांचा संस्कार ते स्वतः अंगें व स्वतःच्या खर्चानें करीत. फार तर काय प्रेत उचलण्यास योग्य माणसें पुरेशीं न मिळाल्यास ते स्वतः खांदा देत !

## १८७६–७७ सालचा दुष्काळ.

मुंबईंत वामनरावजींनीं सर्वांत मोठें असें सार्वजनिक काम केलें तें सन १८७६–७७ च्या दुष्काळाचे सालीं होय. त्या वर्षीं जेव्हां जिकडे तिकडे व विशेषेंकरून सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळानें कहर उडवून दिला तेव्हां वामनरावजींस दुष्काळपीडितांचे स्थितीबद्दल फार वाईट वाटलें. सकाळसंध्याकाळीं जेवणाचे वेळीं दुष्काळांत सांपडलेल्या लोकांचें त्यांस स्मरण होई व आपण येथें सुखानें व पोटभर जेवतों परंतु त्या गरिबांस दिवसचे दिवस अन्नावांचून काढावे लागतात असे उद्गार ते वेळोवेळीं काढीत. कधीं कधीं तर त्या आपद्ग्रस्त लोकांच्या दुःखाच्या आठवणीनें त्यांचें अंतःकरण कळवळून डोळे पाण्यानें भरून यावेत.त्या वर्षीं दिवाळींत त्यांनीं घरामध्यें सण करूं दिला नाहीं. त्यांनीं मुलांबाळांस म्हणावें, इतके लोक उपाशीं मरत आहेत तर आपणास गोड खाववेल तरी कसें ? त्यांच्या त्या सद्गदित वृत्तीचा घरांतील माणसांवर इतका परिणाम झाला कीं, त्यांस त्यामुळें सणाची आठवणही झाली नाहीं. वामवरावजींनीं दुष्काळपीडितांसाठीं वर्गणी जमा करण्यास सुरुवात केली. वर्गणीच्या पैशाकरितां त्यांनीं एक पेटी केली व ती वर ‘ दुष्कळपीडितांसाठीं वर्गणी ’ अशीं अक्षरें लिहविलीं. ती पेटी व एक निशाण एका नोकराजवळ देऊन त्याला बरोबर घेऊन

संध्याकाळीं समुद्रकिनाऱ्यावरून रोज वामनरावजींनीं फिरावें. घरीं आल्यावर ही पेटी व निशाण दाराजवळ असे. अशा रीतीनें घरीं व फिरून वामनरावजींनीं वर्गणी जमा करावी व कांहीं रक्कम जमली म्हणजे ती त्यांचे सोलापुरास एक मुनसफ स्नेही होते त्यांजकडे पाठवावी. आपण स्वतःही वर्गणींत १०० रुपये घातले. येणेंप्रमाणें तनमनधनेंकरून दुष्काळपीडितांची मदत चालू ठेविली.

---

## भाग सत्ताविसावा.

### धर्मश्रद्धा, साधेपणा व निर्व्यसनता.

वामनरावजींचें रोजचें नित्यनैमित्तिक कर्म ह्मणजे सकाळीं उठून मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर स्नान करणें व संध्या करणें हें होय. संध्या झाल्यावर ते गंध लावीत व अंगांत बंडी व अंगरखा घातल्यावर चहा घेत असत. हल्लींच्या ब्राह्मणी पगडीपेक्षां किंचित् मोठें असें एक पांढरें पागोटें डोक्यावर घालीत. केस किंवा भला मोठा घेरा ते डोक्यावर ठेवीत नसत. एक लहानशी शेंडी मात्र असे. नेसावयास एक पांढऱ्या कांठाचें धोतर, आंगावरही एक पांढऱ्याच कांठाचें धोतर व पायांत ब्राम्हणी जोडा एवढाच काय तो पोषाख! जरीकाठी किंवा रेशमी कपडा त्यांनीं कधींही वापरला नाहीं, असा हा साधा पोषाख असे तरी तो नीट नेटका असून फार स्वच्छ असे. त्यावर डाग म्हणून कधीं दिसावयाचा नाहीं. दिसलाच तर तो कास्टिक लोशनाचा.

क्वचित् प्रसंगीं वामनरावजी तुमानदार विजार घालीत असत. बाकी साधारणपणें कामांत गुंतलेले असोत, कोणाकडे भेटावयास जावयाचे असोत, लग्नप्रसंगांत जावयाचे असोत किंवा राजदरबारांत जावयाचे असोत वामनतात्या आपले नेहमींच्या पोषाखांत दिसावयाचे. आग्रा येथें सन १८६६ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत भरलेल्या दरबारांत डाक्टर वामनरावजींस बोलावणें आलें होतें. त्या दरबारांत हिंदी चार गृहस्थांस सरकारांतून लॉट साहेब लॉर्ड लॉरेन्स यांच्या हातून सन्मानार्थ देणग्या देण्यांत आल्या त्यांत वामनरावजींस शस्त्रक्रियेच्या शस्त्रांची बहुमोलाची पेटी देण्यांत आली. त्या दरबारास सर्वच लोक इंग्रजी पोषाखांत गेले. वामनरावजींचा त्यांच्या साध्या पोषाखामुळें दरबारांत कसा प्रवेश होईल ह्याची कित्येकांना चिंता पडली ! पण वामनतात्या डगमगले नाहींत.ते त्याच पोषाखानें आपली निमंत्रणपत्रिका दाखवून दरबारांत गेले व तेथें त्यांचा सन्मानपूर्वक प्रवेश होऊन नेमलेल्या वरच्या स्थानीं त्यांना बसविण्यांतही आलें.

वामनतात्यांची हिंदुधर्मावर पूर्ण श्रद्धा होती. हल्लींच्या भाषेंत बोलवयाचें म्हणजे ते जुन्या मताचे होते असेंच म्हटलें पाहिजे. ते व्रतें उपोषणें करीत. व प्रसंगविशेषीं ते पुराण व कीर्तन ऐकण्यास जात. ब्राह्मणभोजनेंही अल्पप्रमाणावर घालीत. जेवणाच्या वेळीं जर ब्राह्मण अतिथि आला तर ते आपल्या पानावर त्याला बसवीत. आतांच्याप्रमाणें त्या वेळीं गणपतिउत्सवाचें प्रस्थ नव्हतें तरी वामनतात्या गणेशचतुर्थीस गणपति बाजारांतून विकत आणून त्याला घरीं बसवीत असत व त्याची यथाविधि पूजाही करवीत असत. या उत्सवानिमित्त ब्राह्मणभोजनही मोठ्या थाटानें होत असे.

मुंबईस असतां घरांतील देवपूजेचें काम त्यांचा पुतण्या गोविंदा याच्याकडेच असे, पण तो मुंबई प्रार्थनासमाजाचा सभासद झाल्यापासून देवपूजेकडे दुर्लक्ष करूं लागला. तात्यांच्या ही गोष्ट लक्षांत आली, व त्याला एके दिवशीं ते म्हणाले; हें पहा वस्त्राआड सगळें जग नागवें आहे; सर्व धर्मांत कमी ज्यास्त प्रमाणानें बरें वाईट आहेच. तेव्हां माणसाला आपलें धर्मदृष्टीनें कल्याण करून घेण्याकरितां आपल्या वाडवडिलांचा धर्म सोडलाच पाहिजे असें नाहीं. प्रत्येकाला आपल्या धर्मांत राहूनही आपली धार्मिक उन्नति करून घेतां येते. नित्याच्या हव्यकव्यानिमित्त त्यांच्या येथें ब्राह्मण येत असे. इंदूर मुक्कामीं एका प्रतिष्ठित ब्राह्मणाचा मुलगा विद्यार्जनासाठीं तात्यांच्या घरीं असे. तो अगदीं घरांतील मुलांसारखा असे. त्याच्या खाण्यापिण्यांत, वस्त्रप्रावरणांत कमींपणा नसे. घरीं अक्षयी गुरुचरित्राचा पाठ चालत असे. मुंबईंत असतांना एकदा वडील मुलाची प्रकृति बिघडली होती. औषधोपचार चालू होताच. पण मुलगा मेडिकल कॉलेजांत शिकत होता. तेव्हां त्याच्या मनांत असें आलें कीं आपण एग्ज मिक्श्चर घ्यावें म्हणजे आपणास शक्ति येऊन लवकर आराम पडेल. या हेतूनें त्यांनीं सदर औषध केलें. ही गोष्ट वामनरावजींस समजली. मांस मच्छर अगर दारू इत्यादि गोष्टी त्यांस इतर ब्राह्मणांप्रमाणें वर्ज्य असत. तेव्हां मुलाची वरील गोष्ट ऐकून वामनरावजींच्या मनास वाईट वाटलें व पुढें लवकरच ते सहकुटुंब रामेश्वराच्या यात्रेस दक्षिणेंत निघोन गेले. ब्राह्मणेतर रोग्यास मात्र अवश्य असेल तर मांसाचा सुर्वा घेण्यास ते सांगत असत. आणि कोणास सुर्वा करण्याची रीत माहीत नसली तर तीही सांगत.

# भाग अठ्ठाविसावा.

## कित्ता घेण्यासारखे वामनरावजींच्या आंगीं वसत असलेले अनेक गुण.

वामनरावजींस व्यसन म्हणून कोणत्याच प्रकारचें नव्हतें. सुपारी, विड्या, तपकीर अगर तंबाखू यापैकीं कशाचाही त्यांना छंद नसे. मग गांजा, भांग, दारू याविषयीं बोलणेंच नको. सकाळची स्नानसंध्या झाल्यावर व रात्रौ निजावयास जाण्यापूर्वीं चहा मात्र घेत असत. सर्व प्रकारें त्यांचें आचरण निर्मळ व पवित्र असे.

सर्व लोकांशीं त्यांचे बोलणें मोठें गोड असे. मिष्ट भाषणाची संवय त्यांस पहिल्यापासूनच होती. मुंबई मुक्कामीं त्यांच्या प्रेमळ भाषणामुळें गरीब लोकांना ते फार प्रिय असत. मुलाबाळांनासुद्धां लोकांशीं प्रेमळपणें बोलण्याची सक्त ताकीद असे. काण्यांच्या घरचें अशा प्रकारचें कित्ता घेण्यासारखें वळण सर्वांस महशूर असे. हाच कित्ता पुढें त्यांचे सच्छिष्य डाक्टर गणपतसिंग यांच्यांत पूर्णपणें विकसित झाला होता. ज्या ज्या कोणास त्यांच्या सहवासाचा लाभ मिळे त्यास हा मिष्ट भाषणाचा कित्ता वळवावा लागे.

वामनरावजींच्या बोलण्यांत अपशब्द अगर शिवी कधींही येत नसे. या बाबतींत मुलाबाळांसही फार कडक शिक्षण असे. शिवीगाळ करावयाची नाहीं एवढेंच नव्हे तर अशी कोणतीही गोष्ट करावयाची नाहीं कीं ज्या योगानें दुसरा कोणी आपणास शिवीगाळ करील. एके प्रसंगीं वडील मुलगा शाळेंतून घरीं येत होता. कौलाचा अगर विटकरीचा पाजावा शाळेच्या रस्त्यापासून बऱ्याच अंतरावर

होता. परंतु कुंभाराच्या तुटक्या फुटक्या विटा किंवा कौलें रस्त्यावर पडलीं होतीं त्यांपैकीं एक कौलाचा तुकडा मुलानें चालतां चालतां उचलला. हें पाहून कुंभार मुलास शिवीगाळ करूं लागला. इतक्यांत त्याच मार्गानें वामनरावजी घोड्यावर बसून दुखणेकऱ्यास पाहण्यास चालले होते. त्यांना ह्या शिव्या ऐकूं गेल्या. त्यांनीं मुलाला विचारलें, तूं कांहीं कुंभाराची खोडी केलीस काय? मुलगा म्हणाला नाहीं. मग कुंभारास विचारलें, तूं कां मुलाला शिव्या देतोस? तो ह्मणाला, मुलगा माझें कौल उचलून घेऊन जात होता. हा जबाब कुंभाराच्या तोंडून निघण्याचाच उशीर, हातांत चाबूक होता, त्या चाबकानेंच मुलाला मार मिळाला. मुलगा चार दिवस तापानें बिमार होऊन पडला, मारानें पाठ इतकी सुजली होती कीं उपचार करितां करितां आईचे नाकीं नव आले.* पुढें कांहीं दिवसांनीं हाच मुलगा आईबरोबर पंढरपुरच्या यात्रेकरितां पुण्यास आपले आजोळीं आला होता. आईस व मुलास वामनरावजींचे बंधु नारायण-शास्त्री काणे यांनीं आपल्या घरीं एक दोन दिवसांकरितां शनवार पेठेंत जेवण्यास व राहण्यास आणलें. दुपारचें जेवण झाल्यावर बाळाभाऊ व धोंडू ह्मणजे नारायण शास्त्री यांचा मुलगा गोविंदा नदीवर खेळा-वयास गेले. दुपारच्या जेवणाच्या वेळीं गंमत ह्मणून दोघांनाही एक एक पैसा दक्षिणा ह्मणून दिली होती. नदींत खेळतां खेळतां बाळाभाऊनें आपला पैसा गमावला. धोंडूस त्याबद्दल वाईट वाटलें व त्याच्या तोंडांतून अपशब्द निघाला. बाळाभाऊस त्यांचा वीट आला

* हा मजकूर प्रकाशकाचे माहितीचा आहे म्हणून येथें नमूद केला आहे.

आणि तो आपल्या आजोळीं निघून गेला. चुलत्याच्या घरीं राहिला नाहीं. दोघेही मुलगे वयानें ७।८ वर्षांच्या आंतच असतील.

अपशब्द अगर शिवीगाळ यासंबंधानें चाकर माणसांसही इतकेंच कडक शिक्षण वामनरावजींच्या घरीं असे. इतकें मिष्ट भाषण होतें तरी भाषणांत थट्टामस्करी अगर वायफळपणा नसे. जशी मुद्रा गंभीर होती तशीच भाषणशैलीही गंभीर होती. घरांतील मुलांमाणसांवर कडकडीत धाक असे. तात्या रामेश्वराच्या यात्रेहून परत येणार असें कळतांच घरांतील मुलांना थोडेंसें पोटांत धस्स झालें. त्यांचा मुलांवर प्रेमासह धाकच तसा असे! हांक मारल्यावर मुलांनीं ओ दिली तर बरें नाहीं तर त्यांची फार खपा मर्जी होत असे; बायकोशींही पण जरासें कडकपणाचें वर्तन असे. वामनरावजी जसे मिष्टभाषणी होते तसेच ते स्पष्टवक्तेही होते. त्यांच्या निर्मळ व पवित्र तसेंच राजनिष्ठ आचरणामुळें बडे साहेबांचे व माळव्यांतील राजेरजवाड्यांचे दरबारांत त्यांना मोठा मान असे. वामनरावजी बडे साहेबांच्या कोठीवर आल्याबरोबर त्यांस बैठकींत पोंहचविण्याविषयीं शिपाई लोकांस सक्त हुकूम असे. राजेरजवाड्यांचे वकीलांच्या भेटी बडे साहेब आपल्या सोईनें घेत. त्यामुळें वकील लोकांस बराच वेळ तिष्ठत बसावें लागे. पण वामनरावजींची भेट गेल्याबरोबर तावडतोब होई. याचें कारण मोठमोठे साहेब लोक यांच्या पवित्र आचरणामुळें यांच्याविषयीं मोठी सन्मानबुद्धि ठेवीत. वामनरावजींचा स्वभाव निःस्पृह असल्यामुळें राजेराजवाड्यांबद्दल गोष्टी सहज त्यांचे समोर निघत पण या भाषणांत कोणत्याही राजाची निंदा झालेली वामनरावजींस खपत नसे. ते स्पष्टपणें सांगत कीं मला कोणाचीही निंदा झालेली ऐकणें प्रशस्त

वाटत नाहीं. हा त्यांचा आचार सर्व स्थळीं सारखाच असे. साहेब लोकांत म्हणा अगर राजेरजवाड्यांत म्हणा, पुष्कळ लोकांबद्दल ते शिफारस करीत व त्यांच्या शिफारशीस मान मिळत असे. पण वाईट शब्द कोणाबद्दल बोलावयाचा नाहीं व कोणी बोलला तर ऐकावयाचा नाहीं असा त्यांचा बाणा असे.

औषधोपचार हा गरीबास काय व श्रीमंतास काय एकसारखाच असतो, पण कित्येकदां गरीबांस वाटतें कीं आम्हांस जसा औषधोपचार व्हावा तसा होत नाहीं, कारण आमची गरिबी आहे. श्रीमंत माणसांस वाटतें कीं आमच्या जवळून लागतील ते पैसे घेऊन आम्हांस उत्तम प्रकारचें औषध देऊन लौकर बरें करावें. दोघांचीही चूक आहे, हें उघड आहे. "आर्तः पुत्रवदुपक्रम्यः' म्हणजे रोग्यास पुत्राप्रमाणें वागविलें पाहिजे; असें बहुतेक उत्तम वैद्यांचें म्हणणें आहे. असो. होळकर महाराजांच्या महाराणी साहेब यांचे डोळे एके प्रसंगीं बिघडले होते. डाक्टर वामनरावजींचा औषधोपचार चालू होता. डोळे बरे होण्यास जरा विलंब लागला. तेव्हां महाराणी साहेब वामनरावजींस म्हणाल्या, वामनरावजी, आमच्या डोळयास उत्तम औषध देऊन आमचे डोळे त्वरित बरे करा. यावर वामनरावजी म्हणाले 'महाराणी साहेब, मी आपल्या डोळयांकरितां जें औषध देतों तेंच उत्तम औषध आहे. त्यानेंच आपले डोळे खास लवकर बरे होतील. ह्याच औषधानें हजारों गरीब लोकांचे डोळे बरे झाले आहेत. हेंच औषध मी हलक्या जातीच्या लोकांच्या डोळयास देतों व त्यानें त्यांचे डोळे बरे होतात. आपल्या औषधोपचारांत व त्यांच्या औषधोपचारांत बिलकुल

फरक नाहीं. हेंच औषध आपण चालू ठेवा व आपले डोळे लौकर बरे होतील, काळजी करूं नका." वामनरावजींची राहणी जशी साधी असे तशी त्यांच्या एकंदर संसारांत त्यांची वर्तणुक मोठी शिस्तीची व टापटिपीची असे. महिन्याच्या कांठीं यांना जें उत्पन्न मिळत असे त्याचा निरनिराळया कामांकडे योग्य रीतीनें खर्च करितां यावा म्हणून ते विभाग पाडीत व ते पेटीच्या निरनिराळया लहान लहान खणांत भरून ठेवीत. ह्या योगानें धर्मादायाकडे राखून ठेवलेला पैसा घरखर्चाकडे किंवा इतर कामांकडे सहसा खर्च होत नसे.

वामनरावजी स्वत: सत्यावर प्रेम करीत व आपल्या कुटुंबांतील मुलांमाणसांसही ते प्रेम करावयास लावीत. मुलांची जात घरांत किंवा बाहेर कळत नकळत अपराध कारावयाचीच. त्यांचे आईबापही केव्हां आपला राग शांत करण्याकरितां त्यांना जबर शिक्षा करतात किंवा अपत्यप्रेमामुळें त्यांच्या अपराधाकडे अगदींच दुर्लक्ष करतात. पण वामनरावजींचें कांहीं तसें नसे. मुलांकडून घडलेल्या किरकोळ अपराधाला ते विशेष महत्त्व देत नसत. मुलांच्या प्रामाणिकपणाकडे विषेश लक्ष देत; व मुलांनीं प्रामाणिकपणानें चूक कबूल केल्यास ते त्यांस कधींही शिक्षा करीत नसत. पण अपराध करून जर तीं नाकबूल करावयास लागलीं, तर ते त्यांना कडक शिक्षा केल्याशिवाय कधींही रहात नसत. वामनरावजींच्या ह्या वर्तनाचा मुलांच्याच नव्हे तर घरांतील सर्व माणसांच्या मनांवर अत्यंत इष्ट असा परिणाम होत असे. गरीब विद्यार्थ्यांस ते हस्तें परहस्तें मदत कण्र्यास नेहमीं तत्पर असत. अनेक विद्यार्थी त्यांच्या घरीं येऊन हुशार झाले. ते त्यांच्या कल्याणार्थ त्यांना कडक रीतीनें वागवीत. त्यामुळें ते क्रूर स्वभावाचे व कठोर

अंतःकरणाचे आहेत असें भासे. परंतु ज्यांस अन्याय, अव्यवस्था, आळस व हलगर्जीपणा हीं आपल्या मुलांत खपत नसत त्यांस तीं दुसऱ्यांत कशी खपतील? आपल्या मुलांस व परक्यांस ते इतक्या समतेनें वागवीत कीं तीं सर्व त्यांचींच लेकरें आहेत असें घरीं किंवा शाळेंत असतां लोकांस वाटे. यामुळेंच त्यांचे उपाध्याचा मुलगा हा देखील बोलचाल व इतर व्यवहारांत अगदीं बाळाभाऊसारखा झाला.

डाक्टर वामनरावजी आपल्या शिष्यांनीं आपल्यासारखें व्हावें ह्याविषयीं किती कळकळ बाळगीत व त्यांच्याविषयीं कसे प्रयत्न करीत, हें कामगारपत्रांतील डॉ. गणपतसिंगाच्या चरित्राच्या खालील उताऱ्यावरून दिसून येईल:—

## चांगल्या संगतीचा परिणाम.

### डॉ. गणपतसिंग यांचें चरित्र.

"डॉ. गणपतसिंग यांच्या मृत्यूची खबर आम्हीं गेल्या अंकीं दिलीच आहे. हे इंदूर येथें नेहमी राहणारे असल्यामुळें त्यांजविषयीं आमच्या पुष्कळ वाचकांस माहिती नसेल. पण त्यांचें चरित्र प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, म्हणून तें आम्ही देत आहों.

डॉ. गणपतसिंग यांचे वडील उज्जनी येथें रहाणारे. हें शहर शिंदेशाहींत आहे. गणपतसिंगाच्या लहानपणीं म्हणजे ४० वर्षांच्या पूर्वीं त्या प्रांतीं विद्याप्रसाराची शाळा, कॉलेजें वगैरे साधनें नव्हतीं. सरासरी लिहितां वाचतां येऊन कांहीं तरी पोटापुरता धंदा करून रहाणाऱ्या कुटुंबांतीलच गणपतसिंगाचे वडील होते. अशा परिस्थितींतील लहान मुलांची स्थिति म्हणजे त्यांनीं उगीच उनाडासारखें

हिंडून दिवस घालवावयाचे अशी असावयाची. डॉ. गणपतसिंग हे सुमारें १५ वर्षांच्या वयाचे असतां उज्जनीहून एक मुलगा आईबापांस न विचारतां इंदुरास आला. त्याच्याबरोबर हेही आले. मुलाच्या बापानें मुलगा घरांतून नाहींसा झाला तेव्हां इंदुरास आपल्या एका स्नेह्यास पत्र लिहिलें कीं मुलगा तेथें आला असल्यास शोध करावा. शोध करितां त्या स्नेही गृहस्थास या दोघां मुलांचा पत्ता लागला. ही खबर कळल्यावर मुलांचे बाप मुलांस न्यावयास आले. पण गणपतसिंगांच्या वडिलांनीं असा विचार केला कीं मुलाला घरीं घेऊन जावें त्यापेक्षां त्याची इंदुरांतच राहण्याची चांगली सोय होईल तर बरें. नाहीं तर तो पुन्हां पळून जाईल. ही जी त्या गृहस्थास बुद्धि झाली तीच पुढें त्याच्या पुत्राच्या कल्याणास कारण झाली. उज्जनीकरांचे इंदूर येथील वरील मित्र इंदूर छावणींतील इस्पितळांत नोकर होते. त्यांपाशीं गणपतसिंगाच्या वडिलांनीं मुलाच्या सोयीची गोष्ट काढल्यावरून त्यांनीं ती करण्याचें पत्करिलें. त्याच इस्पितळांत डॉ. वामन गोपाळ काणे हे डॉक्टर होते. गणपतसिंगाचे वडील येईपर्यंत या डॉक्टरांच्याच आश्रयास गणपतसिंग वरील इंदूरकर गृहस्थांच्या मार्फत लागलेले होते. त्यांच्याच आश्रयास गणपतसिंगांच्या वडिलांनीं त्यांस पुढें ठेविलें व आपण घरीं परत गेले. डॉ. वामनराव काणे हे फार सात्विक सरळ व दयाळु गृहस्थ होते. त्यांची त्या प्रांतीं तशीच या प्रांतींही या गुणाविषयीं फार प्रसिद्ध आहे. त्यांनीं गणपतसिंगाकडून आपल्या मुलांबरोबर विद्याभ्यास करविला. पुढें त्यांस कांपौंडरच्या कामाची माहिती करून दिली. कांहीं दिवस तेथें एक इंग्रजी औषधांचें दुकान घालून त्यावर त्यास ठेविलें. पुढें मुंबईस मेडिकल कॉलेजांत

डाक्टरीच्या अभ्यासास आणलें. येथें ते ती विद्या शिकून परीक्षा पास होऊन इंदुराकडे परत गेले. तिकडे गेल्याबरोबर त्यांची नेमणूक लगेच छावणीच्या दवाखान्यावर झाली. चमत्कार असा कीं त्यांचे आश्रयदाते डॉ. वामनराव काणे ज्या मुख्य जागेवर त्या दवाखान्यांत होते त्याच जागेवर त्यांच्या आश्रयानें उदयास आलेले डॉ. गणपतसिंग अखेरपर्यंत होते. डॉ. काण्यांच्या सत्संगतीचा लाभ असा विद्याप्राप्तीच्या द्वारें तर झालाच; पण त्यांच्या सुस्वभावाचेंही उत्तम प्रतिबिंब त्यांच्या आश्रितावर उठलें. डॉ. गणपतसिंगाच्या दयाळूपणाबद्दल त्यांची सध्यां तर काय पण फार काळपर्यंत इंदूरप्रांतीं कीर्ति राहील. ते गरिबगुरीबांच्या घरीं जाऊन औषधोपचार करीत; पण त्यांनीं कोणापासुन कधीं फी मागितली नाहीं. इतकेंच नव्हे तर गरीब स्थितींतील मनुष्यानें संकोचानें फी दिली तर ते ती त्यास परत देत असत. इतर लोकांपासून तरी कोणी दिली तर ते फी घेत असत, आपण होऊन कोणापाशीं फी मागत नसत. इस्पितळांत दोन तीनशें रोगी राहणारे व शिवाय औषधाकरितां येणारे इतक्याची व्यवस्था नीट लागल्याशिवाय ते कधीं जेवीत नसत. दोन वाजण्यापूर्वीं त्यांना अन्न कधीं मिळालेंच नाहीं. ते हाताखालच्या माणसांस रोग्यांची हयगय करूं देत नसत. रोगी आपले यजमान होत, त्यांच्यामुळें आपल्यास भाकरी मिळते असें ते आपल्या हाताखालच्या नोकरांस म्हणत. 'देह त्यागितां कीर्ति मागें उरावी,' असा रामदासांनीं बोध केला आहे त्याप्रमाणें ह्या गृहस्थाचें वर्तन होतें. हे फार धार्मिक होते. परमेश्वराच्या ठिकाणीं त्यांचें सदा लक्ष असे. ते तेथील प्रार्थनासमाजाचे फार दिवस सेक्रेटरी होते.

घरून पळून आलेल्या उनाड गणपतीचे असे कीर्तिमान् डॉ. गणपतसिंग कसे झाले हें पाहिल्यास तें सत्संगतीचें फळ होय, असें उघड दिसेल. तुकारामबोवांनीं संतांविषयीं असें म्हटलें आहे कीं, **आपणासारिखे करिती तात्काळ**, त्याप्रमाणें डॉ. वामनराव काणे या गुरूंनीं आपल्या शिष्यांस आपल्यासारिखें करून आपल्या गादी-वर बसण्याला योग्य अधिकारी केलें. सर्वांनीं व विशेषेंकरून गरीब स्थितींतील लोकांनीं हें चरित्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पर. डॉ. वामनराव काण्यांच्या सहवासाचा परिणाम त्यांच्या शिष्यावर घडला, तोच पुत्रावरही घडल्याचा अनुभव हल्लीं या शहरीं शेंकडों लोक घेत आहेत. तात्पर्य सत्समागमाचें माहात्म्य फार मोठें आहे.

**कामगार.** ता. २५ जून १८९२ मुंबई.

डॉ. वामनरावजींना अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार करणेंही आवडत नसे. डॉ. गणपतसिंगांनीं एकदा पोष्टाच्या विरुद्ध पोष्टमास्तरकडे आपल्या पत्रासंबंधीं तक्रार केली. ही गोष्ट वामनरावजींस कळल्यावर त्यांनीं त्यासंबंधीं डॉ. गणपतसिंगाजवळ आपली नापसंती दाखविली. व तुम्ही आतां मोठे झालांत म्हणून तुम्हाला आतां गणपतसिंग असें म्हटलें पाहिजें असें त्यांना सांगून—हा वेळपावेतों ते त्यांना गणपत म्हणत; आतां—गणपतसिंग म्हणावयास लागले.

डॉ. श्रीधरपंत काणे या नांवाचे गृहस्थ पंचवटीस डॉक्टरीचें काम करीत असत. हे गृहस्थ कोंकणांतून अगदीं गरीब स्थितींत मुंबईस आले; व इंग्रजी शिकण्याच्या उद्देशानें डॉ. वामनरावजी यांच्या येथें राहिले. तेथें त्यांनीं थोडीशी इंग्रजी विद्या संपादन केल्या-वर कांपौंडरचें काम करूं लागले. काम करितां करितां पुष्कळ

हुशारी कमाविली; त्यांची हुशारी पाहून डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे यांनीं, पंचवटीस एक नवीनच दवाखाना उघडलेला होता; त्यावर त्यांची नेमणूक करण्याविषयीं शिफारस केली. तेथें त्यांनीं बरींच वर्षें काम केलें व उत्तम लौकिक संपादन केला. त्यांच्या चांगल्या मनमिळाऊ स्वभावाचें अझून नासिक येथील लोकांना स्मरण आहे. बुधईराम या नांवाचा गृहस्थ असाच कांपौंडरचें काम करून उदयास आला. हे गृहस्थ डॉक्टर बुधईराम या नांवानें इंदुरास प्रसिद्ध होते. कांहीं दिवस इंदूर शहरांतील इस्पितळावर यांची नेमणूक झाली होती. त्याप्रमाणें अनेक लोकांना डॉक्टर वामनरावजींच्या शिक्षणापासून फायदा झाला. विद्या संपादन करून उदरनिर्वाह करण्याचें सामर्थ्यच नुसतें त्यांस त्यांच्या सहवासानें आलें असें नाहीं तर लोकांशीं सभ्यपणानें व मनमिळाऊ-पणानें वागण्याचा कित्ता वामनरावजींच्या सहवासानें मिळत असे.

वामनरावजी मुंबईस आल्यावर मुलांच्या अभ्यासाची चांगली सोय झाली. थोरला मुलगा सदाशिव यास हायस्कुलांत घातलें व धाकटा मुलगा काशीनाथ यास पोतदारांच्या नवीन स्थापन झालेल्या शाळेंत घातलें. ही शाळा खाजगी होती तरी तींत शिक्षणाची व्यवस्था चांगली होती. व तिचे चालकास उत्तेजन देण्याकरितां वामनरावजींनीं आपले मुलांस तेथें घातलें होतें. थोरल्या मुलाची प्रवेश परीक्षा उतरल्यावर त्यानें आपलाच धंदा पुढें चालवावा या हेतूनें वामनरावजींनीं त्यास डाक्टरी शिकण्याकरितां मेडिकल कॉलेजांत घातलें. या चिरंजिवास ते आतां असें म्हणत कीं, बाबा रे! मी पेरणी करून ठेवितों आहे, तूं लौकर पास होऊन कापणी करूं लाग.

## अंत.

मुलानें आपल्या देखत डॉक्टरी परीक्षेंत पास होऊन आपण चालविलेल्या धंद्याचा व प्रपंचाचा भार संभाळावा अशी वामनरावजींस साहजिकच इच्छा उत्पन्न झाली. परंतु ईश्वराचे मनांत तसें नव्हतें. वामनरावजींचे हातून आतांपर्यंत इहलोकीं जी कामगिरी झाली तेवढीच ईश्वराला पुरेशी वाटून त्यानें त्यांस आपणाजवळ परत बोलाविलें. वामनरावजींच्या प्रपंचाचा भार देवानें आपले शिरावर घेतला. व दुष्काळ ज्वराचें निमित्त करून त्यांस इ. स. १८७७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १८ व्या तारखेस आपल्या चरणाजवळ नेलें. येणेंप्रमाणें वामनरावजींची इहलोकची यात्रा संपली. व ती संपेपर्यंत त्यांनीं " प्रपंच साधुनि परमार्थ केला " म्हणून श्रीसमर्थ रामदासांच्या मागील उक्तीच्याच उत्तरार्धाप्रमाणें वामनरावजींस ' तो नर भला रे भला ' या पदवीची पात्रता प्राप्त झाली. मृत्यूच्या निमित्तानें वामनरावजींचा जड देह जरी इहलोकांतून नाहींसा झाला तरी 'देह त्यागितां कीर्ति मागें उरावी' या समर्थांच्या दुसऱ्या उक्तीप्रमाणें वामनरावजींची कीर्ति त्यांच्या पाठीमागें चिरकाल राहिली व राहील; कारण ते साधारण पुरुष नव्हते, हें याच चरित्रांत ठिकठिकाणीं दिलेल्या वृत्तांतावरून दिसून येईल.

## वामनरावजींचे पश्चात्.

वामनरावजींचे निधनाची वार्ता ऐकून मुंबईतील गोरगरिबांस फार वाईट वाटलें. वामनरावजी हे त्यांस आप्तासारखेच वाटत असत, व तसें वाटणें अगदीं साहाजिकच होतें. श्रीमंत लोकांकडून पैसा मिळतो म्हणून त्यांचीं कामें (किंवा चाकरी) करणारे जगांत पुष्कळ

भेटतात पण 'ज्यासी अपंगिता नाहीं त्यासी धरी जो हृदयीं' ह्या कोटींतील पुरुष वामनरावजी असल्यामुळें गोरगरिबांस ते मायबापाप्रमाणेंच वाटावे यांत कांहीं नवल नाहीं. ही गोरगरिबांची गोष्ट झाली. पण प्रत्यक्ष श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकरांसही वामनरावजींच्या निधनाची वार्ता ऐकून फार दु:ख झालें. ते श्रीमंत होते, त्यांना वामनरावजींसारख्या देशी डाक्टरांची एवढी महती कां वाटावी ? पण नाहीं, वामनराव-जींची महाराजांनीं किंमत केली ती त्यांच्या केवळ डाक्टरी विद्येतील नैपुण्याबद्दल नव्हे तर त्यांच्या अंगीं वसत असलेल्या भूतदया, सत्य-निष्ठा, कर्तव्यतत्परता इत्यादि सौजन्यास शोभणाऱ्या गुणांमुळेंच होय. याच गुणांमुळें वामनरावजींवर त्यांचा इतका लोभ जडला होता कीं त्यांच्या निधनामुळें आपला एक आप्तच गमावला असें त्यांसही वाटलें. वामनरावजींचे निधनदु:खाबद्दल ते शाब्दिक सहानुभूति प्रकट करून थांबले नाहींत. तर लगेच त्यांनीं वामनरावजींस त्यांचे कडून मिळत असलेलें पेन्शन त्यांचे पश्चात् त्यांच्या वडील मुलाची डाक्टरीची परीक्षा पास होईपर्यंत कायम ठेवण्याबद्दल हुकूम दिला. त्याचप्रमाणें धारचे महाराज आनंदराव पवारसाहेब यांनींही आपले कडील नेमणूक बाळाभाऊची शेवटची डाक्टरीची परीक्षा पास होईपर्यंत उदारपणें चालविली. वामनरावजींनीं मुंबईस आल्यावर पुष्कळ होतकरू गरीब विद्यार्थ्यांसही मदत केली होती. गौतम म्हणून एक गुजराथी गरीबाचा मुलगा इंदुरास त्यांच्या घरीं होता त्याला त्यांनीं हाताशीं धरिला, व त्याची शाळेंतील विद्येची विशेष उमेद नव्हती म्हणून त्याला त्यांनीं दवाखान्यांतच ठेवून स्वत: थोडें बहुत इंग्रजी शिकविलें, व कांपौंडरचें काम त्याजकरवीं करवून त्याला

डाक्टरी विद्येची माहिती करून दिली, व इंदुरास जसे गणपतसिंग यांना पट्टशिष्य करून सोडलें होतें, तसेंच या गौतमालाही त्यांनीं डाक्टरी विद्येंत तरबेज करून सोडलें. पुढें गौतमराव केशव या नांवानें प्रसिद्धीस आलेल्या व स्वतंत्र धंदा करून लौकिक मिळविलेल्या वामनरावजींच्या या गौतम शिष्यानें आपली कृतज्ञताही उत्कृष्टपणें दाखविली. वामनरावजींचे वडील चिरंजीव सदाशिव उर्फ बाळाभाऊ यांची डाक्टरीची परीक्षा पास होऊन त्यांनीं वडिलांचा धंदा हातीं घेईपर्यंत गौतमरावांनीं दवाखान्याचें काम इमाने इतबारें चालविलें व दवाखान्याची पेढी कायम राखली. येणेंप्रमाणें वामनरावजींच्या निधनदुःखांत त्यांचे कुटुंबास तन, मन धन अशा तिन्ही प्रकारची सहानुभूति मिळाली. हें वामनरावजींच्या सत्वस्थ वृत्तीचेंच फळ होय. ते पूर्ण ईश्वरनिष्ठ होते आणि म्हणूनच त्यांच्या हयातीप्रमाणेंच त्यांच्या पश्चात्‌ही ईश्वरानें त्यांच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविला. वामनरावजींचे निधनसमयीं त्यांच्या खास कुटुंबांतील माणसें म्हणजे त्यांची वृद्ध पत्नी, दोन पुत्र, सदाशिव उर्फ बाळाभाऊ व काशीनाथ, कृष्णाताई नांवाची कन्या एक, दुसरी उपवर कन्या यमुनाबाई. कृष्णाताई हिचें लग्न वामनरावजींनीं इंदूर येथें असतांनाच सन १८६९ सालीं तेथील सभ्य व कुलीन कुंटे घराण्यांतील रा. सिद्धेश्वर केशव यांच्याशीं करून दिलें. बाळाभाऊ मेडिकल कॉलेजमध्यें शिकत होते ते सन १८८१ मध्यें एल्. एम्. अँड एस्. ची परीक्षा पास होऊन गौतमरावांनीं तेथपर्यंत चालविलेला वडिलांचा दवाखाना त्यांनीं आपले हातांत घेतला. काशीनाथपंत हे हायस्कुलांत होते ते पुढें प्रवेश परीक्षा पास होऊन विल्सन कॉलेजांत गेले. पण तो अभ्यास यांस न आवडल्यामुळें

त्यांनींही मेडिकल कॉलेजांतच प्रवेश केला. व पांच वर्षांत एल्. एम्. ॲंड एस्. ची परीक्षा पास होऊन बाळाभाऊस दवाखान्याचे कामांत मदत करूं लागले. यमुनाबाईसही स्थळ चांगलें मिळालें. मुंबई विद्यापीठांत नांवाजलेले विद्यार्थी व पुढें ग्वालेर संस्थानचे मुख्य न्यायाधीश रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य हेच आमच्या यमुनाबाईचे भ्रतार होत. यमुनाबाईच्या सासरचें नांव सगुणाबाई होतें. त्या अल्पवयांतच वारल्या. रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य यांनीं अबलोन्नतिलेखमाला या नांवानें पांच मनोरम व बोधकारक प्रकरणें लिहिलीं आहेत. त्यांतील कांहीं इंग्रजींत आहेत. इंग्रजी प्रकरणांतील पहिल्या प्रकरणांत पुढें उतरून घेतलेला मजकूर आढळतो.

PREFACTORY AND DEDICATORY NOTICE.

It is not vanity which impels me to relate the story of my sad bereavement; nay, I would rather not parade before the public the in-different details of a very common misfortune. But an idea has taken possession of my mind-an idea originating in this sore affliction, the idea of preaching to the Hindu community the necessity of marriage reform in the memory of the goodness of that noble woman from whom I have been so early separated by the dire hand of death.

We were married in the month of may 1879 and during the three years which elapsed, before we were united we grew to understand the peculiarities

of each other's temperaments and to love each other intensely. Each state of society has its pleasures and its pains. I may exclaim with the immortal poet भवभूति (in उत्तरामचरित्र) । जीवत्सु तातपादेषु नवेदारपरिग्रहे । मातृभिः पाल्यमानानां तेहिनो दिवसागताः । Hereafter my wife and myself lived almost as a separate family earning its own livelihood and doing all that we could to please each other within our scanty means. But it was not till I was fortunate enough to get a comfortable situation that the peculiar felicitous traits of her character began to develop themselves. She was distinguished by a peculiar humility and goodness of temper ( which distinguishes her family also ) and retained them even in those days of prosperity.

Days steeped in bliss thus seemed to pass on, concealing behind their pleasant appearance that dreadful storm which was gathering and was soon to burst upon the innocent little family. My wife began to suffer from slow fever and although medicines were given her, now and then, the treatment was entirely inadequate and fitful.

She subsequently contracted cough which could not be cured. I feel at this time as if impending calamity had blinded me, made me stupid and unthiking and the frightful disease grew upon her with rapid strides unobserved and unattended to. Whenever I saw her at home, she was, however, cheerful.

Even though she had fever on, she would attend to my wants morning and evening, and thus that very disposition of hers which was my blessing proved a lull and a misfortune. She was advanced in pregnancy and I took her to Bombay to her family. It is notorious though not then known to me that the climate of Bombay is peculiarly antagonistic to diseases ot the nature of consumption and before long I was called to Bombay again to see her on her death bed. How glad was she to see me by her side ! Infinite goodness and love and above all infinite resignation ! In a moment of utter grief I begged her pardon when alas it was of no use. But with that indescribable feeling which I believe only a Hindu wife bears towards her husband, she was shocked at the idea of my soliciting her to forgive me and she attributed the crisis at which circumstances had arrived to the indispensable will of God. With a serenity never to be forgotten by those who looked upon her in her dying moments she calmly and lovingly took leave of her relations, her mother and brothers, and left this world of mingled happiness and misery for that of eternal goodness and peace and blessing.

She was a typical Hindu wife, loving, obedient and respectful. Her image is even now before me, moving in the house engaged in the usual round of daily work. In this world divided between fate and will, there would seem to be a canon of life which

might be gathered from the conduct of that exemplary lady. Love your kindred and neighbour and try to do good to them as best lies in your power. Be not overjoyed and puffed up with prosperity, which He in his goodness has bestowed upon you. Be ready and willing to place yourself into His hands whatever He wishes, for reasons best known to Himself, to take back. Thus did she live and act and die. A noble lesson she has taught me. I have determined in the mame of Sagunabai (she well deserved this name) to preach to my Hindu countrymen to improve and reform their marriage customs, that they ought to try to devote their attention to the moral and physical wellbeing of their women, verily a heavenly blessing upon earth, for in their happines lies the happiness of individuals and also the advancement of the nation as a whole. Before concluding I may remark that in detailing this short history of my married life, I have not only unburdened my oppressed heart and paid a deserved tribute to the memory of the excellent virtues of my wife (which I will endeavour to perpetuate in such ways as my humble means and the pleasure of God will make it possible) but I have also described a typical instance in which may be seen at a glance the evils and the beauties which are to be found in the ordinary married life of a middle class Hindu, the former of which in any scheme of reform advocated by a reformer, he should try to lessen or remove and the latter to preserve or strengthen."

ह्यासंबंधानें रावबहादुर चिंतामणराव वैद्य ह्यांनीं खालीं दिल्या-प्रमाणें पत्र प्रकाशकास पाठविलें आहे.

My dear Govindrao, I send you this copy according to your desire. I tried to find in my old papers the Marathi of this; but I have lost the copy I had. This preface has not been reproduced in the second edition of the अबलोन्नतिलेखमाला. Fortunately I found the English pamphlet I had, ( the first three pamphlets were published in English also ).

When I read this notice which I had written so many years back ( 1890 ) tears rose also, alas, not at the blessed memory of my lost wife, but at the thought that the noble lesson which I had derived and preached and resolved to follow had been lost upon my subsequent life!!! With the multitude, noble thoughts rise and live for a short time only. And the greatest misfortune is that I re-read this at a time when that lesson is now almost of no use. Yet let me try and show that even this वैराग्य too is not momentary but lasting down to my last days. I may conclude by saying that I have this day handed over my wife's portrait and a Govt. Pro. note for 5000Rs. to Mr. G. B. Vaidya of Bombay to perpetuate her memory in connction with the Students Literary and Scientific Societys Girls Schools in Bombay."

Yours Truly.

C. V. VAIDYA.

वरील इंग्रजींतील मजकुराचा भावार्थः—

माझ्या दुःखाची कहाणी मी सांगत बसणें ह्यांत कांहीं प्रौढी आहे असें नाहीं. तसेंच जें दुःख कधीं ना कधीं सर्व लोकांवर गुदरतें तें दुःख लोकांपुढें मी मांडणें हें ठीक नाहीं. परंतु माझ्या मनांत ह्या कठिण दुःखामुळें एक कल्पना आली. आणि ती कल्पना म्हणजे ज्या सुशील स्त्रीचा वियोग भयंकर मृत्यूमुळें मला इतक्या लौकर सोसावा लागला तिच्या चांगुलपणाच्या स्मरणार्थ हिंदुजातीच्या लग्नपद्धतींत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असें हिंदुलोकांस उपदेशणें, ही होय. आमचें लग्न सन १८७९ च्या मे महिन्यांत झालें. आणि आम्ही एकत्र राहूं लागण्यापूर्वीं जीं तीन वर्षें गेलीं त्या तीन वर्षांत आम्हाला एकमेकांच्या स्वभावाचें वैशिष्ट्य कळूं लागलें व एकमेकांवर आम्ही प्रेम करावयासही लागलों. मानवी समाजाच्या प्रत्येक स्थितींत सुखें व कांहीं दुःखें असतात. उत्तररामचरित्रांतील भवभूति कवीच्या म्हणण्याप्रमाणें मीही म्हणतों कीं, “ जीवत्सु तातपादेषु नवेदारपरिग्रहे मातृभिः पाल्यमानानां ते हि नो दिवसा गताः” म्हणजे आईबाप जिवंत असतां लग्न होण्याचा योग घडून आला म्हणून आईबापाच्या छत्राखालीं सर्व दिवस सुखाचे गेले. सांप्रत हे सुखाचे माझे दिवस नष्ट झाले आहेत. ह्यापुढें मी आणि माझी बायको एखाद्या विभक्त कुटुंबासारखे निराळे राहूं लागलों व आपला चरितार्थही तसाच चालवूं लागलों. व आपल्या अल्प मिळकतीस अनुरूप अशा रीतीनें एकमेकांस संतुष्ट ठेवण्यास आम्ही झटूं लागलों. मला चांगली मिळकत मिळूं लागून माझी संसाराची स्थिति चांगली सुखाची होईपर्यंत माझ्या पत्नीच्या

अंगीं जे विशेष वाखाणण्यासारखे गुण होते ते विकसित झालेले दिसून आले नाहींत. ज्या गुणाबद्दल तिच्या कुळाची ख्याती आहे असे गुण म्हणजे सौजन्य व विशेष प्रकारची विनयशीलता तिच्या अंगीं असल्यामुळें तिची त्या गुणांबद्दल ख्याति झाली व ते गुण तिनें आमच्या भरभराटीच्या दिवसांतही कायम ठेविले. आमच्या संसाराचे दिवस अशा आनंदानें गेले कीं आमच्या लहानशा निरुपद्रवी कुटुंबावर पुढें संकट ओढवून भयंकर प्रसंग गुदरणार आहे, ह्याचें भानही त्यामुळें राहिलें नाहीं. तिला ताप यावयास लागला, व मधून मधून जरी तिला औषधें दिलीं जात तरी चाललेला उपचार अगदीं अपुरा असून अखंडित नव्हता. शेवटीं तिला खोकल्यानें पछाडलें व तो बराही लवकर होईना. मला असें वाटतें कीं त्या वेळेस पुढें ओढवणाऱ्या संकटामुळें माझ्याडोळ्यास अंधेरी आली; म्हणून त्याविषयीं मी अगदीं मूढ व विवेकशून्य बनलों. यामुळें हा भयंकर रोग तिच्यामध्यें इतक्या झपाट्यानें वाढूं लागला तरी आमचें तिकडे विशेष लक्षही गेलें नाहीं व आम्ही त्या संबंधीं उपचारही केले नाहींत. जेव्हां जेव्हां मी तिला घरीं पाहात असें तेव्हां तेव्हां तिची मुद्रा आनंदित दिसे. तिच्या आंगांत ताप असे तरी सकाळसंध्याकाळ ती माझी बरदास्त ठेवी. परंतु ह्याच तिच्या स्वभावामुळें प्रथम मला मोहांत पाडलें आणि अंती दुखांत लोटलें. तिचे प्रसूतीचे दिवस भरत आले आणि म्हणून मी तिला मुंबईला तिच्या माहेरच्या माणसांकडे घेऊन गेलों. मुंबईची हवा क्षयरोगाला अतिशय वाईट आहे हें प्रसिद्ध आहे, तरी त्या वेळीं मला हें माहीत नव्हतें. पुढें लव-

करच ती मरणोन्मुख झाली तेव्हां तिची शेवटली भेट घेण्याकरितां मला बोलाविलें. तेव्हां मुंबईची हवा क्षयरोगाला बाधक आहे ही गोष्ट मला कळून आली. तिच्या जवळ मी जेव्हां जाऊन बसलों तेव्हां तिला जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. तिच्या ठायीं अतिशय चांगुलपणा आणि प्रेम हे गुण तर होतेच पण ह्या सर्वां-पेक्षांही तिचा मोठा गुण म्हटला म्हणजे ईश्वराच्या ठायीं तिची अम-र्याद निष्ठा हा होता. मी अत्यंत दुःखी झालों व तिची क्षमा मागि-तली; परंतु त्या वेळेस माझ्या क्षमेच्या याचनेपासून कांहीं उपयोग होण्यासारखा राहिला नव्हता ! उलट हिंदु बायकांचें आपल्या नवऱ्यांविषयीं जें अवर्णनीय प्रेम असतें त्या प्रेमामुळेंच तिची मी क्षमा मागितली म्हणून तिच्या जीवास धक्का बसल्यासारखें झालें आणि ती म्हणाली, यांत तुमचा कांहीं दोष नाहीं. जो प्रसंग आला तो ईश्वराच्या अपरिहार्य इच्छेमुळें आला. तो सोसण्याची आपली तयारी असली पाहिजे. तिच्या मरणसमयीं ज्यांनीं म्हणून तिच्या मुद्रेकडे पाहिलें त्यांस तिच्या चित्तप्रसन्नतेचा कधींही विसर पडणार नाहीं, आणि अशा प्रसन्नचित्तानेंच तिनें मोठ्या शांततेनें व प्रेमळ-पणानें आपल्या नातलगांचा व आई आणि भाऊ ह्यांचा निरोप घेतला, व ह्या सुखदुःखानें भरलेल्या जगाचा त्याग करून ती चांगुल-पणा, शांति व सुख ह्या गोष्टी जेथें चिरकाल वास करितात तेथें प्रयाण करिती झाली !

प्रेमळ, आज्ञाधारक व मर्यादशील अशा हिंदुपत्नीचा एक नमूना ती होती. घरांत नित्याच्या कामांत गढून गेलेली अशी तिची मूर्ति आतां सुद्धां माझ्यासमोर येते. दैव आणि मानवेच्छा

ह्यांनीं विभागलेल्या ह्या जगामध्यें वागावें कसें या विषयींचे नियम त्या अनुकरणीय स्त्रीच्या आचरणापासून आपणास कळून येतील. तीं तत्वें हीं कीं आपल्या नातलगांवर व शेजाऱ्यांवर प्रीति करावी व आपली सर्व शक्ति खर्च करून त्यांचें कल्याण करण्याचा प्रयत्न करावा, ईश्वरानें आपल्या चांगुलपणानें आपला जो उत्कर्ष केला असेल त्यानें फुगून जाऊं नये व अतिहर्षितही होऊं नये, ईश्वराची इच्छा तुह्मांपासून कांहीं वस्तु परत घेण्याची असली तर त्या वस्तु खुषीनें व तत्परतेनें त्याच्या स्वाधीन कराव्या, कारण त्याचें कारण त्यालाच चांगलें माहित असतें, इत्यादि तत्वांच्या अनुरोधानें ती जगली, वागली व मेली. एक उत्तम उदाहरण तिनें मला घालून दिलें. सगुणाबाई हें तिचें नांव सर्वथैव अन्वर्थक होतें. म्हणून, तिच्या स्मरणार्थ माझ्या हिंदु देशबांधवांना आपल्या लग्नपद्धतींत सुधारणा करण्याविषयीं उपदेश करण्याचा मी निश्चय केला. तो असा कीं, त्यांनीं आपल्या बायकांच्या नैतिक आणि शारीरिक कल्याणाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करावा. बायका खरोखरच ह्या पृथ्वीवरील एक स्वर्गीय देणगी आहेत. कारण त्यांच्या सुखांत व्यक्तीचें सुख असतें आणि राष्ट्राची प्रगती त्यांच्या सुखामुळेंच होते.

शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, माझ्या विवाहित जीवनक्रमाची ही त्रोटक हकीगत सांगण्यानें, मी माझ्या दुःखानें दडपलेल्या अंतःकरणाचें ओझें कमी केलें व माझ्या स्त्रीच्या उत्तम गुणांचा योग्य गौरव केला एवढेंच नाहीं,तर मध्यम स्थितींतील हिंदूंच्या साधारण जीवनक्रमांत आढळून येणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी ज्यांत चटकन दिसून येतील असें एक अनुकरणीय स्त्रीचरित्र रेखाटून मी जगापुढें मांडलें

आहे. परंतु माझ्या शक्तीप्रमाणें व ईश्वरी कृपा होईल त्याप्रमाणें तिच्या आदर्शरूप सद्गुणाचें चिरस्थायी स्मारक करण्याचा मी प्रयत्न करीन. सुधारकानें कोणतीही सुधारणा करतांना वाईट गोष्टी कमीं करण्याचा किंवा नाहींशा करण्याचा प्रयत्न करावा व चांगल्या गोष्टींची जोपासना किंवा वाढ करण्याचा प्रयत्न करावा.

(रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य ह्यांचें पत्र.)—

"प्रिय गोविंदराव, तुमच्या इच्छेवरून मी तुह्माला ही नकल पाठविली आहे. माझ्या जुन्या कागदांमध्यें हिचें मराठी भाषांतर मी शोधून पाहिलें परंतु माझी मराठी नकल हरवली आहे. अबलोन्नति-लेखमालेच्या दुसऱ्या आवृत्तीमध्यें ही प्रस्तावना घातली नाहीं. सुदैवानें माझ्याजवळ असलेलें इंग्रजी चोपडें मला सांपडलें. ( पहिलीं तीन चोपडीं इंग्रजींतच प्रसिद्ध झालीं होतीं. )

मी जेव्हां हा लेख इतके वर्षांपूर्वी (१८९०) लिहिलेला वाचला तेव्हां माझ्या डोळ्यांत अश्रु आले, पण ते माझ्या गतपत्नीच्या पवित्र स्मरणामुळें आले असें नाहीं, तर जो धडा मी स्वतः शिकून लोकांना सांगितला व ज्याला अनुसरून वागण्याचा मी संकल्प केला, त्या धडयाकडे माझें पुढें लक्ष गेलें नाहीं, हा विचार आल्यामुळें हे अश्रू आले. उदात्त विचार मनांत उद्भवावे आणि थोडाच वेळ टिकावे असीच जगाची राहाटी आहे. आणि अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, ज्या धडयापासून आतां कांहीं उपयोग होणार नाहीं अशा वेळेस मी तो पुन्हां वाचून पाहिला. तथापि हें वैराग्यसुद्धां क्षणिक नसून माझ्या शेवटच्या दिवसापर्यंत टिकणारें आहे, असें मला लोकांस

दाखविण्याचा प्रयत्न करूं द्या. या प्रीत्यर्थ माझ्या पत्नीची तजवीर आणि ५००० रुपये किंमतीची सरकारी प्रामिसरी नोट मी मुंबईचे रा. रा. ग. भा. वैद्य ह्यांच्या स्वाधीन आज केली आहे. व रा. वैद्य यांनीं मुंबईतील स्टूडंस् सायंटिफिक आणि लिट-टरी सोसायटीच्या मुलींच्या शाळांमध्यें माझ्या बायकोचें स्मारक करून ठेवण्याकडे वरील देणगीचा उपयोग करावा अशी मीं इच्छा प्रद-र्शित केली आहे."

आपला–चिंतामण विनायक वैद्य.

* * *

वामनरावजींची दुसरी कन्या सौभाग्यवती कृष्णाबाई ह्या आपले कुलीन व सुशील भ्रतार रा.रा. सिद्धेश्वर केशव कुंटे व आपलीं अपत्यें यांजसह सुखानें श्रीक्षेत्र उज्जनी येथें रहात आहेत. कृष्णाबाईच्या सासरचें नांव उमाबाई असें आहे. त्यांचा स्वभाव शांत प्रेमळ व मनमिळाऊ असल्यामुळें त्यांच्या विषयीं त्यांच्या दिराजावांचा व इतर सर्व माण-सांचा मोठा आदर आहे. व आपल्या इष्टमित्रांस, आप्तांस व शेजारी पाजारी यांस त्या फारच आवडत्या झाल्या आहेत. खास तात्यांच्या संततीपैकीं फक्त त्याच सध्यां हयात आहेत. असो.

* * *

रावसाहेब विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं आपल्या बाळबोध मासिकाच्या फेब्रुवारी सन १८९७ च्या अंकांत डाक्टर वामनराव-जींचें संक्षिप्त चरित्र लिहिलें आहे तें येथें देतों; व हें चरित्र पुरें करितों.

## वामन गोपाळ काणे.

### श्लोक

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥

एक कल्पवृक्ष जवळ असला, म्हणजे सगळ्या वस्तु सुसाध्य असतात. त्याप्रमाणें एक साधुत्व व सज्जनत्व माणसानें दृढ धरिलें, म्हणजे त्यांत त्याला इतर सगळे सद्गुण आपोआप प्राप्त होतात; त्याकरितां वेगळे श्रम करावे लागत नाहींत. हें एक मोठें नीतितत्त्व आहे. हें ज्यांचे ठायीं वसतें, ते, "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला, तो नर भला भला" असे खरोखर होतात. असे जे कोणी वंद्य पुरुष अलीकडे आमच्यांत होऊन गेले, त्यांतल्या श्रेष्ठांत गणण्यासारखे डॉ. वामन गोपाळ काणे हे होते. ह्यांचें संक्षिप्त चरित्र आम्हीं येथें सादर करितों.

काण्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत रीळ म्हणून आहे, तें होय. त्यांतले बापू शास्त्री म्हणून एक गृहस्थ पुण्यास येऊन राहिले. त्यांचे चिरंजीव चिंतामण शास्त्री काणे हे मोठे नामांकित विद्वान् निपजले. त्यांस दरबारास बोलावून नेण्यास पेशव्यांकडून पालखी येत असे. यांचे चिरंजीव गोपाळ शास्त्री काणे हेही मोठे विद्वान् शास्त्री होते. त्यांचे चिरंजीव वामनराव होत. ह्यांचें जन्म इ. स. १८१९ ह्या वर्षी पुणें येथें झालें. ह्यांस लहानपणीं वामनतात्या म्हणत. ह्यांच्या वयास आठ नऊ वर्षें पुरीं होण्याच्या आधींच ह्यांचे वडील निवर्तले. तेव्हां, अर्थातच ह्यांच्या लहानपणांत ह्यांच्या विद्याभ्यासाची आबळ झाली. तरी वरच्या माणसांच्या शिस्तीनें ह्यांचा थोडाबहुत मराठी अभ्यास मराठी शाळेंत, आणि थोडासा इंग्रजी अभ्यास इंग्रजी शाळेंत,

दृजदेल साहेबांच्या हाताखालीं झाल्यावर ह्यांस बरेंच कळूं लागलें. आणि ह्यांचें लग्न झाल्यावर ह्यांस, घरच्या माणसांच्या टोमण्यावरून, स्वनिर्वाहाची बरीच काळजी लागली. तेव्हां, कांहीं तरी उद्योग करावा म्हणून आपा बळवंताच्या वाड्यापुढें दुकान मांडून त्यांनीं खुर्दा विकण्याचा सराफीचा धंदा आरंभिला. शिवाय सराफीच्या धंद्यांत गाहाणाचा व्यापार हें एक मोठें अंग असतें त्यांत वामनरावांस एक अद्दल घडली, आणि तीवरून त्यांच्या आंगचा एक मोठा गुण दृश्यमान झाला. त्याचा प्रकार असा:—

कोणा एका माणसानें, कांहीं चोरीचें रुपें ह्यांजकडे गाहाण ठेविलें, तें उमगलें. आणि त्याचा खटला सरकारांत चालला. त्यांत असें होतें कीं, मला अठरावें वर्ष लागलें नाहीं, एवढें जर ते म्हणते, तर त्यांजवर कांहीं एक गुन्हा लागू होत नव्हता. ह्मणून तसें म्हणण्याविषयीं त्यांस सगळ्या माणसांनीं मोठ्या आग्रहानें सांगितलें. परंतु न्यायाधीशापुढें उभे राहिल्यावर, मी अठरा वर्षांचा आहें असें त्यांना खरें होतें तेंच स्पष्ट सांगितलें; त्यामुळें त्यांस दोनशें रुपये दंड भरावा लागला. आणि, त्यासाठीं त्यांच्या मातुश्रीपाशीं जें काय होतें नव्हतें, तें सगळें करावें लागलें. सत्यव्रताच्या प्रदर्शनाचें त्यांचें हे पहिलें मोठें उदाहरण होय. हें व्रत त्यांनीं जन्मभर उत्तम प्रकारें चालविलें. पंतांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

जो सत्याचा वक्ता साधुचि तो यांत संशयचि नाहीं;
बहु पूज्य सत्यवादी त्रिजगीं उपमान त्या नसे कांहीं.

—ह्याची आठवण आम्हांस फार होते. असो.

पुढें, वामनराव, शिकण्याकरितां आणि कांहीं धंदा करण्याच्या हेतूनें घराहून पळून मुंबईस आले. ते, प्रथम, काळ्या पायदळ पलटणीचे डॉक्टर कोणी नारायणराव म्हणून होते, त्यांच्या आश्रयास राहिले. त्यांनीं त्यांला आपल्या दवाखान्यांत कंपौंडरच्या कामावर घेतलें तेव्हां त्यांस वैद्यविद्येंत थोडीशी गति झाली. आणि त्या विद्येची त्यांस आवड लागली. म्हणून ती वाढविण्याकरितां ते, डॉक्टर स्टोव्हेल नामक प्रोफेसर साहेबांच्या परवानगीनें, ग्र्यांट मेडिकल कॉलेजांत व्याख्यानें ऐकायास जाऊन बसूं लागले. ह्या साहेबांनीं त्यांस, होतकरू पाहून मोठ्या आस्थेनें, विशेषेंकरून नेत्रवैद्यक पढविलें. त्यांस तेथें शारीरशास्त्र शिकण्यास प्रेतच्छेद करावे लागत, त्यावरून त्यांस, खाणावळींतली मंडळी फार नांवें ठेवी, आणि पंक्तीस घेत नसे. पहांटेस शिकवण्या शिकवाव्या, दुपारपासून सायंकाळपर्यंत शिकावें, आणि सायंकाळीं पुनः शिकवण्या शिकवाव्या, अशा प्रकारें, प्रातःकालापासून रात्रीं आठनऊ वाजतपर्यंत यांस उद्योग करावा लागे. तरी त्यास ते कधीं कंटाळले नाहींत.

नंतर इ. स. १८४० ह्या वर्षी अफगाण युद्ध मांडलें, तेव्हां तिकडे वैद्यांची गरज लागली. त्यांत चाकरी पत्करून वामनराव तिकडे गेले. ते तिकडे दोन वर्षे होते. तिकडून परत आल्यावर, मुंबईस रामवाडीवर त्यांनीं एक लहानसा दवाखाना घातला, आणि लोकांस औषधें देण्याचें काम चालविलें.

तें दोनएक वर्षे चालविल्यावर पिट साहेबांच्या शिफारशीवरून त्यांस इंदूर नजीक उज्जनी येथें एक लहानशी डाक्टरीची जागा मिळाली. नंतर ते, इंदुरास, डॉ. अनंत चंद्रोबा ह्यांच्या जागीं

इ. स. १८५० ह्या वर्षी आले. ते तेथें इ. स. १८५० पासून इ. स. १८७१ पर्यंत होते. ह्या एकवीस वर्षांत ह्यांनीं कसें काम केलें, आणि तें कसें होतें, ह्याविषयीं ह्यांचे वरिष्ट डाक्टर बोमंट ह्यांनीं सरकारांत असें लिहिलें कीं, हे अत्यंत ममताळू आणि अत्यंत दयाळू आहेत. मनुष्य श्रीमंत असो कीं गरीब असो, ते सर्वांस साह्य करण्यास सारखे सिद्ध असतात. आणखी त्याबद्दल कोणापाशीं कांहीं मागत नाहींत, एवढेंच केवळ नव्हे, तर कोणी कांहीं दिलें तरी घेत नाहींत. आणखी, वामनरावांच्या वैद्यकीच्या कामाच्या संबंधानें असें म्हटलें पाहिजे कीं, पाश्चिमात्य औषधांवर मध्य हिंदुस्थानांतल्या लोकांचा विश्वास बसण्यास आणि त्याविषयींच्या त्यांच्या मनांतल्या वेड्या वांकड्या कल्पना नाहींशा होण्यास वामनराव ह्यांची सुशीलता फार उपयोगी पडली आहे. हें कृत्य शेकडों रुपये खर्चिल्यानें झालें नसतें.

इंदुरास बंडाचा कहर गुदरला, तेव्हां वामनराव तेथेंच होते. त्यांचेंही घर, इतर इमारतींबरोबर, बंडवाल्यांनीं जाळून पोळून टाकलें. ह्यासंबंधाची एक चमत्कारिक गोष्ट आहे. ती ही कीं, अशा प्रकारें बंडांत ज्यांचें जें नुकसान झालें होतें, त्यांचें तें वाजवी वाजवी पाहून भरून द्यावें, असा सरकारी ठराव होऊन एक मोठा कामदार त्या कामावर बंड शांत झाल्यावर नेमला. तो, त्याविषयीं खात्री करून घेण्याकरितां लोकांपासून शपथा वाहून घेत असे. त्यास वामनरावांनीं सांगितलें कीं, मी बोलतों हें सत्य आहे, सत्यास शपथ लागत नाहीं, म्हणून मी ती वाहाणार नाहीं, आपणास कांहीं द्यावयाचें असल्यास द्या, नाहींतर देऊं नका. त्याचें पुष्टीकरण वामनरावांच्या वरिष्ठ गोऱ्या अधिकाऱ्यांनीं चांगलें केलें. तेव्हां त्या कामदारानें त्यांस,

शपथ न घेतां द्यावयाची ती रक्कम दिली. हा सत्याभिमान होय. आणखी, सगळ्या चांगुलपणाचें बीज हाच आहे. हा माणसाचे ठायीं पाहिजे आहे. गरीबांस साह्य करणें हें त्यांचें मोठें आवडतें व्रत होतें. त्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. शिवाय त्यांनीं आपलें वैद्यकीचें काम फार उत्तम रीतीनें केलें. त्यावरून त्यांचा मोठा लौकिक होऊन, लार्ड लॉरेन्स गव्हरनर जनरल ह्यांनीं, दरबारांत, त्यांस मोठ्या मानानें, इ. स. १८६६ ह्या वर्षीं एक उत्तम शस्त्रांची पेटी बक्षीस दिली.

पुढें वामनरावांचीं मुलें प्रौढ झालीं. त्यांच्या विद्याभ्यासाकडे लक्ष देणें हें आपलें अवश्य कर्तव्य जाणून, त्याकरितां इंदूरची चाकरी सोडून, ते, इ, स. १८७१ ह्या वर्षीं मुंबईस आले, आणि दवाखाना घालून वैद्यकीचा धंदा करूं लागले. तेव्हांच्या त्यांच्या कामाविषयीं इंदुप्रकाशांत असें लिहिलें आहे कीं, " गरीब व निराश्रित विद्यार्थ्यांस ते फुकट औषधें देत असत. आणि पाहिजे त्या वेळेस कोणीही बोलाविलें तरी ते त्याच्या येथें **धांवत** जात असत." अशा प्रकारें, पैशाची परवा न करितां रोग्याचे येथें **धांवत** जाणारे वैद्यबोवा सर्वांस मोठे साधु वाटावे, हें अगदीं साहाजिकच आहे.

हे गृहस्थ इंदूरची चाकरी सोडून निघाले, तेव्हां ह्यांस होळकर सरकारांनीं तहाहयात दरमहा तीस रुपये पेनशन करून दिलें. त्याप्रमाणेंच धारच्या महाराजांस ह्यांनीं बरें केलें होतें, त्यावरून त्यांनीं ह्यांस दरमहा पंचवीस रुपये तहाहयात नेमणूक करून दिली. आणखी त्यांच्या वैद्यकीवर त्यांस थोडें बहुत मिळे. मिळून त्यांची प्राप्ति प्रथम शें दोनशें होती, ती पुढें तीन चारशें पर्यंत वाढली होती. ती इतकी नको असें वामनरावांस वाटून, औषधांच्या किंमती कमी करून, ती

त्यांनीं पुनः शें दीडशेंवर आणली. ह्यापरता स्वार्थत्याग तो कोणता असावयाचा ! हे गृहस्थ ह्मटले ह्मणजे स्वराज्य गेल्याच्या आणि इंग्रजांचें राज्य स्थापित झाल्याच्या संधींतल्या पिढींतले होत. तेव्हां ह्यांचें आयुष्य अर्धें इकडचें आणि अर्धें पाश्चिमात्य असें झालेलें होतें. तरी पाश्चिमात्य विद्येच्या प्रकाशानें त्यांचें मन उज्वलित झालें होतें. स्त्रीशिक्षणाकडे त्यांचा ओढा फार होता. इंदुरास मुलींची शाळा आणि पुस्तकालय हीं त्यांच्या उद्योगानें स्थापित झालीं. ब्राह्मण विधवा-विवाह त्यांना फार संमत होता. हुंडा घ्यावयाचा नाहीं, आणि द्यावयाचा नाहीं, आणि कार्यांत नृत्यगायन करावयाचें नाहीं, असा त्यांचा नेम होता. ते खरे हिंदु होते. कर्मठ होते. तरी दुसऱ्यास आणि त्यांतही गरीबांस साह्य करणें हें कर्मठपणाचें मोठें पवित्र अंग आहे असें ते समजत असत, आणि त्याप्रमाणें वागत असत. सत्या-चरण हें त्यांचें ब्रीद होतें. ह्या विषयीं त्यांच्या वरिष्ठांनीं असें ह्मटलें आहे कीं, इतके सत्यशील गृहस्थ हिंदुस्थानांत मला दुसरे एक देखील आढळले नाहींत. अशा प्रकारें ह्यांचें सगळें आयुष्य सद्वर्त-नांत, सत्याचरणांत आणि परोपकारांत गेलें. आणि ते, इ. स. १८७७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १८ व्या तारखेस, दुष्काळ ज्वराच्या योगानें आजारी होऊन मरण पावले. त्यांच्या आत्म्यास स्वर्गलोकीं निरंतर शांति मिळाली असलीच पाहिजे. ह्यांचें अनुकरण आमच्यांतल्या होतकरू मंडळींनीं अवश्य अवश्य करावें.

सज्जनांचें सज्जनपण त्यांच्याबरोबर जात नाहीं. तें, त्यांच्या पश्चात् कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें जनांच्या उपयोगीं पडत असतें. कै. वामनराव काणे ह्यांचे पट्टशिष्य गणपतसिंग म्हणून ह्यांच्या

शिक्षेतच लहानाचे थोर झालेले आणि त्यांच्या बरोबरीचे झालेले होते, त्यांचे ठायीं त्यांचा सज्जनपणा दृश्यमान होता. ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक आहे. त्याप्रमाणेंच त्यांच्या वृत्तीची प्रत्यक्ष प्रतिमा, त्यांचे चिरंजीव, आमचे सन्मान्य मित्र बाळाभाऊ काणे ह्यांचे ठायीं उत्तम प्रकारें उतरली आहे, आणि ती स्वदेशबंधूंच्या कामीं पडत आहे. ती अशीच निरंतर वृद्धि पावो, आणि ती वाढत्या कलेनें आणि वंशपरंपरेनें चालो, असें परमेश्वरापाशीं मागून, हें अल्प चरित्र येथें समाप्त करितों.

ह्या चरित्रनायकाचे पुत्र डाक्टर सदाशिवराव व तसेंच त्यांचे धाकटे बंधु काशीनाथपंत ह्या उभयतांनीं आपल्या वडिलांचा दवाखाना उत्तम चालवून वडीलांचा लौकिक कायम राखिला. मातोश्रीची उत्तम प्रकारें सेवा केली. डॉक्टर सदाशिवरावांनीं इंदूरच्या दवाखान्यांत वडिलांच्या नांवाचा वार्ड बांधण्यास रुपये पांच हजार रक्कम दिली. परोपकाराकरितां देह झिजविणें हें जें डॉ. वामनरावजींचें ब्रीद तें दोघा बंधूंनीं अव्याहत चालविलें. व अशा प्रकारें पितृऋणांतून मुक्त होऊन पुत्र संज्ञेची सार्थकता करून दाखविली. डॉक्टर वामनरावजींच्या नांवानें प्रस्तुतच्या पुस्तकप्रकाशकानेंही मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें एक हजार रुपयांची अल्पशी देणगी दिली आहे. या देणगीच्या व्याजांतून ग्रँट मेडिकल कॉलेजांतील पहिल्या वर्षाच्या पहिल्या योग्यशा विद्यार्थ्याला पुस्तकरूपानें बक्षिस दिलें जातें. या बक्षिसाला डॉक्टर वामन गोपाळ काणे बुक प्राईझ असें नांव देण्यांत आलें आहे. असो.

---



डॉ. सदाशीव वामन काणे.

# कैलासवासी डॉक्टर सदाशिव वामन काणे यांचें चरित्र आणि चारित्र्य.

प्रि. पाध्ये यांच्या इंग्रजी लेखाचा रा. रा. का. कृ. लेले कृत अनुवाद.

दीनानां कल्पवृक्षः सुगुणफलनतः सज्जनानां कुटुम्बी
आदर्शः शिक्षितानां सुचरितनिकषः शीलवेलासमुद्रः ।
सत्कर्ता नावमन्ता पुरुषगुणनिधिर्दक्षिणोदारसत्वो
ह्येकः श्लाघ्यः स जीवत्यधिक गुणतया चोच्छ्वसन्तीव चान्ये ॥*

( मुंबई येथील आर्यसमाजाचे दिवाणखान्यांत ई. सन १९०० सालांत जून महिन्याचे ९ वे तारखेस शनिवारीं आर्यन सोशिअल यूनिअन या सभेच्या विद्यमानें हिंदू समाजाची सभा भरली होती तींत प्रि. दामोदर गणेश पाध्ये यांनीं कै० डॉ० स० वा० काणे यांचें चरित्र इंग्रजींत लिहिलेलें वाचलें त्याचा रा. रा. लेले यांनीं मराठींत अनुवाद केला तो खालीं दिला आहे :--

कुलस्त्रिया आणि सभ्य गृहस्थ हो,

ज्या सद्गृहस्थाचे सद्गुण स्मरून त्याजविषयीं आपले अंतःकरणांत असलेलें निर्मळ प्रेम व दृढ भक्ति व्यक्त करण्याकरितां आजरात्रीं आपण एकत्र जमलों आहों, ते कैलासवासी डॉ० सदाशिव

---

* वरील श्लोकांचा अनुवाद मृच्छकटिक नाटकांत खालील पदरूपानें केला आहे:—

पद " अष्टमूर्ति परमेश " या चालीवर

दीनजनांचा कल्पतरुचि जो, साह्य सज्जनांचा ॥
विद्याविनयें नम्र सदा किति, कोश सद्गुणांचा, ॥
सदाचरण–जन निकषाचि आदर्श शिक्षितांचा, ॥
मर्यादेचा सागर, आदर राखी सकलांचा, ॥
सुहृज्जना संतोषदायि, बहु निधि औदार्याचा, ॥
ऐसा सद्गुणमणिमंडित जो, धन्य जन्म त्याचा ॥ १ ॥

वामन काणे हे अद्वितीय पुरुष होते त्यांजविषयीं आपले मनांत जी पूज्यबुद्धि वाटत आहे, ती खरोखर थोड्यांचेच भागास येत असेल. ईश्वरकृपेनें त्यांच्या अंगीं जे मानवी सद्गुण वसत होते ते इतके विविध व अनेकरूपी होते कीं ते कधीं कधीं समजण्यास व ओळखण्यासही कठीण पडे. मग त्यातील सुरम्य रंग व छटा यांची छाननी करणें तर अत्यंत दुरापास्त, हें सांगावयास नको. म्हणून आर्यन सोशिअल यूनिअनचे सेक्रेटरी माझे मित्र राजश्री सुंदरलाल यांनीं सर्वभक्षी निर्दय कृतांतानें आपल्यांतून अकालीं हरण करून नेलेल्या ह्या सन्मान्य मित्राचें चरित्र आणि चारित्र्य वर्णन करण्याचें कष्टमय काम अंगीकारावें म्हणून मला विनंति केली. तेव्हां मित्र हो, रुकार देण्यास मला फारच शंका वाटली. कारण, हें कठीण काम आपल्या हातून कसें तडीस जाईल याबद्दल माझे मनांत भीति आणि शंका उत्पन्न झाली. डॉक्टर काणे यांसारख्या पुरुषांच्या गुणाचें पूर्णपणें विवेचन करणें हें काम सोपें नव्हे. आणि त्यांच्या शेंकडो मित्रांस, नातेवाईकांस आणि दूरस्थ चाहत्यांस त्यांच्या चारित्र्याच्या मुख्य मुख्य स्वरूपांची चांगली ओळख असून त्यांची योग्यता सहृदयपणें समजत होती ही गोष्ट मला प्रत्यक्ष माहीत असल्यामुळें तर माझें काम मला अधिकच कठीण वाटलें. पण या अडचणीमुळें रा. सुंदरलाल यांच्या विनंतीस मान देऊं नये ही कल्पना मात्र माझे हृदयास कधींही शिवली नाहीं. कारण, डॉ॰ काणे यांशीं सलगी असण्याचें आणि त्यांशीं मोकळ्या मनानें बोलण्या चालण्याचें अभिमानदायक सुभाग्य ज्यांचे वांट्यास आलें त्यांपैकीं मी एक होतों. व बहुत वेळां त्यांच्या आनंदांत व

कष्टचिंतांत भागीदार होण्याचा प्रसंग मला वारंवार आला; आणि त्यांच्या विचाराशीं आणि मनोभावाशीं अत्यंत एकरूप होण्याचे प्रत्येक प्रसंगीं आपल्या अंतःकरणास व बुद्धीस उत्तरोत्तर उन्नतीच प्राप्त झाली असाच मला अनुभव आला, हें मी कृतज्ञतेनें कबूल करितों. असें असतां अशा असंख्य उपकार करणाऱ्या गृहस्थांच्या सद्गुणांची पूजा करण्याचे प्रसंगीं मीं अनमान केलें तर माझ्या कृतघ्नपणास पारावरच राहिला नसता. दुसरें, अशा सज्जनांच्या गुणांचें आविष्करण व विवरण करण्यापासूनही पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या असतात, हेंही विसरतां कामा नये. कारण, उत्तम पाणीदार रत्नाप्रमाणें त्यांच्या सद्गुणांची देदीप्यमान प्रभा दुरूनच आपल्या नेत्रांस चकित करून टाकिते, हें खरें. तथापि जों जों आपण त्यांचें बारकाईनें जवळून निरीक्षण करावें व जों जों त्यांच्या प्रभेच्या मूळ झऱ्यांचा सूक्ष्म विचार करावा तों तों त्यांची योग्यता व सुंदरता ह्या आपले ध्यानांत अधिक अधिक भरत जातात.

अशी चाल आहे कीं, प्रत्येक चरित्राचे आरंभीं चरित्रनायकाच्या घराण्याचें व त्यांच्या पूर्वजांच्या हातून कांहीं पराक्रम घडले असल्यास त्यांचें वर्णन करावें. डॉक्टर सदाशिव वामन काणे यांचें चरित्राचा आरंभ करितांना त्यांच्या वडिलांचा गुणानुवाद थोडे विस्तारानें मीही पण करणार आहें. पण तो केवळ या संप्रदायाचें अनुकरण करण्याकरितांच नव्हे. कारण कीं, सदाशिवराव यांचे तीर्थरूप इंदूरकर किंबहुना मुंबईकर डॉ. वामनराव गोपाळ काणे यांचें चरित्र खरोखर असामान्य रीतीनें उदात्त होतें. आणि त्यांचें स्मरण व त्यांजविषयींचा

पूज्यभाव पुष्कळांचे अंतःकरणांत अद्याप वसत आहे. "बाप जैसा बेटा, कुंभार जैसा लोटा" या म्हणींतील खरेपणाचें इतकें अनुरूप उदाहरण हे गृहस्थ आणि त्यांचे चिरंजीव, यांच्या शिवाय दुसऱ्या ठिकाणीं सांपडावयाचें नाहीं. आनुवंशिक संस्कारामुळें या पित्याचे सर्व सद्गुण त्यांच्या उभयतां चिरंजीवांत पूर्णपणें उतरले होते. एक दोन गोष्टींतच नव्हे तर अनेक गोष्टींत असें निदर्शनांत येत असे कीं डॉ. सदाशिव आणि डॉ. काशीनाथ हे आपल्या पित्याचे खरे सत्पुत्र व प्रतिनिधि होते इतकेंच नाहीं, तर, त्यांचे वडिलामध्यें जे अनेक अद्वितीय सद्गुण होते व ज्यामुळें संसारांतील विविध प्रसंगांत व संबंधांत आणि विविध कार्यक्षेत्रांत व उद्योगांत त्यांचा इतका लौकिक झाला व त्यांनीं इतकी लोकप्रियता संपादिली, ते सर्व सद्गुण त्यांच्या चिरंजीवांचे ठायीं अधिक विकास, विस्तार व वृद्धि पावले असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

डॉ. वामनराव गोपाळ ह्यांचा जन्म ज्या घराण्यांत झाला तें हलकेंसलकें नव्हतें. पेशव्यांचे भरभराटीचे कालांत तें घराणें कोकणांतून पुण्यास आलें होतें. वामनरावजींचे वडील, गोपाळशास्त्री हे अल्प वयांत वारल्यामुळें त्या घराण्याचें सर्व ओझें लहानपणींच या अर्भकाचे शिरावर येऊन कोसळलें. त्यांचे आजे चिंतामणशास्त्री हे पुण्यांतील शास्त्रीमंडळापैकीं एक प्रसिद्ध शास्त्री असून त्यांस बहुमानार्थ पालखींत बसून जाण्याचा मान श्रीमंतांकडून मिळाला होता. चिंतामणशास्त्री यांचे चिरंजीव, गोपाळशास्त्री, यांनीं वडिलांनीं मिळविलेली प्रतिष्ठा उत्तम प्रकारें संभाळिली. ते वारले तेव्हां महाराष्ट्र-राज्यसंघाचा अंत होऊन त्याचे अधिपति दुसरे बाजीरावसाहेब ह्यांस घाईघाईंत

हातीं लागेल ती चीजवस्त व जडजवाहीर घेऊन पळ काढावा लागला होता. या विपत्तीचे कालांत अल्पवयी वामनरावांचे संसारयात्रेस आरंभ झाला होता. या राज्यक्रांतीमुळें समाजांत जी समूळ उलथा-पालथ झाली तिच्या दुष्परिणामाच्या कटुरसाचा स्वाद या पितृहीन बालकास चाखण्याची पाळी आली. या प्रसिद्ध व विद्वान् शास्त्री घराण्यां-तील मुलास सराफीचा धंदा करावा लागला. त्यांत कर्मधर्मसंयोगानें त्यानें एक वस्तु खरीद केली, ती चोरीची निघाल्यामुळें त्यास पक-डून नेऊन प्रत्यक्ष फौजदारापुढें उभें करण्यांत आलें. त्यानें माल खरेदी केला तो प्रामाणिकपणानें केला, चोरीचा समजून केला नाहीं, हें कोर्टाचे लक्षांत येईना. तेव्हां त्यास सुटण्याचा एकच उपाय होता, तो असा कीं, आपण कायद्यांत आलों नाहीं असें सांगावें; आणि वस्तुतः त्याचें वय एखाद्याच वर्षानें अठराहून अधिक असून, ही सबब कोर्टाकडून मान्य केली जाणें सर्व प्रकारें शक्य होतें. आणि वडिलांनीं, मित्रांनीं आणि नातेवाईकांनीं त्याची तसें सांगण्याविषयीं समजूत घाल-ण्यांत जंग पछाडला, परंतु त्या मुलानें कोणाचेंही ऐकलें नाहीं, आणि त्यांच्या अनुचित उपदेशास झुगारून देऊन, खरेंच भाषण करून, आनंदानें कोर्टांत केलेला दंड भरला. पण खोटें बोलण्याच्या हृदयांत सलत राहाणाऱ्या अपकृत्यानें आपले शुद्ध मनास त्यानें विटाळलें नाहीं. नंतर लौकरच वामन मुंबईस येऊन डाक्तर बनला, आणि पुढें इंदूर येथील दवाखान्यांत त्यास अधिकाराची जागा मिळाली. तेथें ३० वर्षें त्यानें लोकांची आणि संस्थानाची सेवा करून, जन-तेचें हित साधून आपणास सन्मान मिळविला. होळकरशाहींत इतके दिवस काम करून असें दुहेरी यश संपादिलें, हीच गोष्ट

कांहीं कमी महत्वाची नव्हे. आणि तेथील सरकारी कागदपत्रांत ही गोष्ट नमूद झाली आहे कीं, इंदूरसारख्या आडवळणी संस्थानां-तील लोकांचे अंत:करणांत वैद्य व हकीम यांजवरील दृढ विश्वास बद्धमूल झाला असतां तेथें पाश्चात्य वैद्यशास्त्र आणि शस्त्रक्रिया यांस लोकप्रिय करण्याची कामगिरी कोणी बजाविली असल्यास तें यश डॉ० वामनराव यांसच दिलें पाहिजे. त्यांनींच आपल्या चतुराईनें लोकांस जुन्या पद्धतीच्या अंधश्रद्धेतून हळू हळू सोडविलें. डॉ० वामनराव यांचें इंदूर येथील वर्तन निरलस असून साधुतुल्य होतें. आपलें काम अत्यंत मेहनतीनें व निस्पृहतेनें करावें आणि सर्वांशीं समान प्रेमानें वागून अमृततुल्य मधुर भाषण करावें. हेंच त्यांचें ब्रीद होतें. तेथें असतां ते औषधोपचाराकरितां कोणाही जवळून "फी" घेत नसल्यामुळें श्रीमान् होण्याचें एका बाजूस राहिलें--उलट त्यानीं धर्मार्थ व परोकारार्थ इतका सढळ हातानें खर्च चाल-विला कीं शेवटीं त्यांजवर १०००० रुपयांचा कर्जाचा बोजा झाला!! त्या वेळीं इंदूरचे रेसिडेंट कर्नल डेली हे होते. ते त्यांची योग्यता आणि गुण पूर्णपणें जाणत होते. त्यांच्या कानावर ही वामनरावजींची स्थिति आली. तेव्हां त्यांनीं त्यांस कर्जमुक्त करण्याची तजवीज योजिली. त्यांत त्यांनीं म्हणजे कांहीं जास्त केलें असें नाहीं. वामनरावजी यांचे हातून जी निरनिराळ्या प्रकारची जनतेची सेवा घडली होती तिज-बद्दल मोबदला देवविला इतकेंच. सत्तावन सालच्या बंडाच्या दुर्धर प्रसंगीं वामनरावजीनीं आपले कुटुंबांतील माणसांस दूर पाठवून देऊन आपण स्वत. आपल्या युरोपियन मित्रांचे जीव वांचविण्यांत इतक्या अनन्यभावानें परिश्रम केले कीं त्यांनीं आपले घराकडे मुळींच लक्ष दिलें

नाहीं; व बंडखोर लोकांनीं तें जाळून टाकिलें!! डॉ०वामनराव यांस दोन पुत्र होते. ज्येष्ठ, आपले चरित्रनायक डाक्तर सदाशिव, यांचा जन्म सन १८५३ सालीं जुलई महिन्याचे २८ तारखेस झाला. आणि कनिष्ठ, डॉ० काशीनाथ, हे त्यानंतर १० वर्षांनीं जन्मले. या मुलांचा विद्याभ्यास व्हावयाचा होता, याकरितां डॉ० वामन गोपाळ यांनीं इंदुर सोडून मुंबईस येऊन वास्तव्य केलें. या वेळीं कृतज्ञ इंदूर दरबाराकडून त्यांस ताहयात पेन्शन देण्यांत आलें. आणि धारचे महाराज श्रीमंत आनंदराव पवार यांसही त्यांचे डाक्तरी कौशल्यापासून फायदा झाला होता. सबब त्यांनींही त्याचप्रमाणें त्यांस नेमणूक करून दिली. पण ह्या वेतनाच्या रकमा लहान होत्या. त्यांत चांगली भर अवश्य होती. मुंबईसारख्या ठिकाणीं एखाद्याचें तेज पडणें कठीण; परंतु डा० वामन गोपाळ आपले कामांत निष्णात असून त्यांचे अंगीं विलक्षण बुद्धिमत्ता आणि दयाळूपणा हे गुण वसत होते यामुळें गुणग्राहक मुंबई शहरांतहीं त्यांची छाप पडून ते आपल्या धंद्यांत प्रकाशूं लागले. लवकरच त्यांचा जम चांगला जमून त्यांजवर लोकांचा विश्वास आणि प्रीति बसली. पण त्यांनीं बुद्धिपुर:सर गरीब लोक हातीं धरिले; व त्यांतच आपले धंद्याचें कार्यक्षेत्र ठरविलें. त्यांची लाडकीं व आवडतीं कुळें ज्यांस त्यांची "फी" देखील देण्याचें सामर्थ्य नसे तींच असत. किंबहुना कधीं कधीं त्यांस गाडीचें भाडें डा० वामनरावजींसच द्यावें लागे. अद्यापि, आपले कानावर अशा बातम्या येतात कीं अमक्या अमक्या शाळेच्या पवित्र हद्दींत महार व धेडांचे मुलांस प्रवेश करण्याची सक्त मनाई करण्यांत येते. अशा स्थितींत ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय आहे

कीं वामन गोपाळ काणे यांसारिखे एक डाक्तर मुंबईत होऊन गेले, कीं ज्यांचेविषयीं येथील भंग्यांचा देखील दृढ विश्वास होता; व ज्यांनी त्यांस साह्य करण्याकरितां त्यांचे घरीं जाण्यास कधींही इनकार केला नाहीं; मग त्यांजकडून प्राप्ति होवो अथवा न होवो; आणि बहुधा ती होतच नसे. ते विशेषतः व मुख्यत्वेंकरून गरीबांचे डॉक्टर होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि गरीबांस उपयोग व्हावा याच हेतूनें दर माणसीं औषधाची किंमत रु. -।- पेक्षां अधिक घ्यावयाचीच नाहीं, असें त्यांनीं ठरवून टाकिलें होतें. कदाचित् आपले कंपौंडर अधिक पैसे घेतील म्हणून पैसे घ्यावयाचे ते स्वतःच घ्यावयाचे, असा त्यांचा नेहमींचा अबाधित प्रघात असे. डॉ. वामन गोपाळ काणे हे साधे असून भपका हा कसा तो त्यांस माहीत नव्हता. त्यांची चालरीत अत्यंत सभ्यपणाची असून त्यांचें बोलणें फार प्रेमळ व गोड असे. ते दयेचा जिवंत झरा असून त्यांची भूतदया अत्यंत उच्च दर्जाची होती. अशाच पित्यापासून डॉ. सदाशिवासारखें पुत्ररत्न निपजावें, हें योग्यच होतें.

डॉ. सदाशिवराव वामन काणे यांचे आयुष्यांतील मुख्य गोष्टी थोडक्यांत सांगतां येण्याजोग्या आहेत त्या अशाः—( इंदुराहून मुंबईस आल्यापासून ) त्यांचें शिक्षण एल्फिन्स्टन हायस्कुलांत झालें. आणि म्याट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्यावर व मेडिकल कॉलेजांत जाऊं लागल्यावर तीन वर्षांनीं दुर्दैवानें त्यांचे वडील त्यांस सोडून गेले ! परंतु या वेळीं उभयतः पितापुत्राचे भरंवशाचे एक आश्रित शिष्य गौतमराव केशव नावाचे होते. त्यांनीं अनन्य भावानें डिस्पेन्सरी सांभाळिली. सन १८८१ सालीं सदाशिवराव यांची एल.एम.ॲंड.एस्. ची परीक्षा

पास होऊन ते वडिलांचे डिस्पेन्सरीचें काम करूं लागले. तोंपावेतों ४ वर्षे गौतमरावांनीं दवाखान्याचें काम बिनबोभाट चालविलें होतें. डा. सदाशिवराव आपला काम धंदा करूं लागल्यापासून त्वरितच द्रव्य, लोकप्रियता आणि लोकमान्यता हीं त्यांस प्राप्त होऊन डिस्पेन्सरीचें काम दिवसानु दिवस वाढूं लागलें. इतक्यांत त्यांचे धाकटे बंधु, काशिनाथ, हेही डॉक्टर बनून त्यांस मदत करूं लागले. त्यामुळें वाढलेल्या कामाचा बोजा पुष्कळ कमी झाला. आतां काणे–बंधूंस अत्यंत सुखाचे दिवस प्राप्त होऊन असें वाटूं लागलें कीं संसारी मनुष्यास ज्या ज्या सुखाचा अभिलाष वाटतो, तीं सर्व सुखें आपले आटोक्यांत आलीं आहेत. पण हा सुखाचा ऋतु फार दिवस टिकावयाचा नव्हता. आणि हळूहळू पण निश्चित रीतीनें या सुखास ओहोटी लागून विपरीत दैवाचा कळस गेल्या मे महिन्याच्या चौदाव्या १४ तारखेस नाशिक येथें झाला ! ! डॉ. सदाशिवराव यांच्या शरीराचा बांधा खरोखरच बराच सुदृढ व काटक असून त्यांचे अंगीं पुष्कळ सोशिकपणा होता. चालूं लागले असतां कोठें न थांबतां, उपाहार किंवा पाण्याचा घोट देखील न घेतां, ते एका तडाख्यानें दहा दहा मैल चालून जात, आणि थोडें दूध व पाणीं पिऊन त्यावर ते कित्येक दिवस राहत. रात्रभर जागून दुसरे दिवशीं त्यांच्या डोक्यास जडत्व येत नसे. निदान काम करण्याची तत्परता तरी त्यांत दृष्टीस पडत असे. परंतु, आहारविहारांच्या परिमितपणाची त्यांनीं पराकाष्ठा केली, व आपलें शरीर कसरती नसतांना आपल्या सोशिकपणाचा त्यांनीं अतिशय अंत पाहिला. "अति सर्वत्र वर्जयेत्" ही म्हण खरी आहे, व तदनुसार त्यांवर कष्टातिशयाचा उलट परिणाम होऊं लागला.

सन १८९० सालीं त्यांस अतिशय तीव्र अशा दम्याची व्यथा लागली. हाच त्यांचे आरोग्यास पहिला धक्का पोहोंचला. या शारीरिक आघातानंतर यापेक्षां पुष्कळ पटीनें तीव्र व अविस्मरणीय असा दुसरा मानसिक आघात त्यांवर येऊन कोसळला. सन १८९१ च्या नाताळांत त्यांचे आवडते बंधु आणि सहकारी काशीनाथपंत मृत्यु-मुखीं पडले. त्यांत अत्यंत दुःख वाटण्यासारखा योग असा आला कीं, या प्रसंगीं डॉ० सदाशिवराव कलकत्ता येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेला गेले होते. त्यामुळें त्यांस मरणसमयीं आपल्या प्रियबंधु काशी-नाथपंताच्या जवळ असल्यानें जें थोडेंबहुत समाधान झालें असतें त्यासही ते मुकले. तो बंधु मोठा होतकरू असून त्यावर त्यांनीं आपल्या आशांची इमारत बांधली होती. काशिनाथपंतास अपत्य नव्हतें. तें असतें तरी त्याकडे पाहून डॉ० सदाशिवरावांनीं आपलें समाधान केलें असतें. काशीनाथपंतांची पत्नीही त्यांचे मागून फार दिवस वांचली नाहीं. सदाशिवरावांस एक धाकटी बहीण होती. तिला त्यांनींच वाढवून सुस्थळीं देऊन सुखी केलें होतें. तिचे प्रतिभाशाली व प्रभावान् पति रा. रा. चिंतामण विनायक वैद्य हे हल्लीं ग्वालि-यर संस्थानांत मुख्य न्यायाधीशाचे जागीं विराजमान आहेत. युनि-व्हर्सिटींतील पदव्या संपादण्यांत त्यांनीं जें अद्भुत यश मिळविलें त्याचें स्मरण अद्यापि मुंबईचे लोकांत जागृत आहे. पण कर्मधर्मसंयोगानें ही बहीण देखील राहिली नाहीं. तेव्हां डॉ० सदाशिवराव यांस समाधानाचें साधनें स्वपत्नीशिवाय त्यांची एक कन्या मात्र होती. ती त्यांचे मागें विद्यमान आहे. ४ वर्षांमागें त्यांस एक दुसरी कन्या झाली होती, पण

तिनें एक वर्षाचे आंतच आपली जीवितयात्रा संपविली. अशा आपत्परंपरांचे प्रसंगींही डॉ० सदाशिवराव यांनीं अत्यंत धैर्यानें दृढनिश्चय केला कीं, पूर्वीप्रमाणेंच आपलें कर्तव्य नेटानें करावयाचें आणि धंद्यासंबंधीं, नीतीसंबंधीं किंवा सामाजिक व्यवहारासंबंधीं आपल्या पूर्वसंकल्पित व्यवसायापासून तिलप्राय ढळावयाचें नाहीं. तो निश्चय त्यांनीं चालविला तथापि ते स्वभावत: अतिशय कोमल अंत:करणाचे असल्यामुळें या आघातपरंपरांनीं त्यांचा धैर्यमेरू नव्हे पण शरीरबळ ढासळल्यावांचून राहिलें नाहीं. निसर्गदेवता सरते शेवटीं आपल्या नियमाच्या भंगाबद्दल त्यांस शासन केल्यावांचून राहिली नाहीं. प्रथम त्यांस "प्ल्युरिसी–"चा विकार होऊन पुढें त्यांचीं फुफ्फुसें बिघडलीं आणि सरते शेवटीं घातुक क्षयरोगानें त्यांवर स्वारी केली. डॉ० काणे यांनीं कामधंदा सोडून एक दोनदां वांद्र्यास जाऊन हवा बदलण्याचा उपाय केला; आणि तेवढ्यानें यश येत नाहीं असें अनुभवास आल्यावरून ते नाशिकच्या आरोग्यमंदिरांत जाऊन राहिले तेथें शक्य तितके औषधोपचार करण्यांत आले. तथापि, पांच आठवड्यांमागें ते त्या कालरूप रोगास बळी पडले. येथें एक गोष्ट अवश्यमेव नमूद करून ठेविली पाहिजे. ती ही कीं आपल्या सुखसमाधानाकडे अधिक तत्परतेनें लक्ष देणारा व आपल्या सुखाविषयीं कमी वैराग्य धारण करणारा आणि आपल्या स्वत:विषयीं कमी हयगय करणारा पुरुष डॉ० काण्यांचे जागीं असता तर तो खात्रीनें अधिक दिवस वांचला असता; किंबहुना त्यानें आपले रोगास मुळींच खुडून टाकिलें असतें. पण असा योग घडावयाचा नव्हता. कारण असें घडतें तर जन्मा-

पासून मृत्यूपर्यंत डा० काणे जसे एकरूपी होते तसे ते नव्हते असें झालें असतें ! !

आतां आपण या पुरुषास तत्वत: ओळखण्याचा प्रयत्न करूं. अधिक निकटवर्ती होऊन त्यांच्या अंगच्या गुणांची बारकाईनें तपासणी करून पाहूं. त्यांच्या अंगीं भिनलेला साधेपणा, आणि शुद्ध वर्तन, या त्यांच्या महान् गुणाच्या निरनिराळ्या छटा अधिक संलग्नतेनें अवलोकन करूं–म्हणजे त्यांचा पोशाख, त्यांचें भाषण, त्यांची चालरीत त्यांची ज्ञात अज्ञात कृत्यें, ह्यांवर प्रतिबिंबित झालेले गुण न्याहाळून पाहूं. म्हणजे इतक्या सद्गुणसंघाचा व चांगुलपणाचा मुख्य झरा कोणचा व कसा होता तो आपल्या लक्षांत येईल, आणि ज्या गुणांनीं त्यांचा ज्यांशीं ज्यांशीं संबंध आला त्यांस ते प्रिय झाले व ज्या गुणांमुळें "बाळाभाऊ" हें आवडतें नांव मुंबईतील व मुंबईच्या बाहेरील शेंकडो घरांत उदात्त गुणांचें वाचक बनलें त्या त्यांच्या सद्गुणांचा आपणास अधिक परिचय होईल. मला खात्री वाटते कीं असा खोल शोध केला असतां आपण अधिक शाहणे व उदात्त बनल्यावांचून राहणार नाहीं.

प्रथमत: आपण त्यांचा 'डॉक्टर' या नात्यानें विचार करूं. या संबधानें असें म्हणतां येईल कीं मुंबईत औषधोपचार व शस्त्रक्रिया या दोन्ही परोपकारी प्रयोगांत या पितापुत्रांनीं एक थोडाबहुत नवा पंथच स्थापिला. कर्तव्यप्रधानता हा या पंथाचा मुख्य गुरुमंत्र असून त्याचें मुख्य तत्व असें होतें कीं, डाक्टर हा रोग्याकारितां निर्माण झाला असल्यामुळें त्यानें रोग्याची शुश्रूषा करतांना आपल्या स्वत:च्या

जिवाकडे पाहूं नये, हा त्याचा धर्म होय. डाक्टर आपले विद्येंत निपुण झाला व उद्योगी असला ह्मणजे झालें, असें नसून त्यानें आपल्या रोग्याची काळजी घेतांना अत्यंत प्रेमळ, मधुर व पितृतुल्य वत्सल असलें पाहिजे. आपले वाडिलांचे स्थानावर त्यांच्या दवाखान्यांत अधिष्ठित झाल्या दिवसापासून डॉ. सदाशिवराव यांनीं आपल्या पुढें धंद्यासंबंधीं अत्यंत उच्च ध्येय मांडून ठेविलें. कोणत्याही रोगाचें फार काळजीनें निदान ठरविणें व त्याच्या कारणांचा पूर्ण शोध करणें, प्रत्येक रोगाचे उपचारांत आपल्याकडून होईल तितका प्रयत्न आपण केला आहे असें आपल्या मनाचें समाधान करून घेणें, हीं दोन तत्वें धंदा चालविण्यांत त्यांचे मुख्य मार्गदर्शक नियम बनलीं होतीं. कोणत्याही धंद्यांत एकदा कोणाची प्रतिष्ठा कायम झाली व कामाचा बोजा फार पडूं लागला व प्रकृति नीट राहिनाशी झाली म्हणजे त्याच्या कामांत ढिलाई व हयगय दिसून आल्यावांचून राहात नाहीं, असा साधारण नियम आहे. परन्तु डॉ. सदाशिवराव हे आपल्या स्वतःच्या वर्तनक्रमासच दृढपणें चिकटून राहिले व कधींही काडीभरही त्यापासून ढळले नाहींत. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं गौतमरावांनीं आपले मृत मालकाचे चिरंजीवाचे हितार्थ त्यांची डिस्पेनसरी चालविली होती. त्या विश्वासू गौतमरावांनीं आरंभींच मित्रभावानें त्यांस शरीरप्रकृतीकडे दुर्लक्ष केल्यानें ओढविणाऱ्या भावी अनर्थाची सूचना दिली. परंतु ती व्यर्थ; कारण जें एकदा आयुष्यक्रमाचें ध्येय ठरलें तें ठरलेंच. त्यांच्या निश्चल मनानें एकदा जो दृढ संकल्प केला त्यास अणुमात्र क्षीण होऊं देण्याचें त्यांस ठाऊक नव्हतें. उलट पक्षीं, तो निश्चय कालगती-

बरोबर अधिक विस्तृत होऊन उत्तरोत्तर वृद्धि व विकास पावला. उदाहरणार्थ, अलीकडे त्यांनीं अशी व्यवस्था सुरू केली होती कीं आजारी मनुष्याची स्थिति काळजी करण्यालायक झाली असतां त्याकरितां तयार केलेलें औषध प्रथमतः आपलेसमोर त्यास पाजावयाचें, म्हणजे औषधाचा गुणावगुण लक्षांत यावा व तें रोग्यास न आवडल्यास लागलीच त्यांत बदल करितां यावा. तसेंच, जेव्हां औषध तयार करून देण्यांत फार काळजी बाळगणें अत्यवश्यक असे, तेव्हां तें औषध कसें कसें तयार केलें हें ते कंपाउडरास विचारून घेत असत. डॉ० काणे यांजकडेस दररोज सरासरी १०० वर आजारी उपचाराकरितां येत. परंतु प्रत्येक रोग्याकडे जितका काळ व लक्ष देणें अवश्य तितका काळ व लक्ष दिल्यावांचून ते राहात नसत. असें केल्यामुळें पुष्कळ रोगी कंटाळून अवश्य दुसरीकडेस जावयाचे, हें त्यास माहित असतांही त्यांच्या मनाची कधीं अस्वस्थता झाली नाहीं. याशिवाय, त्यांचें एक असें तत्व असें कीं आपल्या दवाखान्याच्या प्रसिद्ध सरहद्दींत येणारे सर्व रोगी समान दर्जाचे लेखावयाचे. मग त्यांपैकीं कोणी श्रीमंत असो किंवा गरीब असो, ओळखीचा मित्र असो किंवा अपरिचित परका असो, त्यांचा असा क्रम असे कीं, प्रथम लहान मुलें पाहावयाचीं, नंतर स्त्रिया, आणि सरते शेवटीं पुरुषांची पाळी यावयाची. पण ज्या क्रमानें ते आले असतील त्याचं-क्रमानें त्यांची तपासणी नियमानें व्हावयाची. या नियमास अर्थात् कधीं कधीं अपवाद होत असे. उदाहरणार्थ, आफिसांत जाणारे लोक वेळशीर हजर झाले नाहींत, तर त्यांस हटकून दंड किंवा कडक ताकीद मिळावयाची. अशा नौकरांस मात्र फार वेळ वाट पाहण्यास ते

लावीत नसत. पण पैशाच्या लोभानें मात्र कधींही हा अपवाद होत नसे. म्हणजे एखादा रोगी श्रीमंत असून पुष्कळ पैसे देणारा असेल, किंवा तो मोठा मनुष्य अथवा आपला मित्र अथवा नातेवाईक असेल, तर त्याच्या मुरवतीनें मात्र क्रमभंग व्हावयाचा नाहीं. योग्य कारणा-वांचून कोणी अयोग्य पक्षपाताविषयीं प्रार्थना केल्यास त्याची प्रार्थना व्यर्थ जावयाचीच. तथापि घाई करणाऱ्यास तुमची पाळी येईपावेतों थांबा असें सांगण्यांत देखील ते कर्तव्यदक्ष डाक्तर सभ्यता व प्रेमळपणा कधींही विसरले नाहींत. आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, त्यांनीं आपल्या नियमांची शेखी कधींही मिरविली नाहीं. ज्यांचे अंगीं एखादा दुसरा सद्गुण असतो असे पुष्कळ लोक असतात. परंतु खरोखर जो आपल्या अंतरंगांतील धार्मिकतेनें समाधान मानून शांतचित्त असतो, व जो आपले शुद्ध धर्मज्ञानाचा दुसऱ्यास उपदेश करण्याच्या मोहांत न पडतां त्याबद्दल डौल मिरवीत नाहीं असा मनुष्य विरळा.

निर्वाहाच्या धंद्याकरितां ज्या शास्त्राचें अध्ययन डॉ० काणे यांनीं केलें होतें त्याचें रहस्य काय हें ते जाणत असून सदैव तदनुरोधानें वागत. त्यांच्यांत ढोंगसोंगाचा स्पर्शही नसून असमंजस व निरर्थक प्रयोग करून पाहण्याची पोरकट बुद्धिही पण नसे. पाश्चात्य वैद्य-काची उपपत्ति आणि उपचार यांवर त्यांचा दृढ विश्वास होता. तथापि प्रसंगीं नवीन शोध करण्याचें ते कधींही टाळीत नसत. कित्येक नवशिक्या डाक्तरांत चालच पडून गेली आहे कीं देशी वैद्यकाची सपशेल निंदा करावयाची. पण असा अन्याय त्यांचे हातून

कधींही घडला नाहीं. डॉ० काणे पुष्कळ वेळां देशी औषधें देऊन पाहत; पण औषधाचे गुणदोष त्यांस माहीत असतील तेव्हांच त्यांचा उपयोग करावयाचा, असा त्यांचा नियम असे. ज्या औषधांत अज्ञात गूढपणा असेल अशीं औषधें ते उपयोगांत आणीत नसत. अल्पवयांत मरण पावलेल्या त्यांच्या कनिष्ट बंधूची मोठी इच्छा होती कीं, देशी औषधि आणि औषधें यांचें शास्त्रीय रीतीनें पृथक्करण करून पाहावें आणि शास्त्रीय तत्वांच्या पायावर पौरस्त्य आणि पाश्चात्य वैद्यशास्त्रांचा मिलाफ करावा. हा कार्यक्रम डॉ० सदाशिवराव यांस पूर्ण पसंत पडला होता; व याचकरितां श्रीमंत शिवाजीराव होळकर महाराज यांचे समागमें त्यांस इंग्लंडास त्यांनीं जाऊं दिलें. तेथें जाऊन एक वर्षभर राहून रासायनिक पृथक्करणाची विद्या शिकून यावें असा डॉ० काशीनाथ याचा इरादा होता. पण हा बेत सिद्धीस गेला नाहीं ! कारण ज्या मित्राच्या साह्यानें हा योग आला होता तो मित्र-म्हणजे राजश्री कृष्णराव वासुदेव मुळे- यांची प्रकृती विलायतेच्या हवेनें बिघडली आणि त्यांस परत जाण्याबद्दल महाराजांचा हुकूम झाला. तेव्हां त्यांजबरोबर कर्तव्यकर्म समजून डॉ. काशीनाथांस परत यावें लागलें. नूतन औषधांचे गुणदोष पाहावे अशी डॉ. सदाशिवरावांस उत्कंठा होती, तथापि "मदर सिजेलचें सरबत" "हेअर रिष्टोअरर" आणि "नरिशर" सारख्या भबकेदार जाहिरातीनें प्रसिद्ध केलेल्या गूढ औषधांसारख्या औषधाचा ते विरळाच उपयोग करीत. ते स्वत: शेवटल्या असाध्य रोगामुळें नाशिक येथें अत्यवस्थ स्थितींत असतां युरोपिअन औषधापासून आपणास गुण येण्याची उमेद नाहीं असें त्यांस कळून आलें. तेव्हां तेथें अद्भुत गुणकारी औषधें बाळगणारा

म्हणून प्रसिद्ध असलेला एक वैद्य होता. पण तो आपल्या औषधाचे घटक प्रगट करीना. म्हणून त्याचा इलाज करण्याविषयीं मित्रांनीं केलेली सूचना त्यांनीं निश्चयानें नाकारिली. सदरहू औषध घेण्याकरितां त्यांचे पत्नीनें, नातेवाईकांनीं आणि मित्रांनीं आग्रहानें व कळकळीनें विनवण्या केल्या, पण डॉ. काण्यांनीं आपला दृढनिश्चय सोडला नाहीं तो नाहींच. त्यांचे उपचार शुद्ध शास्त्रीय असत. व शास्त्रप्रियता हा त्यांचा स्वभाव असे. याचें एक ठळक दर्शक चिन्ह म्हणजे कीं त्यांचे डिस्पेन्सरींत एक असा कायम नियम होता कीं औषधाचें प्रिस्क्रिपशन रोग्यास देऊन त्याची नकल मात्र आपले रजिस्टरांत ठेवावयाची. या नियमापासून त्यांची निस्पृहताही व्यक्त होते.

डॉ० सदाशिवराव यांत, किंबहुना त्या त्रिवर्ग सन्माननीय पिता-पुत्रांत, महान् कर्तव्यभक्ति वसत होती. कर्तव्यदक्षताच आपला धर्म असें ते मानीत. आणि केवळ आपला डाक्टरी धंदा चालविण्यांतच मात्र त्यांची अशी समजूत होती असें नाहीं, तर संसारांतील प्रत्येक व्यवहारांत, म्हणजे सर्व प्रकारचे सामाजिक, धार्मिक आणि नैतिक व्यवहार संपादण्यांत, त्यांची तीच समजूत असे. मला माहीत असलेल्या कांहीं गोष्टी सांगितल्या असतां त्यावरून त्यांच्या स्वभावांतील हा गुण विशेष व स्पष्ट निदर्शनास येईल. प्रथम तरुण काशीनाथपंतापासून आपण आरंभ करूं. एके दिवशीं फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्यें एक अत्यंत मनोरंजक व्याख्यान होणार होतें. तें ऐकण्यास जाण्याकरितां तयार होऊन काशिनाथपंथ घराबाहेर येऊन वाहनांत बसण्याचे बेतांत होते, इतक्यांत

एक गृहस्थ दत्त म्हणून त्यांच्यापुढें उभे राहिले, आणि त्यांनीं विनंती केली कीं एक रोगी अत्यवस्थ झाला आहे, त्यास पाहाण्यास आपण चलावें. यावेळीं काशिनाथपंताचा जो हिरमोड झाला, त्याची कल्पना करतां येण्याजोगीं आहे एक क्षण मात्र त्यांच्या मनाची चलबिचल झाली, पण त्यांनीं तत्काल भक्तीनें कर्तव्याचे निमंत्रणास मान दिला. त्यांनीं जाऊन तो रोगी पाहिला, व १५ मिनिटें त्याचेपाशीं घालवून गाडींत बसून व्याख्यानाचे दिवाणखान्याकडे धांव घेतली. त्यांस तेथें पोहोंचण्यास पाऊण तास उशीर झाला. पण त्यांनीं आपल्या दिनचर्येंत लिहून ठेविलें आहे कीं दुसऱ्याचें संबंधानें आपलें जें कर्तव्य आहे तें बजाविण्याकरितां मीं आज आपल्या करमणुकीची आहुती अर्पण केली, त्यामुळें मला जें समाधान व जो अभिमान वाटला तसा मला कधींहीं वाटला नव्हता.

आतां दुसरे एक उदाहरण सांगतो.—तें इंदुप्रकाशाच्या रकान्यांत पूर्वींच प्रसिद्ध झालें आहे. आपल्या या मुंबई शहरांत पहिला प्लेगचा हल्ला झाला, तेव्हां डाक्टरी धंदा करणाऱ्यांपैकीं देखील पुष्कळ सद्गृहस्थांचीं पांचांवर धारण बसून त्यांनीं येथून पळ काढिला. परंतु डॉक्टर सदाशिव वामन काणे यांचे शरीरांत पुढें क्षय ह्मणून निदान झालेल्या भयंकर आजाराचीं पूर्व चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं होतीं,. तरी तशा स्थितींत देखील ते येथें राहिले. एका प्लेगनें पछाडलेल्या रोग्याचा उपचार करण्याकरितां गेले असतां त्यांनीं रोग्याच्या गाठीस औषधाची पिचकारी मारिली. पिचकारीची सुई धूत असतां ती त्यांच्या बोटांत शिरून एक अष्टमांश इंच आंत गेली; म्हणजे

जिवंत प्लेग जंतूंनीं प्रत्यक्ष गोंदून घेतल्यासारखें हें कृत्य झालें म्हणावयाचें. यामुळें किती भयंकर प्रसंग ओढवण्याची भीति होती याची कल्पना करतां येण्याजोगी आहे. परंतु, डॉक्टर काणे शांत व धीर गंभीर असेच राहिले, आणि झालेल्या गोष्टीचें यत्किंचित्‌ही चिन्ह त्यांनीं आपल्या चेहऱ्यावर दिसूं दिलें नाहीं. असें करण्याचें कारण एवढेंच कीं, ज्या जुन्या मित्रानें आपल्या दुर्धर आजाराच्या स्थितींत आपल्या जीविताचें रक्षणाकरितां आपल्या विश्वासू डॉक्टरास बोलाविलें होतें त्या डॉक्टराचा जीव धोक्यांत घालण्यास आपण कारण झालों असा त्या मित्राच्या मनास धक्का लागूं नये, अशी त्यांची इच्छा होती. त्या रोग्याचा रीतीप्रमाणें निरोप घेऊन आपल्या गाडींत बसल्यावर डॉक्टर काणे यांनीं सुई टोंचल्याजागीं चिरा देऊन जखम दाबून अवश्य तेवढें रक्त पिळून टाकिलें. तथापि दुसरे दिवशीं त्यांस फणफणून ताप आलाच. मग तो मानसिक आघातामुळें येवो अथवा रोगजनक कृमींमुळें येवो. इतकें मात्र बरें झालें होतें कीं, रोगजंतुविनाशक औषधांत ती सुई धुतली असल्यामुळें सुईस लागलेले कृमी अंशतः निर्जीव झाले होते. दुसऱ्या एके प्रसंगीं सणाचे दिवस आनंदांत घालविण्याकरितां डॉक्टर सदाशिवराव वामन काणे लोणावळ्यास गेले होते. त्यांस दहा वर्षांपूर्वींपासून भयंकर दम्याची व्यथा जडून चैन पडत नसे. तेथें गेल्यापासून थोडें बरें वाटावें हा त्यांचा या प्रवासांत मुख्य हेतु होता. तेथें गेल्यावर मुंबई सेक्रेटेरिएटमधील रा. देशपांडे यांची त्यांची तोंडओळख झाली होती. एके दिवशीं रात्रीं रा. देशपांडे यांनीं त्यांजकडेस येऊन विनंति केली कीं माझी बायको प्रसूतिवेदनेपासून फार कष्टी झाली आहे, आणि डॉक्टरी मदती-

वांचून तिची मुक्तता होण्याची उमेद नाहीं. डाक्टर काणे यांची स्वतःची प्रकृति चांगली नव्हती आणि थंडी फार कडक पडली होती, म्हणून या वेळीं तुम्ही बाहेर जाण्याचें साहस करूं नये म्हणून नातेवाईकांनीं त्यांस जाण्याचा निषेध करण्याची पुष्कळ खटपट केली. पण नाहीं. हें घडावें कसें ? कर्तव्यदेवतेकडून बोलावणें आलें होतें. डॉक्टर काणे त्या गृहस्थाचे घरीं गेले आणि पाहतात तों बाईची अवस्था कठीण आहे. म्हणून त्यांनीं सर्व रात्र, तेथेंच डोळ्यांत तेल घालून, जागून, पहारा देऊन, अनेक उपचार करण्यांत घालविली. बाईची मुक्तता होऊन तिला बरें वाटेल, म्हणून तिच्या कृतज्ञ भ्रतारानें बक्षीस देण्याकरितां, मोठी रक्कम डॉक्टरसाहेबांजवळ आणिली. पण ती स्वीकारण्याचें डॉक्टर काणे यांनीं सुदृढ निश्चयानें नाकारिलें. ते म्हणाले, मीं लोणावळयास आलों आहें तो धंद्याकरितां आलों नाहीं म्हणून ही रक्कम मी घेणार नाहीं.

नुकतीच दुसरी एक गोष्ट घडली. या वेळीं डॉक्टरांच्या जिवाचा शेवटचा सोबती क्षयरोग हा परिपक्व अवस्थेंत आला होता. ते कामधंदा सोडून हवा पालटण्याकरितां नाशिकास जाऊन राहिले होते. परंतु तेथून ते मधून मधून मुंबईस येत असत. कारण तेथील आपल्या स्नेहीसोबत्यांच्या सुखदुःखांत सामील होण्याच्या उत्कट इच्छेनें त्यांस कधींही सोडलें नाहीं; व तसें केल्याशिवाय त्यास बरेंच वाटत नसे. अशा एका प्रसंगीं रा. आत्माराम बापू दळवी अत्यंत अजारी होऊन मरणोन्मुख झाले होते. त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली कीं, डॉक्टर या नात्यानें म्हणा किंवा माननीय मित्र या नात्यानें

म्हणा, डॉक्टर सदाशिवराव काणे यांची आपली एकदां भेट व्हावी. त्या दिवशीं सर्व दिवसभर डॉक्टर काणे यांच्या अंगात धादांत ताप भरलेला होता. त्यांच्याऐवजीं त्यांच्या डिस्पेन्सरीचें काम पाहणारे डॉक्टर परूळकर यांनीं त्यांस निक्षून सांगितलें कीं, ताप अंगांत भरलेला असतां आपण बाहेर जाऊं नये. पण त्यांचें त्यांनीं ऐकिलें नाहीं. मित्राचें नातें आणि वैद्याचें नातें अशा दोन्ही कारणांनीं त्यांनीं जाण्याचेंच ठरविलें, आणि आपल्या मरणोन्मुख झालेल्या मित्राजवळ आणि कुळाजवळ जाऊन एक तास घालविला. आपलें कर्तव्य बजावल्यामुळें सुख व आनंद मिळवून डॉक्टर घरीं आले. पण त्या श्रमामुळें दुसरे दिवशीं त्यांची प्रकृति अधिक बिघडली, हें सांगण्याची गरज नाहीं. मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, अशा परिपूर्ण व शुद्ध भक्तीनें ज्या कर्तव्यदेवतेची ते उपासना करीत होते, तीविषयींची त्यांची कल्पना ती एक मत्सरी व क्षुद्र मनाची देवता आहे अशी नव्हती. धंद्याच्या रीतिरिवाजाच्या संकुचित मर्यादेबाहेर पाऊल टाकावयाचें नाहीं असें ती त्यांस शिकवीत नव्हती. कर्तव्यदक्षता ही त्यांच्या सर्व जीवनव्यापारांत आणि स्वभावांत नखशिखांत भरली होती. तिची आज्ञा त्यांस प्रमाण असे. आणि खरोखर तीच त्यांच्या हृदयांत अधिष्ठित झालेली मुख्य नियामक आणि प्रेरक अशी देवता होऊन बसली होती. इंग्लंडांतील कविरत्न “ वर्डस्वर्थ ” यानें कर्तव्यदेवतेचें स्तोत्र गाइलें आहे. त्याच्या शेवटच्या “ To humbler function awful power ” वगैरे अनुपम ओळींतील सुप्रसिद्ध भावार्शी त्यांच्या अंतःकरणाची एकवाक्यता झाली होती, असें म्हण-

ण्यास हरकत नाहीं. त्या ओळींचा* भावार्थ येणेंप्रमाणें आहे:— "हे पराक्रमी पूज्यदेवते! आतां एका साधारण लहानसहान कामाकरितां तुझा मी धांवा करितों. या क्षणापासून मी तुला अनन्य शरण आलें आहें, माझें सर्वस्व मी तुझे आधीन करितों. तूं वागविशील तसा मी वागेन. हे माते! माझ्या अंतःकरणांतील क्षुद्र बुद्धीचा अंत कर, मला विनम्र व सुबुद्ध करून मजमध्यें स्वार्थत्यागाची प्रेरणा कर, सद्विचारावर माझा विश्वास दृढ कर, आणि या दासाला सत्याचे प्रकाशांत सतत आयुःक्रमण करूं दे."

राष्ट्रीय परिषदेच्या प्रत्येक बैठकीस हजर राहावयाचें असा डॉ. काण्यांचा दृढ निश्चय होता. लाहोर येथील परिषदेच्या वेळीं एक आठवडाभर ते आजारी होते, व अंगांत ताप असतांही त्यांनीं कांग्रेससाठीं जाण्याचा आपला निश्चय सोडला नाहीं. शेवटीं

---

*सदर ओळींचें कवितेंत भाषांतर:—

(चाल:—परमसुवासिक पुष्पे कोणी.)

रुद्ररूपिणी हे जगदंबे। प्रार्थितसें तुज मी माते!।
स्वल्प अल्प मम कार्य कराया धांव पाव गे तूं मातें॥ १॥
आजपासुनी किंकर पदिंचा पडलों पदरीं तव साचा।
तूंचि आसरा मज दीनासी, मार्ग दावि चिरसौख्याचा॥ २॥
मज ठायीं जे अवगुण असती, अंत होऊं दे आजि त्यांचा।
विनम्र सुविचारी मज करुनी, बोध करी मंजुल वाचा॥ ३॥
परोपकारास्तव वेचाया तन, मन, धन सन्मतिला हो।
दिव्यप्रेरणा अंतरिंची तव दृढनिष्ठा तिजवर राहो॥ ४॥
निर्भय आयुःक्रम सत्याच्या प्रकाशांत दे या दासाला।
प्रसाद देई हाचि सदोदित वांछा माझी करि सुफला॥ ५।

दुःसाध्य आजारानें त्यांस अगदीं बिछान्यास खिळून टाकिलें, तेव्हां मात्र उपाय राहिला नाहीं. कर्तव्यपरायण होऊन राहण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या अंगांत पुरी पुरी भिनली होती. यामुळेंच त्यांचे हातून कर्तव्यकर्मांत तिलप्राय चूक घडत नसे. शेवटच्या आणीबाणीच्या वर्षांत मृत्यूची छाया त्यांजवर आली होती, तेव्हां देखील ते आपल्या ध्येयापासून ढळले नाहींत. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर आणि आजचे सन्माननीय अध्यक्ष राजश्री नारायणराव चंदावरकर यांस कौन्सिलदारीचें बहुमानाचें पद प्रथम प्राप्त झालें, त्या गोष्टीच्या आदरार्थ "हिंदु युनिअन क्लब" कडून "पार्टी" देण्यांत आली. तेव्हां डॉ. काणे हे त्या क्लबच्या कमेटीचे अध्यक्ष होते. दुखणाईत असून अशक्त स्थितींत असतांही क्लबाचे कमेटीचे अध्यक्षाचें काम बजाविण्याकरितां वांद्र्याहून येण्याबद्दल त्यांनीं अनमान केलें नाहीं. आणि तशा स्थितींत येऊन त्यांनीं प्रसंगानुरूप जें सुंदर भाषण केलें तें आपल्यांपैकीं पुष्कळांस आठवत असेल. ह्याच कर्तव्यपरायणतेच्या मनोभावनेनें रा. रा. टिळक यांच्यावरील आरोपाच्या चौकशीपूर्वीं ते त्यांजकडे जाऊन त्यांस प्रेमानें कडकडून भेटले. आणि त्यांजवरील खटल्याच्या शेवटीं न्यायाधीशानें जूरीसाठीं केलेलें भाषण ऐकण्याकरितां आणि शेवटचा निवाडा जाणण्याकरितां डॉ. काणे कोर्टांत हजर राहिले. असेंच आत्मत्यागाचें दुसरें उदाहरण त्यांच्या दोघां मित्रांनीं एका उपयुक्त संस्थेच्या मदतीसाठीं "कॉक्स आणि बॉक्स" ह्या इंग्रजी चुटक्याचा प्रयोग रंगभूमीवर केला त्या वेळीं त्यांनीं दाखविलें. पण अशीं उदाहरणें पुष्कळच आहेत. तीं सांगत कोठवर बसावयाचें ? तथापि त्यांपैकीं आणखी दोन मीं येथें सांगतों.

कारण त्यापासून त्यांचें हें मनाचें वळण प्रपंचांतील लहानसहान कामांत देखील दृष्टीस पडत होतें, हें स्पष्ट होईल. राष्ट्रीय परिषदेकरितां डॉ. काणे नागपुरास गेले, तेव्हां त्यांचे परम मित्र रा. रा. हरी सीताराम दीक्षित यांनीं त्यांस आपले घरीं उतरण्याबद्दल अतिशय आग्रह केला. परंतु त्यांचें न ऐकतां आपलें कर्तव्य समजून मुंबईची प्रतिनिधि मंडळी उतरली होती तेथेंच राहून त्यांनीं आपल्या सोबत्यांबरोबर सर्व अडचणी सोसल्या. एके वेळीं लोणावळ्यास असतां पुष्कळ मंडळीचा विचार ठरला कीं लोहगडास जाऊन परत यावें. त्या मंडळींत ते व मी सामील होतों. आम्हीं डोंगराचे माथ्यावर जाऊन पोंहचलों तोंच भयंकर वादळ उसळलें. मुसळधार पावसानें आम्हांस चांगलें झोडलें. त्यामुळें आम्हीं भिजून चिंब झालों. आणि थंडीनें आम्ही काकडून गेलों. त्या वेळीं एकच उपाय होता, तो असा कीं मागच्या पावलीं तडक फिरून जोरानें चालून घर जवळ करावें. आणि दोघे दोघे तिघे तिघे मिळून आम्हीं विलंब न लावितां परत फिरलों. पण आमच्या मंडळींत स्थूल देहाचा व मंद चालीचा एक गृहस्थ होता. तशांत ओल्या जमीनीवरून घसरून पडून त्यांचा पायही किंचित् लचकला. अशा स्थितींत त्या आठ मैलांच्या पल्ल्यांत बसत उठत चालून परत येतांना त्यांजबरोबर अगदीं शेवटपर्यंत एकच साथीदार उरले—ते डॉक्टर काणे होत.

कधीं कधीं, विशेषत: स्वसुखाच्या संबंधांत, निश्चय ठरविण्यास डाक्टर काण्यांस फारच उशीर लागत असे. व तशा कामांत झालेल्या निश्चयास ते नेहमीं चिटकूनही राहात नसत. पण सत्य व परोपकार इत्यादि मुख्य धर्मांचे ठिकाणीं त्यांची जशी निष्ठा बळकट असे,

तशी सांपडणें विरळा. जेथें एखाद्या नीतितत्त्वाचा प्रश्न उद्भवे, तेथें त्यांच्यासारखा खंबीर वीर सांपडावयाचा नाहीं. प्रपंचांतील हरएक महत्त्वाच्या कामांत किंवा ज्यांत आपल्याशिवाय दुसऱ्याचा संबंध येई, अशा कामांत आपण कसें वर्तावें ह्याबद्दलचे त्यांचे ठरलेले सिद्धांत असत. स्वसुखाविषयीं मात्र ते बुद्धिपुरःसर हयगय करीत असत. उदाहरणार्थ, त्यांचे बंधु विलायतेहून परत आले तेव्हां उभयतां बंधूंचा निश्चय झाला कीं प्रायश्चित घ्यावयाचें नाहीं; आणि बंधूचें लग्न व्हावयाचें होतें, त्यास अडचण येण्याची भीति असतांही उभयतांनीं आपला निश्चय पार पाडला. हें पुष्कळांच्या नजरेस आलें असेल कीं त्यांच्या मनाचा कल व कळवळा सुधारक मताकडे असतांही, खाण्यापिण्याचे जुन्या चालीचे विधिनिषेध ते मोठ्या काळजीनें व भक्तीनें पाळीत. या निश्चयाच्या उत्पत्तीची हकीगत मनोरंजक आहे. लहानपणीं कॉलेजांत असतां कांहीं मित्रांच्या सांगण्यावरून ते आपल्याकरितां एके दिवशीं शास्त्रोक्त "एग मिक्सचर" नामक कोंबडीच्या अंड्याचें औषध तयार करीत होते, इतक्यांत अकस्मात् तेथें त्यांचे वडील आले. त्यांनीं विचारलें, हें काय करीत आहेस? अर्थात् जें खरें होतें तेंच त्यांस सांगितलें गेलें. वृद्ध डॉ. वामनरावजी इतकेंच बोलले कीं "तूं हें करशील असें माझ्या मनांत देखील कधीं आलें नाहीं." ही सूचना तरुण सदाशिव यांस पुरेशी होती. त्या दिवसापासून त्यानें निश्चय केला कीं खाण्यापिण्यांत अगदीं शुचिर्भूत राहावयाचें; आणि हा निश्चय त्यांनीं आमरण चालविला. आतां दुसरें एक उदाहरण घेऊं. ही गोष्ट प्रसिद्धच असेल कीं, डॉ. काण्यांच्या कारखान्यांतील एक

पूर्वींचा औषधें तयार करण्याचें काम करणारा हुशार गृहस्थ अनेक रोगांवर रामबाण औषधें जाहिराती देऊन विकीत आहे. त्यांतील औषधाचे पाठ उत्तम असून बहुतेक डॉक्टर काणे यांचेच आहेत. हा व्यापार पुष्कळ फायद्याचा झाला आहे. डॉक्टर काणे त्या फायद्याच्या कामांत सामील झाले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं असे कडक हुकूम देऊन ठेविले कीं त्या कामाचा आपल्या डिस्पेन्सरीशीं बिलकूल संबंध नसावा. आणि तसा संशय कोणास येईल असें कांहीं एक पत्रांत किंवा वर्णनांत येऊं नये, अशी त्यांनीं खबरदारी घेतली. याचप्रमाणें डॉ. काण्यांचें वर्तन दत्तविधानाच्या विषयांत झालें. आपले घराण्यांत आपल्यास किंवा चिरंजीव काशीनाथ यांस पुत्रसंतान व्हावें अशीं गोष्ट निघाल्यावर ईश्वरी इच्छा म्हणून त्यांचे मुखांतून वेदांती समाधानाचा सुस्कारा निघे. तथापि दत्तविधानावर त्यांचा भरंवसा नव्हता. एकाचा मुलगा दुसऱ्यानें आपल्या मांडीवर बसवून आपला म्हणणें यांत काय सौरस्य असेल तें असो. ती पद्धति त्यांस पसंत पडत नव्हती. त्यांनीं पुष्कळ संपत्ति आणि कीर्ति संपादिली होती. अशा स्थितींत आपलें नांव पुढें चालावें, अशी इच्छा आपल्यापैकीं पुष्कळांस साहजिकपणें होईल. पण डॉक्टर काणे यांचा निश्चय अढळ होता; आणि पुष्कळ आग्रह व विनवण्या झाल्या तरी त्यांनीं दत्तक पुत्र घेण्याचें मनांत आणिलें नाहीं. डॉक्टर काणे यांचा असा एक विलक्षण स्वभाव होता कीं त्यांनीं नेहमीं आपल्याविषयीं अविश्वास ठेवावयाचा आणि आपल्या स्वतःच्या शरीराची व नफ्याचीं हेळसांड करावयाची. यांत पराकाष्ठा करावयाची ती आम्हां कित्येकांस बिलकूल रुचत नसे. म्हणून प्रापं-

चिक हिताच्या दृष्टीनें आम्ही त्यांशीं यासबंधीं जिकीर करीत असूं. तपस्व्यासारखा कडक साधेपणा आणि साधूसारखें अदंभित्व आणि आपल्याविषयीं अप्रत्ययत्व, व आपण शतशः ताप सोसावयाचे पण दुसऱ्यांस यत्किंचित् देखील उपद्रव द्यावयाचा नाहीं. असे स्वभावगुण हे पुराणांतील ऋषींच्या अंगचे असले तथापि त्यांत देखील अति सर्वत्र वर्जयेत असा प्रकार घडून येतो; व अशा स्वभावाचे लोक ज्या समाजाचे सुखहिताकरितां इतकी काळजी वाहात असतात, त्यांचेंही परिणामीं ते आपल्या सद्गुणांच्या अतिरेकानें नुकसानच करितात. ही गोष्ट डॉक्टर सदाशिवराव यांच्या अकालिक मृत्यूनें सिद्ध होते.

प्रसंगीं जीविताला अवश्य असणाऱ्या गोष्टी देखील करावयाच्या नाहींत, आणि आपल्या अंगच्या बळाची आणि सोशिकपणाची मर्यादातीत कसोटी पाहावयाची, या त्यांच्या स्वभावाचें वर्णन मीं पूर्वीच केलें आहे. याला जोडून आणखी त्यांच्या अंगीं खिळलेल्या कांहीं विलक्षण संवयी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. पांढरें शुभ्र पागोटें घालावयाचें, जुन्या चालीचें धोतर नेसावयाचें, आणि इतर कपडे अतिशय थोडे वापरावयाचे, बूट आणि स्टॉकिंग म्हणजे पाप आहे असें समजून होतील तों टाळावयाचे; हा ठरीव क्रम चालविण्याविषयीं त्यांचा जोराचा आग्रह किंवा दुराग्रह होता. आपल्या पोषाखांत जे अर्धवट यूरोपिअन रिवाज घुसले आहेत त्यांपासून जें शरीरसंरक्षण होतें त्याची अत्यंत आवश्यकता असतां, त्यांनीं आपल्या शेवटच्या दुखण्यांतील तीन वर्षांतदेखील आपली रीत सोडिली नाहीं. आपलें स्तोम माजविल्यासारखें जेणेंकरून दिसेल अशा गोष्टीचा

त्यांस मनापासून बद्धमूल तिटकारा वाटत होता. त्यांचा डाक्टरी धंदा कायमपणें चांगला चालूं लागल्यावर पुष्कळ दिवस ते गाडीघोडें खरीद करीनात. आणि तें खरीदण्यास मित्रांनीं त्यांस भाग पाडल्या-वरही स्वाभाविक मर्यादशीळपणामुळें पुष्कळ दिवस ते तें वापरीत नसत. त्यांच्या शेवटच्या दुखण्यांत त्यांच्या इष्टमित्रांनीं पुष्कळ सांगितलें कीं आपण आपल्याकरितां हवाशीर ठिकाणीं चांगला बंगला भाड्यानें घ्या; अथवा योग्य व्यवस्थेनें एखाद्या प्रसिद्ध आरोग्यशाळेंत चला; रेलवे कंपार्टमेंट राखून ठेवून प्रवास करा; आपल्यास साध्या गाडीचे धक्के सोसत नाहींत, तर मेण्यांत बसा, वगैरे. पण त्यांच्या निग्रही स्वभावामुळें यांपैकीं एकही गोष्ट त्यांच्या गळीं उतरली नाहीं. अयोग्य काटकसर करण्याची इच्छा या गोष्टींच्या मुळाशीं नव्हती. तिचें कारण खोल होतें. तें असें कीं ते आपल्यास अत्यंत क्षुद्र समजत; म्हणून आपलें स्तोम जेणें करून माजेल तें करावयाचें नाहीं, असा त्यांचा संकल्प होता. ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, निरंतरचा अभ्यास आणि अनुभव यामुळें नेत्ररोगांत ते विशेष निपुण व तज्ञ झाले होते. त्यांच्या हाताखालून शेंकडों मोतीबिंदुचे रोगी बरे होऊन गेले होते. आणि त्यांपैकीं निदान दोन उदाहरणें मला अशीं माहित आहेत कीं ज्यांत दुसऱ्या तज्ज्ञ म्हणविण्याऱ्या डॉक्टरांनीं हात टेंकले असतां यांनीं ते रोगी हातीं घेऊन बरे केले. तथापि ऑफथॅल्मिक सर्जन म्हणजे नेत्रवैद्य असें त्यांनीं आपल्यास कधीही ह्मणवून घेतलें नाहीं, आणि डिस्पेन्सरीच्या बोर्डावरहीं त्यानीं तशीं जाहिरात लाविली नाहीं. या निग्रहाची मजल याही पुढें गेली होती. त्यांची निवडणूक युनिव्हर्सिटीचे 'फेलो' किंवा म्युनिसिपल कौन्सिल ह्या जागीं

होण्यासाठीं उमेदवार म्हणून उभें राहण्याबद्दल त्यांच्या मित्रांनीं जंग पछाडला. परंतु दांभिकत्वाच्या भीतीमुळें डॉ. काण्यांनीं ह्यासंबंधीं कोणाचें ऐकिलें नाहीं. एके वेळीं तर त्यांना कळूं न देतां त्यांच्या मित्रांनीं त्यांच्याकरितां मतें गोळा करून त्यांची निवडणूक होईल असें केलें. पण यांतही त्यांनीं डॉक्टर काणे यांस पूर्ण ओळखलें नव्हतें असें दाखविलें. कारण त्यांनीं कितीही आग्रहाच्या विनवण्या केल्या तथापि ते डॉक्टर काण्यांचें मन वळवूं शकले नाहींत. आपल्या मित्रांशीं, नातेवाईकांशीं, चाकरांशीं, आणि आश्रित वर्गाशीं आणि बायको आणि मुलें यांशीं वागण्यांत तर त्यांच्या या आत्मत्यागाच्या वागणुकीची कमाल होत असे. लोणावळ्याहून लोहगडास आम्हीं सफर केली तींत आह्मीं अगदीं भिजून चिंब झालों होतों वगैरे गोष्टींचा उल्लेख वर आलाच आहे. त्याच्या दुसऱ्या दिवशीं आम्हीं बाहेर फिरावयास निघालों, तेव्हां डॉ. काण्यांस आढळून आलें कीं आपली टोपी वाळली नव्हती. मजजवळ दोन टोप्या होत्या, त्यांपैकीं एक त्यांच्या डोक्यास बसेल अशी होती. ती मीं त्यांस घालावयास देऊं लागलों परंतु त्यांनीं दोन्ही टोप्या अजमावून पाहिल्या. त्यांपैकीं जी कमी दर्जाची होती ती त्यांच्या डोक्यास बिलकुल बसेना; आणि अंमळ बरी होती ती आपण घातली तर माझ्या सुखांत तेवढा रतिभर कमीपणा येईल म्हणून डॉ. काणे यांनीं आपलीच ओली टोपी घालण्याचा आग्रह धरला. आणि म्हणाले, कांहीं नाहीं हो, ती कांहीं इतकी भिजली नाहीं. मी माझ्या मित्राचा स्वभाव चांगला ओळखत होतों; ह्मणून ह्या प्रसंगीं त्यांजवर मी पुष्कळ रागावलों. आणि ह्मटलें, या वर्तनानें मजवर केवढा अन्याय तुम्हीं करीत आहां याचा तुम्हीं

कांहींच विचार करीत नाहीं. निक्षून सांगितलें, तेव्हां कोठें त्यांनीं माझी अधिक चांगली टोपी वापरण्याचें कबूल केलें. आणखी एक उदाहरण सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं, त्या-बद्दल माफी असावी. दोन वर्षांमागें ते वांद्र्यास एका बंगल्यांत जाऊन राहिले. तो त्यांचे अत्यंत प्रिय व सलगीचे मित्र राजश्री हरी सीताराम दीक्षित यांचे बंगल्याचे अगदीं शेजारीं होता. पहिले दिवशीं त्यांचें सामान येऊन अव्यवस्थित रीतीनें पडलें होतें. तिसरे प्रहरीं चहा घेण्याची त्यांची आवडती संवय होती. दीक्षितांच्या कुटुंबानें निरोप पाठविला कीं चहा केव्हां पाठवून देऊं? तेव्हां डॉ. काण्यांनीं उत्तर पाठविलें कीं, मला चहाची बिलकुल गरज नाहीं. दीक्षितीणबाईच्या नोकरास आपणाकरितां कां श्रम द्यावे हेंच यांतील बीज होतें. राजश्री हरीभाऊ दीक्षित ऑफिसांतून परत आले, तेव्हां त्यांस ही गोष्ट कळली. त्यांस डॉ. काणे यांच्या स्वभावाच्या बिनाख्या चांगल्या माहित होत्या. त्या त्यांनीं स्वपत्नीला सांगून असें बजाविलें कीं, डॉ. काणे यांजकरितां वेळसर जें करावयाचें तें त्यांच्या हवें नको म्हणण्याचा विचार न करतां केलें पाहिजे. त्यांच्या शेवटच्या अजारीपणांत देखील डॉक्टर काणे यांचा मूळचा स्वभाव लवलेशही बदलला नाहीं. त्यांनीं नेहमीं आपल्या स्वतःची हयगय करावयाची, आणि सदोदित दुसऱ्याची काळजी वाहावयाची. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षांत त्यांस पांच सहा भयंकर व्याधींनीं पछाडलें होतें, त्यामुळें त्यांस बिलकूल चैन पडत नव्हतें. असें असतां, दुसऱ्यास आपल्यापासून तसदी पोहोंचूं नये याकरितां त्यांची काळजी असेच. इतरांविषयीं अशी आमरण काळजी वाहणारा व्याधिग्रस्त गृहस्थ सांपडावयाचा नाहीं.

आपल्या आजारांतही जवळच्या माणसांस सक्ती करावयाची नाहीं, त्यांस अधिक काम पडूं नये याबद्दल जपावयाचें, व त्यांच्या सोई व आराम यांत कमतरता पडूं नये म्हणून काळजी वाहावयाची, असें त्यांचें अपूर्व चरित्र होतें. रात्रीं बहिर्दिशेस जाण्याची इच्छा झाल्यास ते कोणास न जागवितां जाऊन, आपल्या बिच्छान्यावर परत येऊन निजत. त्यांस भेटावयास जे मित्र किंवा पाहुणे येत त्यांची चहा, भोजन, निजणें, बसणें इत्यादिविषयींची व्यवस्था नीट लागली आहे किंवा नाहीं ह्याची चौकशी केल्यावांचून ते राहत नसत. आणि ज्या दिवशीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें त्या दिवशीं देखील या कामांत ते विसंबले नाहींत. इतकेंच नाहीं तर एकपरी ही काळजी मरणोत्तरकालव्यापिनी होती असें म्हटलें असतां चालेल. मरतां मरतां त्यांनीं असें सांगून ठेविलें होतें कीं प्राणोत्क्रमणानंतर माझें प्रेत गाडींत घालून न्यावें, पण खांद्यावर उचलून नेण्याचे श्रम माझ्या मित्रमंडळीस पडूं नयेत !

डॉ. काणे यांची धार्मिकता आणि परोपकारबुद्धि हीं सुप्रसिद्ध आहेत. गरीब मुलें व विद्यार्थी यांच्या साह्यार्थ ते सरासरीनें दरमहा ५० रुपये खर्चीत. आणि कांहीं दिवस असें चाललें होतें कीं डॉ. काणे यांनीं एखादे मुलास चार आणे दिल्याचा दाखला दिला कीं तो पाहून सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांजकडून चार आणे आणि न्यायमूर्ती काशीनाथ त्रिंबक तेलंग यांच्याकडून दुप्पट म्हणजे आठ आणे मिळावयाचेच. त्यांच्या गिऱ्हाइकांपैकीं शेंकडा पंचवीस किंवा तीसजणांस औषधोपचार मोफत मिळावयाचा. ही सवलत देण्याचा अधिकार कंपाउंडरांस देखील देऊन ठेविला होता. या

सवलती आमरण अव्याहत चालविल्या गेल्या. कधीं कधीं तर आपल्या गिऱ्हाइकांपैकीं कोणी अगदीं द्रव्यहीन असल्यास, त्यास ट्रामचें भाडें व इतर गोष्टींकरितांही मदत त्यांजकडून मिळत असे. नाशिक येथील आरोग्यालयांत आपल्या शेवटच्या दुखण्यांत ते जाऊन राहूं लागल्यास फार दिवस गेले नाहींत तोंच ते एक उत्तम डॉक्टर आहेत अशी प्रसिद्धि शहरांत व भोंवतालच्या गांवांत झाली. त्यामुळें लवकरच दररोज पंचवीस तीस रोगी त्यांजकडे प्रकृति दाखविण्यास आणि औषध घेण्यास येऊं लागले. कांहीं अनमान न करितां, आणि कांहीं मोबदला न घेतां ते रोग्यांस पाहूं लागले व त्यांस उपचार करूं लागले, कारण धंदा चालविण्याकरतां व पैसे मिळविण्याकरितां ते नाशिकांस गेले नव्हते. त्यांचा आजार वाढत चालला तों तों हा त्यांच्या मागचा त्रास वृद्धि पावला. नाशिक येथील ट्रामवे कम्पनीचे सुपरिन्टेडंट मिस्तर टिमोथी यांच्याशीं त्यांचा स्नेह झाला होता. ज्या रोग्यांस बराच आराम झाला असेल, किंवा आराम झाला असें दृष्टीस पडे, त्यांनीं डॉक्टरसाहेबांकडे येणें कायम ठेऊन त्यांस फाजील त्रास देऊं नये म्हणून हे गृहस्थ मध्यें पडून त्यांस येऊं देत नसत. डॉ. काणे मुंबईंत धंदा चालवीत असतां कोणी धर्मार्थ वर्गणी मागावयास त्यांजकडे आल्यास तो रिक्तहस्तानें जात नसे. आपल्या शेवटच्या आजारामुळें डॉ. काणे कामधंदा सोडून नाशकास गेले होते, तेव्हां देखील त्यांनीं आपला हा नेम चालविला होता. यामुळें त्यांस दरमहा १००।२०० रु. खर्च पडे; तो ते संतोषानें करीत. आयुष्याच्या सरतेशेवटीं त्यांनीं मृत्युपत्र करून दिलें त्यांत ज्या मोठ्याल्या देणग्या दिल्या त्या सांगावयाच्या आहेत.

स्थूल मानानें घर आणि घरांतील संसारगत वस्तु या शिवायकरून त्यांनीं आपल्या जिंदगीचे तीन समान भाग केले. एक भाग त्यांनीं आपली पत्नी आणि कन्या यांस दिला. दुसरा भाग त्यांनीं आपले दूरचे नातेवाईक यांस वांटून दिला, आणि तिसरा भाग धर्मादायाकडे लावला. भूतदया आणि परोपकार बुद्धि हे त्यांचे गुण सर्वव्यापी होते; त्यांत संकुचितपणा कसा तो नव्हता. ह्या गोष्टी त्यांच्या धर्मादायांत दृष्टीस पडत होत्या; व त्यांत कोणास कांहीं सुचवावयास जागा राहिली नव्हती. इंदूर येथील सरकारी धर्मार्थ दवाखान्यांत आपल्या वडिलांचे नांवानें एक वार्ड बांधण्याकरितां त्यांनीं पांच हजार रुपये दिले; आणि आपल्या बंधूच्या नांवानें पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजांत एक रसायनप्रयोगशाळा बांधण्याकरितां त्यांनीं दहा हजार रुपये दिले. प्रो. कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमासाठीं त्यांनीं आपल्या मातोश्रीच्या नांवानें रु. ३००० ची रक्कम व्याजीं लाविलेला ट्रस्ट फंड म्हणून पंचांचे स्वाधीन करून ठेविली. आणि " पूअर बॉईज सेमिनरी " ( गरीब मुलांची शाळा ) स्टू० लि० आणि सा० सोसाइटीच्या शाळा, थीस्टिक असोशिएशन ( प्रार्थनासमाज ) वांई येथील शिक्षणप्रसारक मंडळी, आणि नाशिक येथील आरोग्यशाळा, या प्रत्येक संस्थेस हजारापासून दोन हजार रुपयांची रक्कम त्यांनीं दिली. यापैकीं प्रत्येक रक्कम आपल्या आवडत्या नातेवाईकांपैकीं कोणाचें तरी चिरकाल स्मरण राहावें याकरितां त्यांचे नांवें देण्यांत आली आहे. परंतु आपले स्वतःचें म्हणजे डॉ. काण्यांचे नांवाचे स्मरणार्थ काढून ठेवण्यांत आलेली एकही रक्कम नाहीं. कवीनें म्हटलें आहे कीं " देह त्यागितां कीर्ति मागें उरावी " अशाविषयीं

मनुष्याचे मनांत किती तरी फोल महत्वाकांक्षा असते ! ! ! पण डॉ. काण्यांच्या विषयीं उलटेच उद्गार काढावे लागतात. ते हे कीं सदर मानवी स्वभावदौर्बल्याला जिंकून टाकण्यांत त्यांनीं केवळ परमावधि केली.

त्यांचे चुलत बंधु गोविंदराव नारायण काणे हे हल्लीं वऱ्हाडांतील प्रमुख वकिलांपैकीं एक असून ज्या अनन्यभावी देशसेवकांनीं अमरावती येथील समाजास प्रकाशांत आणिलें त्यांत त्यांची गणना आहे. आणि प्रसिद्ध हरी सीताराम दीक्षित हे डॉ०काण्यांचे परम मित्र असून माझ्या मित्रवर्गापैकीं एक आहेत. आजचा निबंध तयार करण्याचे कामांत या उभयतां मित्रांनीं सामग्री जमवून दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. राजश्री गोविंदराव मला कळवितात कीं, डॉ०काणे यांचा बालपणापासून असा मनोरथ होता कीं आपण आपलें सर्व आयुष्य शिक्षकाचे धंद्यांत घालवून आमरण देवी सरस्वतीची सेवा करावी. पण हें त्यांचें मनोराज्य सिद्धीस गेलें नाहीं. कर्मयोगानें डॉ. काणे यांजकरितां दुसरेंच कार्यक्षेत्र आंखून ठेविलें होतें पण ह्यांत एक गोष्ट निर्विवाद आहे, ती ही कीं, धंद्याच्या संबंधानें व सामाजिक संबंधानें यद्यपि डॉ. काणे यांच्या गळ्यांत विविध कामें पडलीं, तथापि त्या सर्वांत त्यांनीं आपलें नीतितत्वाचें धोरण सोडिलें नाहीं. त्यांच्या स्वभावाचें आदर्शरूप चरित्र हें जनतेस एक अत्यंत नामी कित्ता आहे. उच्च विचार पण साधी राहणी, प्रपंचांतील व्यवहारांत व्याप्त राहूनही अध्ययन व तत्त्वविचार यांत निमग्न राहणें, आपले धंद्यात तल्लीन राहून शास्त्र आणि साहित्य यांची उपासना करणें, आणि कविता व रसिकता यांविषयीं सहृदय अंतःकरण ठेवणें:—या साधारणतः भिन्न गुणांचा विसंवादरहित संयोग त्यांचे ठिकाणीं अपूर्व मिलाफानें

जमला होता. हायस्कुलांत अभ्यास करीत असतां देखील त्यांची तीव्र बुद्धिमत्ता जितकी चमकत होती तितक्याच मानानें त्यांचे स्वाभावाचें माधुर्य आणि पूज्यबुद्धि उत्पन्न करणारी थोरवी हे गुण दृग्गोचर होत असत. हा शेवटचा भारदस्तपणाचा गुण तर, त्यांचा पोषाख, बोलणेंचालणें व वागणूक यांत जन्मभर नजरेस येत असे. शाळेंत देखील पागोटें आणि जुन्या चालीचा अंगरखा हाच त्यांचा पोषाख होता. कोट, पाटलून, बूट, स्टाकिंग यांचा विटाळ देखील त्यांनीं आपल्यास होऊं दिला नाहीं. अभ्यासांतील विषयांत त्यांनीं इंग्लिश भाषेचें नैपुण्य विशेष संपादिलें होतें. त्यांचे हातचे लेख पाहून त्यांचे हायस्कुलचे प्रिन्सिपल-मिस्तर ब्यारेट-यांसच नव्हे तर त्यांच्या वडिलांचे युरोपिअन मित्रांस मोठें कौतुक वाटे. त्यांचा हा गुण पाहून त्यांनीं त्यांचें अभिनंदन करावें. डॉ. काणे यांनीं कधीं कधीं इंग्रजींत आणि मराठींतही कविता रचाव्या. प्रिन्स ऑफ वेल्स यांचे आगमनाचे स्मरणार्थ एक उत्तम इंग्रजी काव्य रचून त्यांनीं तें त्यांजकडेस नजर पाठविलें. त्याचा त्यांनीं सहृदयतेनें स्वीकार करून आपला संतोष प्रदर्शित केला. डॉक्टरी धंद्यास आरंभ केला तेव्हां कांहीं दिवस काण्यांचा असा नेम असे कीं दररोज नेटिव्ह जनरल लायब्ररींत जाऊन आपल्या आवडत्या ग्रंथकारांच्या समागमांत दोनतीन तास घालवावयाचे. लेख लिहून वर्तमानपत्रांस ते मदत करीत असत; आणि पत्रव्यवहारांतील त्यांचें कौशल्य त्यांच्या मित्रांस चांगलें माहित होतें. त्यांची आवडती करमणूक ग्रंथवाचन आणि एखाद्या विषयाची विचारपूर्वक चर्चा करणें ही होती. कांहीं तरी नवीन ज्ञान संपादावयाचें, वादविवादांतील दोन्ही पक्षांकडील

मुद्दे नीट ध्यानांत ध्यावयाचे, दुसऱ्यांतील उत्तम गोष्टींचें ग्रहण करण्याविषयीं तत्पर राहावयाचें, आणि दुसऱ्यांतील दोषांवर पांघरूण घालावयाचें, असा त्यांच्या मनाचा नेहमींचा कल असे. दुसऱ्याच्या मतांतील भेदाविषयीं मनःपूर्वक सहिष्णुता धरावयाची हा त्यांच्या स्वभावांतील दुसरा प्रमुख गुण होता. मराठी ग्रंथांविषयीं त्यांना मनापासून प्रेम होतें. मोरोपंत हा त्यांचा आवडता कवि होता. आणि आपल्या साधुसंतांचे ग्रंथ आणि श्रीमद्‌भगवद्गीता यांस ते मार्गोपदेशक धर्मगुरु मानीत. त्यांची रसिकता आणि सहृदयता उदात्त तऱ्हेची होती. ती काव्यप्रेमांतच काय पण प्रत्येक सुंदर विभूतिमत् आणि मंगल वस्तूंचें जें ते सोत्कंठ अभिनंदन करीत त्यांत व्यक्त होत असे. कलाकुशलतेचें प्रदर्शन मुंबईस होत असे तें पाहण्याकरितां दर वर्षीं जाण्याचा त्यांचा नेम असे. आणि दोन तीन वेळां तें पाहिल्या शिवाय त्यांचें समाधान होत नसे. सृष्टिसौंदर्य पाहण्याकरितां त्यांचे नेत्र नेहमीं उत्फुल्ल असत घाटांतून आणि इतर ठिकाणीं सहल करीत असतां ते मध्येंच थांबत आणि नीट न्याहाळून पाहून सृष्टीच्या सौंदर्याचें साल्हाद निरीक्षण करीत, आणि त्यापासून शिकण्यासारखें काय आहे याचा मनांत संग्रह करीत. जगांतील अत्यंत साध्या पदार्थांत देखील कांहीं शिकण्यासारखें असतें हें तत्त्व त्यांच्यासारख्या सहृदय सज्जनांस मात्र दिसतें. त्यांच्या प्रेमळ अंतःकरणाचें एकच उदाहरण मी सांगतों. राष्ट्रीय परिषदेच्या एका सफरींत ते हरिद्वारास गेले. तेथील तीर्थविधि सांगोपांग करावे असें इच्छिण्याइतका देवभोळेपणा अर्थात् त्यांच्यांत नव्हता. परंतु आपल्या मातोश्रीची त्यांस सदैव आठवण असे. आणि तिच्या मनोभावाप्रमाणें तिचा सत्कार करण्याकरितां तिला स्मरून त्यांनीं एक दिवस तीर्थोपवास केला.

ज्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज आपण येथें जमलों आहों तो महात्मा वरील गुणविशेषांनीं मंडित होता. तो खरोखरच एक आधुनिक साधु होता. त्याचा साधेपणा पाहूनच मनांत पूज्यभाव उत्पन्न होई. आणि त्याची कडक तपस्व्यासारखी नीतिमत्ता आठवून आपले मनांत प्रेमाचें भरतें आल्यावांचून राहत नाहीं. कर्तव्यता आणि नीतितत्त्व यांस ते देव मानीत, आणि अनन्यभावानें त्यांची उपासना करणें हा आपला धर्म आहे असें ते समजत. जुना देवभोळेपणा ज्याला म्हणतात तो त्यांच्यांत थोडा देखील वसत नसे. उदात्त तत्त्वें कोणत्याही धर्मांत सांपडोत तीं घ्यावयाचींच असा त्यांचा नियम असे; आणि कोणचेही असमंजस ठरीव सिद्धांत त्यांच्या अंगीं खिळले नसल्यामुळें त्यांचें अंतःकरण परम उदार असून त्यांत परमताऽसहिष्णुत्वाचें वारें बिलकुल नव्हतें. ते नियमानें संध्यावंदन करीत, तें ईश्वरदत्त नियम म्हणून नव्हे तर जीवितसाफल्याकरितां योग्य (विहित) आचार म्हणून करीत. तथापि देवळांत जाऊन नाक घासावयाचें व कथापुराणें व अनुष्ठानें आवडीनें करावयाचीं या मार्गाचें त्यांनीं कधींही अवलंबन केलें नाहीं. कोणी ब्राह्मण त्यांजकडे आल्यास त्यास ते मोकळ्या मनानें दक्षणा देत. पण त्यास ते अगोदर सांगत कीं देवळांत जाऊन कांहीं पूजाअर्चा करा. पुण्यांतील संस्कृत पाठशाळेसारख्या संस्थांस ते विपुल द्रव्य देत, तें प्राचीन विद्या व संस्कृति यांजविषयीं त्यांचे अंतःकरणांत जें निस्सीम प्रेम असे त्यामुळें देत. पण त्यांतील मतां-वर व संप्रदायांवर त्यांची भोळेपणाची श्रद्धा अशी नसे. आर्यसमाज आणि प्रार्थनासमाज यांसारख्या चळवळी नवीन प्रकारची धर्मजागृति उत्पन्न करण्याचे जे प्रयत्न करीत आहेत त्यांजविषयीं त्यांची मनः-

पूर्वक पूर्ण सहानुभूति असे. ईश्वरचंद्र विद्यासागरासारख्या सुधारका-विषयीं त्यांचे मनांत तात्विक पूज्यभाव असे. आपले मृत्यु-पत्रांत थीस्टिक ॲसोसिएशन ( प्रार्थनासमाज ) आणि प्रोफेसर कर्वे यांचा 'अनाथ बालिकाश्रम' यांसारख्या संस्थांस विपुल मदत त्यानीं दिली आहे, या गोष्टीची आपणांस आठवण असेलच. त्यांचे चुलतबंधु राजश्री गोविंदराव काणे यांस त्यांच्या ह्या मनोभावाचें मजपेक्षां अधिक परिज्ञान आहे. ते मला असें लिहून कळवितात कीं त्यांचे स्वतःचे मनांत खिश्चन धर्माविषयीं व धर्मतत्त्वाविषयीं जी भक्ति एके काळीं जडली तिचें कारण खुद्द डॉ. काणे हे होते. ते म्हणतात, डॉ. सदाशिवराव काणे हे एकेश्वरोपासक होते. आणि एकांतांत बसून सृष्टिनियंत्या प्रभूचें ध्यान करणें हें त्यांस फार आवडत असे. आपल्याभोंवतीं जें विशाल विश्व विद्यमान आहे त्यापासून त्यांस निरंतर धार्मिक आणि नैतिक प्रेरणा मिळत असे. अलीकडे सर्वेश्वरवादाकडे त्यांच्या मनाचा कल झाला होता. परंतु अंतर्यामांतील बुद्धि नामक चित्कला ही महा-शक्ति आहे असें ते मानीत, आणि अठराव्या शतकांत फ्रान्स देशांत जे बुद्धिवादासच प्राधान्य देणारे तत्त्वज्ञानी उदयास आले त्यांज-विषयीं त्यांचे मनांत अंतःकरणापासून आदर वसत असे याच तत्त्वज्ञान्यांनीं विचाराच्या पर्यवसानीं बुद्धिदेवतेची स्थापना नवें मंदिर बांधून त्यांत केली आणि तिजवर पूर्ण भरंवसा ठेवून आपली आयुष्यक्रमणा केली. मानवी आत्म्यास प्राप्त होणारा परलोक आहे असा डा. काणे यांचा दृढ भरंवसा होता. शेवटच्या दुख-ण्याचे वेळीं अंतींअंतीं समाधान करण्याकरितां ते मला एकदां म्हणाले कीं, परलोकच्या रम्य काठावर आपण पुन्हां एकमेकांस भेटूं. त्या वेळीं "आत्म्याच्या अमरत्वाचीं गूढ प्रमाणें" Intimations of

Immortality या नांवाचें वर्डस्वर्थ कवीचें अत्यंत सुंदर गीत आहे तें त्यांच्या मनांत घोळत असावें असें मला वाटतें.

इतक्या कमी वयांत देवाची शेवटची आज्ञा त्यांस झाली ती त्यांनीं वीराप्रमाणें शिरसा मान्य केली, याचें कारण वर सांगितलेल्या सिद्धांतांवर त्यांची पूर्ण निष्ठा होती, हें सांगण्याची गरज नाहीं. ईश्वराविषयीं आणि मानवांविषयीं आपलें कर्तव्य आपण मनोभावें केलें आहे असा आत्मप्रत्यय ठेवून, सर्व भार प्रभूवर टाकून, ते शांतचित्तानें, साधारण प्रवासास जाण्यास मनुष्य तयार होतो त्याप्रमाणें, परलोकयात्रा करण्यास तयार झाले. मृत्युसमयीं त्यांच्या शय्येजवळ जी प्रियकर नातेवाईक मंडळी होती त्यांचे अंतःकरणांतही आपल्या ईश्वरार्पणबुद्धीची आणि धैर्याची प्रेरणा व्हावी म्हणून त्यांनीं प्रयत्न केला. त्यांच्या इतक्या समाधानानें आणि सुखानें ज्यानें मृत्यु स्वीकारिला असा दुसरा मनुष्य सांपडणें कठीण. शेवटच्या वेदनांपैकीं, सावध असतां, एक अत्यंत तीव्र वेदना झाली, तेव्हां त्यांचे मुखांतून एवढाच उद्गार निघाला:—"आणखी एक वेदना, आणखी एखादी कळ—आणि ईश्वराचे मंदिरांत माझा प्रवेश होईल आणि तो मला भेटेल." जर ईश्वर जगांत आहे आणि त्याजकडून अशा अनुपम सद्वर्तनाबद्दल अनुपम देणग्या मिळत असतील तर आपणांस अशी खात्री धरण्यास हरकत नाहीं कीं, डॉ. काण्यासारख्यांच्या आत्म्याचा त्याजकडून आदर होऊन त्यास प्रसादचिन्हाची देणगी उदार हस्तानें दिली जाईल.

नम्रत्वेनो न्नमन्तः परगुणकथनैः स्वान्गुणान्ख्यापयन्तः ॥
स्वार्थान्संपादयन्तो वितत बहुतरारम्भयन्ताः परार्थे ॥
क्षान्त्यै वाक्षेप रुक्षाक्षर मुखरमुखान्दुर्मुखान्दूषयन्तः ॥
सन्तः साश्चर्यचर्या जगति बहुमताः कस्य नाभ्यर्चनीयाः ॥

## कैलासवासी डॉ. सदाशिव वामन काणे यांच्या सन्मानार्थ आर्यन सोशिअल युनियनच्या पुरस्कृततेनें मुंबई येथील हिंदुसमाजाच्या शनिवार ता. ९ जून १९०० रोजीं भरलेल्या सभेचें संक्षिप्त इतिवृत्तः—

मुंबई येथील 'आर्यन् सोशल यूनिअन सभे'च्या विद्यमानें मुंबई येथील हिंदुसमाजाची जाहीरसभा आर्यसमाजाच्या इमारतींत कैलासवासी डॉ. काणे यांच्या स्मृतीचा आदर करण्याकरितां ता. ११ जून १९०० ई. रोजीं शनिवारीं भरली होती. तिचें इतिवृत्त इंदुप्रकाशाच्या पुढच्या अंकांत प्रसिद्ध झालें होतें; त्यांत थोडाबहुत फेरफार करून व थोडा नवीन मजकूर घालून तें वृत्त खालीं देण्यांत येत आहे:—

आर्यन् सोशल युनियन सभेचे सेक्रेटरी रा. सुंदरलाल जी. वर्मा यांच्या प्रयत्नांनीं डॉ. काणे यांच्या सुमंगल जीवात्म्याच्या स्मरणार्थ व यथायोग्य सन्मान देण्याकरितां मुंबईतील नागरिकांची वर निर्दिष्ट केलेली सभा भरलेली होती. त्या सभेचेयोगें मुंबईनें कांहीं अंशीं आपली डॉ. काण्यासंबंधींची ऋणमुक्तता संपादिली. "कांहीं अंशी" हे शब्द आम्ही बुद्धिपुरस्सर योजिले आहेत. सभेंत बरीच सभ्य मंडळी जमली होती. तथापि समाज अशा प्रसंगीं जितका भरगच्च असावयाला पाहिजे होता तितका नव्हता. मित्रत्वामुळें अथवा कृतज्ञतेमुळें म्हणा, किंवा अशा प्रसंगास मान द्यावा ह्या वरिष्ठ तत्वामुळें म्हणा, हजर राहणें ज्यांचें कर्तव्य होतें, असे पुष्कळ गृहस्थ हजर नव्हते, हें पाहून आम्हांस खेद वाटला. जो समाज आपल्या मृत महात्म्यांचा आदर करण्यांत

यथायोग्य उत्साह दाखवीत नाहीं, तो समाज हतभागी समजला पाहिजे. नामदार रा.रा.नारायणराव गणेश चंदावरकर यांची अध्यक्ष-स्थानीं योजल्या झाल्यावर आपल्यांतून नुकतेंच ज्यांनीं प्रयाण केलें त्या प्रियकर साधुसम डॉक्टर मित्राच्या चरित्राविषयीं व स्वभावाविषयीं लिहून आणलेला निबंध राजश्री दामोदर गणेश पाध्ये यांनीं वाचून दाखविला. डॉक्टर व्हैगास हे आर्य नसतां आले होते. आणि सर्व सभेचें काम संपेपावेतों हजर होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राजश्री पाध्ये यांचा लेख आम्हीं दुसरीकडे छापून प्रसिद्ध केला आहे. त्याच्या उत्तमत्वाबद्दल वेगळें सांगावयास नको. त्यांत दोन गुण होते; गुण-ग्राहकता व प्रेम. याशिवाय त्यांत विवेचक बुद्धि होती. अर्थात् तो सभासदांस फार मानवला. ज्यांचा ज्यांचा डॉ. काणे यांशीं परिचय होता ते सर्व कबूल करतील कीं त्यांचें जें शब्दचित्र या निबंधांत काढलें आहे, त्यांत लेशमात्र अतिशयोक्ति नाहीं. डॉक्टर काणे यांच्या मृत्यु-पत्राचाच विचार केला तर मन प्रश्न करील कीं, असा कोणता मनुष्य आहे कीं ज्यानें, अर्धांगी भार्या व कन्या विद्यमान असतां, आपल्या जिंदगीचा एक तृतीयांश भाग दूरदूरच्या नातेवाईकांस देऊन टाकिला आणि दुसरा एक तृतीयांश लोकोपयोगी धर्मकार्यास लाविला ? आणि जिवंत असतां ज्यांनीं आपला हात दानधर्मांत सढळ ठेविला होता त्यांनीं शेवटीं असें करावें हें अपूर्वच होय. डा० काण्यांच्या स्वभावां-तील हें उत्तम लक्षण राजश्री पाध्ये यांच्यामागून राजश्री खोटे आणि राजश्री दळवी यांचीं भाषणें झालीं, त्यांत चांगलेंच व्यक्त झालें. त्यांनीं पुढील ठराव सभेपुढें मांडून त्यास पुष्टि दिली, आणि तो सर्वा-नुमतें मान्य झाला—

" असा ठराव करण्यांत येतो कीं 'आर्यन सोशल यूनिअन'च्या विद्यमानें ही मुंबईतील हिंदुसमाजाची सभा डाक्टर सदाशिव वामन काणे एल्. एम्. ॲंड. एस्. यांच्या मृत्यूबद्दल आपणांस झालेलें पराकाष्ठेचें दुःख प्रदर्शित करीत आहे. डाक्टर काणे हे ज्याप्रमाणें आपल्या धंद्यांत नामांकित होते, त्याप्रमाणें त्यांच्या आंगच्या सामाजिक सद्गुणांबद्दलही त्यांची ख्याती होती. दीन आणि अकिंचन यांचे खरे मित्र, विद्येचे परमभक्त, सुशिक्षितांचे आदर्श, विचारांत उन्नत पण राहणींत साधे, दयेचा खरा जिव्हाळा बाळगणारे, असे ते होते. आणि आणखी असा ठराव करण्यांत येत आहे कीं या सभेच्या अध्यक्षांस अशी विनंती करावी कीं त्यांनीं या ठरावाची एक प्रत कै० डाक्टर यांच्या पत्नीकडे पाठवावी."

हा ठराव पुढें आणतांना रा. सुंदरनाथ खोटे यांनीं हृदयद्रावक भाषण केलें. त्यांत, सर्व भार परमेश्वरावर टाकून डा० काणे यांची वृत्ति शान्त व प्रसन्न असे, त्यांच्या वर्तनांत व स्वभावांत परोपकारबुद्धि सदैव दृग्गोचर होत असे, आणि त्यांच्यांतील भूतदयेचा झरा सुखदुःखांत समानत्वेंकरून अखंडित वाहत असे, या गुणांचें त्यांनीं विशेषेंकरून प्रतिपादन करून सांगितलें कीं, "एके वेळीं कांहीं मित्रांसह मी त्यांस त्यांच्या आयुष्याचे शेवटील काळांत भेटावयास गेलों होतों; तेव्हां आपल्या विषयीं आपल्या मित्रमंडळीस जी तसदी झाली ती पाहून त्यांस फार वाईट वाटलें. आणि ते म्हणाले कीं, "मजविषयीं इतके मित्र व हितचिंतक खरा कळवळा बाळगीत आहेत हें पाहून मी सुखानें देह ठेवीन." नंतर डॉक्टर काणे यांच्या धर्मादायाविषयीं, त्यांच्या प्रत्यक्ष पाहण्यांत एक गोष्ट आली होती तिचें त्यांनीं वर्णन केलें, तें

असें: नाशिक येथील आरोग्यालयांत राहात असतां एक गरीब आणि फाटकीं वस्त्रें ल्यालेलें जोडपें त्यांच्याकडे औषधाकरितां आलें. चौकशी अंतीं डॉक्टर यांस कळलें कीं, तें जोडपें फार लांबून आपल्या गांवांहून पायीं चालत येऊन उपाशी होतें. डॉक्टर काणे यांनीं त्यांस प्रथम जेवण देऊन नंतर औषध दिलें आणि एक आठवडाभर त्यांस आपल्या बिऱ्हाडीं ठेवून घेऊन त्यांच्या अन्नवस्त्राची आणि औषधोपचाराची तरतूद फुकट केली. हें एकच उदाहरण अनेक ग्रंथांच्या ठिकाणीं आहे असें खोटे यानीं सांगितलें, तें बरोबर नाहीं असें कोण म्हणेल ? या ठरावास पुष्टि देतानां राजश्री दळवी म्हणाले कीं, या क्षणीं मला असें वाटतें कीं, बोलण्यापेक्षां मौन धारण करणें हेंच ज्यास्ती श्रेयस्कर आहे. आज संध्याकाळीं ज्यांच्या निधनाविषयीं दुःखप्रदर्शनार्थ आपण सर्व जमलों आहों, त्या परमपूज्य मित्राच्या उदात्तत्वास एखादा शब्द गैरवाजवी उच्चारल्यानें किंवा इकडे तिकडे पडल्यानें कमीपणा येण्याचा संभव आहे. ते सत्यप्रिय आणि सत्वशील होते; आणि एक कवि म्हणतो त्याप्रमाणें त्यांच्यासारख्या सज्जनाचेंही आपल्या इच्छेविरुद्ध आपणांस विस्मरण पडणारच. तथापि प्राचीन म्हण आहे तीप्रमाणें आपण निरंतर आपलें व दुसऱ्याचें शील बनवीत असतों, हें विधान खरें असल्यास, डॉ. काणे यांसारख्या मित्राकडून व इतरांकडून आपल्या शीलास जी उत्साहशक्ति प्राप्त होते तिचा कधींही नाश व्हावयाचा नाहीं. त्यांसारखे सज्जन या जगतीतलावर अवतीर्ण झाले नाहींत तर आपल्या अंतःकरणांस आणि वासनांस कधीं उन्नति प्राप्त व्हावयाची नाहीं.

डॉक्टर काणे हे खरोखरीच दैवी पुरुष होते. त्यांचा खरेपणा शुद्ध बावनकशी सोन्यासारखा असे; आणि कारलाईलच्या मतें प्रांजल सत्य हेंच वीरांचें मुख्य लक्षण होय. डॉक्टराच्या नमुन्याचीं माणसें यत्किंचित् डंका न वाजवितां आपलें कर्तव्य करीत असतात आणि संसाराच्या उच्चनीच अशा निरनिराळ्या टापूंत ते मोठ्या धैर्यानें प्रपंचांतील संग्रामाशीं भिडत असतात. मोठ्या प्रतापी वीरांच्या चरित्रापासून आपणांस जो उपदेश मिळतो त्यापेक्षां त्यांच्या चरित्रापासून मिळणारा उपदेश कोणत्याही प्रकारें कमी महत्त्वाचा नसतो. संसारांतील खालच्या कक्षांत संक्रमण करणाऱ्या माणसांस जीं संकटें भोगून उल्लंघावीं लागतात, तीं थेट आपल्या अंतःकरणांत बिंबतात. कारण त्यांवर आलेले प्रसंग व सुयोग आपणांस आपलेसे वाटतात. प्रोफेसर पाध्ये यांनीं डॉक्टर काण्यांच्या धर्मादायाची याद आपणांस वाचून दाखविली. आणि त्यांच्या स्वभावांतील औदार्य सहृदयतेनें उघड करून दाखविलें. डॉ. काणे यांचा द्रव्यसंचय फार नव्हता, पण जो थोडाबहुत होता तो वांटून देण्यांत जी सामाजिक जबाबदारीची नजर दिसली ती अत्यंत सूक्ष्म होती, असें कोणींही कबूल केल्यावांचून राहावयाचा नाहीं. गतप्राण्यांची कोणीही निंदा करूं नये हें खरें; पण मुंबई येथें आलीकडे पुष्कळ श्रीमंतांचीं उदाहरणें दाखवितां येतील कीं ज्यांच्यांत या जबाबदारीची जाणीव बिलकुल दिसली नाहीं. आपल्या जवळ जी संपत्ति असेल ती योग्य रीतीनें वांटून देण्याची नैतिक जबाबदारी आपले शिरावर आहे; आणि आपल्या मनाच्या कार्पण्यदोषानुरूप धर्मादायाच्या विषयांची हेळसांड करणें प्रशस्त नाहीं असें समजणारे विरळा. डॉ. काणे यांच्या

चरित्रांतील शुद्ध निर्लोभ वर्तन या गुणाचें तर मोल करितां येत नाहीं, असें म्हटलें असतां चालेल. आणि तशांत डॉक्टरी धंद्याचे मार्गांत मोहजाल पसरलेलें असतें, आणि तोंडास पाणी सुटण्याचे प्रसंग अतोनात असतात, ही गोष्ट लक्षांत आणिली असतां त्यांनीं लोभ जिंकला होता याबद्दल तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. म्हणून हें योग्यच आहे कीं अशा सच्छील, सत्यप्रिय, आणि निर्मल अंतःकरणाच्या साधुपुरुषाच्या निधनाबद्दल आपणांस दुःख वाटत आहे.

नामदार चंदावरकर यांनीं सभेचें काम संपवितांना जें भाषण केलें तें अत्यंत उपदेशपर, वक्तृत्वपूर्ण व मनावर ठसणारें असें होतें. डॉक्टर काणे यांस कवितेची अभिरुचि फार होती, आणि कोणत्याही रसाच्या आविर्भावानें त्यांचें अंतःकरण विरघळून जात असे. महासागराचें भव्य स्वरूप व पर्वताची रम्य शोभा पाहून आणि दऱ्याखोऱ्यांतून झुळझुळ वाहत जाणाऱ्या निर्झरोदकाचा मंजुळ ध्वनि ऐकून त्यांचे मनांत परमपूज्य भाव उत्पन्न होत असे. या मानसिक गुणावर नामदार चंदावरकर यांनीं मनोहर विवेचन केलें. त्यांनीं प्रश्न केला कीं, मनुष्य आणि पशु यांत अंतर आहे, तें कशामुळें? मनुष्यांत वाक्शक्ति आहे, म्हणून म्हणावें, तर त्या वाक्शक्तीमुळें आपण आपणांस पशूहून पशु बनवूं शकतों. मनुष्यांत बुद्धि असते म्हणून म्हणावें तर बुद्धिबलानें पशूंत कधीं आढळणार नाहीं, अशा पापाचरणांत आपण जाऊन पडतों. सहृदयता किंवा रसिकता ज्याला म्हणतात, त्यामुळें मनुष्य पशूपासून भिन्नता पावतो हें जरी खरें, तरी व्यवहारांत हुशार किंवा दक्ष म्हणविणारे लोक प्रेमळ रसिकांस तुच्छ मानितात. पण त्यापासून ते सरतेशेवटीं आपल्यासच तुच्छ करून

घेतात, हें त्यांस समजत नाहीं. ज्यांत कवित्व किंवा रसिकता असते तोच मनुष्य उदार व दयाळू होऊं शकतो. त्यासच दीनांची दया येते आणि तोच बुद्धिप्रकाशानें भोळसरपणाच्या तडाक्यांतून सुटूं शकतो; आणि महात्मे ज्या भक्तीनें कर्तव्याची उपासना करितात, त्याच भक्तीनें तो तिला पूजितो. हा परम श्रेयस्कर गुण डाक्टर काणे यांत अधिक होता, आणि स्वभावतः त्यांच्या अंगीं जे बहुविध सद्गुण होते, त्यांचा मूळ झरा प्राधान्यें करून हाच गुण होय. म्हणून डाक्टर काणे यांच्या सद्‌गुणांच्या किल्ल्या कवित्व व रसिकता या होत्या. याप्रमाणें चंदावरकर यांनीं विवेचन केलें, आणि त्यांत बरेंच तत्त्व आहे असें कोण ह्मणणार नाहीं! निर्दयाचें अंतःकरण पाषाणमय असलें पाहिजे; आणि जर त्याच्या अंतःकरणांत कवित्वाचा ओलावा नसेल व ईश्वर सर्व विश्वाचा पिता आहे ह्मणून सर्व विश्व एक कुटुंब आहे, हें लक्षांत आणून जो सृष्टींतील अत्यंत क्षुद्र प्राण्याशींही आपलें बंधुत्वाचें नातें आहे हें ओळखीत नाहीं, त्याच्यांत तें उन्नतनीतीचें परिज्ञान कोठून उदय पावणार? जेणेंकरून दीन दुबळ्यांविषयीं खरी प्रांजल दया उत्पन्न होते किंबहुना सर्व प्राणी स्वजन वाटून त्यांवर प्रेम जडतें—हें नीतितत्व त्यांस कसें कळणार? मनुष्यकोटींत तीन जाति असतात: पहिला वर्ग आपमतलब्यांचा—ज्यांचें जीवितसर्वस्व आपल्या एकट्याचें सुख साधणें हें असतें. दुसऱ्या वर्गाचे लोक ते होत कीं ज्यांचा व्याप आत्मकेंद्राचें बाहेर पडून ज्यांची छाप दुसऱ्यावर पडते, आणि ज्यांचे हातून मोठाले पराक्रम घडतात. अशीं माणसें ग्ल्याडस्टन व क्रॉमवेल यांसारखी होत. यांशिवाय एक तिसरा वर्ग आहे. यांतील

माणसें मोठ्या मनाचीं असतात. पण त्यांचा मोठेपणा थोड्यांसच माहीत असतो. अज्ञात पर्वतांतून हळूच वाहणारा एखादा झरा जे त्याचेजवळ जाऊन त्यांतील शुद्धोदक प्राशन करितात त्यांसच माहित होतो. तशीच स्थिति माणसाच्या पारखीची असते. डॉ. काणे हे वर सांगितलेल्या तिसऱ्या वर्गांतील होते. अशा माणसापासूनच मनुष्यजातींत जे उदात्त आणि प्रेमपात्र गुण आढळतात ते उदयास येतात आणि हेच मानवी सद्गुणांचे पोषक व रक्षक होत, व त्यांच्यामुळेंच ते सद्गुण विकास व उन्नतता पावतात.

# कै. डॉ. स. वा. काणे.

## यांजविषयींचे

## प्रि. दा. ग. पाध्येकृत "लोणावळी व खंडाळा" ह्या अप्रसिद्ध काव्यांतील उद्गार.

इ. स. १८९३ सालीं, लोणावळें येथें डॉ. काणे, रा. रा. ह. सी. दीक्षित व प्रि. दा. ग. पाध्ये हे उन्हाळ्याचे सुट्टींत एकत्र राहत होते. त्या वेळीं मित्रत्रयांनीं, दुसऱ्या थोड्या मंडळीसह, सकाळपासून दुपारीं दोन-वाजेतों, दरी, खोरीं, डोंगरमाथ्यांवरून तेथील अनुपम्य वनश्री पाहण्यासाठीं केलेल्या एका दूरवरच्या सहलीची हकीकत वर निर्दिष्ट केलेल्या कवितेंत आहे. त्यांतून खालील दोन अवतरणें दिलेलीं आहेत. डॉ. काणे यांस आबा ( साहेब ) व रा. दीक्षित यांस भाऊ ( साहेब ) असें म्हणत, त्याच शब्दांनीं त्यांस कवितेंत संबोधिलें आहे. "मोरुद्वय" म्हणून उल्लेख केलेल्या दोन व्यक्तींपैकीं एक रा. हरी सिताराम दीक्षित यांचे पुतणे म्हणजे नागपुरांत राहणारे सध्यांचे नामदार मि. मोरेश्वर राजाराम दीक्षित हे होत.

लोणावळें येथील ह्या खेपेची वस्ती विशेष कौतुकास्पद झाली, नव्हती; तथापि इतक्यांत आपले स्नेही डॉ. काणे तेथें येऊन त्यांनीं मनाचें स्थित्यंतर करून अपूर्व रसिकता जागृत केली असें सांगून, कवि आपल्या मित्राचें वर्णन करितो:—

**विद्वान्, सुधी,* सुजनताविनयाद्युपेत ॥**
**लोकप्रिय, प्रथितकीर्ति, महा उदात्त, ॥**
**प्रेमार्द्रदृष्टि सकलांवरि सर्वदाही, ॥**
**साधा तसा सरळ, वक्र कुणा न पाही ॥ १ ॥**
**पेशा जयें निवडलाहि परोपकारी, ॥**
**कर्तव्य जो विसरला न कधीं विचारी; ॥**

---

* प्रसिद्ध कीर्तीचा.

न्यूनत्व एकचि मला दिसतें जयांत ॥
कीं सौष्टवातिशयता[1] वसते तयांत ॥ २ ॥
तत्स्नेह वृद्ध[2] नव्हता, म्हणवूनि त्याची; ॥
होती न ओळख पुरी मजलागिं साची ॥
होते जरी गुण बहूत तदीय ठावे; ॥
भांडारं[3] एकदम सर्व कसें कळावें ? ॥ ३ ॥
कीं वस्तुशास्त्रनिपुणीं रसिकत्व-वस्ती ॥
नाहीं अशी मम जुनी समजूत होती-॥
कीं इंद्रियावगततान[4]च जिथें प्रमाण ॥
तें कल्पनेस कविच्या कुठुनी ठिकाण ? ॥ ४ ॥
त्यांतून जे शिकति वैद्यक आंग्ल त्यांचें ॥
राहील केंवि रसिकत्व, कळे न साचें; ॥
केले पृथक्करण[5] नित्य जयीं शवाचें ॥
ते केंवि जाणति विचार गमे कवींचे ? ॥ ५ ॥
वैद्यकशास्त्रीं तैसा अग्रेसर तो पदार्थशास्त्रांत; ॥
मन्मित्र अध्ययनरत, नित्य तया आवडेहि वेदांत ॥ ६ ॥
ठाउक हें मज होतें, होती समजूत म्हणुनि फार दिन—॥
कीं तद्हृदय विशेष न रसिकत्वाचें असेल तें स्थान॥ ७ ॥
ज्ञानार्थ त्याजपाशीं जावें वादार्थ, तेंविं शिकण्याला; ॥
शिकवील तो कवित्वा ऐसें कधींही न वाटलें मजला ॥ ८ ॥
खोटी परी समज हे कळलें मनाला; ॥
आनंदलाभच गमे बहु हा तयाला ॥

---

१ मधुरपणाचा अतिरेक. २ पूर्ण वाढलेला. ३ गुणांचें भांडार. ४ इंद्रिय-द्वारा ज्याचें ज्ञान होऊं शकते व तद्द्वाराच ज्याच्या खरेखोटेपणाचा निवाडा होऊं शकतो तेंच "प्रमाण" अथवा सत्य ( बाकीचें सर्व मनोभ्रम ) असे ज्या वस्तुशास्त्रनिपुणांस ( Scientists ) वाटतें त्यांच्या मनांत कविकल्पनेला स्थळ कोठून मिळणार असा भावार्थ. ५ " Dissection. "

ऐसे सदैवहि नवे गुण मत्प्रियांत ॥
मातें कळोत ! परमावधि सौख्य त्यांत ॥ ९ ॥
आबा ! तुम्हांसहित जी पहिली प्रभात ॥
गेली विहार करण्यांत मुदें वनांत, ॥
तीची न विस्मृति कधींहि घडेल मातें; ॥
तेव्हांच येथ मज सृष्टि मिळे नवी ते ॥ १० ॥
झाली अमूल्य सुखदा मज ते प्रभात; ॥
[1]आतृप्ति दृष्टि रमली रमणीयतेंत; ॥
नानाविधा नव बघोनि वनश्रियांला ॥
निर्वाणसौख्यसम सौख्य मिळे मनाला ॥ ११ ॥

* * * *

सदरहू सहलींत पाहिलेल्या सृष्टिसौंदर्याचें वर्णन करून मग कवि आपल्या डॉक्टर मित्राविषयीं उद्गार काढतो:--

ते दिवशीं आबांच्या चापल्यें, वर्णनीय हौसेनें, ॥
झालों थक्क, अपूर्वहि शोधकतेनें तसें रसिकतेनें ॥ १२ ॥
हरिणापरी झरारा चाले, मारी कड्यावरोनि उड्या, ॥
लावी म्हणावयाला "थांबा हें साहवे अम्हां न गड्या" ॥ १३ ॥
पाणीदार जसा हय[2] आवरतां येत नाहिं रश्मीला[3], ॥
आम्हांसाठींही पद मन वा रोधावया नये त्याला ॥ १४ ॥
दावी मजा इकुडची; पक्षांचें आयका, म्हणे, गान; ॥
सुतरुच्छाया वर्णी; रम्यत्वाची, ह्मणे, इथें खाण ॥ १५ ॥
फलनत[4] तरूंस बघतां काठ्या पाडावया फळां मारी; ॥
निर्मांसाहाऱ्यांची हीच अनिर्दय, वदे, शिकार बरी ॥ १६ ॥
जें जें दृष्टिस येई मानुनि आनंद सृष्टिचा भक्त ॥
काढी तयांत गूढ; प्रभुच्या लीले नसे, ह्मणे, अंत ॥ १७ ॥
कुशलां पिपीलिकांनीं[5] रचिलेल्या वारुळाहि पासोनी ॥
उच्चगिरीपावेतों सकल बघे प्रेमपूर्ण नयनांनीं ॥ १८ ॥
निर्जीव-सजीवांचें, अल्प-महाचें, करी गुणस्तवन; ॥
वाटे ईश्वरलीलाकीर्तन दुसरें जगांत यासम न ॥ १९ ॥

---

१ तृप्ति होईतों. २ घोडा ३ लगामाला. ४ फळांनी वाकलेल्या. ५ मुंग्यांनी.

विसरे न मानवी ही बुद्धीचा तो प्रभाव वर्णाया; ॥
मनुजहि ईश्वरकृति तो; कारण तत्कृतिहि[1] ईश वानाया ॥२०॥
वर्णूं किती तरी तो स्वर्गसुखानंद, तें समाधान ! ॥
झालों आबा, भाऊ, मोरूद्वय, मीहि फार तल्लीन ॥ २१ ॥
आला बहुत वरि दिन, घरचे करतील काळजी व्यर्थ, ॥
म्हणुनी इच्छा नसतां उठलो कष्टेंच जावया परत ॥ २२ ॥
होतों प्रसन्नमानस; थकवा आला परी शरीराला; ॥
तरि आलेल्या मार्गें परतावें हें रुचे न आबांला ॥ २३ ॥
घालूं प्रदक्षिणा या गिरिला, बोले, दुजी मजा पाहूं, ॥
मन तृप्त हें कराया आनंदें श्रम जरा अधिक साहूं ॥ २४ ॥
मोहक वचनां भुललों, आक्रमिला मार्ग दूरचा फार; ॥
विविध चमत्कृति पाहुनि झालों हृदयांत सर्वही गार ॥ २५ ॥
मार्गीं शिणतां केला आम्रफलांचा यथेष्ट आहार; ॥
पाणी एके ग्रामीं लाभे तें वाटलें सुधामधुर ॥ २६ ॥
श्रमलों, थकलों, शिणलों, रडकुंडी जीवही बहू आला; ॥
कळलें नसे मनाची गति अनिवारा अकुंठिता तनुला ॥ २७ ॥
आबा ताजेच परी; उत्साह कमी तदीय नच झाला ॥
मोरूद्वय बालांसहि लाविति खालींच ते पहायाला ॥ २८ ॥
होते वडील मजला, भाऊंलाही, बऱ्याच वर्षांनीं; ॥
संसाराचीं दुःखें अनुभविलींही बहूपरी त्यांनीं ॥ २९ ॥
इतुकें असूनि त्यांचा आणी आम्हांस लाज उल्हास; ॥
सविशेष प्रेमाचें फल इशाच्याच हें असे खास ॥ ३०
दुर्दैवानें झाली शिथिल जरी ते कितीहि धी अपुली ॥
रक्षागूढाग्निसम[2] केवल ती सुप्त जाणिजे झाली ॥ ३१ ॥
म्हणुनिच कष्टी, दुःखी, शांत, जगतत्रस्त जे अह्मां दिसले, ॥
आबांच्या नैसर्गिक सह्यश्रीनें[3] गुणांस जागविलें ॥ ३२ ॥
वंदावे सद्गुणते; तत्कर्त्या ईश्वरास मानावें; ॥
वाटे मला अधिक परि येथिल रयणीयतेस वानावें ॥ ३३ ॥

---

१ मनुजकृतिही. २ राखेंत झाकलेल्या अग्निप्रमाणें. ३ सह्याद्रीगिरीचें शोभेनें.



डॉ. काशीनाथ वामन काणे.

# कै. डॉ. काशीनाथ वामन काणे यांचें पद्यात्मक त्रोटक चरित्र.

हें चरित्र रा. रा. विष्णु गणेश नेने, यांनीं रचिलें व तें सन १८९२ सालीं छापून प्रसिद्ध झालें होतें. सदरहू पुस्तक कर्त्यांनीं डॉक्टर अण्णा मोरेश्वर कुंटे बी. ए. एम्. डी. यांस अर्पण केलें होतें, आणि सदरहू काव्यास दक्षिणा प्राइझ ( डेक्कन व्हर्नक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसायटी ) कमिटीनें बक्षिस दिलें होते.

सदरहू चरित्र पुनश्च या ग्रंथांत ग्रथित करण्याचे प्रसंगीं कर्त्यांनीं प्रस्तावनारूपी " चार शब्द " छापण्यास पाठविले ते खालीं दिले आहेत:—

शोच्य मृत्युलोकवास अथवा कै. डॉ. काशीनाथ वामन काणे यांचें पद्यात्मक त्रोटक चरित्र या नांवाचें सन १८९२ मध्यें छापलेलें व दक्षिणाप्राइझ् कमिटीचें बक्षीस मिळालेलें काव्य पुनः काव्यनायकांच्या तीर्थरूपांच्या चरित्रांतून छापून निघण्याचा सुप्रसंग आला आहे हें पाहून समाधान वाटतें. कै. डॉ. काशीनाथपंत व मुंबईतील प्रसिद्ध नागरिक कै. डॉ. सदाशिव वामन उर्फ बाळाभाऊ काणे या दोघांचे तीर्थरूप सुप्रसिद्ध कै. डॉ. वामन गोपाळ काणे यांचें शेवटलें शेवटलें, सर्व चरित्र मला प्रत्यक्ष पहावयास सांपडलें असल्यामुळें मला असें खात्रीनें सांगतां येतें कीं कै. डॉ. वामनरावतात्या मानवजातींतल्या उच्च कोटींतली एक व्यक्ति असल्यामुळें त्यांचें चरित्र सर्वथैव मनोरंजक, बोधप्रद व अनुकरणीय आहे. असें तें असूनहि पुस्तकरूपानें प्रकाशित व्हावयाचें अडीच तपांवर राहून गेलें हें जितकें आश्चर्यकारक आहे तितकेंच खेदजनक आहे. या चरित्राच्या प्रकाशनाच्या अभावीं सहृदय जनतेची व सच्चरित्रवाङ्मयाची मोठी हानि होऊन राहिली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. तथापि " अकरणान्मंदकरणं श्रेयः" या न्यायानें, ही उणीव उशिरां कां होईना, पण भरून काढण्याचें श्रेय अखेरीस कै. डॉ. वामनरावजींचे सख्खे पुतण्ये रा. रा. गोविंद नारायण काणे, वऱ्हाड-उमरावतींतले वकील, यांनीं घेतलें हें पाहून फार आनंद होतो. रा. गोविंदरावजी हे विद्वान् ग्रंथकार असून जन्मापासून रा. वामनरावजींच्या तिसऱ्या पुत्राप्रमाणेंच असल्यामुळें त्यांनीं त्यांचें सर्व धीरोदात्त चरित्र मार्मिकपणें पाहिलेलें आहे. अर्थात् तात्यांचे चरित्रकार होण्याचे आतां सर्वथैव हेच योग्य अधिकारी आहेत व त्यांनीं तें काम पुरें केलें हें पाहून फार समाधान वाटतें.

रा. गोविंदरावजींनीं आपल्या पूज्य पितृव्यांच्या चरित्रांतून रा. काशीनाथपंतांसंबंधानें मजकडून झालेलें उपरिनिर्दिष्ट अल्प काव्य फिरून छापून

काढण्याचा आपला निश्चय मला कळवून तें छापून निघते वेळीं मला तपासून पहावयास सांगितलें. त्याप्रमाणें करण्यापूर्वी, सत्तावीस वर्षांपूर्वीच्या व आतांच्या माझ्या दृष्टींत साहजिकच थोडा तरी फरक पडल्यामुळें मी आतांच्या दृष्टीनें अवश्य व शक्य ते अल्प स्वल्प फेरफार--मूळकाव्याच्या मजकुरांत फारसे नव्हेत—तर त्याच्या रचनेंत केले आहेत; ते असे कीं त्यांत राहून गेलेले थोडेसे दोष यथामति काढून टाकले आहेत; कांहीं श्लोक व श्लोकार्धें बदलून घातलीं आहेत व थोडे श्लोक नवीन घातले आहेत. एका विद्वान् व रसिक गृहस्थांच्या सूचनेवरून मूळकाव्यांतल्या टिपा वाढवून घातल्या आहेत. असे फेरफार मी मूळकाव्यांत आतां केल्याबद्दल कोणालाही वाईट वाटणार नाहीं, उलट बरेंच वाटेल, अशी आशा आहे. कोणत्याही कृतींत कांहीं दोष हे रहावयाचेच ह्मणून जे राहिले असतील त्यांबद्दल वाचक मला क्षमा करतील अशी आशा आहे.

या काव्यांत रचनेच्या सोईसाठीं कोठें कोठें **नाथ** हें संक्षिप्त नांव काव्यनायक **कै. डॉ. काशीनाथपंतां**बद्दल घातलें आहे.

**तात्या, राव** व **रावजी** हीं संक्षिप्त नांवें **कै. डॉ. वामन गोपाळ काणे**, **काशीनाथपंतांचे** वडील, यांच्याबद्दल कोठें कोठें घातलीं आहेत.

**भाऊ** व **आबा** हीं संक्षिप्त नांवें **कै. डॉ. सदाशिव वामन उर्फ बाळाभाऊ काणे, काशीनाथपंतांचे** सख्खे वडील बंधु, यांच्याबद्दल कोठें कोठें घातलीं आहेत.

**राम** व **रूपजी** हीं संक्षिप्त नांवें **कै. रा. रामनाथ भाई रूपजी, काशीनाथपंतांचे मेडिकल कॉलेजांतील** सहाध्यायी मित्र, यांच्याबद्दल कोठें कोठें घातलीं आहेत.

मुंबई—गिरगांव बॅकरोड.
ता. १–४–१९१८.

सर्वांचा नम्र सेवक,
**विष्णु गणेश नेने.**

---

# प्रस्तावना.

( ग्रंथ प्रथम छापला त्या वेळेची )

वास्तविक पहातां, या लहानशा पद्यात्मक ग्रंथाला प्रस्तावनेचें कांहीं कारण नव्हतें. परंतु, कोणतेंही चरित्र, या एकुणिसाव्या शतकांत तरी निदान, पद्यापेक्षां गद्यांतच लिहिणें अधिक इष्ट आहे, कारण त्यांतच तें सविस्तर व सुलभतर होतें, असें असून, हें चरित्र मीं पद्यांत कां लिहिलें, असा जो एक आक्षेप निघूं शकतो त्याच्या निरसनाच्या हेतूनें मी ही लहानशी प्रस्तावना लिहिली आहे. या आक्षेपाचें निरसन पुढील गोष्टीवरून होण्यासारखें आहे कै. डॉ. **काशीनाथपंत** म्हणजे प्रस्तुतच्या काव्यांतील चरित्रनायक हे माझे अगदीं लहानपणापासूनचे मित्र होते. पूर्वविद्याक्रमांत बराच काल ते व मी सहाध्यायी होतों. अर्थात् आम्हा उभयांमध्यें कांहीं विशेष प्रकारचा स्नेह होता, व एक दोन प्रसंगीं त्यांचे मजवर मोठे उपकारही झालेले होते. अशा प्रकारचा त्यांचा माझा मित्रसंबंध असतां, त्यांच्या मृत्यूची भयंकर वार्ता मी श्रीसिद्धपूरच्या यात्रेहून परत मुंबईस येतांच एकाएकीं माझ्या कानीं पडल्याबरोबर माझ्या मनाची स्थिति कशी झाली असेल तिची पूर्ण कल्पना, ज्यांना तसल्या स्थितीचा अनुभव आला असेल त्यांसच करतां येईल. निसर्गतः कवितेकडे माझा विशेष कल असल्यामुळें, शोकभरांत माझ्या तोंडावाटे **काशीनाथपंतां**संबंधानें जे दुःखोद्गार निघत त्यांस कवितारूपांत गुंफण्यास मला विशेष श्रम पडत नसत. अशा प्रकारच्या कांहीं कविता, निवळ माझ्या स्वतःच्या उपयोगासाठीं व समाधानासाठीं, मी प्रसंगोपात्त टिपून ठेवल्या होत्या, परंतु त्या टांचून ठेवतेवेळीं **काशीनाथपंतां**चें चरित्र लिहिण्याचें माझ्या मनांत मुळींच नव्हतें. तथापि सदर्हू कवितांपैकीं कांहीं कविता माझ्या कांहीं मित्रांच्या नजरेस पडल्यावरून, मी **काशीनाथपंतां**चें निर्मल व अनुकरणीय चरित्र गद्यांत सविस्तर लिहून त्याचा लाभ सर्व सहृदय जनतेस करून द्यावा असा त्यांनीं मला आग्रह केला. तेव्हां माझ्याही मनांत ती गोष्ट भरली, परंतु त्यांचें चरित्र

गद्यांत सविस्तर लिहिण्यास त्यांचे सर्व दैनिकवृत्तलेख उपलब्ध असावयास पाहिजे होते, पण ते तसे उपलब्ध नव्हते, तथापि, गद्यांत त्यांचें सविस्तर चरित्र लिहिण्याचें साधन नाहीं ह्मणून, त्यांच्या संबंधाच्या जवळ असलेल्या कवितांचा होईल तितका उपयोग करून त्यांचें त्रोटक चरित्र पद्यांत लिहिलें असतां वाउगें होणार नाहीं असें वाटल्यावरून त्याप्रमाणें केलें आहे. तरी पण वास्तविक पहातां या काव्यास चरित्रात्मक काव्य ह्मणतां येईल कीं नाहीं याची शंका आहे, कारण यांतलें चरित्र फारच त्रोटक असून चरित्रग्रंथाच्या पद्धतीस तंतोतंत अनसरून लिहिलेंलें नाहीं. अतएव यास चरित्रकाव्य ह्मणण्यापेक्षां शोकरसप्रधान काव्यच ( इंग्रजींत ज्यास Elegy किंवा Elegiac poem ह्मणतात त्याच्या धर्तीवर लिहिलेलें काव्य ) ह्मणणें बरोबर होईल. पद्यात्मक काव्यास गद्यप्रस्तावना कशास हवी असाहि एक प्रश्न येऊं शकेल त्याचेंही उत्तर थोडक्यांत देतां येईल. ग्रंथ लिहिण्याच्या हेतूचें स्पष्टीकरण जसें गद्यांतल्या प्रस्तावनेनें होतें तसें पद्यात्मक उपोद्घातानें होत नाहीं. शिवाय, ग्रंथसंबंधी कांहीं अवश्यक गोष्टींचा उल्लेख गद्यप्रस्तावनेंत करण्याचा शिष्टसंप्रदायच झाला आहे, त्यास अनुसरून ही प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेचा हेतु वर निर्दिष्ट केलेल्या आक्षेपांचें निरसन करणें हा होय. त्याप्रमाणें त्या आक्षेपांचें निरसन वर केलेंच आहे. शिष्टसंप्रदायाप्रमाणें ज्या अवश्यक इतर गोष्टींचा उल्लेख करावयाचा त्या गोष्टी पुढें नमूद केल्या आहेत.

ज्या मोठ्या अडचणीच्या भीतीनें हें काव्य लिहिण्यास मी कांकू करीत होतों, व हें मी लिहीत असतांनाही, ज्या पुढें येणाऱ्या मोठ्या अडचणीचा प्रतिकार कसा करावा हें मला समजत नव्हतें, ती मोठी अडचण, कै० डा० **काशीनाथपंतांच्या** एका जिवलग स्नेह्यानीं हें काव्य आपल्या प्रिय मित्राचें अल्प स्मारक आहे असें समजून, आपल्या खर्चानें, मोठ्या आनंदानें छापून प्रसिद्ध केल्यानें अल्प मित्रसेवा बजावल्याचें श्रेय घेऊन, दूर केली, त्यांचे मी मनोभावें आभार मानतों. त्याचप्रमाणें, अवर्णनीय अशा बंधुशोकानें व्याप्तचित्त असूनही, व विलक्षण कार्यबाहुल्यामुळें थोडाही

विश्रांतीचा वेळ लाभत नसूनही, ज्या विद्वद्वर्य व सहृदय डाक्टर **सदाशिव वामन काण्यानीं** ह्मणजे चरित्रनायकांच्या ज्येष्ठ बंधूनीं आपलीं सर्व कामें बाजूस ठेवून वेळोवेळीं मला लागेल ती माहिती दिली, व इतर पुष्कळ प्रकारांनीं साह्य केलें त्यांचेही आभार मनःपूर्वक मानणें हें माझें कर्तव्यकर्म आहे.

शेवटीं, या चरित्राच्या वाचनानें व प्रसारानें, लहान वयांत व थोड्य कारकीर्दींत, आमच्या काव्यनायकांनीं जे कांहीं अलौकिक गुण संपादन केले होते, व जे गुण ते कांहीं वर्षे अधिक वांचते तर निःसंशय जगत्प्रसिद्ध झाले असते, त्यांच्याकडे लोकांचें लक्ष्य वेधून त्यांपैकीं कांहीं आपण अनुकरणानें साध्य करावे इतकी जरी लोकांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली तरी मी हें वेडेंवांकडें चरित्र लिहिल्याचें पूर्ण सार्थक्य झालें असें समजेन,

सरतेशेवटीं या काव्यांत जे दोष घडले असतील त्यांबद्दल सर्व विद्वज्जनांनीं क्षमा करावी अशी त्यांस विनंति करून ही प्रस्तावना पुरी करतों.

**मुंबई-गिरगांव,**
ता० २६ जुलई सन १८९२.

सर्वांचा नम्र सेवक,
**विष्णु गणेश नेने**
**ग्रंथकर्ता**

श्री.

# " शोच्य मृत्युलोकवास "

अथवा

## " कै० डॉक्टर काशिनाथ वामन काणे यांचें पद्यात्मक त्रोटक चरित्र. "

### वृत्त " मंदाक्रांता."

काशीनाथा, जिवलग सख्या, सद्गुणांच्या अगारा,
तूं गेल्यानें, मम हृदिं* मिळे दुःखवन्हीस[1] थारा
हा दुःखाग्नि त्वरित धुमुनी, पेट वेऊनि कैसा
जाळी माझें हृदय बघ, बा, रान दावाग्नि[2] जैसा १
वेळोवेळीं नयन तुजला इच्छितातीं पहाया
वारंवार श्रवण[3] तुजला इच्छितातीं श्रवाया
सायंप्रातः[4] स्मरण घडतें त्वद्गुणांचें मनास
तूं मी आहों वदतच असा होतसे नित्य भास २
नाथा जासी त्वरित इथुनी विष्णुच्या[5] आलयास
ही दुर्वार्ता श्रवणिं पडतां शोक झाला मनास
वाटे भाले अमित हृदया बोंचले त्या क्षणांत
किंवा निद्रास्थितिंत हृदयीं होय हा वज्रपात ३
दुर्वार्तेचा कठिण शर हा खोल जाऊनि भारी
तीक्ष्णाग्रें[6] मद्हृदय चिपळीं क्रूरतेनें विदारी[7]
दुर्वार्तेचें प्रखर विष हें बोलतां बोलतांना
कैसें गेलें भिनुन अवघ्या अंगिं माझ्या कळेना ४
दुर्वार्ता ही अशुभ समयीं ये अम्हांला कळून
कोणालाही प्रथम परि ती सत्यशी वाटली न

---

* हृदयांत. १ दुःखरूप अग्नीस. २ वणवा. ३ कान. ४ संध्याकाळीं सकाळीं म्हणजे सर्व वेळीं. ५ वैकुंठास. ६ तीक्ष्ण टोंकानें. ७ फाडी.

ज्याला तूझा उदय[1] न सहे अल्प ऐशा खलानें
मिथ्या वार्ता भयद कथिली ही गमे निश्चयानें ५
दुर्वृत्तांत त्वरित फिरुनी वायुवेगाप्रमाणें
होतो मिथ्या विरलचि असें बोलताती शहाणे
सुज्ञांचा हा अनुभव मम प्रत्यया येइ पूर्ण
स्वर्गीं तूझा अपगमें[2] ठरे शेवटीं सत्य तूर्ण ६
काशीनाथा, वद वद कुठें तूज आतां बघूं मी
जेथें तेथें स्मृति तव मला होतसे सर्व कामीं
तूं गेल्यानें, मम मन निरुत्साहें[3] झालें क्षणांत
आली तूझ्याविण जगिं उदासीनता मूर्तिमंत ७
तूं गेलास स्थिर[4]जगिं असें पूर्ण ठावें असूनी
वाटे आम्हां मधुनि मधुनी अन्यथा[5] तें अजूनी
होती देशाटनरुचि[6] तुला फार तेणें मनास
वाटे गेला असशि नुकता तूं कराया प्रवास ८
कां रे जासी त्वरित इतुका त्यागुनी मृत्युलोका
कोण्या दुष्टें तुज अविनयें[7] ताडिलें दुर्वचें[8] का
संसाराच्या अखिल विषयीं काय झाली विरक्ति[9]
तूझे ठायीं अमित जडली काय वा स्वर्गभक्ति ९
तूं गेल्यानें स्थविर[10] जननी जी तुला पूजनीय
ज्येष्ठ[11] भ्राता[12] जनकसम[13] जो तूज संमाननीय[14]
तैसी तूझी तरुण रमणी[15] जी भजे तूज भावें
सारीं दुःखोदधिंत[16] पडलीं हें न का तूज ठावें १०
सोडूनी हे स्वजनहि जरी त्यागिसी तूं स्वकाय[17]
तूला ये ना स्वसुहृद्दया[18] यांत आश्चर्य काय

---

१ भरभराट. २ गमन. ३ नाउमेद. ४ वैकुंठाला. ५ उलट. ६ देश हिंडण्याची हौस. ७ उद्धटपणानें. ८ कठोर भाषणानें. ९ अप्रीति. १० वृद्ध. ११ वडील. १२ भाऊ ( डॉ. सदाशिव वामन उर्फ बाळाभाऊ काणे ) १३ बापासारखा. १४ विशेष मानाला योग्य. १५ बायको. १६ दुःखसमुद्रांत. १७ आपलें शरीर. १८ आपल्या मित्रांची दया.

माता भ्राता प्रियद दयिता[1] मित्र चौघांतुनी या
जासी एकाहि न कळवुनी थोर लावून माया ११
होती तूझी सुविदित दया पात्र सद्वृंदमाना[2]
कैशी जातेसमयिं परि ती नष्ट झाली कळेना
मेघ व्योमीं[3] भरुनि, करुनी चातकां हृष्ट[4] फार,
जैसे जावे अवचित लया, तेंवि झाला प्रकार १२
शेतीं अत्युत्तम कृषि[5] पुरी जाणत्याच्या श्रमानें,
पर्जन्याच्या-उचित समयीं, लाभलेल्या कृपेनें
धान्यें होतां बहुत हिरवीं गार, खावीं समस्त
तीं टोळांनीं अवचित, तसें हें तुझें दुःखवृत्त १३
नामी रोपा प्रचुर[6] सलिलें[7] मानवाच्या श्रमानें
होतां मोठा तरु सुमफलीं[8] युक्त अल्पावधीनें,
विद्युत्पातें[9] अवचित जसें भस्म व्हावें तयाचें,
स्वर्लोकाला तव गमन हें होय तैशा प्रतीचें १४
जो मातेचा अखिलहृदयानंदकंद[10] प्रकीर्ण[11]
आशास्तंभ[12] प्रबल अपुल्या बंधुचा सत्वपूर्ण[13]
अर्धांगाचा जिवलग सदाचारसंपन्न आत्मा
जो मित्रांचें हृदय हरि त्या काळ कैसा दुरात्मा[14] १५
काळा, नेसी त्वरित बहु तूं आमुचा मित्र शांत
वाटे तूझ्यासम न दुसरा दुष्ट साऱ्या जगांत
दुष्टात्म्यांची करिति तुलना लोक सारे तुझ्याशीं
मातें नाहीं कळत तुजला मी तुलावें कुणाशीं १६
वाटे आम्हां अविरत[15] चमत्कार तूझ्या कृतीचा
साऱ्या लोकांतुनि निवडिसी सुज्ञ, थोड्या वयाचा

---

१ बायको. २ सज्जनसमूहाच्या मानाला. ३ आकाशांत. ४ आनंदित. ५ शेतकी. ६ मुबलक. ७ पाण्यानें. ८ फुलांनीं फळांनीं. ९ वीज पडून. १० सर्व हृदयांतल्या आनंदाचा गड्डा. ११ पसरलेला. १२ आशेचा खांब. १३ चांगुलपणानें भरलेल्या १४ दुष्ट. १५ नेहमीं.

ऐसे ज्ञानी तरुण जन तूं रोजच्यारोज, काळा,
दाढांमध्यें किति चिरडिसी तें कळेना अम्हांला १७

ऐसीं ज्या ज्या समयिं करिसी क्रूर कर्में विशेष
वाटे तूला बघवत नसे सज्जनोत्कर्षलेश[1]
काळा, कांता जनक जननी बंधु सुनूं[2] कितीक
तूझ्या नांवें रडत असती, आंवरे ज्यां न शोक १८

तूझ्या दाढेहुनि बहु बरें वक्त्रें[3] पंचाननाचें[4]
तैसी, धारा प्रखर असिची[5], दंत तैसे फणींचे[6]
तूझ्या दाढेहुनि बहु भली अग्निची चंडतांही[7]
जो जो तूझ्या वदनिं पडला तो पुनः येत नाहीं १९

व्याधिग्रस्ता अतिशय जरी नित्यशः त्रास होतो
बोले " हीच्यापरि मरणही इष्ट " ऐसें जरी तो
येतां त्याच्याजवळ परि तूं, कांपतो तो थर्रारां[8]
मृत्यो तुझा खचित जगिं या फार मोठा दरारा २०

या संसारीं कधिंहि न डगे जो महा संकटांस
स्वारी तूझी म्हणि थडकतां घाबरा होय खास
क्रौर्यें[9], काळा, जगतिं असशी तूंच तूझ्यासमान
तो योगी जो बघुनि तुजला भीति पावे कधीं न २१

तूझे चक्षू असति गरुडासारखे रे कृतांता[10]
वाटे तैसी गति तुज असे अद्भुता[11], जेंवि वार्ता[12]
बारा मासीं द्युमणिकिरणां[13] स्थान जें भेद्य[14] नाहीं
जाई एक्या पळिं, त्रिपळिंही, मूर्ति तूझी तिथेंही २२

गुप्त स्थानीं पळुनि विलया जातसे शत्रुभीति
शस्त्रास्त्रांनीं * महदरिचमू होतसे भग्नपंक्ति[15]

---

१ सज्जनाच्या भरभराटीचा अल्पही अंश. २ मुलगे, मुली. ३ तोंड. ४ सिंहाचें. ५ तलवारीची. ६ सापाचे. ७ आंच. ८ थरथर. ९ क्रूरपणानें. १० यमा. ११ विलक्षण. १२ वाऱ्याला. १३ सूर्यकिरणांस. १४ प्रवेश करण्यास योग्य. * प्रबल शत्रूचें सैन्य. १५ तोडल्या आहेत रांगा जीच्या.

पाताळीं वा उदधितळिं[१] वा अंतरिक्षीं[२] दडून
तूझा सोटा कधिंहि कवणा येइ टाळावया न २३

वाटे एके समयिं " असती तूजला नेत्र तीक्ष्ण "
वाटे एके समयिं परि " तूं अंध आहेस पूर्ण "
कांकीं तूला समजत नसे कोण मोठा, लहान
मूर्ख, ज्ञानी, सकल करिसी सारखे प्राणहीन २४

आहे वस्तु प्रियकर बहू जी जगीं या अम्हांला
व्हावी कां न प्रियतम तशी स्वर्गिं देवादिकांला
काशीनाथ प्रियतम असे जो अम्हां या जगांत
त्या प्रेमें तूं हरिसि; न तुझा दोष कांहीं तयांत २५

होतों ग्रामांतरिं,[३] समयिं ज्या जासि मित्रा इथून
नाहीं झाली क्षणभर तुझी भेट अंतीं म्हणून
गेलें, तेणें, क्षणिं मन महा शोकपूरीं बुडूनी
त्या गोष्टीचा विसर न पडे कांहिं केल्या अजूनी २६

तूझी दीनावरिल ममता, फार शांत स्वभाव
विद्यादानीं[४] अभिरुचि, तसा नीतिशीं प्रेमभाव
तूझें विद्यार्जन,[५] गुरुजनप्रेम,[६] उद्योगशील
गाऊं तूझे गुण किति असे एक का दोन बोल २७

पात्र श्लाघे[७] चरित बघुनी तूमचें सोदरांचें[८]
वारंवार स्मरण मजला होइ तूझ्या * पित्याचें
सत्यप्रीतिप्रविदित[९] दयाशील त्या सज्जनाची
आहां दोघे प्रतिकृति[१०] तुम्ही यांत शंका नसेची २८

---

१ समुद्राच्या तळांत. २ आकाशांत. ३ दुसऱ्या गांवीं ( मातृगयेसाठीं सिद्धपुरीं ). ४ विद्या शिकविण्यांत ५ विद्येचें संपादन. ६ वडील माणसांवर प्रीति. ७ स्तुतीला. ८ सख्या भावांचें. * सुप्रसिद्ध कै. डॉ. वामन गोपाळ काण्यांचें ९ सत्यप्रीतीमुळें सुप्रसिद्ध झालेल्या. १० ठसे ( आत्मावै पुत्रनामाऽसि या श्रुतिवचनाप्रमाणें. )

पुण्यग्रामीं[1], अनुभवबळें पेशवाईंत वृद्ध
झाले सत्यप्रिय, रत नयीं[2] रामशास्त्री[3] प्रसिद्ध
ऐकूनी सच्चरित तुमच्या भाग्यशाली पित्याचें
होई नित्य स्मरण मज त्या न्यायवित् पंडिताचें २९
वाटे * त्याला जनक, जननी, बंधु, कांता, अपत्य[4]
विद्या, सौख्य, द्रविण[5], अवघीं या जगीं एक सत्य
त्याला सत्य प्रभुवर[6], महा सच्चिदानंद[7], भासे
लोकीं येतें विरल दिसुनी सत्यतादात्म्य[8] ऐसें ३०
होता सत्यप्रिय विदित तो साधु सर्वां सदैव
लावी त्याचा गुण बहु भला तो कसोटीस देव
बाल्यीं[9] एके समयिं जरि तो बोलता अल्प खोटें
त्याला आलें खचित असतें टाळितां दुःख मोठें ३१
" हातीं झोळी धरुनि करणें याचनाही[10] प्रशस्त[11]"
किंवा " इष्ट, प्रिय सतत जो देह त्याचाहि अंत,
" सत्यप्रीतीविण मज नको या जगीं अल्प अन्य"
ऐसें जो त्या समयिं वदला तो दुजा धर्म धन्य ! ३२
होता धीमान्[12] कुशलतम[13] तो चित्रकार[14] प्रसिद्ध
तो सर्वांना सुविदित असे आंग्लवैद्यकशास्त्रसिद्ध[15]
तैसा होता निपुणतम तो वैद्य शस्त्रक्रियेंत
ज्या धंद्यांनीं सतत करि तो जीविका[16] या जगांत ३३
विद्वान्, मूर्ख, स्थविर, तरुण द्रव्यवान्, वित्तहीन
वागे सर्वांजवळ समतावृत्तिनें[17] जो नमून
अन्यापेक्षां मजवरि असे प्रेम त्याचें विशेष
हें प्रत्येक स्वमनिं समजे प्रेमभावें अशेष[18] ३४

---

१ पुण्यांत. २ न्यायांत ३ पेशवाईतले सुप्रसिद्ध न्यायाधिकारी वे. शा. सं. रामशास्त्री प्रभुणे. *(वामनरावजींस) ४ मूल. ५ धन. ६ ईश्वर. ७ ब्रह्म. ८ सत्याशीं एकजीव. ९ लहानपणीं. १० भिक्षा. ११ चांगली. १२ बुद्धिमान्. १३ फार चतुर. १४ चितारी. १५ इंग्रजी वैद्यकांत तयार. १६ निर्वाह. १७ सारखेपणाच्या भावानें. १८ संपूर्ण.

एके कालीं हितकर तशी सत्यमाधुर्ययुक्त
वाक्[1] ये ऐकूं विरल जगिं या सत्य ऐसें संदुक्त[2]
तात्यांची वाक् अति विरल या कोटिमध्येंच आली
जन्माला, जी म्हणुनिच जगद्धन्यते[3] पात्र झाली ३५
रोग्यांमध्यें असति दुबळे दीन जे पाहि त्यांस
तो पूर्वी, त्यांमधिलहि सदा अर्भकांस स्त्रियांस
त्यां[4] पाहील्याक्षणिं गमुनि त्यां भेटला मायबाप
भासे अर्धा अधिक शमला आपुला रोगताप ३६
मोलाचेंही फुकट अगद स्वीय तो द्रव्यहीनां
देऊनीया पुरवि अपुलें पथ्यपाणीहि त्यांना
मुक्तद्वार प्रतिदिन करी तो स्वगेहा-चहाचें
तेणें देती सकलहि दुवे रुग्ण त्याला स्ववाचे ३७
प्रातःकालीं प्रतिदिन असो रुग्णसंख्या[5] कितीही
चित्तें शांत श्रम करुनि ती तो परीक्षूनि पाही
योजी तीला अगद मग तो योग्य ते सर्व जात्यां[6]
ऐसा होता जनहितरत त्वत्पिता धन्य तात्या ३८
ऐशा लोकोपकृतिरत[7] त्या त्वत्पित्याचें चरित्र
झालें वैद्यां कितिक तिथल्या वंद्य कित्ता पवित्र
ते वागूनी तदनुकरणें[8] आपुल्या कार्यिं मात्र
झाले लोकप्रिय धनिक ही लोकमानास पात्र ३९
जैसें काव्यावरुनि कळतें शील[9] सारें कवीचें
किंवा होतें कविपरिचयें[10] ज्ञान त्याच्या कृतीचें[11]
तैसा पुत्रा बघुनि कळतो पूर्ण तातस्वभाव[12]
किंवा ताता बघुनि कथितां येइ पुत्रप्रभाव ४०
चित्रें जीवविरहित[13] करी तो जशीं शान, धामीं
तो सप्राण[14] प्रतिकृति करी त्यांपरी फार नामी

---

१ वाणी. २ सज्जनांचें वचन. ३ जगाच्या धन्यवादाला. ४ तात्यांस. ५ रोग्यांचा समुदाय. ६ स्वतः. ७ परोपकार करण्यांत गढलेल्या. ८ त्यांच्या नमुन्याप्रमाणें वागण्यानें. ९ स्वभाव. १० ओळखीनें. ११ काव्याचें. १२ बापाचा स्वभाव. १३ निर्जीव. १४ जिवंत.

तच्चिच्चित्रें अनुपम तुम्ही दोन बंधू प्रसिद्ध
अर्थात्, त्याचे सुगुण तुमच्या अंगिं आले अविद्ध ४१
हे बंधूनों जनक तुमचा सत्यवाद्यांत मुख्य
वाटे होता समजत पुरें शास्त्र आलोकलेख्य
त्यानें आत्मप्रतिकृति हुबेहूब काढूनि मागें
युष्मद्रूपें जतन करुनि ठेविली प्रीतियोगें ४२
येथें थोडीं विदित मजला जीं कुटुंबें कुलीन
त्यांचें अग्रेसर तर्यि असे क्रोधगर्वीं विहीन
नाहीं ठावें कपट तुमच्यांतील कोणा कसें तें
वाटे सर्वां तव गृहिं वरी गोड वाणी तुह्मांतें ४३
पुण्यश्लोक स्वसम करिती स्वाश्रितां साधु तूर्ण
या तत्वाचा अनुभव सदा येइ लोकांत पूर्ण
येतां त्याच्या गृहजनिं कधीं भृत्य कोणी नवीन
बोले वाणी विनयमधुरा तो धन्याच्या समान ४४
हे विश्वात्म्या सदवनरता हे दयेच्या समुद्रा,
कालें केली सकल अमुची आजला दीन मुद्रा,
हा जो तूझा परिजन असे काल अत्युग्रकाय
वाटे मोठें अनुचित करी तो त्वदाज्ञेशिवाय ४५
साऱ्या जन्मीं अनघ असतां आमुचा नाथ, देवा,
त्याला न्याया त्वरितच तुझा केंवि आदेश व्हावा
कांकीं, तूझा सदवनयशोरूप मोठा नगारा
तीन्ही लोकांमधिं दुमदुमे, सर्वकालीं भरारा ४६
काशीनाथ प्रिय बहु यमा वाटला त्यावरूनी
वाटे नेई क्षणिं यम तया मृत्युलोकामधूनी
आज्ञाभंग प्रथम, दुसरें सद्गृहाचा विघात
ऐसें पापद्वय करितसे तो दुरात्मा कृतांत ४७

१ त्याच्या चैतन्याची चित्रें. २ संपूर्ण. ३ छायाचित्र किंवा हुबेहूब चित्र काढण्याची कला जिला इंग्रजींत 'फोटोग्राफी' म्हणतात. ४ तुमच्या रूपानें. ५ श्रेष्ठ. ६ विरहित. ७ चाकर. ८ संतांच्या पालनांत गढलेल्या. ९ चाकर. १० भयंकर शरीराचा. ११ निष्पाप. १२ आज्ञा. १३ नाश.

वाटे एके समयिं परि कीं तो जरी घोरवृत्त[1]
व्हावा आज्ञेविण तव कसा दुष्टकर्मा प्रवृत्त
कांकीं, इच्छेविण तव लतापत्रसुद्धां न हाले
ऐसें तूझें यश जगिं किती संत गाऊनि गेले ४८

होतें ज्याचें मनुजजगतीं[2] दीर्घ वास्तव्य[3] इष्ट
त्यानें केलें तर मग, विभो, काय तूझें अनिष्ट
या लोकीं तो कधिं न शिवला क्षुद्रही पातकास
अज्ञानानें अनर्थ[4] घडतां, पात्र होतो क्षमेस ४९

त्वां नेल्यानें निज सदिं तया, घोर आला प्रसंग
आम्हां त्याचा खचित न सहे अल्पसुद्धां वियोग
देवा, आम्हांवरि तव असा होय कां फार रोष[5]
ऐसा आम्हांकडुनि घडला कोणता दंड्य[6] दोष ५०

पूर्ण न्यायी खचित असशी सर्ववित्[7] ईश्वरा तूं
चित्तीं तूझ्या कधिंहि न वसे स्वल्प अन्यायहेतु
या जन्मीं तो अनघ जरि, तत्पूर्वजन्मामधील
अज्ञानानें कृत अघ[8], इथें भोगणें त्या असेल ५१

ज्याच्या त्याच्या सुकृति अथवा दुष्कृतीच्या प्रमाणें
देसी सर्वां सुख असुख तूं न्यायतत्त्वांप्रमाणें
आम्ही आहों मनुज अवघे अल्पबुद्धी ह्मणून
केव्हां केव्हां तव कृति अम्हां भासते न्यायहीन ५२

जातां ग्रामांतरिं सुहृद हा आमुचा, दीर्घ काल
वाटे वर्षांसम दिन अम्हां ते कधीं संपतील
जन्माचा हा त्वरित अमुचा आज होतां वियोग
कंठूं त्याच्याविण सकल हें केंवि आयुष्य सांग ५३

श्लाघ्याचारीं[9] रत सतत जो साधु त्याची प्रशंसा
आहे श्रेयस्कर बहु, जगीं सर्व देशेतिहासा

---

१ क्रूर आचरणाचा. २ मृत्युलोकांत. ३ राहणें. ४ अन्याय. ५ राग ६ शासन करण्यास योग्य. ७ सर्वज्ञ. ८ पाप. ९ स्तुत्य आचरणांत.

लोकीं गातां बुधचरित तो होतसे कीर्तिमान
लोक[१]प्रज्ञा, स[२]दनुकरणें होय स[३]त्कर्मलीन ५४
शिल्पज्ञें, जो बहु सुभ[४]गसा, काढिला वृक्षवेल
शिल्पज्ञांतें सतत असतो तो नमूना पुढील
त्या रीतीनें सुविमल असें साधुचें पुण्यवृत्त
होतें त्याच्या पुढिल ज[५]नते, नित्य आधारभूत ५५

आहे पूज्य प्रियतम जगा उत्तमश्लो[६]कवृत्त
माता तात प्रियकर जशीं सुज्ञ लोकां समस्त
सद्बोधाचें अमृत मिळतें ज[७]न्मदांच्या मुखानें
लाभे तें सच्चरितवदनें त्यापरी निश्चयानें ५६

वारंवार श्रवण करुनी साधुचें पुण्यवृत्त
होई म[८]र्त्य क्षणभर तरी साधुबुद्धिप्रवृत्त
सद्वृत्ताचें श्रवण घडतां पा[९]पधी ज्या त्यजी न
ऐसा कोणी जगिं न सहसा येतसे आढळून ५७

हे विश्वेशा, स्वमनिं करुनी याप्रमाणें विचार
झालों आहे स्वसुहृदकथा गावया मी तयार
दे या कार्यीं मति मज तरी तूं कृपेच्या प्रभावें
ऐसी तूला विनति करितों हस्त जोडूनि भावें ५८

**काशीनाथा**, तव गुणकथा आजच्या या प्रसंगीं
मी गाऊनी सविनय यथाशक्ति संक्षिप्तभागीं
मित्रा, अंशें तरि, तव ऋणांतूनि होईन मुक्त
त्वद्वृत्ताचें अमृत पिउनी लोक होतील तृप्त ५९

## गीति

पंच्यायशींत, शतकीं अठराव्या, शालिवाहनशकाचे
अक्षय्य तृतीयेला झालें शुभ कालिं जन्म नाथाचें ६०

---

१ लोकांची बुद्धि. २ साधूचा कित्ता वळविल्यानें. ३ पवित्र आचरणांत गढलेली. ४ नामी. ५ लोकांस. ६ साधूचें चरित्र ७ आईबापांच्या. ८ मानव. ९ पापबुद्धि.

काणे उपनामें जे वामन गोपाळ पुण्यपत्तनाचे
काशीनाथ सुत तयां इंदुरिं झाला, भरांत हर्षाचे ६१

## शार्दूलविक्रीडित.

काशीनाथपदाब्जदर्शनकृती[1] सस्त्रीक[2] झाल्यावरी
झाला वामनरावजींस सुत हा थोड्या दिनीं इंदुरीं
तो काशीपतिचा प्रसाद घडला रावें असें मानुनी
"काशीनाथ" यथार्थ नाम दिधलें, त्या बारशाच्या दिनीं ६२

## मंदाक्रांता.

ज्याचीं चिन्हें बहुत असती चित्रें[3] बाल्यामधील
वाटे ज्यांच्यावरुनि सकलां कीं सुधी जो निवेल
जों जों वाढे मग तनय तो शुक्लचंद्रासमान
सारीं चिन्हें उतरूनि खरीं तो दिसे बुद्धिमान ६३
जो तो त्याची बघुनि नयनीं बाल्यमुद्रा ह्मणे कीं
"सच्छीलाचा सुकृतिरत[4] हा धीर[5] होईल लोकीं"
कालें वृद्धिंगत हळुहळू तो जसा होत गेला
सर्वांशीं ही बहुजनभविष्योक्ति ये प्रत्ययाला ६४
बाल्यीं सुद्धां मनुज बघुनि एकदां त्यास तूर्ण[6]
ये सांगाया कवण कपटी, कोण सौजन्यपूर्ण[7]
त्यायोगानें बहु लघु वयापासुनी तात अंबा[8]
लीलेनें त्या ह्मणत असती "आमुचा शाहणोबा" ६५
बाळाभाऊ म्हणुनि बुध जो बंधु त्याचा वडील
त्याचा होता अतिशय लळा त्यास आजन्मकाल[9]
त्याचा भ्रातृप्रणय[10] मग तो होउनी अद्वितीय[11]
कोणी दूजें प्रियद न गमे त्यास बंधूशिवाय ६६

---

१ काशीविश्वेश्वराच्या पदकमलाच्या दर्शनानें कृतकृत्य. २ बायकोबरोबर. ३ चमत्कारिक. ४ पुण्यकारक काम करण्यांत तत्पर. ५ धैर्ययुक्त. ६ लवकर. ७ सुस्वभावानें भरलेला. ८ आई. ९ उपजल्यापासून. १० बंधुप्रीति. ११ अतुल्य.

केव्हां बाल्यस्थितिंत असतां फार यानें रडावें
आईबापीं लवकर उगी त्या कराया शिणावें
येतां भाऊ जवळ परि तो नाथ राहे उगीच
गेल्या जन्मांतिल सकल हा प्रीतिसंस्कार साच ६७
होता त्याचा वसत जनिता इंदुरीं जीविकार्थ
झाला तेणें लघु वयिंच तच्छिक्षणारंभ तेथ
जातां कांहीं समय जनिता बायकोला मुलांला
घेऊनी ये वसतिस सुखें दिव्य मुंबापुराला ६८
शाळेमध्यें शिकत असतां इंदुरीं सर्व काळ
खेळायाची चटक बहु त्या लाविती द्वाड बाळ
होतां त्याला परि सुसमयीं योग्य बंधूपदेश
झालें त्याचें व्यसन समयीं अल्प हें नामशेष ६९
होतें विद्यालय समयिं त्या स्थापिलें पोतदारीं[2]
ज्यासंबंधें जनमत असे साधु सर्व प्रकारीं
व्हावा विद्वान् सुत धरुनियां हेतु ऐसा मनांत
ठेवी त्यातें प्रथम जनिता त्याच विद्यालयांत ७०
शाळेमध्यें नियमित धडा शिक्षकानें दिलेला
त्याचा झाल्यावर मग मिळे वेळ जो नित्य त्याला
त्याच्यामध्यें [3]जडमति मुलां साह्य त्यानें करावें
जें केल्यानें, बहुतकरुनी मार त्यांचे चुकावे ७१
पाहूनी त्या चपल [4]बटुची भक्ति विद्येवरील
तैसी त्याची बघुनि अतुला [5]बुद्धिमत्ता सुशील
पाहूनी तन्नियमितपणा पूर्ण योग्य स्तुतीस
होई नाना समयिं परमानंद त्याच्या गुरूंस ७२
[6]तो अभ्यासक्रम तिकडला पूर्ण होतां समस्त
[7]पूर्णज्ञानार्जनमति शिरे [8]राजविद्यालयांत

---

१ बाप. २ कै. रा.रा. वासुदेव मोरेश्वर पोतदारांनीं. ३ जड बुद्धीच्या. ४ लहान मुलाची. ५ बुद्धीचा सांठा. ६ (काशीनाथ). ७ संपूर्ण ज्ञान प्राप्त करून घेण्याची आहे इच्छा ज्याला. ८ एल्फिन्स्टन्हायस्कुलांत.

तेथें सुद्धां, स्वसुमतिबलें, नीतिच्या वर्तनानें,
संपादी तो गुरुजनकृपा, शारदेच्या[1] कृपेनें ७३
व्हावा भाषापरिचय मुखें इंग्रजी पंडिताचे
ऐसी इच्छा मनिं धरुनि तो जाय रॉबर्ट्‌मनीचे
शाले, विद्याविषयसततोद्योग त्याचा विशेष
जेथेंही दे मिळवुनि तया कार्ससाहेबतोष[2] ७४
तातें रात्रंदिवस करुनी नीतिचा बोध त्याला.
नीतिप्रीत्यंकुर लघु वयीं तन्मनोद्भूत[3] केला
शाळेमध्यें शिकत असतां क्षुद्रही बाबतींत
मिथ्या वाणी कधिंहि न वदे तो मुखें सोबत्यांत ७५
सत्योक्तीनें[4] विरल समयीं निश्चयें आपणास
शिक्षा मोठी करिल गुरुजी ही जरी भीति त्यास
धिक्कारूनी अनृत[5] वदणें सर्वदा त्या मुलानें
सांगावें तें अवितथ[6] सदा बुद्धिच्या निश्चयानें ७६
कालें आलें अवचित महा विघ्न विद्येंत त्याचे
प्राणांपेक्षां प्रियकर असे त्यास जो त्या पित्याचें
झालें एका लघु विकृतिनें शीघ्र देहावसानें[7]
ज्यायोगानें हृदय अवघें जाय त्याचें खचून ७७
तो गेल्यानें सकल गृहिं त्या जाहला सौख्यभंग
काशीनाथस्मृतिमधिल हा आद्य[8] दुःखप्रसंग
त्राता * एकाविण न उरला त्यापुढें त्या कुटुंबा
ज्याच्यामध्यें उभय सुत हे, एक कन्या, तदंबा ७८
तेव्हां शोच्य स्थिति किति गृहीं, माय वार्धक्यवंद्या[9] !
होता भाऊ शिकत झटुनी इंग्रजी वैद्यविद्या

---

१ सरस्वती देवीच्या. २ मनीस्कुलांत या नांवाचे त्या वेळीं मुख्य अध्यापक ( Principal ) होते. ते नाणावलेल इंग्रजीभाषापंडित होते. ते उजव्या हातानें थोटे असल्यामुळे नेहमीं डाव्या हातानें चांगलें लिहीत. ३ त्याच्या मनांत उत्पन्न. ४ खरें बोलण्यानें. ५ खोटें. ६ खरें. ७ प्राणोत्क्रमण. ८ पहिला. * श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकरांवांचून. ९ वृद्ध अवस्थेमुळें नमस्कार घ्यावयास मात्र योग्य.

**काशीनाथ** स्वविषयरत तो स्वप्रपंचीं अजाण
होती दाना [1]उचित **यमुनाबाइ**नाम्नी[2] बहीण ७९
त्या **रावा**चा नियमितपणा, शस्त्रविद्याप्रसिद्धि,
निष्ठा[3], सेवा निज, धृति[4], मनोनिग्रह[5], न्यायबुद्धि
पाहूनीया, अतिशय मनीं होउनी शीघ्र राजी
देई वृत्ति[6] स्थिर[7] करुनि त्या सुज्ञ राजा **तुकोजी** ८०
त्या **रावाची** स्थिति बघुनियां वृत्ति भूपें दिलेली
तो होता जोंवरि जागीं, असे तोंवरी नेमलेली
गेली **रावा**सहच अपुली जीविकावृत्ति सारी
हें जाणूनी गृहजनमनां होतसे दुःख भारी ८१
धन्या धन्या परि सदयता त्या **तुकोजीनृपाची**
सर्वस्तुत्या, अनुपम तशी, तत्परीक्षा जनांची
जेव्हां आलें समजुनि तया **राव**देहावसान
गेला आज स्वजन ह्मणुनी होय तो फार खिन्न ८२
औदार्याचा निधि नृपति तो फार मोठ्या मनानें
तेव्हां बोले जवळिल जनां कीं तुम्ही हो त्वरेनें
सांगा त्याच्या प्रथम तनया, वैद्यविद्यापरीक्षा
तूझी हो तोंवरि करिन मी निश्चयें वृत्तिरक्षा[9] ८३
जें भूपें हें वचन दिधलें त्यास मोठ्या मनानें
तें तो दावी करुनिच खरें शब्दशः निश्चयानें
ही भूपाची उपकृति[10] महा, **रावजीं**चें घराणें
होतें नित्य स्मरत अपुल्या धर्मशीलांप्रमाणें ८४
जे विद्यार्थी धनरहित सद्वर्तनी सुस्वभावी
ऐसे **तात्या** जवळ अपुल्या पोसुनी नित्य ठेवी

---

१ उपवर. २ यमुनाबाई नांवाची–यांचें लग्न पुढें रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल् एल्. बी. सर न्यायाधीश, लष्कर, संस्थान ग्वाल्हेर व अबलोन्नतिलेखमालेचे संपादक यांच्याशीं झालें. ३ आपल्या स्वतःवर असलेलें प्रेम व आपली केलेली सेवा. ४ धैर्य. ५ आत्मसंयमन. ६ नेमणूक. ७ कायमची ८ सांठा. ९ नेमणुकीचें रक्षण. १० उपकार.

प्रेमी तात्या प्रियकर असे एक त्यांतील मुख्य
विश्वासाचें सदन जणुं कीं काय जो गौतमाख्य[1] ८५

रावें थोडें शिकवुनि घरीं इंग्रजी गौतमाला
मोठ्या प्रेमें बहुत दिधलें वैद्यकज्ञान त्याला
सत्संगानें, अनुभवबलें, प्रक्रिया[2] वैद्यकाची
त्याच्या हातीं सतत घडली फार मोठ्या प्रतीची ८६

तेणें, ग्रामांतरिं कधिंहि तो राव कामास जातां
साध्या रोगांवरी अगद[3] त्या गौतमा येइ देतां
होता तोही सविनय दयाशील रावासमान
तेणें, रोगी बहुत तिकडे येति चोहोंकडून ८७

स्वर्गी गेल्यावरि सदय तो राव ऐसा इथून
त्याची मोठी उपकृति पुरी गौतमानें स्मरून
मोठ्या धैर्ये अगदगृह[4] तें चालवीलें श्रमानें
जेणें, रावात्मज[5] करिति ते पूर्ण विद्या सुखानें ८८

बाळाभाऊ कठिण समयीं मात्र देऊनि मंत्र[6]
जेथें तेथें पुरवि अपुली माहिती त्या सशास्त्र
साधी व्याधि स्वकरिं बहुशः गौतमानेंच घ्यावी
ऐसे दोघे क्रमिति दिवसां रावजींच्या अभावीं[7] ८९

विद्यापीठें[8] विहित[9] पहिली[10] आंग्लभाषापरीक्षा
होतां, नाथा उपपद[11]सुखप्राप्तिची होय कांक्षा
विलसनपाठालयिं[12], म्हणुनि, तो पूर्णविद्येच्छु गेला
जेथें त्यानें कितिक महिने नीट अभ्यास केला ९०

---

१ गौतम नांवाचा—हेच पुढें रा. रा. गौतमराव केशव म्हणून डॉ. वामन गोपाळचा प्रसिद्ध सार्सापरिला तयार करून विकणारे म्हणून प्रसिद्ध झाले. हे जातीचे गुजराती ब्राह्मण होते. २ क्रियायुक्त ज्ञान. ३ औषध. ४ दवाखाना. ५ वामनरावजींचे पुत्र. ६ सल्लामसलत. ७ पश्चात्. ८ मुंबईयुनिव्हर्सिटीनें. ९ नेमलेली. १० (म्याट्रिक्युलेशन्) ११ मुंबईयुनिव्हर्सिटीच्या पदवीच्या प्राप्तीची १२ विलसन्कालेजांत.

त्याचें यौनोचित[1] वय जुन्या माणसांच्या मतानें
होतां त्या तद्विषयिं करिती प्रश्न तीं कौतुकानें
जेव्हां, " मातें अडकवुं नका यौनपाशांत येव्हां "
त्या सर्वां यापरि कथितसे नित्य तो बाल तेव्हां ९१

जो जो त्याचा गुरुजन असे त्या जनाची अवज्ञा[2]
कोठें कोण्या समयिं करणें त्या–गमे पाप–सुज्ञा
तद्यौनाचा परि गृहजनीं होय जेव्हां विचार
बोले त्यां "या समयिं न तया व्हावयाचा तयार " ९२

रावांचें[3] सद्यश[4] परिसुनी रामकीर्तीप्रमाणें[5]
पाहूनी तें, सुविमल कुलें, योग्य शीलें, घराणें
विद्वान्, शीलें, अतिशय भल्या, पाहुनी त्या वराला
वेळोवेळीं उपवर मुली सांगुनी येत त्याला ९३

माझी कन्या खचित वर हा अंगिकारील* ऐशी
आशा जो तो स्वमनिं धरुनी जातसे त्याजपाशीं
तेव्हां बंधूकडुनि करवी तो स्वहेतुप्रकाश
जो ऐकूनी जन परत ते पूर्ण जाती निराश ९४

काळें, आतां खचित तव हा पातला यौनकाल
ऐसें पाहे वदुनि बहु त्या नित्य जो तो वडील
त्यांनाही तो परि कथि " तया यौवनानें[6] प्रशस्त
मोठा झाल्याविण न कधिं मी व्हावयाचा प्रवृत्त " ९५

मित्रींही तन्मन वळविण्या फार केले उपाय
तो ऐकेना परि सुसमय प्राप्त झाल्याशिवाय
जेव्हां त्याचें वय परिणया[7] योग्य त्याच्या मतानें
झालें तेव्हां निज परिणया सिद्ध झाला सुखानें ९६
व्हायापूर्वी विहित दुसरी तत्परीक्षा क्रमानें
तो आजारी अवचित पडे फार विद्याश्रमानें

---

१ विवाहास योग्य. २ उपमर्द. ३ वामनरावजींचें. ४ सुकीर्ति ५ श्रीरामचंद्राच्या कीर्तीप्रमाणें. * पतकरील. ६ तारुण्यानें. ७ विवाहास.

या झालेल्या महदनहितें[1] होतसे त्या विषादें[2]
ज्या योगानें अतिशयच तन्मानसा होय खेदें[3] ९७
तेव्हां अन्य स्थलिं इथुनि तो जाय विश्रांति घ्याया
कालें होतां प्रकृति बरवी तो पुन्हां ये शिकाया
विल्सन्शालाक्रम परि पुन्हां आवडेना तयाला
वाटे त्याला अधिक बरवी राजरुक्[4]शास्त्रशाला ९८
केव्हां केव्हां मनुज जगतीं इष्ट चिंती मनानें
येतें कांहीं परि घडुनिया अन्यथा दुर्विधीनें[5]
त्या संधीला अवचित घडे शोच्य अत्यंत गोष्ट
जी ती झाली तदखिलसुखा जीविताही अनिष्ट ९९
होतां तीचें स्मरणहि कधीं आमुच्यासारख्यांही
होई रोमांचित[6] तनु, सुचे त्या प्रसंगीं न कांहीं
जेव्हां नाथावरि झडप त्या घातली संकटानें
तच्चिताची स्थिति अनुभवें ज्ञेय[7], वा, कल्पनेनें १००
जेव्हां गेला प्रथम दिनिं तो वैद्यविद्यालयांत
त्याला भेटे सुमति मुलगा मग्न विद्यार्जनांत
त्याचें विद्यारतिमतिवयःशील नाथासमान
होतें; दोघे क्षणिं परिचयें पूर्ण झाले, म्हणून १०१
होता जैसा लघु वयिं गुणीं फार नांवाजलेला
तैसा, रूपें जणु मनसिजें[8] तो असे रेखलेला
तेणें, त्याला मधुर अभिधा[9] "रूपजी[10] रामनाथ"
वाटे सर्वां खचित पितरीं[11] अर्पिली[12] पूर्ण सार्थ[13] १०२
राही ताताजवळ अपुल्या, तो स्वतःच्या घरांत
वाटे त्याला गृहिंहि वसणें इष्ट मित्रासमेत

---

१ मोठ्या तोट्यानें. २ दुःख. ३ नाउमेद. ४ ग्रांट मेडिकल कालेज. ५ दुर्दैवानें. ६ अंगावरील केस उभे राहिलेली अशी. ७ जाणण्यास योग्य. ८ मदनानें. ९ नांव. १०यांचें सबंध नांव रामनाथ भाई रूपजी. यांचे वडील रा. रा. भाईसाहेब रूपजी हे खत्री जातीचे मुंबईतील एक प्रतिष्ठित व संपन्न गृहस्थ होते. ११ आईबापांनीं. १२ दिली. १३ अर्थाला धरून, अन्वर्थक.

तातज्ञेनें, मग न करुनी थोडकाही विलंब,
प्रेमें आणी वसतिस गृहीं राम काणेकुटुंब १०३
दोघे-एके सदनिं जमतां-मित्र " अन्योन्यसंगीं
येतो सौख्यानुभव" म्हणती ते समस्त प्रसंगीं
जाती येती बसति निजती एकमेकांसमेत
विद्याभ्यासा उभय बसती नित्य एका स्थलांत १०४
अन्योन्यांचे जिवलग सखे होति याच्यामुळें ते
होई एकक्षणिकविरहें[1] दुःख भारी दुज्यातें
अन्योन्यांचे जिवलग उमाजानकीनाथ[2] जैसे
हेंही नाथद्वय[3], तदभिद[4], प्रीतिनें पूर्ण तैसें १०५
दोघे बंधूंसम वसति ते याप्रमाणें सुखानें
हें काळाला नच बघवलें फार, तेणें, तयानें
क्रौर्यें रामावर करुनिया तीक्ष्णदण्डप्रयोग[5]
अन्योन्यांचा-अकरुण मनें पूर्ण केला-वियोग १०६
लाभे एके समयिं उभयां दीर्घ विश्रांतिकाल
जाया अन्य स्थलिं, समयिं त्या, इच्छिती ते सुशील
होती नाथप्रियद भगिनी[6], मित्रही, इंदुरांत
आलें त्याच्या, म्हणुनि, तिकडे जावयाचें मनांत १०७
त्या रामाचा प्रियकर पिता, त्या प्रवासानभिज्ञा[7]
रामा, देई प्रथम न तिथें जावयाला अनुज्ञा
जेव्हां अत्याग्रह परि बघे, लाडक्या त्या मुलाचा
बोले " नाथासह जपुनि जा " तो पिता काळजीचा १०८
दोघांनांही करमत नसे एकमेकांशिवाय
या रीतीची बघुनि उभयप्रीति ती अद्वितीय
नाथा बोले सजलनयनीं[8] रामजीतात[9] धामीं[10]
" तूं त्यापाशीं असशि म्हणुनी मात्र त्या धाडितों मी " १०९

---

१ एकाच्या थोड्याही झालेल्या वियोगानें. २ श्रीशंकर व श्रीरामचंद्र. ३ नाथांची दुक्कल. ४ त्यांच्याच नांवांची. ५ प्रखर मुसळाचा मार. ६ बहीण. ७ प्रवास ज्याला ठाऊक नाहीं अशा. ८ साश्रुनेत्रांनीं ९ रा. भाईसाहेब १० घरीं.

ते सर्वांचा गृहिं मग सुखें घेउनीया निरोप
आले मार्गं क्रमित अपुला इंदुराच्या समीप
चित्रालापीं[१] समय सरला शीघ्र अन्योन्यसंगीं
हें पाहूनी उभयहि सुखी होति ते त्या प्रसंगीं ११०

त्यांचा विघ्नाविण सकल तो होउनीया प्रवास
सौख्यें नाथद्वय लवकरी पोंचलें इंदुरास
ते त्या आर्यक्षितिपतिपुरीं[२] इंदुरीं, नाथ राम
मोदें कांहीं दिवस करिती मित्रधामीं स्वधाम १११

रामा सारे सुहृद अपुले भेटवूनी सुखानें
अन्योन्यांतें परिचित करी नाथ पूर्णादरानें
जें जें नाथा परिचित असे इंदुरीं प्रेक्षणीय[३]
तें तें दावी प्रतिदिवस तो नाथ मित्रा स्वकीयें[४] ११२

त्या स्थानाच्या जवळ भगिनी–धामिं हासलूपुरांत
जाई, कांहीं दिन उलटतां, नाथ रामासमेत
कृष्णाबाई, बहुत दिवशीं पाहुनी गेहिं[५] नाथा
आनंदाचे गिरिवर जणूं काय जाई सनाथीं[६] ११३

होता त्याच्या प्रिय भगिनिचा कांत कुंटे[७] म्हणून
त्याशीं राहे मुदित पुरिं त्या लोकसंमर्दहीन[८]
मोठ्या कोलाहलिं[९] शहरिं जो राहतो नित्य त्यास
वाटे कांहीं दिन तरि कधीं सौख्यद ग्रामवास[१०] ११४

कुंटे जेथें वसत तिथुनी दूर गांवासभोंती
नाना वृक्षीं रुचिर लघुशी टेंकडी एक होती
व्यायामार्थ[११], प्रतिदिन तिथें पावतां अस्त मित्रें[१२]
जाई कुंट्यांसह ससुख तो नाथ घेऊनि मित्र ११५

---

१ नानाविषयांवर केलेल्या भाषणांत २ हिंदुराजाच्या नगरांत, म्हणजे इंदुरांत. ३ पहाण्यासारखें. ४ आपल्या. ५ घरीं. ६ पतिसह ७ काशीनाथपंताच्या वडील बहिणीचे पति रा. सिद्धेश्वर केशव कुंटे. ८ लोकांची गर्दी नसलेल्या. ९ गलबल्यांत १० खेड्यांतील रहाणें. ११ सहल करायास. १२ सूर्य.

चित्रालापें फिरत तिथली सृष्टिशोभा विचित्र
पाहूनीया सतत करिती ते तिघे तुष्ट नेत्र
तेथें आर्योषधि दिसत ज्या नूतनें[1] नाथद्वयाला
तन्मीमांसा करित अवघे नित्य येती घराला ११६
ऐसे त्यांचे सुखदिवस जों फार गेले न तोंच
येई आपत्समय ह्मणि जो वर्णनायोग्य[3] साच
आपत्तीचे दिन सुखदिनाहूनि मोठे सदैव
आहे ऐसा नियम बहुशा मृत्युलोकांत सर्व ११७
एके संध्यासमयिं असतां वप्रशीर्षस्थ[4], मोदें
ते सारेही फिरत असतां खात कांहीं करंदें
एकाएकीं पद निसरुनी तोल जाऊनि आला
रामा एक क्षणिं घडघडां लोळतां पायथ्याला ११८
दोघे ऐसी स्थिति बघुनियां जाति रामा धराया
येईना त्यां परि निजकरीं त्याजला सांवराया
गेला ठेंचाळत ह्मणुनि तो टेंकडीच्या तळाशीं
ते दोघेही क्षणिं उतरले त्यामुळें पायथ्याशीं ११९
थोड्या उंचीवरुनि पडला तो जरी याप्रमाणें
त्याच्या मर्मस्थलिं[5] गुरु तया होय आघात[6], तेणें,
तत्पृष्ठास्थि[7] प्रबल असुनी मोडला पूर्ण, तूर्ण
दैवा, तूझे हरहर, किती खेळ वैचित्र्यपूर्ण[8] ! १२०
अस्ताव्यस्त स्थितिंत पडुनी रूपजीचें शरीर
मूर्च्छेनें[9] त्या प्रबलतमशा व्यापिलें शीघ्र फार
रामा शुद्धीवर लवकरी तेथ आणावयांत
झाले दोघेजण समयिं त्या श्रांतें[10] अत्यंत भीत १२१
मोठ्या यत्नें जल मिळवुनी एक त्यांतील आणी
तत्स्पर्शानें बहुत समयें तो[11] वदे मंद वाणी

१ नवीन. २ त्यांची चर्चा. ३ वर्णनास अयोग्य. ४ टेंकडीवर. ५ नाजुक जागेवर. ६ जोराचा सपाटा. ७ त्याच्या पाठीचा कणा. ८ आश्चर्यकारक प्रकारांनीं भरलेले. ९ बेशुद्धीनें. १० थकलेले. ११ (रामनाथजी.)

लागे जेव्हां परि हलु कण्हू राम पृष्ठास्थिभग्न[1]
तेव्हां त्याची स्थिति कळुनि ते होति दुःखाब्धिमग्न[2] १२२

एकाएकीं सुखगिरिशिरापासुनी जो निघाला
येई एका क्षणिं, अहह, तो राम दुःखाब्धिमूलीं[3]
ये तोंडाचें वरि शवकळा[4] ती मुहूर्तांत[5] एक
हा दैवाचा, हरहर, असे केवढा दुर्विपाक[6] १२३

तेथूनी तद्गृह न जवळी, यामिनी[7] ध्वांतपूर्ण[8],
गांवामध्यें कवणहि नसे शस्त्रविद्याप्रवीण
तेव्हां डोली करुनि झणि त्या नेउनी इंदुराला
द्यावा त्याला अगद, रुचलें हें तयांच्या मनाला १२४

डोली एक श्रम करुनिया मेळवूनी, तिच्यांत
मोठ्या कष्टें निजवुनि तया जाति ते तत्समेत
अर्ध्या मार्गावरि हळुहळू पोंचली मात्र डोली
तों रामाच्या अबलें[9] असुंच्या[10] वर्तिची[11] ज्योत गेली १२५

नाथस्वांतस्थिति[12] समयिं त्या जाहली शोच्य जी ती
वर्णायाला सकल, कविला नाहिं कौशल्य शक्ति
" न्यावें मातें त्वरित अपुल्या खोल पोटांत भूनें "
त्या ऐसें त्या भयद समयीं वाटलें निश्चयानें १२६

नाहीं हासल्पुर जवळ, तें इंदुरस्थान नाहीं,
तो रात्रीचा समय, तिथली माहिती त्या न कांहीं,
केव्हां मृत्यूत्तर[13] कृति असे नाथ हस्तें न झाली,
तेथें दोघांविण न तिसरा येइ आपत्तिकालीं १२७

ज्या नाथाला क्षणहि न सहे रूपजीचा वियोग
त्या जन्माचा विरह घडला, काय घोर प्रसंग !

---

१ मोडला आहे पाठीचा कणा ज्याचा. २ दुःखसमुद्रांत पडलेले. ३ दुःख समुद्राच्या तळाला. ४ प्रेतकळा. ५ घटकेंत. ६ वाईट कृति. ७ रात्र. ८ अगदीं काळोखी. ९ क्षीण. १० प्राणांच्या. ११ वातीची. १२ काशीनाथाच्या अंतःकरणाची अवस्था. १३ मरणानंतरची, और्ध्वदेहिक.

ज्याचें आस्यांबुज[1] बघुनिया हर्ष नाथास होई
त्या टाकावें अनलवदनीं[2] लागलें त्यां,[3] अगाई १२८

जी काळाची झडप पडली आपुल्या मित्रजीवीं
येती—जीवावरिच अपुल्या-ती जरी दुःस्वभावी
होतें तेंची खचित बरवें, त्या विचित्र स्थितींत
येई त्याच्या—फिरुनि फिरुनि याप्रमाणें—मनांत १२९

ते दोघे, तें शव उचलुनी नेउनीया स्मशानीं
मोठ्या कष्टेंकरुनच चितासाधनें मेळवूनी
त्या रामांगासहच अवघे आपुले सौख्यराशी
दुःखावेशें[4] रडत, करिती दग्ध,[5] अल्पावकाशीं १३०

त्याच्यापूर्वीं बहु जरि महा संकटें नाथिं आलीं
नाहीं कोण्या समयिंहि धृति त्यागुनी त्यास गेली
त्या कालीं त्या त्यजि धृति पुरी, एवढेंचि नसूनी,
हृष्टावृत्ती त्वरित पुरती जाय त्याला त्यजूनी १३१

तो एकांतीं बसुनि अपुला काळ काढी संचित[6]
बोले थोडें स्वजनिंहि, असे अन्न अत्यल्प खात
त्याला निद्रा लवभर न ये; अल्प येतां क्वचित् ती,
दुःस्वप्नीं त्या निशिदिनं[7] दिसे रूपजीराममूर्ति १३२

एकाएकीं अति भयद हें पातलें जें अरिष्ट
त्यायोगानें अति लवकरी नाथ झाला भ्रमिष्ट
जें जें त्याला प्रियकर असे तेंहि त्याला रुचेना
रम्य स्थानीं बसुनिहि कुठें चैन त्यातें पडेना १३३

वानप्रस्थाश्रम[8] धरुनिया, निर्जनारण्यिं[9] दूर
जावें कोठेंतरि, मनिं असा त्यास होई विचार

---

१ मुखकमल. २ अग्नीच्या तोंडांत. ३ (काशीनाथास) ४ दुःखाच्या झपाट्यानें. ५ जळून खाक. ६ चिंताकुल. ७ रात्रंदिवस. ८ सर्वसंगपरित्याग करून वनांत जाऊन राहण्याचा तिसरा आश्रम. ९ जेथें मनुष्यांचा वास नाहीं अशा रानांत.

किंवा, जावें नर कवणही ओळखीचा न जेथें
ऐसें वाटे फिरुनि फिरुनि त्या प्रसंगीं तयातें १३४
आहे कष्टप्रदच वसणें मृत्युलोकांत खास
ऐसें वाटे फिरुनि फिरुनी त्या प्रसंगीं तयास
माता, भ्राता, द्रविण, दयिता, मित्र, कोणी नकोसें
वाटूनी त्या, त्रिभुवन उदासीन अत्यंत भासे १३५
बाळ।भाऊप्रभृति[1] घरचीं माणसें थोर सारीं
तच्चित्ताच्या प्रशमिं[2] करिती यत्न सर्व प्रकारीं
कोणाच्यानें परि न भरवे शांति चित्तीं तदीय
तद्दुःखाचा कितितरि असे जोर तो, हाय हाय ! १३६
एकाएकीं स्वसुतमरणानिष्टवार्ता[3] श्रवून
झाली भाईस्थिति खचित ती रामतातासमान[4]
सौख्यस्थानीं मनुज असतां गाढ निद्रेंत, जेंवी
जावा क्रूराहिवदनिं[5] पळों; तद्दशा होय तेंवी १३७
त्या भाईची स्थिति बहु जरी यापरी शोच्य होती
नाथाचीही स्थिति परिसुनी स्वस्थितीसारखी ती
धैर्यें सारें गिळुनि अपुलें दुःख मोठ्या मनानें
पत्रें नाथाप्रत समजवी बोधुनी तो श्रमानें १३८
भाई बोले " खचित घडलें हें कुदैवें मदीय[6]
" काशीनाथा लवभर नसे त्यांत दोष त्वदीय[7]
" तेव्हां बाळा उगिच करुनी शोक ऐसा अपार
" चित्तीं आणीं कधिं न भलते आपुल्या तूं विचार १३९
" माझा दुःखभ्रम जरि कमी इच्छिसी तूं कराया
" तूं ये शीघ्र स्वजनिं पहिल्या वर्तनानें वसाया
" एकासाठीं उठुनिच जगांतूनि जावें दुज्यानें
" हें नाहीं, बा, कधिंहि बरवें कोणत्याही तऱ्हेनें " १४०

---

१ आदिकरून. २ शांति उत्पन्न करण्याच्या कामीं. ३ आपला मुलगा वारल्याची भयंकर वार्ता. ४ दशरथाप्रमाणें. ५ भयंकर नागाच्या तोंडांत. ६ माझ्या. ७ तुझा.

त्या भाईचा परिसुनि[1] असा धैर्यबोध प्रशस्त
तैसीं, ध्यानीं गुरुजनवचें आणुनीया समस्त
ये तो मुंबापुरिं परि वसे स्वीय धामीं न आधीं
कांहीं कालें, स्वजनिं परते दीर्घशोक[2]प्रबोधीं १४१

विद्याभ्यासक्रम पुढिल तो नाथ कालांतरानें
कष्टें लागे हळुहळु करूं नित्य पूर्वीप्रमाणें
त्यापूर्वींचा, परि, बहु तदुत्साह[3], आनंदवृत्ति,
जीं गेलीं त्यां पुनरपि नसे यावयाची प्रवृत्ति १४२

या दुर्वृत्ताप्रथम, गृहिणी[4] जो कराया तयार
तो हें होतांक्षणिंच फिरवी त्या दिशेचा विचार
हें आल्यानें घडुनि, अवघी जी जगाची रहाटी
तत्संबंधें सतत करि तो कल्पना चित्र मोठी १४३

तो जें कांहीं प्रतिदिन करी, वा, बघे या जगांत
तें तो ठेवी टिपुनि अवघें खासगी पुस्तकांत
त्याच्यामध्यें असति टिपल्या कल्पना ज्या तयाच्या
त्या वाचाया खचित असती अत्युदात्त[5] प्रतीच्या १४४

दीर्घाभ्यासें, पुनरपि मनीं नाणुनी देहरक्षा[6],
दे तो वर्षत्रयिंच[7] पहिली वैद्यकाची परीक्षा
पूर्वीपेक्षां कठिण असतां दोन वर्षें पुढील
आस्थेनें स्वाध्ययनरत तो होय उद्योगशील १४५

होतें विद्यालय बहु घरापासूनी दूर, तेणें,
वाटे कालक्षय करि तया आपुलें तेथ जाणें
घेऊनीया स्थल म्हणुनि त्या पाठशाळेसमीप
एकाकी तो दिवसरजनी[8], तेथ राहे अपाप[9] १४६

भेटायाला सकल अपुल्या मंडळीला म्हणूनी
स्वागारीं[10] तो विरल समयीं मात्र येई तिथूनी

---

१ ऐकून. २ उद्वेगांत. ३ त्याची उमेद. ४ बायको. ५ पोक्त सुविचारांनीं युक्त. ६ शरीराचें रक्षण. ७ तीन वर्षांतच. ८ रात्र. ९ निष्कलंक. १० आपल्या विन्हाडीं.

रात्रीं निद्रासुख सतत तो घेउनी तास तीन
बाकी साऱ्या अवसरिं[1] असे नित्य विद्यानिमग्न १४७
त्यानें, मध्यें, कितिक दिवशीं एकदां अन्न खावें
कांहीं कांहीं दिवस नुसतें दूध सेवीत जावें
राहे अन्नाविण कधिं, कधीं अन्न खाई अकाळीं
सारा विद्यालयविधि परी तो कधींही न टाळी १४८
जेव्हां विद्यालयिं मिळतसे त्यास विश्रांतिकाल[2]
पाही स्थानें रुचिरतम[3] तो आर्यभूमीमधील
तो आनंदें कितिक समयीं रम्य यात्रास्थलांस
नेई बुद्ध्या प्रियकर वयोवृद्ध त्या माउलीस १४९
विश्रांतीच्या समयिं फिरुनी रम्य नाना स्थलांत
या सृष्टीची अतुल रचना कौतुकें पाहण्यांत
तैसा, तीचा चतुर जनिता जो, स्तवीं त्या प्रभूचे
त्याला वाटे 'दिवसरजनी' सार साऱ्या सुखाचें १५०
सच्छीलानें, लघु वयिं मनोनिग्रहें स्तोमपात्र[4],
विद्याभ्यासीं सतत रत हा पाहुनी स्वीय[5] छात्र[6]
तैसी नानासमयिं बघुनी ही तितिक्षा[7] तयाची
अत्याश्चर्यें परिवृत[8] मनें होत अध्यापकांची[9] १५१
केव्हां केव्हां समय न मिळे त्या जरी खावयाही
स्नेही येतां कठिण समयीं त्या पुसायास कांहीं
आनंदें तो समजवुनि त्यां देइ, जें त्या कळे तें
तेणें, होई प्रिय बहुत तो सर्व विद्यालयातें १५२
दीर्घाभ्यासें, सुगुरुकडुनी लाभतां त्यास शिक्षा[10],
दे तो वर्षद्वयिंच[11] चरमा[12] वैद्यविद्यापरीक्षा
झाला त्याचा सुफलित मनःकाम[13], जी जाहल्यानें,
विद्यापीठें उपपद तया अर्पिलें आदरानें १५३

---

१ वेळीं. २ सुटी. ३ फार सुंदर. ४ स्तुतीस पात्र. ५ आपला. ६ शिष्य. ७ शांति, किंवा दुःख सहन करण्याची शक्ति. ८ वेढलेलीं. ९ गुरूंची. १० शिक्षण. ११ दोन वर्षांत. १२ शेवटची. (एल्. एम्. अँड एस्.) परीक्षा. १३ मनाचा हेतु.

याच्या पूर्वीं कितितरि असे वैद्यकी चालवीत
बाळाभाऊ करुनि पदवी प्राप्त ती मुंबईत
विद्यापीठाभिमत भिषग् होय तो ख्यात येथें
त्या वेळेला विसर पडला रावजींचा जनांतें १५४

त्या धंद्यानें धन मिळवुनी फार तो सुस्वभावी
पाळी पुत्रासमच अनुजा रावजींच्या अभावीं
मागे जें ज्या समयिं अनुज, प्रीतिनें देउनी तें
भाऊ तातस्मरण न कधीं होउं देई तयातें १५५

आयुर्वेदीं भरतमुनिचे, इंग्रजीवैद्यकांत,
आहे कोठें फरक किति तो शोधण्याचा समस्त
होता त्याचा कितिक दिवसांपासुनी वांछितार्थ
ज्याच्यासाठीं झटुनि शिकला आंग्लरुक्शास्त्र नाथ १५६

आंग्लस्थानोषधि, भरतभू जात ही, पाहुनीया
साधर्म्याच्या कितिक असती त्यांत तें शोधुनीया
अन्योन्यैक्यस्थिति करुनिया दीर्घ यत्नें, धनें, वा
त्याला होती बहुत करणें जन्मभूमातृसेवा १५७

संपादाया, ह्मणुनि, अवघें ज्ञान आंग्लोषधींचें
आंग्लद्वीपेक्षण करुनिया त्या असे यात्रयाचें
वाटे त्याला परि कठिण हें केंवि यावें घडूनी
थोड्या काळें परि बहु भला योग आला जमूनी १५८

लक्ष्मीविद्यागुणयुत सुधी इंदुरेश प्रसिद्ध
इंग्लंडाला ज्युबिलिसमयीं जावया होय सिद्ध

---

१ विश्वविद्यालयानें मान दिलेला. २ वैद्य. ३ धाकट्या भावास. ४ आर्यवैद्यकांत. ५ इष्ट हेतुला. ६ विलायती वनस्पती. ७ हिंदुस्थानांत झालेल्या ही वनस्पती. ८ सारख्या गुणांच्या व धर्मांच्या. ९ इकडल्या व तिकडल्या वनस्पती पाहून त्यांतून एक जातीच्या कोणत्या तें ठरविणें. १० संपत्ति, विद्या व सद्गुण यांनीं युक्त. ११ श्रीमंत महाराज बाळासाहेब होळकर. १२ श्रीमती महाराणी व्हिक्टोरिया यांच्या राज्याच्या ५० व्या वर्षीं झालेला अभिनंदन सभारंभ.

आला जाया नरपति[१] मुळे कृष्णरावासमेत
या बंधूंचा सुसुहृद असे जो मुळे फार शांत १५९
स्वारीमध्यें अतिशय असे इष्ट वैद्य प्रवासीं
चातुर्यानें समजवुनिया यापरी त्या नृपासी
घेवोनीया सविनय मुळे भूपतीची अनुज्ञा[२]
वैद्य स्वारीमधिल म्हणुनी नेइ नाथा कृतज्ञा[३] १६०
आनंदानें बहु करुनिया रॉजनौकाप्रवास[४],
स्वारी ये ती कितिक दिवशीं रम्य मार्सीलिसपुरास,
तेथें आल्यावर, लघु अशा खासगी कारणानें,
नाथा जावें–परविषयिं त्या लागलें एकट्यानें १६१
जाई ऐसा परविषयिं तो एकटा हें बघून
नाथस्नेही–निज मनिं–मुळे होय अत्यंत खिन्न
तेव्हां नाथा धनबल हवें तेवढें देउनीया
तो कष्टें भूपतिसह निघे आंग्लभूमीस जाया १६२
आला नाथावरि, समयिं त्या, फार घोर प्रसंग
त्या दावाया कवणहि नसे त्या विदेशांत मार्ग
अंशानेंही[६] अवगत नसे फ्रेंचभाषा तयातें
जावें कैसें तिथुनि न कळे त्याजला पारिसातें १६३
येता धीरावर जरि कुठें याप्रमाणें प्रसंग
झाला–थोडा तरिहि–असता खास तद्धैर्यभंग
हा धैर्याचा निधि, परि, महा संकटें भोगुनिया
गेला, काळें, बहु सुभग ती *राजधानी पहाया १६४
तेथें एका पथिकसदनीं नाथ होता बसून

---

१ रावबहादुर कृष्णराव वासुदेव मुळे बी. ए. यांच्या बरोबर हे देवास संस्थानांत पूर्वी दिवाण होते. नंतर इंदुरच्या दरबारांत महाराज होळकरांचे एक कौन्सिलर होते. हे उत्तम संस्कृतज्ञ असून सहृदय व रसिक होते. २ परवानगी. ३ केलेले उपकार जाणणाऱ्या. ४ पी. एन्ड ओ. कंपनीची विलायतेस जाणारी सरकारी टपालाची आगबोट. ५ परदेशांत. ६ माहित. * पारीस. ७ खाणावळींत.

जेथें लागे अतिशय नरा द्रव्य ऐसें बघून
जावें आतां त्वरित इथुनी केंवि इंग्लंडदेशीं
वाही चिंता दिवसरजनी तो स्वचित्तांत ऐशी १६५
त्या धीराची स्थिति बहु अशी शोचनीया बघूनी
झाला तुष्ट **प्रभुवर** तया, फार थोड्या दिनांनीं
चिंताक्रांत स्वगृहिं असतां बैसला. एक काळीं
आला तेथें नर बहु भला एक औदार्यशाली १६६
त्या देशीं तो सकरुण[1] **अलेक्झांडराख्य** प्रवासी
आला होता दुरुनि सदनीं **लंडना** जावयासी
तेथें चिंताकुल तरुण हा एकटा सुज्ञ धीर
पाहूनी त्या समयिं करुणा ये तयाला अपार १६७
प्रेमें त्याला कुशल पुसुनी वृत्त ऐकूनि त्याचें
झालें **नाथा**विषयिं सुमत प्रायशः त्या बुधाचें
तेव्हां **नाथ** प्रमुदित[2] मनीं होय हें पाहुनीया
नेई **नाथा** निज सदन तो लंडनीं दाखवाया १६८
तो व्यापारी नयरत असे सुज्ञ साहेब धीर
ज्याची कांता सुतहि असती सुस्वभावी उदार
त्याचा **नाथ** प्रियकर असे पाहुणा दीर्घ काल
गेलें होतें रुचुनि उभयां पूर्ण अन्योन्यशील[3] १६९
रम्य स्थानें विविध[4] तिथलीं नित्य हर्षे बघूनी
सत्संगानें विविध विषयीं माहिती मेळवूनी
चाली रीती बघुनि तिकडे राहणाऱ्या जनांच्या
यावें त्यानें परत अपुल्या स्थानिं राहावयाच्या १७०
या तद्देशाटनिं, सकलही शिक्षितांनीं सुचिंत्य[5]
ऐसें त्याच्याकडुनि घडुनी येतसे स्तुत्य कृत्य
तो न स्वापत्समयिंहि[6] करी कर्म केव्हां अशुद्ध
वागे कोण्या समयिं न मनोदेवतेच्या विरुद्ध १७१

---

१ दयाळु. २ हर्षलेला. ३ एकमेकांचा स्वभाव. ४ वेगळीं वेगळीं. ५ चांगल्या रीतीनें विचार करण्याला योग्य. ६ संकटाच्या वेळींसुद्धां.

केव्हां आपत्समयिंहि सुधी तो न भक्षी अभक्ष्य[१]
तैशा शीतें[२] स्थलिंहि मदिरापानिं[३] तो दे न लक्ष्य
उद्भिज्जांचें[४] अशन करुनी शीत देशींहि होतें
सौख्यें प्राणावन[५], उलट तो नित्य सांगे सभांतें १७२
तेथें त्याला कठिण समयीं मंत्र अत्यंत मान्य
द्याया कोणी नसुनिहि मनोदेवतेवीण अन्य
तेथें स्वैराचरणयुवतीभ्रूशराघातजालीं[६]
किंवा अन्य व्यसनिं[७] गवसे तो न कोण्याहि काळीं १७३
नाहीं तेथें प्रकृतिंत उणें वाटलें त्यास, तेणें,
जातां कांहीं समय, अपुल्या पूर्वहेतूप्रमाणें
जाया लागे मुदित तिथल्या पाठशाळेंत नाथ
रुक्शास्त्राचें सकल करुनी घ्यावया ज्ञान तेथ १७४
जातां कांहीं समय तिकडे वेळ वाईट आला
आजारानें अवचित मुळे फार बेजार झाला
कोणीही त्या समयिं नव्हतें साह्य द्याया तयास
हिंदुस्थाना[८] त्वरित म्हणुनी इच्छि तो यावयास १७५
तेव्हां नाथावरि असति जे कृष्णरावोपकार
फेडायाचा अवसर तया पातला शीघ्र फार
तो ठेवूनी त्वरित अपुला हेतु बाजूस सारा
आणी मित्रा बहु जपुनिया जन्मभूसिंधुतीरा १७६
या रीतीनें कितिक महिने त्या विदेशीं[९] वसून
आला मुंबापुरिस विविध ज्ञान तो मेळवून
यायापूर्वीं, स्वसुहृद अलेक्झांडराचा निरोप
घ्याया गेला, तंव तदुभयां दुःख झालें अमूप[१०] १७७
येथें आल्यावरि गृहजनां, सर्व मित्रां, स्ववृत्त
प्रेमें सांगे अवितथ, जसें ये घडूनी समस्त

---

१ खाण्यास अयोग्य असे मांसादि पदार्थ. २ थंड. ३ दारू पिण्याकडे. ४ कंदमूलफलांचें. ५ प्राणांचें संरक्षण. ६ स्वच्छंदानें वागणाऱ्या किंवा दुराचरणी बायकांच्या भ्रुकुटीरूप बाणांच्या जाळयांत. ७ संकटांत. ८ हिंदुस्थानास. ९ परदेशांत. १० फार.

आंग्लद्वीपानुभवलव त्या होय अल्पावधींत
जो, तो मोदें कथि मिळवुनी फार लोकां सभांत १७८
जातां कांहीं समय, अपुल्या पूर्वहेतूप्रमाणें,
आयुर्वेदाध्ययन झटुनी तो करी नाथ काणे
विद्वान् वैद्याकडुनि अवघें वैद्यकज्ञान त्यानें
संपादीलें झटुनि इथल्या वैद्यशास्त्रक्रमानें १७९
आधीं दीर्घोद्यमरति तया, तीव्र भारी मनीषा,
त्यांमध्यें त्या अवगत असे आर्यगीर्वाणभाषा
तो तैशांत प्रथमच असे आंग्लहक्शास्त्रसिद्ध
तेणें, झाला त्वरित बहु तो आर्यवैद्य प्रसिद्ध १८०
ऐसा झाल्यावरि निपुण तो दोनही वैद्यकांत
घेई कांचोपकरण, पडे जें तयाला पसंत
मोठ्या यत्नें धन विपुलसें खर्चुनी निश्चयानें
पाही नानागद करुनि तो वेगळाल्या तऱ्हेनें १८१
केव्हां आंग्लागद इकडल्या वैद्यकाच्या कृतीनें
केव्हां आर्यागद करितसे इंग्रजी पद्धतीनें
त्या दोघांचे गुण मग परीक्षूनि दीर्घश्रमांतीं
दोहोंपैकीं ठरवि कृति तो चांगली कोणती ती १८२
ऐसे आर्यागद करितसे तो स्वहस्तें कितीक
जे सेवूनी लवकर बरा होतसे रुग्ण लोक
दीर्घस्थायी गुण असतसे नित्य आर्यौषधांचा
ऐसा पूर्ण ग्रह लवकरी होय त्याच्या मनाचा १८३
एक्या धर्मौषधगृहिं इथें वैद्य होवोनि राहे
नाना रोगी प्रतिदिन जिथें तो तपासून पाहे
त्यां सर्वां तो बहुतकरुनी औषधें दे स्वदेशी
जेणें आर्यौषधगुण कळे त्यास अल्पावकाशीं १८४

१ पुष्कळ उद्योग करण्याची हौस. २ बुद्धि. ३ संस्कृतभाषा. ४ प्रयोग करून पहावयास जीं निरनिराळीं कांचेचीं भाडीं लागतात तीं. ५ वेगळीं वेगळीं औषधें. ६ पुष्कळ वेळ टिकणारा. ७ मत. ८ धर्माच्या दवाखान्यांत. ९ थोड्या काळांत.

या रीतीनें मग हलुहळू पंचवर्षावधींत
औदासीन्यस्थितींत[1] करुनी वैद्यविद्याक्रमान्त[2]
आंग्लद्वीपांतुनि परतुनी, भ्रातरंबाग्रहानें[3]
होई यौना फिरुनि अपुल्या सिद्ध[4] कालांतरानें १८५

काशीनाथा उचित नवरी शीघ्र शोधावयास
बाळाभाऊ विविध नगरीं पाठवी गौतमास
त्यानें, नाना स्थळिं फिरुनिया चांगल्याशा वधूंचें[5]
आनंदानें टिपण करुनी आणिलें शीघ्र साचें १८६

तो सर्वांचीं कथित असतां लक्षणें वेगळालीं
त्याचें एकीवर मन बसे, तद्गुणाख्यानकाळीं[6]
ही अर्धांगी[7] खचितच मला नेमलेली विधीनें
ऐसें त्याच स्थळिं झणि गमे त्याजला निश्चयानें १८७

अन्या[8] कन्या अधिक बरव्या वर्णितां गौतमानें
तो बोले “ जी प्रथम वरिली एकदां मन्मनानें
“ ती सोडूनी सुरुचिर असो दूसरी केवढीही
“ तीचें पाणिग्रहण[9] मजला मान्य होणार नाहीं ” १८८

कांहीं कांहीं समयिं, घडुनी यावयाचें, तयाचीं
चिन्हें होती प्रथम अगदीं दृश्य त्या त्या तऱ्हेचीं
नाथोद्वाहप्रकरणिहि[10] त्या होय तैसेंच सारें
तो बोले जें सकल ठरलें सत्य सर्व प्रकारें १८९

“ या कन्येनें मम मन जसें वेधिलें या क्षणास
“ तैसें तीचें मन सकलही मीहि वेधीन खास
“ ऐसें आहे गमत मजला या प्रसंगास, तेणें
“ हीशीं यौन त्वरित जुळवा ” तो वदे याप्रमाणें १९०

---

१ उदासस्थितींत. २ वैद्यकाच्या अभ्यासाचा शेवट. ३ भाऊ आणि आई यांच्या आग्रहानें. ४ तयार. ५ नवऱ्या मुलींचें. ६ तिच्या गुणांचें वर्णन चाललें असतां. ७ बायको. ८ दुसऱ्या. ९ विवाह करणें. १० काशीनाथाच्या विवाहप्रकरणांत.

तो बोले त्यापरि, नवरिच्या मातृतातादिकांस
सर्वांमध्यें वर बहुगुणी आवडे हाच खास
येतां सारें जुळुनिच, सखारामजा[1] गंगुबाइ
नाथार्धांगी, सुतनु[2] हरिची[3] श्री[4] जशी, तेंवि होई १९१
होते कोणी सुजन, अभिधा ज्यां सखारामपंत
जे राजाची करित असती चाकरी नाशिकांत
होते कर्णप्रिय बहु जसे स्वोपनामें[5] खरे ते
तैसे लोकप्रिय बहु खरे सर्व कर्मांत होते १९२
त्यांची पूर्णोपवर[6] तनया गंगुबाई[7] म्हणून
होती रूपें रुचिर बहु जी शुद्ध गंगेसमान
जी बांध्यानें सरळ, दृढही जेवि, तैशी मनानें,
शीलें शांतिप्रिय, सकरुणा, तीव्र अत्यंत धीनें १९३
काशीनाथें प्रथम अगदीं जी भविष्योक्ति केली
जातां अल्पावधि, गृहजनप्रत्यया पूर्ण आली
ऐसा त्यांचा प्रणय जडला एकमेकांवरी कीं
तें सर्वांना अनुपम दिसे जोडपें सर्व लोकीं १९४
[8]काशीनाथा प्रिय बहु उमा[9] जेवि विश्वेश्वरासी
काशीनाथा प्रिय बहु उमा होय शीलें कुळाशी
गंगाकाशीरमण[10] उभयां विश्रमस्थान जैसें
ती गंगा तत्प्रियरमण तो नाथ दोघेंहि तैसें १९५
संसाराचें जड शकट[11] हें ओढितां एक चक्रें[12]
तें हालेना त्वरित, सरतां तें सरे फार वक्रें[13]
दूजें त्याच्यासमच दुसऱ्या बाजुला त्या मिळालें
त्या वेळीं, तें सरळ गतिनें, शीघ्र अत्यंत, चाले १९६

---

१ सखारामपंतांची कन्या. २ सुंदर. ३ विष्णूची. ४ लक्ष्मी. ५ आपल्या आडनांवानें. ६ विवाहास पूर्ण योग्य. ७ ही प्रसिद्ध रा. रा. वामन सखाराम उर्फ बाबासाहेब खरे बी. ए. एल्. एल्. बी. नाशिक येथील वकील यांची धाकटी बहीण होती. ८ काशीपती श्रीशंकराला. ९ पार्वती. १० काशीपती श्रीशंकर. ११ गाडा. १२ चाक. १३ वांकडें.

ती कन्येच्या स्थितिंत अतुला जेंवि, तेंवी सुनेचे
जें भर्त्यांचें सुख, सुख तिचें दुःख जें, दुःख तीचें
होई नाथ त्वरित, म्हणुनी, त्या उमेचा सुखात्मा
झाली नाथप्रियकर सखी ती उमातुल्य रामा १९७
मर्यादा जी अतिशय असे स्त्रीजनाला अवश्य
होती तीची तिजवरि कृपा, जी असे लोकदृश्य
होतें तीचें लघु, अलघुही, सर्व कामांत लक्ष्य
ती नाथाची, ह्मणुनि, गृहिणी होय संसारदक्ष १९८
विश्रांतीचें सदन मिळतां ही उमा त्यास ऐसी
अल्पांशानें विसर पडला रूपजीचा तयासी
केव्हां एक स्थिति नृचरितीं राहिना सर्वदा, हें
ध्यानामध्यें सतत धरणयासारखें खास आहे १९९
त्याचा झाल्यावर परिणय प्रीतिचा तो सुयंत्र
स्थापी आंग्लौषधगृह इथें नाथ अल्प स्वतंत्र
जेथें रोगी प्रतिदिवस तो काळजीनें तपाशी
रोगी येती, म्हणुनि. बहुत प्रीतिनें त्याजपाशीं २००
प्रातःसायं प्रतिदिन तिथें नित्य त्यानें वसावें
प्रेमें मध्यंतरिं निज गृहीं बंधुला साह्य द्यावें
तेणें, भ्रात्या अनुदिन मिळे अल्प विश्रांतिसौख्य
जें त्या* वाटे खचितच असे सर्व सौख्यांत मुख्य २०१
त्या भ्रात्याला सतत पहिल्यापासुनी काव्यचित्रीं
होती मोठी अभिरुचि; नरा जेंवि हृद्यीं कलत्रीं
अर्थात्, त्याला प्रियकर गमे फार एकांतवास
जो आहे या उभय विषयां इष्ट अत्यंत खास २०२
होते प्राप्त स्थिति जगतिं जी मानवा ती, तयास
स्वप्राबल्यें बनवि बहुधा आपुला दीन दास

१ स्त्री. २ लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येणारी किंवा लोकांनीं बघण्याला योग्य ३ इंग्रजी औषधांचा दवाखाना. ४ दररोज. * ( बाळाभाऊस. ) ५ कविता आणि चित्रकला यांत. ६ आवड. ७ बायकोच्या हृदयहरण करणाऱ्या. ८ बायकोच्याठायीं. ९ आपल्या सामर्थ्यानें.

त्यायोगानें, कधिं कधिं, नरा आवडे जें स्वभावें
तें केव्हां ही न मिळुनि दुजें लागतें त्या करावें २०३
जों जों ज्यास्ती अनुभव तया‡ वैद्यवृत्तींत[१] येई
तों तों त्याला अधिक यश त्या वैद्यकीं येत जाई
लोकांची त्यावरति अधिक प्रीति वाढे, म्हणून,
बाळाभाऊवरि बहु असे जेंवि तीच्यासमान २०४
कांहीं काळें, अनुज अपुला आपणा हातभार
लावायाला अनुभवबळें पूर्ण झाला तयार
हें पाहूनी, श्रम सततचे आपुले घालवाया
भाऊ दूज्या स्थळिं कितिकदां जाय विश्रांति घ्याया २०५
तेव्हां दोन्ही अगदनिलयें चालवी तोच शान
तो दे रोग्या अगद, करुनी सूक्ष्म तद्रुग्निदानें[२]
त्यायोगानें, असुनि अवघे लोक राजी तयाला
बाळाभाऊ स्मरण न घडे त्यांमधूनी कुणाला २०६
अण्णा[३] कुंटे म्हणुनि इथला वैद्य विख्यात जेव्हां
जाई थोडे दिवस इथुनी, कारणें, दूर तेव्हां
त्याचें होतें अगदगृह जें खासगी, स्वीय धामीं
तो विश्वासें परम, तिकडे, वैद्य नाथास नेमी २०७
त्या भाऊच्या अगदसदनीं काम, कालांतरानें
वाढे जेव्हां अतिशय, न तें आटपे एकट्यानें
तेव्हां बंधू उभय मिळुनी काम तें संपवीती
तेव्हां सर्वां खचित अवघी मौज मोठी दिसे ती २०८
जेव्हां भाऊ नरगणिं[४] असे, नाथ नारीगणांत[५]
भाऊ नारीगणिं जंव असे, नाथ राहे नरांत
जेव्हां नारीनर बघतसे भाऊ, तान्ह्या मुलांस
नाथें द्यावा अगद; असली मौज लाभे जनांस २०९

---

‡(काशीनाथास.) १ धंद्यांत. २ त्याच्या रोगाची परीक्षा. ३ डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे, बी. ए एम् डी. मुंबईतील सरकारी ग्रँटमेडिकल कॉलेजांतील एक अध्यापक. ४ पुरुषमंडळांत. ५ स्त्रीमंडळांत.

ऐसे जेव्हां करित अपुलें काम दोघे मिळून
दोघे सर्वां सतत गमती आश्विनेयांसमान[1]
मोठे छोटे म्हणुनि अवघे लोक त्यां ओळखीती
ऐसे भ्राते उभय सम त्या एक धंद्यांत होती २१०
त्यांच्या येथें सुहृद्सुत वा पुत्र जे सोयऱ्यांचे
विद्येसाठीं वसत असती सुज्ञ, मोठ्या वयाचे,
त्या सर्वांना विविधविषयज्ञान द्यावें करूनी
काशीनाथें, सतत नियमें त्यांजसाठीं झटूनी २११
प्रत्येकाची अभिरुचि, तशी योग्यता, पाहुनीया
तो दे त्यांतें विषय नियमें काळजीनें शिकाया
प्रत्येकानें, नियमित अशीं नित्यकर्में करूनी
दीर्घाभ्यासें नव विषयहीं हा शिकावा झटूनी २१२
उद्भिद्विद्या[2], रसकृति[3], तशी यंत्रविद्योपपत्ति[4],
आर्यांग्लांचे[5] अगद, कविता, धर्म, वेदान्त नीति
तो दे यांच्यांतुनि विषय जो आवडे ज्या कुणास
ज्यामध्यें तो गति करुनिया देतसे शीघ्र त्यास २१३
थोड्या वेळीं कठिणविषयज्ञान द्याया जनांस
येई त्याला; म्हणुन बहुधा आवडे तो तयांस
त्याची विद्येवर असतसे भक्ति अत्यंत, तेणें
वाटे अध्यापन सुलभ हें त्याजला याप्रमाणें २१४
होता लोकीं जरि बहु तदध्यापनाचा प्रसार
लोकां झाला खचित असता लाभ त्याचा अपार
ज्या काळें हा अनुपम-जगा-लाभ होऊं दिला न
धिक् त्या, धिक् धिक् कुविधिसहि[6] या आमुच्या सत्वहीन २१५
होता मोठा सदय पहिल्यापासुनी नाथ, तेणें,
तो दीनांचें हित करितसे नित्य शक्तीप्रमाणें

---

१ अश्विनीकुमारांसारखे. २ वनस्पतिशास्त्र. (Botany) ३ रसायनशास्त्र. (Chemistry) ४ यंत्रविद्येचें ज्ञान. (Mechanics.) ५ आयुर्वेद व इंग्रजी वैद्यक याचें. ६ दुर्दैवास.

जो उद्योगप्रिय, मग असो कोणही तो, तयातें
थोडें उत्तेजन म्हणुनि तो देतसे द्रव्य हातें २१६

तैसा विद्याप्रिय बटु, असो जातिचा कोणत्याही
काशीनाथाकडुनि मिळवो नित्य साहाय्य कांहीं
अबदुल्‌नामा यवनसुत[1] त्या आवडे एक नित्य
कांकीं, विद्याप्रिय असुनि तो भाषणीं लीन, सत्य २१७

शाळेमध्यें, यवनसुत हा दीन, नाथास भेटे
ताताभावीं अतिशय जया पीडि दारिद्र्य मोठें
त्याची विद्यारति बघुनि तो देइ त्या अन्न खाया
तैसीं देई क्रमिक अवघीं पुस्तकें त्या शिकाया २१८

अब्दुल् भोळा बहु जरि, तरि पूर्ण होता कृतज्ञ
काशीनाथोपकृति[2] अवघी तो स्मरे नित्य सुज्ञ
नाथापाशीं सतत शिकुनी इंग्रजी अल्प कालीं,
त्यानें थोड्या समयिं लघुशी चाकरी* मेळवीली २१९

काशीनाथें विषय रुचिचा हातिं जेव्हां धरावा
तो मध्यें न त्यजुनि अपुरा, शेवटा नित्य न्यावा
या रीतीनें विविध विषयीं मोठमोठ्या सभांत
व्याख्यानांतें, समय मिळतां, तो असे श्राव्य देत २२०

होतीं काव्यें प्रिय बहुत त्या *लाँगफेलोकवीचीं
तें सर्वांत प्रियच अभिधा जीवितस्तोत्र[3] ज्याची
त्याची त्याच्यावरति पहिल्यापासुनी भक्ति होती
तेणें, संध्येपरि पठतसे नित्य तें तो दिनान्तीं २२१

तें त्या वाटे सरस इतुकें कीं तयानें म्हणावें
" कीं तद्भाषांतर सकलही विश्वभाषांत व्हावें

---

१ मुसलमानाचा मुलगा. २ काशीनाथाचे उपकार * मुंबईतील सरकारी. अकाउंटंट जनरलच्या कचेरींत. ३ याचें मूळ इंग्रजींतलें नांव Long fellow's Psalm of Life याचें जीवित स्तोत्र या नांवाचें भाषांतर काशीनाथ पंतानीं प्रस्तुत काव्यकर्त्यां कडूनच करवून छापवलें.

त्याचें भाषांतर करवुनी जन्मभाषेंत, मोदें
त्याच्या मित्रां फुकट नकला द्रव्य खर्चूनि तो दे २२२

या रीतीनें, सरस दुसऱ्या आंग्लदेशी कवींचीं
काव्यें त्याला असति अपुल्या देशिं आणावयाचीं
त्याची इच्छा जनहितकरा ही न सिद्धीस गेली
त्याच्या योगें परम अमुची आजला हानि झाली २२३

ज्येष्ठ भ्रात्यापरिच कविता आवडे फार त्यास
तैसा, आ[1]ध्यात्मिक विषयही आवडे तन्मनास
गीता प्रेमें कथिति भगवान् कृष्ण जी अर्जुनासी
ती त्या होती प्रियतम सदा, रामगीताहि तैसी २२४

विश्रांतीच्या समयिं, अपुल्या मानसें शुद्ध फार
एकांतीं तो प्रतिदिन करी रामगीताविचार
त्याचें सारें सुमन इतुकें रामगीतेंत रंगे
कीं त्या साक्षात्[2]रघुपति दिसे सस्मि[3]त स्वप्नसंगें २२५

सर्वांमध्यें प्रियतम असे त्या तुकारामवाणी
भक्ति, श्रेयस्[4] परम, नयही, जी अभंगांत आणी
सद्भक्तीचा सुगम पथ जो दावितो श्रेष्ठ संत
सर्वांमध्यें अतिशय पडे तो तयाला पसंत २२६

जे जे होती पुरुष जगतीं शूर, देशाभिमानी
त्या सर्वां तो अतिशय मनीं आपुल्या पूज्य मानी
त्यांचीं वृत्तें सुलभ लिहुनी जन्मभाषेंत, बाळां
द्यावीं विद्यालयिं गमतसे थोर त्याच्या मनाला २२७

होती नारी चतुर गृहिणी नित्य, ज्या शिक्षणानें
तें द्यावें त्यां; अधिक न असे इष्ट त्याच्या मतानें
स्त्रीमर्यादे उचित तितुकें नित्य द्यावें स्त्रियांस
स्वातंत्र्याचें सुख गमतसे नित्य त्याच्या मनास २२८

---

१ आत्म्यासंबंधीं ज्यांत विचार आहेत असा. २ प्रत्यक्ष श्रीरामचंद्र. ३ हास्ययुक्त. ४ मोक्ष.

देणें घेणें बघुनि घरचें चोख ठेवी हिशेब
देणें द्याया कधिंहि न करी अल्पही तो विलंब
देण्यामध्यें नियमित असे तो जरी याप्रमाणें
घेण्यामध्यें सवलत जनां देतसे नाथ काणे २२९

स्त्रीपुत्रांच्या तनुवरि निज स्वर्णराशी समस्त
ठेवायाचें, कधिंहि न गमे तन्मनाला प्रशस्त
सुव्यापारीं धन बहुतसें गुंतलेलें असावें
त्यानें सर्वां निज मत असें बोलुनी दाखवावें २३०

स्वातंत्र्याच्या स्थितिंत मिळणें द्रव्य, थोडेंहि, इष्ट
मोठा दास्यस्थितिंत घडणें लाभ, आहे अनिष्ट
त्याला होतें गमत पहिल्यापासुनी याप्रमाणें
अंगीकारी नच कधींहि तो चाकरी नाथ, तेणें, २३१

धीश्रीमंतीं सतत करुनी संघशक्तिप्रकाश
नाना शास्त्रें, द्रविणद कला, युक्तिनें, सावकाश
उद्योगानें, अतुल धृतिनें, चालवाव्या स्वतंत्र
ऐसा तो दे सतत अपुल्या योग्य मित्रांस मंत्र २३२

श्रीमंतांनीं निजधन सदा देत जावेंच फक्त
सूद्योग्यांना तदुचित असे त्याजपेक्षांहि जास्त
तो बोले कीं खचित घडतो योग्य तो दानधर्म
हें केल्यानें, फुकट इतरां दान देणें अधर्म २३३

नेनेराणेप्रभृति असती मित्र त्याचे पुराणे
मानी, उच्च स्थितिंतहि, तयां मित्र पूर्वींप्रमाणें
येतां त्यांच्यांतुनि कवणही त्या पहाया, स्वकर्म
त्यागूनी तो, प्रमुदित मनें, आचरी मित्रधर्म २३४

१ गुलामगिरी. २ पतकरीना. ३ बुद्धिमंत व श्रीमंत लोकांनीं. ४ जुटीचें सामर्थ्य दाखवणें. ५ (प्रस्तुत काव्यकर्ता) ६ रा. रा. विठ्ठल बापूजी राणे हे पाताणे प्रभु जातीचे गृहस्थ असून विद्वान् सभ्य, व सत्वशील आहेत. ७ जुने. ८ श्रेष्ठ.

नीत्याचारें[1] दिवस अपुले घालवी तो असे कीं
तैसें व्हावें, तदनुकरणें[2] मानवें मृत्युलोकीं
कोण्या कालीं म्हणवुनि न घे नाथ आरंभशूर
ऐसा त्याचा बुधमत[3] मनोनिश्चय ख्यात फार २३५
मोठ्या प्रेमें जनक धन जें त्यास देई अपार
तें नाथानें सकल जपुनी ठेविलें फार फार
जाणावें तें धन जरि असें वाटलें वाचकांस
"सत्यप्रीति" प्रचुर धन तें हें कथीं मीं तयांस २३६
त्या, सूद्योगाविण दवडणें आपुला काल, वाटे
जेव्हां तेव्हां अहितकरसें पाप अत्यंत मोठें
त्या उद्योगें श्रम बहुत जे होत ते तो हराया
जाई संध्यासमयिं बहुशा सिंधुतीरीं[4] फिराया २३७
आपत्तीच्या स्थितिंत अवघ्या, तो असे नित्य धीर
राहे जेव्हां गहनविषयध्यानिं, तेव्हां गभीर[5]
न्यायान्यायप्रकरणिं[6] असे सर्वदा सत्यवादी[7]
बाकी साऱ्या स्थितिंत बहुशा नाथ राहे विनोदी २३८
आधीं विद्या, विनय मग, हीं येति ऐशा क्रमानें
त्याच्या येथें क्रम परि न तो चालल्या कारणानें,
विद्येपूर्वीं विनय पहिल्यापासुनी त्यास होता
ऐसा कीं तो विनयच गमे नित्य लोकां समस्तां २३९
केव्हां क्रोधावसरिंहि[8] न तो वर्म काढी कुणाचें
बोले सर्वांजवळ अपुल्या गोड अत्यंत वाचें[9]
रोग्या, त्याची परिसुनि गिरा गोड आरंभकालीं
वाटे "आधीं प्रकृति बरवी आपुली आज झाली" २४०
केलें—मोठ्या वयिं जरि—असे आपुलें यौन त्यानें
तो राहे तोंवरिहि कडक ब्रह्मचर्यव्रतानें

---

१ नीतीच्या आचरणानें. २ त्याचा कित्ता गिरवून. ३ शहाण्या लोकांस मान्य. ४ समुद्र. ५ गंभीर. ६ न्याय अन्याय निवडण्याच्या कामांतल्या बाबतींत. ७ खरें बोलणारा. ८ रागाच्या वेळींही. ९ वाणी.

होता भारी दृढ निज मनोनिग्रहानें असा कीं
भासे सर्वां शुकच भगवान् ये पुनः मृत्युलोकीं २४१
तन्नीतीची, अनुपम मनोनिग्रहाची, प्रतीति
आली आम्हां बहुत समयीं हें कथाया न भीति
तैशा मोठ्या कठिण समयीं, मान्य विद्वज्जनांही
मोह स्तोक प्रबल पडता यांत संदेह नाहीं २४२
होऊं देई परि न अणुही तो मनोधैर्यभंग
आले त्याच्यावर जरि असे फार चित्र प्रसंग
ज्याला ऐशा समर्थि न दिसे नीतिवांचून अन्य
झाला साक्षात् नयपुरुष तो या जगीं धन्य धन्य ! २४३
वागे, चित्तीं धरुनि समता तो विनोदें सख्यांसीं
वागे, चित्तीं विनय धरुनी, पूज्य जे थोर त्यांशीं
वागे, नित्य स्वमनिं ममता ठेवुनी, सेवकांशीं
प्रेमें वागे अविरत असा नाथ साऱ्या जनांशीं २४४
केव्हां कोण्या स्थलिं न करि तो मातृतातापमान[1]
त्याच्या योगें कधिंहि न तयां दुःख झालें, म्हणून,
बाळाभाऊप्रकृति[2] अवघी आठवी नित्यशः तो
मानी तातासम सतत त्या बंधुरत्ना मरेतों २४५
तो रागावे विरल, कधिं त्या राग येतां चुकून,
त्याच्या तोंडामधुनि लघुही गालि[3] केव्हांहि ये न
गर्वाचा त्याजवळ न कधीं येतसे अल्प गंध[4]
झाला कोण्या समयिंहि न तो द्रव्यविद्यामदांध[5] २४६
जैसी पात्र स्तुतिस अवघी तन्मनाची तितिक्षा
तैसी, अध्यापनकुशलता[6], मानवांची परीक्षा
ही जी त्याची गुणगणकथा; तींत अत्युक्ति[7] नाहीं
हें जाणावें सहृदय[8] अशा आमुच्या वाचकांहीं २४७

---

१ आईबापांचा उपमर्द. २ बाळाभाऊचे उपकार. ३ शिवी. ४ वास. ५ धनाच्या आणि विद्येच्या गर्वानें आंधळा. ६ शिकवण्यांत चतुरता. ७ अतिशयोक्ति. ८ मर्मज्ञ.

होते वृद्धिंगत गुण जरी सर्व, कालांतरानें,
हे प्रख्यातिद्युतिंत[१] शिरते, या जगीं, निश्चयानें
लोकीं मोठा म्हणुनि सगळया गाजता तो अमूप
होओनी स्वप्रियभरतभूदेविचा रत्नदीपें[२] २४८
भोगायाचें बहु सुख नसे भालरेखीं तयाचे
किंवा, आहे खचित फुटकें दैव आम्हा जनांचें
धिक् त्या काला ! अनुचित अशा पूर्व कालीं, जयानें
नेला आम्हांमधुनि असला मोहरा क्रूरतेनें २४९
टाकूनी तच्छिरीं[३] सकलही थोर संसारभार
भाऊ, कांहीं दिवस, इथुनी होइ जाण्या तयार
भाऊ ऐसा मधुनिमधुनी एक दोन प्रसंगीं
जाई राष्ट्रप्रिय[४] परिषदे, दूरच्या दिग्विभागीं २५०
लोकीं राष्ट्रप्रियकर सभा. *वत्सरीं नव्वदाव्वे.
नाताळाच्या दिनिं भरविली कालिकत्त्यांत भावें
येई जेव्हां बहुजन, न तो खर्च भागे सभेला
तेणें, थोडे जन निवडणें प्राप्त झालें जनांला २५१
नेमावे ते इथुनि, बहु जे योग्य, थोडे, जनांत
ऐसें मुंबापुरिंत ठरलें एकचित्तें[५] सभेंत
भाऊची त्या प्रतिनिधि[६] गणीं योजना होत होती
त्या वर्षाची परि नव्हति त्या फार खात्री स्वचित्तीं २५२
होते कांहीं बुध भरतभूराजधानींत[७] मोठे
त्यां भेटावें बहुत दिवसांपासुनी त्यास वाटे
वाटे त्याला " जरि निवडुनी याहि वर्षास यें मी
" एका योगें घडतिल मला लाभ हे दोन नामी " २५३
" भाऊ विद्वद्वर[८] नर असे योग्य साऱ्या गुणांहीं "
हें पाहूनी, जन निवडिती त्यास थोड्या जनींही

---

१ प्रसिद्धीच्या प्रकाशांत. २ रत्नाचा दिवा. ३ त्याच्या शिरावर. ४ नॅशनल कांग्रेस अथवा राष्ट्रीयसभेला. * वर्षी ५ एकविचारानें. ६ सभेंत. ७ कलकत्त्यांत. ८ विद्वानांत श्रेष्ठ.

जेव्हां आलें समजुनि असें, हर्ष भाऊस झाला
सांगायातें सकल अनुजा तो घरीं शीघ्र आला २५४
आहे सर्वानुभव जगिं कीं " जें हंसे फार मूल,
" जातां थोडा समय, तितुकें निश्चयें तें रडेल "
आहे सर्व स्थितिंत बहुशा हें खरें न्यायतत्व
प्रत्येकाला बहुतकरुनी ज्ञात त्याचें महत्व २५५
बाळाभाऊ मुदित, सदनीं येउनी पाहतो तों
अत्यस्वस्थप्रकृति[2] अपुला बंधु त्याला दिसे तो
झाली होती अतिशय इजा [3]तत्पदांगुष्ठभागीं
होई जीनें असहनपरा वेदना त्या प्रसंगीं २५६
होई भाऊ बहुतच मनीं खिन्न पाहूनिया हें
[4]नष्टोत्साह त्वरित मनिं तो खिन्न होऊनि राहे
केव्हां, थोड्या अवधिंत, धनुर्वात होतो अशांस
हें जाणूनी अगद, जपुनी फार, तो दे तयास २५७
कांहीं कालें, जखम भरुनी यावया लागली ती
गेली थोड्या दिनिं मग धनुर्वातसंबंधभीति
हिंडूं लागे कितिक दिवसीं पूर्ववत् नाथ जेव्हां,
बाळाभाऊ मुदित अपुल्या मानसीं होय तेव्हां २५८
नाथा, वर्षामधुन बहुधा एकदां दोनदां वा
तापें एका नियमित[5] अशा, त्रास अत्यंत द्यावा
येई एक क्षणिं, भरुनिया हींव, तो ताप त्यातें
राहे थोडे दिवस परि तो एवढें नीट होतें २५९
येते त्याची जखम भरुनी थोडथोडी अशी, तों
एकाएकीं प्रबलतमसा ताप त्याला भरे तो
त्यायोगें ती जखम, जितुकी शीघ्र यावी भरूनी
नाहीं आली तितुकि, बहु त्या त्रास होई, म्हणूनी, २६०

---

१ समजलेलें. २ फार बिघडली आहे प्रकृति ज्याची. ३ त्याच्या पायाच्या आंगठ्याला. ४ झाली आहे नाउमेद ज्याची. ५ विवक्षित किंवा एका ठरलेल्या जातीच्या.

कांहीं काळें जखम अवघी नीट आली भरूनी
सर्वांच्याहि अतिशय मना हर्ष झाला ह्मणूनी,
आतां राष्ट्रप्रियपरिषदे जाउं का कालिकत्त्या
ऐसें भाऊ मुदित, समयीं त्या, विचारी स्वतः त्या २६१

आहे, माझी प्रकृति समयीं या बरी, हें खरें, बां,
वाटे मातें परि, फिरुनि तो ताप येईल, आबा,
माझा डावा नयन लवतो आज अत्यंत, तेणें,
" वाटे भीति प्रबल मजला, " तो वदे याप्रमाणें २६२

भाऊ बोले, " अनुपम तुझा देवभोळेपणा हा
पाहूनीया, क्षणभर मला ये हंसायाहि पाहा,
राहे तूझा शकुनफलिं[1] रे केंवि विश्वास, जेणें,
नाथा ऐसें तव मनिं शिरे वेड हें मी न जाणें " २६३

आहे तूला भयद नुकता ताप येऊनि गेला,
तूझा छिन्नांगुल समयिं या नीट तैसाहि झाला,
आतां चित्तीं करुनि अपुल्या कल्पनाजाल मोठें
कां हें नाथा भय धरिसि रे जें असे खास खोटें " २६४

"कांहींही तूं म्हण, परि, असे भाव माझा निमित्तीं
" कां कीं, तीं रे विविध समयीं मत्प्रतीतीस[2] येती
" तेव्हां, आबा, त्यजुनि मजला तूं नको आज जाऊं "
ही नाथोक्ति[3] श्रवुनि, फिरवी आपुला बेत भाऊ २६५

तेव्हां " आतां भय न उरलें अल्प नाथा, तशांत
" त्या भेटाया प्रतिदिवस मी येत जाईन येथ
" तेणें, राष्ट्रप्रिय परिषदे स्वस्थ जा भाउ आज "
ऐसें भाऊप्रत म्हणतसे गोखले[4] वैद्यराज २६६

त्या स्वोक्तीनें, अतिशय मनीं भाउ रंजीस झाला,
नाथाला हें कळुनि हृदयीं दुःख झालें तयाला

---

१ शकुनावर. २ माझ्या अनुभवांस. ३ काशीनाथाचें भाषण ऐकून. ४ डाक्टर विठ्ठल विष्णु गोखले. एम्. ए. एम्. डी.

तेव्हां, चित्तीं फिरुनि करुनी योग्य सारा विचार
देई आबाप्रत अनुज तो जावयाला रुकार २६७

गेला आहे भिउनि शकुनें व्यर्थ नाथ स्वचित्तीं
हें जाणूनी लवकर कमी होतसे भाउभीति
तैशामध्यें धृतिद वचनें ऐकुनी गोखल्यांचीं
भाऊ नाथाभिमत[1] धरि तो वाट मोदें सभेची २६८

भाऊ हेका कधिंहि अपुला एकही बाबतींत
नाथांशीं वा इतर कवणाशीं नसे चालवीत
त्यानें हेका प्रथमच असा त्याजशीं चालवीला;
यायाचें जें घडुनि तसली बुद्धि होई नराला २६९

होती नाथप्रकृति अगदीं स्वस्थ, तेणें, तयानें
गाडा कांहीं समय घरचा चालवीला सुखानें
एके संध्यासमयिं सदनीं येइ बाहेरुनी, तों
त्याला थोडी विकृति गमुनी, आंथरूणीं पडे तो २७०

जातां कांहीं समय, भरला त्याजला शीघ्र ताप,
आला नित्यक्रम धरुनि जो आपुलें उग्र रूप;
वाटे स्वास्थ्य क्षणिं, फिरुनि त्या वेदना होत भारी–
त्यानें दुःखस्थितित असल्या काढिली रात्र सारी २७१

प्रातःकालीं रवि उगवला, लोपलेला ढगांत
औदासीन्यव्यथित, म्हणुनी, लोक होती क्षणांत
मध्यें मध्यें क्षणभर दिसे सूर्य जेव्हां सतेज
तेव्हां थोडेंतरि सुचतसे त्यांजला कामकाज २७२

होते सारे स्वजन, दिनिं त्या, त्याजपाशीं बसून
त्यां तो बोले " मज गमतसे स्वास्थ्य थोडें, म्हणून
" कांहीं चिंता मनिं न करितां, जा तुम्ही गेहिं, खालीं, "
तेव्हां, खालीं सदनिं घरचीं माणसें सर्व आलीं २७३

---

१ काशीनाथाची संमति मिळालेला.

थोड्या कालें मग नर असे एकटा ह्याजपाशीं
नामें पद्माकर[१] म्हणुनी जो नाथ बोले तयाशीं
" घेरी येते मज गमतसे वाटुनी ये क्रमानें,
" मातें किंचित् धरुनि बस तूं सौख्य वाटेल ऐसें " २७४
तेव्हां सौख्यस्थितिंत बसवी त्यास तो काळजीनें
ठेवी त्याच्या तनुवरि[२] तैदा[३] नाथ शीर्ष[४] त्वरेनें
तेव्हां पद्माकर भिउनियां हांक मारी कुशाला[५]
तो येऊनी जंव बघतसे शीघ्र, तों घात झाला २७५
तन्नाडीचें स्फुरण[६] अवघें बंद झालें असून,
झालें होतें हृदय अगदीं सर्व चैतन्यहीन[७]
तेव्हां, वस्तुस्थिति[८] कळुनि त्या माणसां सर्व येई
हाहाकारें क्षणिं गृहजनीं एक कल्होळ होई २७६

आर्या.

अठराशें बाराव्या शकाब्दिं पौषांत, शेवटील दिनीं
नाथ स्वर्गीं गेला, भेटाया रूपजीसख्या, इथुनी. २७७

मंदाक्रांता.

आली होती स्थविर जननी मांडव्याहून येथें,
बाळाभाऊ हजर नव्हता त्या प्रसंगास तेथें,
होता ग्रामांतरिं निज गृहीं मित्र तो गौतमाख्य,
कोणीही त्या समयिं न असे त्या घरांतील मुख्य २७८
जी नाथांबास्थिति समयिं त्या शोच्य होऊन गेली
तैशी नाथप्रिय गृहिणिची जी दशा शोच्य झाली
ती वर्णाया मति न मजला, अल्प होतां क्वचित् ती
ती वर्णाया सकल मज न स्वल्प वांछाहि[९] चित्तीं २७९
कन्या, जीला म्हणत यमुना, जी स्वभावें, गुणांनीं,

---

१ रा. रा. पद्माकर केशव पटवर्धन म्हणून दवाखान्यांतला औषधें तयार करून देणारा मदतनीस. २ अंगावर. ३ तेव्हां. ४ डोकें. ५ रा. रा. कृष्णाजी त्र्यंबक ऊर्फ कुशाभाऊ डोंगरे म्हणून. हे मागाहून सुप्रसिद्ध बालामृताचे कर्ते झाले आहेत. दवाखान्यांतले मुख्य मदतनीस. ६ हालचाल. ७ निर्जीव. ८ खरा प्रकार. ९ इच्छा.

होती धन्या, तरुणपणिं ती मृत्युलोकामधूनी
गेली; त्याला अवधि अजुनी थोडकीही न झाली
तों ही दूजी जननिवर त्या घोर आपत्ति आली २८०
या वेळीं भू जरि उमलुनी स्वोदरीं घे अम्हांस
तीची आम्हांवरि उपकृती थोर होईल खास
त्या नाथांबागृहिणिस असें वाटलें त्या क्षणांत
दुःखा त्यांच्या कविहि न असे वर्णण्याला समर्थ २८१
भाऊ वाची, गतं[1] रजनिची तार काशींत जेव्हां
ये शोकाची अतुल भरती तन्मनामाजि तेव्हां
याया काशीहुनि लवकरी येथ तो जों निघाला,
तों, वाटेनें करित विविधा कल्पना ये घशाला २८२
त्याला मार्गांमधिल गमला काल वर्षाप्रमाणें
आतां मातें सदनिं कळतें काय तें कोण जाणें
या चिंतेनें उर धडधडे, गेहें[2]सान्निध्य येतां
द्वाराबाहेरिल जनमुखीं त्या दिसे स्पष्ट चिंता २८३
तोंडावाटे कवण न वदे एकही शब्द जेव्हां
गेलें त्याचें गळुनि अवघें संशयें धैर्य तेव्हां
त्या पाहूनी, गृहजनमनःशोकपूरा, रड्यानें
मोठे मोठे बहुत फुटती पाट मोठ्या जवानें[3] २८४
पृथ्वीकंप क्षणिं करितसे दुर्दशा, जेंवि लोकीं
किंवा, ज्वालामुख पळिं जसा, अग्नि लोकांगिं[4] ओकी
किंवा, कर्णीं अवचित शिरे तैल संतप्त, जैसें
हें दुर्वृत्त त्वरित शिरलें भाउकर्णांत तैसें २८५
पुष्पीं पत्रीं युत तरु जुना, आकृतीनें विशाल
झंझावातें[5] क्षणिं उपटुनी टाकि जैसा समूल
झाली भाउस्थिति पळि तशी, हाय रे हाय दैवा !
कट्या शत्रूप्रतहि असला वेळ केव्हां न यावा, २८६

१ गेल्या रात्रींची. २ घराच्या जवळचा भाग. ३ वेगानें. ४ लोकांच्या अंगावर. ५ वादळाच्या वेळचा वारा.

ज्या गोष्टीचें कधिं न पडलें स्वप्न भाउस, ऐसी
आली जेव्हां घडुन, न खरी ती गमे तन्मनासी
स्वाशास्तंभ क्षणिं करपला पाहुनी, हाय हाय,
त्या भाउचे खचित पुरते मोडले हातपाय २८७
ज्याचें होतें भय निघुनि तो नाथ त्यांतून पार
होतो साधा ज्वर भरुनि तो काय नित्यप्रकार
त्यानें नाथ क्षणिंच जग हें सोडुनी काय जातो
दुष्ट स्वप्नामधिल अवघा खेळ त्याला गमे तो २८८
जेव्हां भाउ[1]जनक जग हें दुष्ट सोडून गेले
त्या वेळींही, खचित न तया एवढें दुःख झालें
त्याच्या अंतःकरणिं शिरला अग्नि जो दुःखरूपी
तो, या जन्मीं, प्रशमित नसे व्हावयाचा कदापि २८९
"मी अंशानें अनुजमरणा कारणीभूत आहें"
ऐसा पक्का ग्रह चिकटुनी त्याजला नित्य राहे
त्या हा दुष्ट ग्रह करितसे सर्वदा फार जाच
नाडी–भोळया अतिशय, जना, नित्य जैसा–पिशाच २९०
स्वभ्रात्याच्या शिरिं करुनियां सर्व संसारभार
सद्ग्रंथासंग प्रिय असति जे जन्मतः त्यास फार
त्यांची सेवा करित बसणें नित्य एकांति त्यास
होतें इष्ट स्वनुजनिधनें तें नये पूर्णतेस २९१
भाऊचा त्या अनुज[2]निधनें सर्व उत्साह भंगे
त्याचें चित्त क्षणभर पुरें नित्यकृत्यीं न लागे
काशीनाथाविण जग गमे त्यास ओसाड दीन
केव्हां, कोण्या स्थलिंहि, न पडे तन्मना अल्प चैन २९२
त्या बंधूंत प्रणय वसला तो असे अद्वितीय
आहे ग्रंथांमधुनि जगतीं तो सदा वर्णनीय
नाथाभावीं जग सकल हें शून्य भाउस वाटे
त्यामध्यें तें तर मग असे काय आश्चर्य मोठें २९३

---

१ वामनरावजी. २ धाकट्या भावाच्या मरणानें.

स्वप्नें निद्रास्थितिंत पडतीं जीं तयालागिं नाना
त्या सर्वांचें कथन करितां या स्थलीं वाचकांना
आहे सारें अनुपम असें कल्पनासृष्टिजाल
ऐसें सर्वां गमुनि न मला खरा ते मानतील २९४

स्वप्नें बंधुप्रणय करिती व्यक्त ऐसा जगाला
कीं, मी त्यांचें कथन करितां, होइल ग्रंथमाला
आबा नाहीं मरणसमयीं भेटला त्यास, तेणें
भेटे स्वप्नीं अविरत तया नाथ तेणेंचि जाणें २९५

या जन्माचें सुखगृह असे उच्च भागांत, लांब,
तेथें जाया श्रम, धृति, हवीं त्याप्रमाणें विलंब
मार्गीं नाना असुनि खळगे, तीक्ष्ण कांटेतरूंचें
आहे तेथें बहुत भयही हिंसक श्वापदांचें २९६

ऐशा मार्गामधुनि पडुनी पार, कालांतरानें.
जातो नाथ प्रियसुखगृहीं जों धृतीनें, श्रमानें
तों, त्या काल क्षणिं उचलुनी नेतसे दुःस्वभाव
भारी दुःखप्रद गमतसे भाउला हें सदैव २९७

पंकीं[1], शीतानिलिं[2], उपजल्यापासुनि कष्टलेली–
कांहीं कालें–कमलकलिका[3], पाहुनी अंशुमाली[4],
थोडें थोडें वदन उघडी जों, तिला तों करीनें[5]
खावें एका क्षणिं, सकल हें होय तैशा तऱ्हेनें २९८

वाटे दुःखस्थितिकथन हें या प्रसंगीं पुरेसें
सांगावें जों अधिक अवघें आठवे दुःख ऐसें
तों तों, अंतःकरण अगदीं होउनी शोकपूर्ण
वाटे "शोकाकुलजनमना वेड लागेल तूर्ण" २९९

हे नाथांबे, खचित तुजला दुःख झालें अपार
थोडा आतां परि निज मनीं तूं करीं गे, विचार
"जो गेला तो परत न कधीं मृत्युलोकांत येई"
हें जाणूनी, नयन पुसुनी, आंवरीं शोक, बाई, ३००

१ चिखलांत. २ थंडीवाऱ्यांत. ३ कमलाची कळी. ४ चंद्र. ५ हत्तीनें.

तूं दुःखानें रडत बसतां नित्य; मोठे लहान
दूजे गेहांतिल जन रडूं लागती, त्वत्समान
बाळाभाउ तव सुत असे, व्योमिं जैसा मृगांक[1],
त्या पाहूनी लवहि न करीं यापुढें पुत्रशोक ३०१

याच्यापूर्वी तुजवरि किती घोर आले प्रसंग
तेव्हां जैसी करुनि वससी तूं सदा धैर्यसंग
या वेळींही, मन करुनियां घट्ट तैसेंच, बैस
भोगायाचें जगतिं असतें तें चुकेना कुणास ३०२

बाळाभाऊ! खचित असशी सुज्ञ मोठा विचारी
विद्वान् धीर[2]प्रकृति म्हणुनि ख्यात लोकांत भारी
तेव्हां, धीरें त्वरित गिळिलें पाहिजे दुःख सारें
हें सांगाया तुज नच अम्हां योग्य कोण्या प्रकारें ३०३

तूझें शुद्धाचरण बघती लोक जे आज, त्यांच्या
किंवा, बंधुप्रणय तुमचा पाहती जे, तयांच्या–
तूं अंशेंही अनुजमरणा कारणीभूत होसी
हें ये स्वप्नींहि न, मग असें कां गमे त्वन्मनासी? ३०४

होतें सारें जगतिं अपुल्या कर्मसूत्राप्रमाणें
तत्संबंधें उचित न असे दोष अन्यास देणें
या तत्वाचा न करिल जरी मर्त्य पूर्णावलंब[3]
त्यापासूनी, अविरत, समाधान राहील लांब ३०५

आहे तूझ्यावरति अवघा भार तूझ्या गृहाचा
तेव्हां ऐसा जरि, करिसि तूं शोक, बा, सोदराचा
तूझ्या हस्तें न घडुनि पुरें यावयाचें स्वकर्म
हें या वेळीं कथुनि तुजला, पाळितों मित्रधर्म ३०६

जें जें कांहीं जगतिं घडुनी नित्य येतें, तयांत
विश्वेशाज्ञा खचित असते न्यायनीतिप्रणीत[4]

---

१ चंद्र. २ धैर्यशाली. ३ पुरा आश्रय. ४ न्याय व नीतीनें प्रेरणा केली तीप्रमाणें.

ध्यानामध्यें सतत धरुनी तत्व हें नीट, आबा
मोठ्या धैर्यें गृहजनमना शांति दे सत्वरी, बा, ३०७

आबा, शोकाकुल जरि असा सर्वदा राहशील,
व्हावा तैसा खचित न जगा लाभ तूझा घडेल
ध्यानीं ऐसें सतत धरुनी, शांतिनें तूं वसावें
याच्यापेक्षां अधिक तुजला काय आह्मीं वदावें ३०८

हे नाथाचे अतुल दयिते ! सद्गुणी तूं असून
यावा आपद्गिरि[1] तुजवरी यापरी कोसळून,
हें पाषाणासमहि हृदया शोच्य वाटेल खास,
माझ्या पोटीं भडभडुनि ये पाहुनी त्वत्स्थितीस ३०९

नाथाशीं या जगतिं तव जो प्रीतिसंबंध झाला
होता दैवें खचित तितुका मात्र तो नेमलेला
हें जाणूनी, गिळुनि अपुलें दुःख सारें, रहा, गे,
ऐसें आत्यासम सति[2] तुला या प्रसंगास सांगें ३१०

होती वंद्य प्रियहि नर भूलोकिं जे पुण्यराशी
त्यांना आत्म्यावसरिं बहुशः विष्णु ने स्वांघ्रिपार्शी[3]
पुण्यश्लोकावरतिं बहुशः संकटें घोर येती
हें जाणूनी बहुत न करीं शोक, बाई स्वचित्तीं ३११

जें ज्या वेळीं जगतिं असतें याचयाचें घडून
तें टाळाया अणुभर बल ब्रह्मदेवासही न
तेव्हां, ज्या ज्या स्थितिंत मनुजा नित्य ठेवील देव
आहे त्या त्या स्थितिंत वसणें भाग त्या, गे सदैव ३१२

आहे अब्धीसम[4] खचित हें दुःख जें, तत्प्रवाहीं
येती विद्याधरमुनिरसानाथ[5]दैत्य स्त्रियाही
बाई, आहे, तर मग तिथें आपुला पाड काय
हें जाणूनी सतत वस गे शोक केल्याशिवाय ३१३

---

१ दुःखपर्वत. २ हे साध्वि. ३ आपल्या चरणापाशीं. ४ समुद्रासारखें. ५ राजे.

जैसीं पुण्याचरण असती आजपर्यंत, तैशीं
बाई राहीं अविरत पुढें, तूज विज्ञप्ति ऐशी
ठेवीं ध्यानीं सुविदित सती इंदुरेशा अहल्या
किंवा, तीच्यासम इतर ज्या ख्यात लोकांत झाल्या ३१४

ऐशा थोड्या वयिं तुज असें दुःख झालें, खरें हें
कोणी कोणा परि न सुख वा दुःख देऊनि राहे
जीं जीं कर्में मनुज करितो हा असे तद्विपाक
ऐसें ध्यानीं धरुनि, अवघा आवरीं तूं स्वशोक ३१५

काशीनाथप्रियसुहृद हो, मृत्युलोकामधील
शोच्यावस्था सुविदित तुम्हा निश्चयानें असेल
तेव्हां आतां त्वरित करुनी सद्विवेक, स्वचित्तीं
ऐशा शोका स्थिर करुं नका, आमुची ही विनंति ३१६

मन्मित्राचें चरित लिहिलें हें, यथाशक्ति, मी जें
तें वाचावें अखिल अमुच्या सज्जनांच्या समाजें
त्याच्या साऱ्या विमल चरितापासुनी निश्चयानें
ध्याया जोगा अनुपम असे बोध साऱ्या जगानें ३१७

विद्यादेवी वश करुनिया सत्वरी केंवि ध्यावी,
कैसीं धैर्यें कधिं न डगतां, थोर कामें करावीं
प्रेमें विद्यारतहित, यथाशक्ति, कैसें करावें
हें लोकांनीं विमल चरितापासुनी या शिकावें ३१८

जिज्ञासेनें[1], कठिण विषयीं ज्ञान तें मेळवून,
कैसा त्याचा सतत सुजना लाभ द्यावा करून
कैसें स्वोक्तीसमं[2] करुनिया सर्वदा दाखवावें
हें लोकांनीं विमल चरितापासुनी या शिकावें ३१९

अन्यायाचें म्हणुनि अवघें जें मना न प्रशस्त
तें केव्हांही न करुनि, मनोदेवताज्ञा समस्त
पाळूनीया, अविरत, मनःपूत कैसें वसावें
हें लोकांनीं विमल चरितापासुनी या शिकावें ३२०

---

१ समजून घेण्याच्या इच्छेनें. २ आपण बोलल्याप्रमाणें.

लोकांपाशीं, अतुल विनयें, गोड वाणी वदून,
लोकप्रीति प्रचुर अपुल्या सद्गुणीं मेळवून
कैसें दीनांवर सुममता ठेवुनीया वसावें
हें लोकांनीं विमल चरितापासुनी या शिकावें ३२१

सत्यप्रेमें परिवृत मनोनिग्रहानें वसून
भावें देवावरि भरंवसा नित्य सारा धरून
केव्हां मोहा न भुलुनि, कसें दक्षतेनें रहावें
हें लोकांनीं विमल चरितापासुनी या शिकावें ३२२

देवा नाथ त्वरित इथुनी पातला त्वत्पदास
भोगूं दे त्वत्पदसुख दयासागरा नित्य त्यास
जोडूनीयां निज कर असें तूजला नम्रतेनें
नाथप्रेमी गणपसुत[1] मी प्रार्थितों विष्णु नेने ३२३

---

१ गणेशपुत्र.

# THE LATE DR. S. W. KANE.

[ Being an address delivered by Mr. D. G. Padhye at a public meeting of the Hindu community held in Bombay on the 11th June 1900 under the auspiecs of the Aryan Social Union, Sir ( the then Hon. Mr. ) Narayan G. Chandaverker presiding. ]

GENTLEMEN,

The late Dr. S W. Kane, to pay to whose memory the due homage of sincere admiration and heartfelt reverence we have assembled here to-night, was a unique individuality. Complex and multifarious and therefore, sometimes hard to understand and harder still to analyse were the phases and shades of the human excellences with which Providence had endowed him plentifully. It was not, therefore, without great diffidence, gentlemen, that I accepted the kind invitation of my friend, Mr. Sunderlal, the Secretary of the Aryan Social Union, to fill the melancholy role of sketching the life and character of the noble soul, that unsparing death has so prematurely taken away from amongst us. The difficulty of doing justice to a character like Dr. Kane's can never be small; nor can it be lightened by the positive knowledge that in its main and broad outlines, that character was clearly discerned and feelingly appreciated by a thousand and one friend, relation and distant admirer. Never however did the idea cross my mind that I should decline Mr. Sunderlal's invitation. I was one of those who enjoyed the proud privilege of being intimate and free with Dr. Kane, and as such, have

often shared in his joys and pleasures, in his cares and anxieties, and at each serious communion with his thoughts and sentiments, gratefully perceived that my heart and head were both being lifted up to a higher and higher standard of moral elevation. It would have been a height of ingratitude to fail to take the opportunity of doing public homage to the memory of one entitled to so much gratitude. It is, besides, an education in itself to analyse and unfold a character, which, like a jewel of the purest water, shines the more brilliantly, the more closely you approach it and the more precisely you know the inner mainsprings of the bewitching grandeur which captivates the eye even from a distance.

